म ग्र सं ठाणें
विषय निबंध
स. क्र. ९५७८

व.भ.कर्णिक



# काय सांगू तुम्हाला!

RFI BK-0013736

२६६६५
१५६६४०
अँ, शा
७५२८

# काय सांगूं तुम्हांला ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. १३५३६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .. ३८८८५ दि: ...
आ‍क ...१५२८... नों दि १५-८-८४

लेखक
**द्वा. भ. कर्णिक**

मूल्य रु. ७–५०

RLFBK-0013736

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति, पहिली : १९६४ फेब्रुवारी

© द्वा. भ. कर्णिक

चित्रकार : अनंत सालकर

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या
३८१ क, शनिवार, पुणें २

मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

# प्र स्ता व ना

प्रा. अनंत काणेकरांच्या 'पिकली पानें' नंतर, प्रा. गो. वि. करंदीकरांच्या 'स्पर्शाची पालवी'चा ठळक अपवाद सोडल्यास द्वा. म. कर्णिक यांच्या प्रस्तुत पुस्तकाएवढा वाचनीय लघुनिबंधसंग्रह माझ्या तरी पाहण्यांत आलेला नाहीं.

आल्डस हक्सले यानीं निबंधाच्या गुणवैशिष्ट्याबद्दल जें विवेचन केलें त्यात दुरुस्ती करणें वा त्याला पुस्ती जोडणें कठीण जाईल. तें म्हणतात : "मन मानेल त्या विषयावर मन मानेल ते सागण्याची वाङ्मयीन युक्ति म्हणजे निबंध...( आत्मवृत्तपर, वस्तुनिष्ठ आणि भावात्मक यांपैकीं ) एक किंवा दोन जगाचा नव्हे तर या तीनहि जगाचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करणारे निबंध हे सर्वात जास्त समाधान करतात. ह्या तीनहि जगांच्या संगमातच निबंधाला जगतां येतें. या कला-प्रकारांतील परिपूर्ण कृतींत विचार आणि भावना यांचा या तीनहि ध्रुवांच्या दरम्यान—वैयक्तिकातून विश्वात्मकांत, अमूर्ताकडून परत समूर्तात आणि वस्तुनिष्ठ सिद्धान्तांपासून तो आंतरिक अनुभूतीपर्यंत मोकळेपणानें आणि सहजपणें इकडून तिकडे संचार चालू असतो." माझें भाषांतर थोडेंफार सैल आहे याची जाणीव मला आहे. मुळांत तें पुढीलप्रमाणें आहे :

The essay is a literary device for saying almost everything about almost anything .....The most richly satisfying essays are those which make the best use not of one, not of two, but of all the three worlds ( autobiographical, factual and abstract ) in which it is possible for the essay to exist Freely, effortlessly, thought and feeling move in these consummate works of art, hither and thither between the essay's three poles--from the personal to the universal, from the abstract back to the concrete, from the objective datum to the inner experience

ह्या सर्व छटा द्वा. म. कर्णिक यांच्या निबंधांत प्रत्ययाला येतात : कधीं दाट तर कधीं तरल स्वरूपांत.

जें क्षणिक आहे, तात्कालिक आहे त्याला सौंदर्याचा साज चढवून चिरजीवित्वाचा लाभ करून देणें हें कलावंतालाच शक्य असतें. वृत्तपत्रीय लिखाण हें सामान्यतः अल्पजीवि गणलें जातें. पण राजकीय आणि सामाजिक संघर्षांच्या कोलाहलांतून गुदमरलेला सत्याचा, सौंदर्याचा आवाज एखादा लेखक व्यक्त करतो तेव्हा त्याला वाङ्मयाची कळा लाभते. दुर्बोध, अवजड, बोजड अग्रलेखातून जें साधायचें असतें पण साधलें जात नाहीं तें ह्या आशावादीच्या स्तंभांतून चपखलपणें साधलें गेलें आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'चे अग्रलेख किती जण वाचतात हें मला माहीत नाहीं. पण 'आशावादी' हें सदर न वाचणारा वाचक विरळा.

उपहास आणि उपरोध हीं विरोधकांच्या विरुद्ध वापरायचीं शस्त्रें मुक्तहस्तानें कर्णिकानीं वापरलीं आहेत; तद्वत्‌च जें आवडलें, आदरणीय वाटलें, त्याचा त्यानीं मुक्तकंठानें गौरव केला आहे. आपल्या अणकुचीदार लेखणीनें काढलेलीं व्यक्तींचीं रेखाचित्रें यांत आहेत; राजकीय उलथापालथींचें आपल्या रॉयिस्ट, मानवतावादी ( आणि आतां ) चष्म्यांतून केलेलें विश्लेषण आहे आणि रसिक मनानें घेतलेला कलेचा परामर्शहि आहे. खेळीमेळीच्या, सलगीच्या स्वरात ते

एखादी कोपरखळी घेतील, एखादें गुपित सांगतील, उपरोधाचा झगझगीत झोत टाकून एखादें सामाजिक व्यंग उघड करतील आणि प्रसंगीं तुम्हांला विश्वासांत घेऊन आपल्या अंतरींचें शल्यहि प्रगट करतील.

इथें कर्णिक गंभीर मुद्रा करून आणि कपाळाला आठया घालून संपादकीय खुर्चीवर बसलेले नाहींत. तर ऐसपैस लोडाला टेकून ते तुमच्याशीं दिलखुलास गप्पा मारीत आहेत. या सबंध संग्रहांत एकहि उद्‌गार उथळ नाहीं, एखादें वाक्यहि अवखळ नाहीं, एखादा विषयहि वायफळ नाहीं असें मला म्हणायचें नाहीं. पण इतक्या प्रसन्नपणें, आडपडदा न ठेवता हें हितगुज करण्यात आलें आहे कीं त्याची मोहिनी न पडली तरच नवल.

ह्या संग्रहाला प्रस्तावनेची गरज होती का? एकदां वाटतें, लिहिली; बरें झालें. पण लिहिली नसती तर — ? तर त्याहूनहि बरें झालें असतें, असा अस्वस्थ करणारा विचार मनाला पुनःपुन्हा स्पर्शून जातो हें कबूल करायलाच हवें.

मुंबई,
७ फेब्रुवारी, १९६४

नाथ पै

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | सवतचि मासे मला | १ |
| २ | जेव्हा डोळ्याच्या कडाहि पाणावल्या | २ |
| ३ | एक कविहृदय | ३ |
| ४ | मि. स्पीकर, सर ? | ४ |
| ५ | राजकारणांतील काव्य ! | ५ |
| ६ | फुलला निशिगंध | ६ |
| ७ | काठी आणि चहाचा प्याला | ७ |
| ८ | 'माती असती मातित मिळसी' | ८ |
| ९ | क्रुश्चेवच्या पाठीवर थाप | ९ |
| १० | 'जहान्नम् में जाव' | १० |
| ११ | मूर्ति ठेंगणी पण— | ११ |
| १२ | एकच अखेरची झेप | १२ |
| १३ | स्वप्न-रजनात गुंगणारा मंत्री | १३ |
| १४ | निस्तब्ध बसलांत तर | १४ |
| १५ | जेव्हां १४ वनराज पळाले,... | १५ |
| १६ | 'घटका जाती पळें जाती' | १६ |
| १७ | 'बाई, तोल सोडू नको' | १७ |
| १८ | पाहू बरें कोण पुढें पळे तो ? | १८ |
| १९ | रानटी युगाचा आचार | १९ |
| २० | आकड्याची किमया | २० |
| २१ | पराजयाचें चिन्ह | २१ |
| २२ | अवखळ हिमालय-कन्या | २२ |
| २३ | अवकाशाचा भेद | २३ |
| २४ | 'मगल होईल देशांत' | २४ |
| २५ | विनोबा आणि कुराण | २५ |
| २६ | अशीच एक आठवण | २६ |
| २७ | 'अजि म्या सिंह पाहिला' | २७ |
| २८ | झाडें ? पण पैशाचीं | २८ |
| २९ | 'प्रे नाऊ; प्लाय लेटर' | २९ |
| ३० | विसरभोळे प्राध्यापक | ३० |
| ३१ | 'हे राम !' | ३१ |
| ३२ | एक दुर्मिळ वाहन | ३२ |
| ३३ | वाऱ्यावरची वरात | ३३ |
| ३४ | हत्तीची आत्महत्या | ३४ |
| ३५ | वादळ उठविणारें व्यक्तित्व | ३५ |
| ३६ | घर घरमें दिवाली | ३६ |
| ३७ | फोडणीची लज्जत | ३७ |
| ३८ | बोलकें दिग्दर्शन | ३८ |
| ३९ | पाण्याविना स्वागत | ३९ |
| ४० | वाटाघाटी ! ! | ४० |
| ४१ | 'लीधो' आणि 'बेचो' | ४१ |
| ४२ | 'चलो क्यूबा | ४२ |
| ४३ | प्रज्ञावंताची कदर ? | ४३ |
| ४४ | भोळीं खुळीं गवसती जीं .. | ४४ |
| ४५ | अश्लील आणि ओंगळवाणें | ४५ |
| ४६ | श्रद्धांजलि | ४६ |
| ४७ | शब्द आणि शब्द | ४७ |
| ४८ | अण्णा आणि 'बाबा' | ४८ |
| ४९ | 'दे दान सुटे गिऱ्हाण' | ४९ |
| ५० | 'ऑल स्टार क्रिकेट मॅच' | ५० |
| ५१ | नियतीची वाटचाल | ५१ |
| ५२ | आम्हांला काय विचारतां ? | ५२ |
| ५३ | आता हसा बरें ! | ५३ |
| ५४ | कालगति | ५४ |
| ५५ | शांतिसैनिक | ५५ |
| ५६ | ...तीं वाघनखें | ५६ |
| ५७ | चमत्कार ! ! ! | ५७–५८ |
| ५८ | एकच प्याला | ५९ |
| ५९ | अश्लीलतेचे पुरावे | ६० |
| ६० | 'लेफ्ट राईट' | ६१ |
| ६१ | उपोषणाचा प्राण वाचला | ६२ |
| ६२ | भिंतीवरील साजशृंगार | ६३ |
| ६३ | मज विफल गमे ग... | ६४ |
| ६४ | पितृभूमीशीं निष्ठा | ६५ |
| ६५ | नवें आव्हान | ६६ |
| ६६ | येशिल कधिं परतून ? | ६७ |
| ६७ | नादस्वरम् | ६८ |
| ६८ | सरदार स्वर्णसिंह | ६९ |
| ६९ | १९६२ | ७० |
| ७० | माझिया माहेरा जा | ७१ |

७१ मृदूनि कुसुमादपि ७२
७२ या इथें तरुतळीं ७३
७३ जिद्द खरी ! ७४
७४ सिमेंटमधील वाळू ७५
७५ ‘ अजि नवल वर्तलें ’ ७६
७६ तुमच्या आरोग्यासाठी ! ७७
७७ रायगडाला जेव्हां जाग येते ७८–७९
७८ नजरबंदी ८०
७९ नष्ट होणारा दुवा ८१
८० मी त्यांना म्हटलें ८२
८१ सुवर्णतुला ८३
८२ बाळलेणें ८४
८३ पर्ल बक ८५
८४ रेंगाळणारा दिवस ८६
८५ बोला अमृत बोला ! ८७
८६ हुडा म्हणून– ८८
८७ साधु संत येती घरा ८९
८८ तेजोवलय ९०
८९ मोशीचें पानशेत ९१
९० परमेश्वर साक्ष ९२
९१ पतंगाची झेंप ९३
९२ आमची बिदागी ९४
९३ बालहत्या ९५
९४ नाचरीं पावलें ९६
९५ पोर रुसली ! ९७
९६ “ नामदार अर्थमंत्री ” ९८
९७ पितृछाया गेली ९९
९८ नशिबाचा खेळ १००
९९ सवतीमत्सर १०१
१०० ही कबर कोणाची ? १०२
१०१ आज हमारी होली १०३
१०२ पंडितराज जगन्नाथ १०४
१०३ सामर्थ्य मात्र द्यावें १०५
१०४ संपादक महाराज. १०६
१०५ सागरा, तूच मला आधार १०७
१०६ खुणेचा शब्द १०८
१०७ गुढ्या आणि तोरणें १०९
१०८ जिवाची मौज ११०
१०९ गड आणि पुतळे १११
११० एप्रिल फूल ११२
१११ परिसंवाद ११३
११२ अज्ञान हें वरदान नव्हे ११४
११३ बेटा सिराजुद्दीन.. ११५
११४ रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ११६
११५ सोमपान आणि सुरापान ११७
११६ हिमालयापेक्षा प्राचीन ११८
११७ आध्यात्मिक अस्त्र ११९
११८ शंभर टक्के महाराष्ट्रीय १२०
११९ गुल्मोहोर १२१
१२० “ हें काय असें होई ” १२२
१२१ शेजारच्या घरीं तू... १२३
१२२ धार आणि विमान १२४
१२३ महाराष्ट्रस्य राज्यस्य १२५
१२४ महाराष्ट्र–दर्शन १२६
१२५ विषाची परीक्षा १२७
१२६ एक आकांक्षा, एक स्वप्न १२८
१२७ आत्म्याला आवाहन १२९
१२८ तोचि साधु ओळखावा १३०
१२९ स्त्री आणि मुत्सद्दी १३१
१३० झाकिर हुसेन १३२
१३१ लाल फीत १३३
१३२ सागराला आव्हान १३४
१३३ उठा बंधूनो,उठा भगिनींनो— १३५
१३४ फ्लॅश, फ्लॅश, फ्लॅश १३६
१३५ जन्ममरणाचा फेरा १३७
१३६ तुम्ही आणि आम्ही १३८
१३७ धन्य, धन्य, धन्य १३९
१३८ व्ही आय्. पी. १४०
१३९ चारशें वीस १४१
१४० आनंद–निधान १४२
१४१ सत्कारांची पर्वणी १४३
१४२ साजिरें गीत १४४
१४३ सुरसुख खनि तू विमला १४५
१४४ पहिला वाढदिवस १४६
१४५ कोण तो ? आणि कोण ती ? १४७
१४६ “ आला खुषित समिंदर ” १४८

१४७ जूते पैजार १४९
१४८ बेटा कॉन्डुइट १५०–१५१
१४९ एकच प्याला १५२
१५० सहजीवनाचा आदर्श १५३
१५१ परमेश्वराची करणी ! १५४
१५२ हांक मनाची, कीं हृदयाची ? १५५
१५३ तीं संथ, कोमल पावलें १५६
१५४ श्री. बळवतराय मेहता १५७
१५५ डॉ. श्रीमाळी १५८
१५६ श्री. जगजीवनराम १५९
१५७ खुबसुरत १६०
१५८ अजुनि चालतोचि वाट १६१
१५९ महाराष्ट्राची सून १६२
१६० भव्य आणि दिव्य १६३
१६१ मॉस्कोंत पगडी १६४
१६२ उद्‌घाटन ! ! १६५
१६३ अश्लीलतेचें मोजमाप १६६
१६४ कोरडा उन्माद १६७
१६५ अंधाऱ्या जगाचा सूत्रधार १६८
१६६ स्वप्न कीं सत्य १६९
१६७ बाळा, जो जो रे १७०
१६८ मग उरलें काय ? १७१
१६९ स्वतःस ओळखणारा पुढारी १७२
१७० केल्यानें देशाटन १७३
१७१ ज्ञानपीठ १७४
१७२ चमत्कार १७५
१७३ ‘ पंडित हाउस ’ १७६
१७४ लेडी गोडायव्हा १७७
१७५ राजा राममोहन रॉय १७८
१७६ नवा पुरुषावतार १७९
१७७ देवा, क्षमा कर १८०

**स मा प्त**

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १५ | याचे | हुतात्म्यांचे |
| | १७ | हींच लोकांतील | हींच स्वर्ग लोकातील |
| ४ | २४ | सरदारसिंग | सरदार हुकुमसिंग |
| ९ | २७ | मौलिकें | मौक्तिकें |
| १६ | २२ | योड्याशा | थोड्याशा |
| १९ | २० | पुर | तर |
| २६ | १७,२२ | दक्षिणच्या | दख्खनच्या |
| २९ | ५ | एअर इंटरनॅशनल | एअर इंडिया इंटरनॅशनल |

# ‘ सुवतचि भासे मला ’

तुम्हांला वाटेल, मी एक दगडी पुतळा आहें. मला भावना कोठल्या, वेदना कोठल्या आणि माझ्याशीं हितगुज कोण करणार ? आणि मी माझें हृद्गत तरी कोणाला सांगणार ? पण तसें नाहीं बरें ! दगडी पुतळ्याचें मी जरी रूप घेतलें असलें, तरी मी खरोखरी एक अप्सरा आहें, आणि पृथ्वीवरील तुम्हां लोकांना जेवढें ज्ञान मिळत नसेल त्यापेक्षां किती तरी पटींनीं अधिक ज्ञानाचा ठेवा माझ्या स्वर्गलोकांतून मला ठायीं ठायीं प्राप्त होत असतो.

तुम्हीं ओळखलें नाहींत ना मला ? मीच ती देवता—फ्लोरा फाउंटनच्या चौकांत जी अव्याहत उभी आहे. तुम्हाला वाटतें मीं डोळे मिटलेले आहेत आणि मला काहीं ऐकूहि येत नाहीं. तो भास मी आज वर्षानुवर्षें कायम ठेवला आहे. पण मीं सारें काहीं पाहिलें, अनुभवलें आहे; जाणलेंहि आहे. तो काळ—तुम्हांला आठवतो का ? ज्या वेळीं स्वातंत्र्यासाठीं तुम्ही लढत होता, त्या वेळींहि गोळीबार झालेला मीं पाहिला, अश्रुधुरानें माझेहि डोळे तुमच्याप्रमाणेंच लाल झाले होते. त्या वेळच्या संतप्त मिरवणुकीहि मीं पाहिल्या आणि नंतरचा तुमचा विजयोन्मादहि मीं या डोळ्यांनीं पाहिला.

तुम्हांला नसेल इतकी स्वातंत्र्याची मला आच आहे. कारण आमच्या स्वर्गलोकांत बंधनें नाहींत आणि निर्घृणताहि नाहीं—जी राज्यकर्त्यांनीं राज्यपुनर्रचनेच्या आन्दोलनाच्या वेळीं दाखविली. तुम्ही सारेच—जण आज तळमळतां आहा आणि त्यांचें स्मारकहि आज तुम्हीं माझ्याच समोर उभें करीत आहा. त्या स्मारकाला मी कसा विरोध करूं ? नाहीं ! नाहीं ! सहिष्णुता आणि सहृदयता हींच लोकांतील आमचीं मनोभूषणें आहेत.

पण मला थोडेंसें वाईट वाटतें तें एवढेंच कीं, या थोर हुतात्म्यांचें स्मारक उभारतांना माझ्या भावनांचा तुम्ही कां विचार केला नाहींत ? सारा वाद झाला. राजकीय पक्षांनीं अटीतटीनें सवाल-जबाब केले. खुद्द तुमचे आवडते मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण हेहि या वादांत पडले. पण या भव्य चौकाची अधिष्ठात्री देवता म्हणून मी जी आज कित्येक वर्षें या परिसरांत अधिकार गाजवीत आहें तिचाच तेवढा साऱ्यांना विसर पडला. मुंबापुरींतील पौरजनांनो, तुमच्यावर मीं फार प्रेम केलें. इथेंच मीं वाऱ्या-वादळांत उभी राहिलें, ती तुम्हाला धीर देण्यासाठीं. कधीं कधीं येथील कारंजांतून जे फवारे प्रगट होत त्यांनीं तुमचेच डोळे सुखावले आहेत. मी एक गुपित सांगतें—याच कारंज्या-खालच्या पोकळींत काहीं गरीब लोकांनीं आपले संसारहि थाटले होते.

माझ्याकडून जेवढें सुख, जेवढी सांवली, जेवढी स्फूर्ति देतां आली ती मीं परोपरीनें दिली आहे. पण आज मला न विचारतां, माझ्या भावनांचा विचार न करता याच भव्य चौकांत तुम्ही एक हुतात्म्यांचें स्मारक उभारणार आहां !

पौरजनांनो, माझा या स्मारकाला विरोध नाहीं; पण एक स्त्री म्हणून मी तुम्हांला कळवळून सांगतें—हें स्मारक मला सवतीसारखें वेदना देत राहील बरें !

# १.

## ' जेव्हां डोळ्यांच्या कडाहि पाणावल्या '

प्राजलपणें सांगावयाचें तर पु. ल. देशपांडे यांनीं आपलें एक युग तयार केलें आहे, असेंच " बटाट्याची चाळ " पाहिल्यानंतर मला वाटलें. तीन तास प्रेक्षकवर्ग नुसता हसून हसून बेजार झाला होता. पण काय आश्चर्य पाहा ! त्या प्रयोगातील अखेरचें चिंतन ऐकून रसिक, समजूतदार आणि सुसंस्कृत प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. हसता हसतां रडविण्याची किमया साधणें प्रतिभाशाली कलावंतालाच जमण्यासारखें आहे.

पु. ल. देशपांडे यांची प्रतिभा लोकोत्तर खरी. ' बटाट्याची चाळ ' ही तसें म्हटलें तर चाळींसारखीच एक चाळ. पण पु. ल. देशपांडे यांनीं तिला प्रथम साहित्यांत आणलें, आणि तिच्यात असा कांहीं विनोद, रंग आणि चैतन्य भरलें कीं, त्यांतील प्रत्येक भाडेकरू हा आपल्याला परिचितासारखाच वाटू लागला. नुसताच परिचित नव्हे, आपला आवडता. तथापि, साहित्य हें कांहीं हजारांच्याच वाचनात येतें. पण पु. ल. यांची कल्पकता अशी कांहीं स्वैर भराऱ्या मारू शकते कीं, ते केव्हां कोठल्या साध्या विषयांत मोठा आशय ओततील याचा नियम सांगवत नाहीं. बटाट्याच्या चाळीला एका सकाळीं त्यांनीं नाट्यरूप दिलें आणि तेव्हांपासून उभा महाराष्ट्र त्याच्या-बरोबर खळखळून हसत राहिला आहे.

इतक्या प्रसन्नपणें, खुल्या दिलानें एकसारखा हसवीत राहणारा प्रतिभावान कलावंत खरोखरच आजवर महाराष्ट्रात निर्माण झालेला नाहीं. आणि हें हसू तरी कसें ? जें साऱ्या यातना विसरावयाला लावतें, नव्हे ! मनातील किल्मिषें आणि पूर्वग्रह मुळापासून काढून टाकतें असें. पण तेवढें हसून पुरें झाल्यानंतर मात्र माणसाच्या मनात पोकळी निर्माण होत नाहीं. तो देशपांड्यांच्या चिंतनाबरोबर वाहत जातो आणि मग गंभीरपणें आत्मनिरीक्षण करू लागतो– आपल्या परिसराबद्दल, आपल्या भोंवतालच्या लोकांबद्दल, सामाजिक फेरबदलाबद्दल.

मग त्याला कळून येतें कीं, आपल्या भोंवतालीं कारुण्य आहे, अनास्था आहे तितकाच आनंद आणि विनोदहि आहे. बटाट्याची चाळ ! ती जुनी असेल, मोडकळीस आलेली असेल, त्यांत विचित्र आणि विक्षिप्त लोकहि राहत असतील. पण त्याच वास्तूत सहजीवनाचा निर्मळपणा प्रगट होतो, आणि एका अडचणीच्या वेळीं अकृत्रिम माणुसकीचीहि प्रचीति येते. जीवनाचा अर्थ देणारा आणि त्या जीवनात आशा फुलविणारा हा दृष्टिकोण पु. ल. यांनीं आपल्या चिंतनांत व्यक्त केला आहे. बटाट्याच्या चाळीचें तेंच खरें वैशिष्ट्य आहे. आधुनिक जीवनात कडवटपणा, निराशा, वैफल्य यांचें थैमान माजलेलें दिसतें. परिस्थितीची वाटचाल तशीच चाललेलीहि असेल, पण जीवनाला दुसरीहि बाजू असू शकत नाहीं काय ? तीच बाजू पु. ल. यांनीं खळखळून हसवीत असतांना मोठ्या मार्मिकपणें पण तितक्याच हृदयस्पर्शी रीतीनें दाखवून दिली आहे.

हसविणाऱ्या आणि रडविणाऱ्या बटाट्याच्या चाळीचें दर्शन म्हणूनच हृदयंगम होत आहे

# ३.

## एक कविहृदय

नाथ पै हे एक समाजवादी पुढारी तर आहेतच, पण ते एक साहित्यिकहि आहेत. त्याचें साहित्य सहसा लेखणींतून प्रगट होत नाहीं; कारण लेखनासाठीं त्यांना वेळ मिळणें कठीण असतें. पण त्याचें साहित्य त्यांच्या भाषणानूनच नव्हे तर साध्या बोलण्यांतूनहि प्रगट होत असतें. नाथ पै हे सारखे बोलत असतात. लोकांच्या समोर संभाषणातून आणि लोकांच्या अपरोक्ष फोनवरून. पण सभाषण करताना इतकेंच नव्हे तर फोनवरून बोलतानाहि त्यांच्या शब्दांत काव्य असतें, आविर्भावात नाट्य असतें, आणि वागणुकींत अभिनय असतो. त्यांच्या बोलण्यात जी मृदुता प्रगट होते आणि त्याच्या शब्दात जें लालित्य असतें तसें मीं इतरत्र क्वचितच अनुभवलें असेल.

त्याच्या जाहीर भाषणांतहि याच काव्याच्या छटा ठायीं ठायीं विखुरलेल्या आढळून येतात. मृदु, आर्जवी आवाजांत ते आपली बाजू मांडू लागले म्हणजे मध्येंच एखादी संस्कृत काव्यातील ओळ ते म्हणतील, आणि आवाज चढवून एखादा मुद्दा ते मांडावयाला लागले तर इतक्या प्रासबद्ध शब्दांची मालिका ते जुळवून देतील कीं ज्या व्यक्तीवर त्यांचा कठोर पण भारदस्त हल्ला होत असेल तीहि त्याच्या भाषेंतील गोडव्यानें डोलत असलेली आढळून येईल. खरोखर, डोलवयाला लावणारें इंग्रजी वक्तृत्व कोणाचें असा मला आज जर कोणीं प्रश्न केला तर मी नाथ पै यांचें नांव तत्काळ घेईन.

गेल्या पाच वर्षांत त्याच्या भाषणानें मला अनेकदां डोलवयाला लावलें आहे. आश्चर्य असें कीं, जाहीरपणें झालेल्या भाषणांनीं, तसेंच न झालेल्या भाषणांनींहि ! — नाथ पै याच्या निकटच्या सहवासांत येणाऱ्या सहकाऱ्यांना अशीं न झालेलीं भाषणें अनेकदा ऐकावीं लागतात. त्याचें स्वतःचें वैशिष्ट्य असें आहे कीं, त्यांचें स्वतःच्या आवाजावर नितान्त प्रेम आहे. आणि सुंदर, लालित्यपूर्ण शब्दांवर व शब्दसमुच्चयांवर त्याची भक्ति आहे. हें प्रेम आणि ही भक्ति त्याना कधीं स्वस्थ बसू देत नाही— म्हणजे एका जागेवर ते स्वस्थ बसू शकत नाहींत. त्याप्रमाणें शब्द वा काव्य सुचलें तर तें बोलून टाकल्याशिवाय त्याना राहवत नाहीं. खासगी बैठकींत ऐकलेलें हेंच काव्यपूर्ण वाक्य पुढें त्यांच्या जाहीर भाषणात कधीं ना कधीं आपल्या कानीं पडतेंच.

म्हणूनच नाथ पै यांना मी साहित्यिक म्हणतों. राजकारणाच्या रुक्ष वातावरणांतच सारें जीवन कठीत असतानाहि साहित्याचा आस्वाद घेणारे, अभिजात साहित्यांतील विलोभनीय काव्यपक्ति गुणगुणत आपल्या भोवतालचें वातावरण काव्यमय करणारे, आणि आपल्या उत्कट भावविवशतेनें आणि आर्जवी वागणुकीनें समरप्रसंगातहि जिव्हाळ्याची ओढ निर्माण करणारे जे काहीं पुढारी आहेत त्यात मी नाथ पै यांची गणना करतों. कधीं कधीं मात्र मला एवढाच संशय येतो कीं, हें कविहृदय जीवनात वावरतें कीं जीवनाच्या रंगभूमीवर आपली भूमिका वठवत असते ?

# ४.

## ‘ मि. स्पीकर, सर ! ’

सरदार हुकूमसिंग हे लोकसभेचे अध्यक्ष जेव्हा निवडून आले तेव्हां दिल्लीच्या ‘ हिंदुस्थान टाइम्स ’नें एक व्यंगचित्र प्रसिद्ध केलें होतें. त्यांत सरदार हुकूमसिंग अध्यक्षाच्या खुर्चीवर स्थानापन्न झाले असून तलवार परजीत “ शीखांवर अन्याय होत आहे ” अशी आरोळी ठोकणाऱ्या मास्टर तारासिंगांना ते “ ऑर्डर ऑर्डर ” म्हणून थाबवीत असल्याचें दाखविण्यात आलें होतें. सरदार हुकूमसिंग याना त्यानंतरच्या काळात अनेक सभासदांना आणि मन्त्र्यांनाहि ‘ ऑर्डर ऑर्डर ’ म्हणून थोपविण्याची वेळ आली. त्यानीं हें अवघड कार्य रागालोभाची पर्वा न करतां आणि भीडमुर्वतीचा विचार न करता सौजन्यानें पण खंबीरपणें पार पाडलें.

तसें पाहिले तर आपल्या नावाला न साजेसाच त्याच्या स्वभावाचा पिंड आहे. सौजन्य आणि शालीनता हीं त्याच्या मुद्रेवरच लिहिलेलीं आहेत. आणि मृदुता ही नेहमींच त्यांच्या बोलण्यांत व वागण्यांत प्रगट होते. केवळ या स्वभावगुणामुळेंच ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. आणि म्हणून कोणत्याहि मानाच्या व जबाबदारीच्या जागेसाठीं त्यांची निवड झाली तरी सहसा कोणाच्याहि कपाळाला आठ्या पडत नाहींत.

सरदार हुकूमसिंग हे राजकारणी पुरुष नव्हेत. त्याचा पेशा वकिलीचा. त्यात चढत चढत ते न्यायाधीश झाले. तेव्हापासून न्यायाचा काटा त्यानीं हायकोर्टाच्या आवारातच नव्हे तर सार्वजनिक जीवनातहि समतोल धरला. अकाली दलातून ते कॉंग्रेसमध्यें आले; पण, मग त्यानीं मागें पाहिलें नाहीं. मास्टरजींचा जीव अन्नत्यागाच्या वेळीं धोक्यात आला असतानाहि त्यानीं कांग्रेसनिष्ठा सोडली नाहीं. हेंच वैशिष्ट्यपूर्ण धैर्य त्यांनीं प्रत्येक आणीबाणीच्या प्रसगीं दाखविलें आहे. “ ब्लिट्झ ”नें सभागृहाचा अवमान केला, तेव्हा त्याच्या सपादकाला दातीं तृण धरावयाला लावण्याचा करारीपणा दाखविला तो हुकूमसिंगांनींच.

लोकसभेच्या अध्यक्षपदाची जबाबदारीहि ते तितक्याच निःपक्षपातीपणें पार पाडीत आहेत. लोकसभेचे संकेत आणि परपरा सभासदानीं पाळाव्या त्याचप्रमाणें मन्त्र्यांनींहि पाळाव्या असा त्याचा कटाक्ष आहे. म्हणूनच त्यानीं मेनन याना ऐकविलें, “ सभासदांच्या पत्राची तरी पोंच देण्याचें सौजन्य मन्त्र्यांनीं दाखवायला नको काय ? ” मन्त्रि वेळेवर हजर नसले, किंवा तान्त्रिक सबबी काढून उत्तरें देण्याची टाळाटाळ करू लागले कीं, सरदारसिंग यांचा किंचित् घोगरा आणि कधीं कधीं फुटणारा आवाज सभागृहांत घुमू लागतो, आणि मग सौम्य पण खबीर शब्दात ते आपल्या सभागृहाच्या अधिकाराची मन्त्र्याना जाणीव करून देतात.

सरदार हुकूमसिंग याचा वाक्प्रवाह अनंतशयनम् अय्यगार याच्याप्रमाणें अखडपणें वाहत नाहीं. पण त्यांचा निर्णय प्रवाहपतित नसतो. त्यांचे शब्द सथ, मृदु असतात. पण त्यांचा निर्णय मात्र धारदार असतो. म्हणूनच ‘ मि. स्पीकर, सर ! ’ असें म्हणून कोणीं हरकतीचा मुद्दा काढू लागले किंवा तहकुबीच्या सूचना आणू लागले कीं सरदार हुकूमसिंग क्षणार्धात त्याच्या मुद्द्यांना उत्तरें देऊन त्याला निरुत्तर करतात.

# ५.

## राजकारणांतील काव्य ?

महाराणी गायत्रीदेवी राजकारणाच्या आघाडीवर उभ्या राहिल्या, आणि त्यांच्या व्यक्तित्वा-भोवतीं वादाची जणु वावटळच उठली. मला कळत नाहीं कीं ही वावटळ इतक्या वेगानें का उठावी? राजे, राण्या आणि महाराण्या या भारतात तरी नुसत्या पत्त्याच्या डावातच दिसतात असें नव्हे. मागें एकदा कोणीं तरी म्हटलें होतें कीं, कालान्तरानें जगामध्यें फक्त पत्त्यातले राजे-राण्या व इंग्लंडचा राजा वा राणी यांचीच फक्त मोजदाद करावयाची वेळ येईल. भरतखंड मात्र या जगांतून वगळला जावयाला पाहिजे. कारण लोकसंख्येप्रमाणें राजघराण्यांच्या बाबतींतहि आपण फार समृद्ध आहों.

इथें वाद निघाला तो जयपूरच्या महाराणीसाहेबांनीं स्वतंत्र पक्षाच्या घरकुलात प्रवेश केला म्हणून. मला मात्र त्याचें वैषम्य वाटत नाहीं. अहो, कॉंग्रेसच्या बाजूला जसें रमणीय आभूषण दिसतें तसें विरोधी पक्षाच्या बाजूला दिसलें तर त्यांत काय बिघडलें ? नाहीं तरी सभागृहाचे वा राजकीय सभा– संमेलनाचे अलंकार होण्याचेंच कार्य या राजघराण्यातील व्यक्ति करीत असतात. लोकसभेच्या गेल्या पांच वर्षांच्या कारकीर्दीत ग्वाल्हेरच्या महाराणीसाहेब विजयादेवी यांनीं आपल्या प्रसन्न व्यक्तित्वानें आणि क्षणकालच्याहि सहवासानें लोकसभेला केवढी तरी शोभा प्राप्त करून दिली. ही शोभा जर गायत्रीदेवींच्या अस्तित्वानें वाढली तर त्याचा आपल्याला आनंदच व्हावयाला नको काय ?

खरें म्हटलें तर स्वतंत्र पक्षात त्या अधिक उठून दिसतात. कारण कॉंग्रेस पक्षाची जी भाऊ-गर्दी मतदानाच्या वेळीं प्रगट होते त्या वेळीं एखादा नाजूक हात वर गेल्याचें दृष्टिपथांतहि येत नाहीं. स्वतंत्र पक्षात कशीं मोजकीं माणसें. तेथें आवाज उठला तरी मंदपणें आणि हात वर झाले तरी हळुवारपणें प्रगट होणारे. कॉंग्रेस पक्षाच्या कोलाहलात ही शान कोठून येणार ? नव्या पार्लमेंटांत गायत्रीदेवींचा प्रवेश झाला आणि ही शान आली. राजकारण हें त्याला निमित्त मात्र झालें खरें. पण खरा काव्यात्मा राजकारणात चुकून का होईना– येणाऱ्या या काव्यानेंच अधिक लुब्ध होईल.

६.

# फुलला निशिगंध

सत्यनारायण सिंह हे केंद्रीय मंत्रिमंडळातील एक सुगंधित मंत्री आहेत. ते नुसते सभागृहात आले तरी त्यांच्या आसपास सुगंध दरवळतो. सर्वच दृष्टींनीं ते हौशी आहेत. कपड्यांची त्यांची शान अशी आहे कीं, त्यांच्या पांढऱ्या शुभ्र शेरवानीवर एक सुरकुती कधीं आढळून येणार नाहीं. अधून मधून ते निरनिराळ्या मोसमाप्रमाणें आपल्या कपड्याचा रंग बदलतात. आणि त्या वेळीं न चुकतां पंडितजींच्या अंगावरील मुलायम कपड्याची सही सही नक्कल त्यांनीं केल्याचा भास होतो, एवढें खरें कीं, पंडितजींच्या खालोखाल किंवा काकणभर अधिकच पोशाखातील नीटनेटकेपणानें सत्यनारायण सिंह हे लोकांचीं मनें आकर्षून घेतात. त्यात आणखी भर पडते ती त्यांच्या भोंवतीं सदैव दरवळणाऱ्या सुगंधाची.

सत्यनारायण सिंह यांचें कामहि तशाच प्रकारचें आहे– म्हणजे स्वागतमंत्र्याचें. संसदेचे स्वागतमंत्रि असेंच मंत्रिमंडळातील त्यांच्या स्थानाचें वर्णन करणें अधिक श्रेयस्कर होईल. नाहीं तरी त्यांच्यावर कामाची जी जबाबदारी पडते ती इतर लोकच पार पाडीत असतात. त्यांतील अत्यंत कठीण काम म्हणजे सभागृहात किमान हजेरी कायम ठेवण्याचें, मंत्र्यांना योग्य वेळीं सभागृहांत आणण्याचें, व कधीं खास मतदानाची वेळ आलीं तर घटनेनुसार आवश्यक अशी सभासदसंख्या जमविण्याचें. पण तें काम बहुशः त्यांचे दुय्यम प्रतोदच करतात. संसदेच्या चिटणिसांपासून निरनिराळ्या समित्यांच्या अध्यक्षापर्यंत, आणि सभापतींपासून मंत्र्यापर्यंत संसदेच्या कामकाजाचीं जीं चक्रें हालवावीं लागतात तीं त्यांच्यावाचूनच हालत असतात. फक्त कधीं काळीं एक मिनिटभर उठून ते या काम-काजाची सभागृहांत घोषणा तेवढी करतात.

अशा प्रसंगीं विरोधी पक्षाकडून त्यांचें टाळ्यांनीं स्वागत होतें. कारण सत्यनारायण सिंह यांचा आवाज ऐकण्याची फक्त अशाच वेळीं सभागृहाला संधि मिळते. त्यांचा आवाज व्यक्तिशः सभासद ऐकत असतात, पण तो सभागृहाच्या बाहेर. आणि त्या वेळीं ते एखादा 'किस्सा' सुनवीत असतात, किंवा हावभावासहित एखादा 'शेर' म्हणून दाखवीत असतात. सत्यनारायण सिंह यांची रसिकता अशाच वेळीं प्रगट होते.

त्यांचा दिल खुलतो तोहि अशाच वेळीं. नाहीं तर सभागृहाच्या किचकट आणि कांटेकोर वातावरणांत या ऐषआरामी आणि कलात्मक प्रवृत्तीच्या व्यक्तीला रस तरी कसा वाटणार? सारें कामकाज बाजूला सारून ते बहुश. हिंडतच असतात आणि मग गंधाचा टिळा लावलेल्या आणि चापून चोपून बसविलेल्या कपड्यांची शान आणि पांढऱ्या टोपीची घडी विस्कटूं न देतां ऐटबाजपणें चालणाऱ्या या मूर्तीच्या आसपास जणूं निशिगंधच दरवळूं लागतो.

# ७.

## काठी आणि चहाचा प्याला

कृष्ण मेनन यांच्याइतकी वादग्रस्त व्यक्ति आज भारतांतच नव्हे तर दुनियेंतहि नसेल. त्यांची गमत अशी आहे कीं, त्यानीं तोंड उघडलें कीं त्यांतून काहीं विचार व काहीं विखार बाहेर पडतो. त्यांचे श्रोते त्या विचारांकडे पाहत नाहींत. पण मेनन यांच्या रक्तात जणु भिनलेल्या विखारानें त्यांची मुद्रा जी उग्र– रौद्र होते, मुद्रेकडे पाहूनच ते आपलें मन त्याच्याविषयीं अधिकच कलुषित करून घेतात. मग कृष्ण मेनन हे जणु कोणी दैत्यच आहेत असा भास त्यांना होऊं लागतो.

तसे मेनन हे दैत्य नाहींत. इतर कोणत्याहि मत्र्यांना नसेल इतका त्याचा मित्रपरिवार आहे. त्याच्या अवतींभोवतीं लोकांची गर्दी असते आणि खुलेपणानें ते आपल्या भक्तगणात तसेंच वार्ताहरांमध्यें मिसळतहि असतात. पण त्यांच्या साध्या बोलण्यातहि इतका उग्रपणा असतो, आणि त्याच्या घोगऱ्या कंठातून इतक्या वेगानें व त्वेषानें शब्द बाहेर पडत असतात कीं, त्याच्या भोवतींच्या खुषमस्कऱ्यांपलीकडे त्यांचा सहवास कोणाला आवडत नाहीं.

कधीं कधीं माझ्याच मनांत विचार येतो कीं, मेनन यांच्यामध्यें जी उद्धटपणाची झाक दिसून येते ती नसती तर ? –पण मग मेनन हे अविवाहित तरी कशाला राहिले असते ? जीवनांत ओलावा निर्माण करणारें गृहसौख्य कायमचें पारखें राहिल्यामुळें तर मेनन यांचा माणूस-घाणेपणा वाढत गेला. त्यात भर पडली आहे ती त्याच्या चहापानामुळें. त्याना व्यसनें आहेत तीं दोन. एक चहाचें आणि दुसरें राजकारणाचें. या चहाच्या पेल्याबरोबर एक लहानसा नवनीताचा लेप लावलेला टोस्ट खाण्याची त्यांना संवय लागली तर ? तर कदाचित् त्यांच्या तप्त मेंदूची कमान खालीं येईल, आणि त्याच्या तितक्याच तापलेल्या राजकारणाची धगहि कमी होईल.

पण हा जर आणि तर समाजजीवनात कधीं उपयोगी पडतो का ? नेत्याच्या बाबतींतील या जरतारी आशा आणि अपेक्षा तर कधींहि फलद्रूप होणार नाहींत. कृष्ण मेनन यांची सहचारिणी एकच,–आणि ती म्हणजे त्याच्या हातातील काठी. आणि त्याच्या जिवाचा कलिजा एकच,– आणि तो म्हणजे चहाचा एकच प्याला. त्याच्या वादग्रस्त राजकारणाचीं हीं प्रतीकेंच नव्हेत काय ?

# ८.

## ‘ माती असशी मातिस मिळशी ’

काहीं महिन्यांपूर्वी स्तालिन अखेर मातीला मिळाला. “ माती असशी मातिस मिळशी ” हीच मर्त्य मानवाच्या जीवनाची सुरुवात आणि अखेर नव्हे काय ? बिचारा स्तालिन. त्यानें थोरपण मिळविलें. म्हणून त्याच्या वीरमूर्तीला देव्हाऱ्यात ठेवण्यात आलें, आणि म्हणून मातीशीं एकरूप होण्याची निसर्गनिर्मित क्रिया त्याच्या बाबतींत लांबणीवर पडली.

आतां अखेरीस त्याच्या अनुयायांनाच वाटूं लागलें कीं ही देवमूर्ति नव्हे; ही सैतानाची प्रतिकृति होय. ते अनुयायी मात्र फार सावध होते. त्यांना स्तालिनचा दरारा जिवंतपणीं किती वाटत होता, हें जगाला माहीतच आहे. पण त्याच्या देहातून चैतन्य लुप्त झाल्यानंतरसुद्धां त्यांनीं थोडीथोडकी नाहीं– सात वर्षे वाट पाहिली, आणि या पोलादी पुरुषाच्या पापण्या रतिभरहि हालत नाहींत अशी पूर्ण खात्री करून घेतल्यानंतरच नुकतीच त्यानीं या वीरपुरुषाला कबरीची वाट दाखविली. सोव्हिएट रशियाचा एके काळीं तळपणारा सूर्य, सोव्हिएट जनतेचा पिता, माता, गुरु, स्फूर्तिदाता– आणि असाच कांहीं तरी आणि सर्व काहीं त्या दिवशीं आकस्मिकपणें आणि कायमचा एका गर्तेत लुप्त झाला. त्या दिवशी स्तालिनचें शरीर अखेरीस मातीला मिळालें.

आत्म्याला म्हणे हें लागू नसतें. तें जर खरें असेल, तर स्तालिनच्या आत्म्याला त्या दिवशीं काय बरें वाटलें असेल ? मला स्वतःला असें वाटतें कीं, स्तालिनच्या चाणाक्ष आत्म्याला याबद्दल फारसें आश्चर्य वाटलें नसेल. कारण ?– त्याच्याबद्दलची एक दंतकथाच तुम्हांला सांगतों :

असें म्हणतात कीं, अखेरच्या दिवसांत आपल्याबद्दल लोकांचें मन विटलेलें आहे याची स्तालिनला जाणीव झाली होती. पण लोक खरोखरच काय बोलतात हें समजून घेण्याची त्याला इच्छा झाली. म्हणून गुप्त वेषानें तो सर्वत्र संचार करू लागला. पण स्तालिनबद्दल कोणी तोंडातून एक शब्दहि काढावयाला तयार होईना. अखेरीस एक माणूस त्याला भेटला– एका हॉटेलात; पण हॉटेलांत तो बोलेना. तो म्हणाला, ‘ भिंतीला कान असतात बरें. ’’ म्हणून ते बाहेर आले मैदानात; पण तेथें एक झाड होतें. तेव्हा तो माणूस म्हणाला, “ झाडसुद्धा हेरगिरी करते बरें. ” शेवटीं ते दोघेजण एका माळरानांत गेले. उघडें बोडकें माळरान. सभोंवार ना माणूस, ना झाड, ना झुडूप. तरी पण त्या माणसानें सभोंवार दृष्टि टाकली, आणि मग स्तालिनच्या जवळ जाऊन त्याच्या कानात तो हळूच पुटपुटला, “ मी स्तालिनच्या बाजूचा आहें; पण अगदीं कुण्णा कुण्णाला सांगू नकोस. माझे राईराईएवढे तुकडे करतील हे सारे दुष्ट लोक. ”

# १.

## क्रुश्चेवच्या पाठीवर थाप

डॉ. राधाकृष्णन् हे तत्त्वज्ञ म्हणून जगविख्यात आहेत. आतां राष्ट्रपति म्हणून भारताचे तेहि एक भाग्यविधाते होणार आहेत. मध्यतरींच्या काळांत त्यांनीं मॉस्को येथील वकीलपद भूषविलें, आणि स्तालिनसारख्या प्रबळ, पराक्रमी आणि पाताळयंत्री व्यक्तीलाहि आपल्या मुत्सद्देगिरीची चुणूक दाखविली.

वस्तुतः राधाकृष्णन् याचा पिंड खरा शिक्षकाचाच. पण पूर्वायुष्यांतील या उज्ज्वल कालखंडाचा आज विसरच पडल्यासारखा झाला आहे. नाहीं म्हणावयाला उपराष्ट्रपति असताना राज्यसभेचें नियंत्रण करण्याची त्याच्यावर जबाबदारी पडत असताना मात्र विद्वत्तेच्या तेजानें आणि वडीलकीच्या आग्रहानेंच नव्हे तर शिक्षकाच्या रुबाबानेंहि ते सारी सभा मंत्रमुग्ध करून ठेवीत असत राज्यसभेंतसुद्धां उसळत्या रक्ताचीं माणसें कमी नाहींत. विशेषतः कम्युनिस्ट नेते भूपेश गुप्ता यांच्या पायाला कधीं उसंत नाहीं, आणि आवेशाच्या बाबतींत तर त्याचा हात धरणारा कोणी नसेल. पण डॉ. राधाकृष्णन् हे नुसत्या करंगळीच्या जोरावर भूपेश गुप्ता याना खालीं बसावयास लावीत. अशा वेळीं " भूपेश, सिट डाउन " असें त्यांनीं म्हटलें कीं भूपेश गुप्ता हे तावातावानेंच पण खालीं बसत. दुसऱ्याच क्षणीं प्रसन्न हास्य करून राधाकृष्णन् त्याना म्हणत, " आता तुमचें म्हणणें काय आहे तें सांगा." कडक शिक्षकानें प्रथम धाकदपटशा दाखवावा, पण क्षणार्धांत प्रेमळपणानें मुलाच्या पाठीवरून हात फिरवावा तसा राधाकृष्णन् याचा क्षणिक कोप या वेळीं वाटावयाचा. कधीं कधीं तर हातानें जणू झाडून टाकावें तसा आविर्भाव करीत ते सभासदांना शिस्त शिकवीत असत.

इतकें स्वातंत्र्य राधाकृष्णन् याच्याखेरीज कोणत्याहि सभापतीला कधीं मिळेल असें मला वाटत नाहीं. त्यांचा सवाल कांहीं जगावेगळाच आहे. आणि आत्मविश्वास तर असा दांडगा कीं, क्रुश्चेव्ह यांच्या पाठीवर थाप मारून त्याना जणू उपदेश करावा त्याप्रमाणें आपल्या भाषणाचा शेवट करावयाला त्यांना संकोच वाटत नाहीं. थोर मुत्सद्दी आणि परदेशांचे प्रतिनिधि जेव्हां जेव्हां संसदेच्या सभागृहांत भाषणें देत तेव्हा राधाकृष्णन् हे उपराष्ट्रपति या नात्यानें त्यांचें स्वागत करावयाला हजर असत. अशा वेळीं सभागृहाचें लक्ष मुख्य पाहुण्यांवर खिळून राहत असे. पण राधाकृष्णन् याचें अस्खलित वक्तृत्व ऐकून मात्र मुख्य पाहुण्याचें देहभान हरपून जात असे. राधाकृष्णन् यांना शब्दांची वा विचाराची कधीं उणीव भासत नाहीं. हरिद्वारच्या गंगेचा ओघ जसा दुथडी भरून वाहत असतो त्याप्रमाणें डॉ. राधाकृष्णन् यांच्या वाक् गंगेचा ओघहि गंभीरपणें चैतन्यपूर्ण रीतीनें वाहत असतो. त्यातून विचारांचीं मौक्तिकें प्रगट होतात, कधीं नर्म विनोदाचे तुषारहि उडतात. आणि कधीं अवखळपणें जगांतील ज्येष्ठतम मुत्सद्द्यांना त्यानीं कोपरखळ्या मारलेल्याहि आढळून येतात. दिपविणारें व्यक्तिमत्त्व आणि चकित करणारें वक्तृत्व कोणतें ? असें जर मला कोणी विचारलें तर मी डॉ. राधाकृष्णन् यांचेंच नाव घेईन.

# १०.

## ‘ जहान्नम् में जाव ’

पंडितजींनीं संतापानें, उद्वेगानें, त्वेषानें हे उद्गार एकदा काढले. त्यावर टीका झाली कीं महामंत्रिपदावर बसलेल्या व्यक्तीनें असे अशिष्टपणाचे उद्गार काढावे काय ? म्हणजे इथें सवाल उठतो हा कीं, महामंत्र्यानीं हा अशिष्टपणा करावा काय ? त्याचा अर्थ इतरानीं तो केला तर चालेल असा आहे काय ?

माझा तर या चर्चेलाच विरोध आहे. जहान्नम् हा शब्दप्रयोग अनेक अर्थांनीं वापरला जातो. कोणी त्याचें भाषान्तर करताना म्हणतात : “ जा लेका मसणात.” कोणी नरक या अर्थानें या शब्द-प्रयोगाचा उपयोग करतात.

आतां या दोन्ही गोष्टी अभद्र आहेत असें समजण्याचें कारण काय ? नाहीं तरी या दोन्ही ठिकाणीं आपल्यापैकीं साधारण प्रत्येकालाच जावयाचें आहे. तुकारामबुवासारखा एखादा संतच तेवढा सदेह वैकुंठाला जाऊ शकतो. तसे पुण्यात्मेहि विरळा, आणि स्मशानाला डावलून परलोक-साधन करणाऱ्या विभूतीहि विरळा !

मला तर असें वाटतें कीं, आपण स्वर्गलोकाची आशा धरूच नये. माणसानें ज्याप्रमाणें व्यक्तिजीवनाच्या मर्यादा लक्षात घ्याव्या त्याचप्रमाणें जीवनाचा अंत झाल्यानंतर आपल्याला गति कोणती प्राप्त होईल याचाहि वास्तविक दृष्टिकोनातून अंदाज बांधावा. मग आपल्या लक्षांत येईल कीं, या जीवनातहि जहान्नम् आणि परलोकांतहि जहान्नम् हेंच बहुशः आपल्या भाग्याचें सूत्र राहील.

पंडितजींना या जीवनाचा काय अनुभव असणार ? त्यानीं जीवनांत भोगलें तें स्वर्गसुख ! म्हणून त्याची कल्पना अशी कीं नरक म्हणजे कांहीं तरी अभद्र आहे. तेव्हां आपल्या प्रतिपक्षांवर चिडून गेल्यानंतर त्यांनीं शापवाणी उच्चारावी तसें म्हटलें : “ जहान्नममध्यें जा.”

मला त्यांच्या या शापवाणीचा राग येत नाहीं. उलट त्याची कींव येते. कारण जहान्नम-मधील जीवनाचा आस्वाद घेण्यापासून ते वंचित व्हावेत हीसुद्धा जीवनांतील केवढी मोठी उणीव आहे ! पण ती उणीव भरून निघावी अशी मात्र इच्छा आम्ही करणार नाहीं. त्यांच्यावरील प्रेमामुळें आम्ही त्याना सांगू, “ पंडितजी, जहान्नम् आमचाच आहे. तुम्ही मात्र स्वर्ग-सुखाचाच सदैव आस्वाद घ्या.”

११.

# मूर्ति ठेंगणी पण—

लालबहादुर शास्त्री हे मानानें थोर, पण कुडीनें अतिशय किरकोळ आहेत. ल्हानशीच मूर्ति आहे त्यांची. पण त्यांच्यामागे व्याप केवढा मोठा. तो व्याप मात्र जन्मजात विनयशीलपणानें ते सांभाळतात. त्यांच्या घरीं कोणालाहि तसा मज्जाव नाहीं. अगदीं मध्यरात्र होईपर्यंतसुद्धां. या काळांत लोक त्यांच्याकडे अर्ज-विनत्या घेऊन येतात, मंत्री आपली गाऱ्हाणीं आणतात, प्रदेशातील मुख्य इतर प्रान्ताविरुद्ध तक्रारी करतात, राजे आणि राण्या वारसासाठीं वा दत्तकासाठीं शब्द टाकतात, आणि पत्रकार वार्ता धुंडाळण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं हिंडतात या सर्वांशीं लालबहादुर बोलतील, गंभीरपणानें पण हसतमुखानें त्यांची चौकशी करतील. पण कधीं त्यांच्या तोंडून वावगा शब्द बाहेर पडणार नाहीं, त्यांच्या मुद्रेवर चिडीची भावना प्रगट होणार नाहीं.

तसे पाहिलें तर गृहमंत्री म्हणजे साऱ्या देशाच्या कारभाराचें केंद्रस्थान. साहजिकच त्यांचें घर हा एक अखंड दरबार असतो. पतजींचा दरबार तर केव्हा भरत असे व केव्हा संपत असे हेंहि सांगतां येत नसे. त्या दरबारात बसल्याबसल्यांच ते कामाच्या फायली चाळीत असत, आणि वेळ ठरवून आलेले लोकहि त्यांच्या भेटीसाठीं तासन्तास ताटकळत असत. पतजींच्या दिलखुलास स्वभावाची जाणीव असलेले लोक त्या मोगली दरबारावर कधीं रुष्टहि होत नसत. त्यांच्यापूर्वी सरदार पटेल हे तितकेच किंवा काकणभर अधिक महत्त्वाचे गृहमंत्री होते. त्यांचा काम उरकण्याचा खाक्या वेगळा. सकाळीं पाच वाजतां फिरावयास जाताजातांच ते आपल्या बहुतेक साऱ्या मुलाखती उरकून घेत असत. दोन्हीहि गृहमंत्र्यांच्या हातीं कधीं फायली नसत आणि पेन्सिलीहि नसत. त्यांची टिपणें जणू मेंदूत कोरल्यासारखीं असत.

लालबहादुर यांचा पिंडच वेगळा. त्यांच्यामध्यें सरदारांचा दरारा नाहीं, आणि पंतजींचा रुबाब नाहीं. पण सोज्वळतेनें ते लोकांवर जेवढी छाप टाकतात आणि मनमिळाऊपणानें लोकांचीं मनें जेवढीं आकर्षून घेतात तेवढें यश या दोन महान् नेत्यांनींहि मिळविलें नसेल. लालबहादुर यांचें वैशिष्ट्यच असें आहे कीं त्यांच्यावर कोणी चिडूच शकत नाहीं. आणि कोणी चिडलाच तर लालबहादुर प्रेमळपणानें त्यांच्या पाठीवर हात टाकून जेव्हा म्हणतात, "–अरे भाई—" तेव्हां त्याचा निम्मा राग वितळूनच गेलेला असतो.

सौम्यपणानें सारा विरोध नष्ट करण्यांत लालबहादुर यांचा हातखंडा आहे. पण हा सौम्य-पणा त्यांच्या निर्णयात येईल असें मात्र नव्हे. निग्रहीपणा हा त्यांच्या सौम्य आविर्भावामागें समूळ दडलेला असतो एवढेंच. म्हणून लाल बहादुर म्हणजे शीतल चांदणें असें समीकरण माडण्यांत अर्थ नाहीं. बोलण्याचागण्यांत ती शीतलता असेल, पण अखेर ते करडे गृहमंत्रीच आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## १२.

# एकच अखेरची झेप

अरेरे ! सहा मिनिटांचाच अवधि होता. कदाचित् लाल प्रकाशात अक्षरेंहि चमकलीं असतील " FASTEN YOUR BELTS " आणि " NO SMOKING PLEASE " विमानातील होस्टेसनें नुकतीच मंजुळ हाकहि दिली असेल. " आतां काहीं मिनिटांच्या आतच आपण सान्ताक्रूझ विमानतळावर पोचूं. कृपा करून कमरपट्टे बांधा आणि धूम्रपान करूं नका." ' THANK YOU ' ते शब्द ऐकून आनंदित झालेल्या प्रवाशांनीं आपल्या चाळिशा उतरल्या असतील, पुस्तकें आपल्या हातबॅगेत टाकलीं असतील, आणि काहीं अधीर जीवानीं आपल्या जागेवर रेलून खिडकींतून काहीं देखावा दिसतो कीं काय म्हणून डोळे फाडूनहि पाहिलें असेल. विमानाचा एक टप्पा सपत आलेला असतांना प्रत्येक प्रवाशाच्या मनात जी भावना उचंबळून येते ती हीच कीं, " चला, सुटलों बुवा, येथवर तरी सुरक्षित आलो."

पण ' अलितालिया 'चे विमान सुरक्षिततेच्या मार्गावर नव्हतें. तें विनाशाच्या गर्तेकडे झेप घेत होतें. अरेरे ! काय त्याची शान. चकचकणारे दिवे, लांबच लांब पसरलेली खुर्च्यांची मालिका, त्यांच्यावर मऊ लुसलुशीत गाद्या, पांढऱ्या शुभ्र उशा आणि जांभळी ब्लॅकेट्स हारीनें वर रचलेलीं, मधल्या पॅसेजमधून हवाई सुंदरीसारखी होस्टेस स्मितहास्य उधळीत असलेली, आणि सारे प्रवाशी त्या ऐषआरामाचा अभिमान बाळगीत निर्धास्त मनानें जेट विमानाच्या वेगाची नुसती कल्पनाच करीत त्या सुंदरीच्या आलिशान स्वागताचा स्वीकार करीत आहेत स्वर्गसुख म्हणावें तें हें, हीच त्या प्रवाशाच्या मनाची भावना !

होय. स्वर्गसुख !—पण आकाशात दिमाखानें तें विमान संचार करीत आहे तोंवरच. " अलितालिया ! " विमान कंपनीचें नांव तरी किती मोहक. रोमचें सारें वैभव त्या विमानांत जसें उधळलें गेलें होतें तशीच रोमची काव्यात्मकता त्या नांवांत ओसडून भरली आहे. दैवदुर्विलास एवढाच कीं एका क्षणात त्या वैभवाचा चक्काचूर झाला आणि " अलितालिया " ही रोमन शोकान्तिकेप्रमाणें गिमदरीच्या डोंगरात नामशेष झाली !

फक्त सहाच मिनिटांचा अवधि ! तसें पाहिलें तर जेट विमानाची एकच झेप शिल्लक होती. कोण जाणे ! ती झेप घाईनें घेतली गेली असेल. कोणी सांगावें ? पावसाळी ढगानीं दिशाभूल केली असेल. चुकला खरा; कोणता तरी होरा चुकला आणि " अलितालिया "चें विमान सान्ताक्रूझच्या कुशींत न विसावतां जंगलानीं व्यापलेल्या सह्याद्रीच्या काळ्याकुट्ट कातळावर आदळलें ! एकच झेंप, पण ती अखेरची ठरली. ९४ प्रवाशांचा प्रवास संपला. पण तो सान्ताकडून अनन्ताकडे नेणारा ठरला.

# १३.

## स्वप्न-रंजनांत गुंगणारा मंत्री

श्री. गोपाल रेड्डी हे शांतिनिकेतनचे विद्यार्थी आहेत एवढें म्हटलें म्हणजे त्यांच्या सुसंस्कृतपणाची कल्पना करतां येईल. त्यांच्या सहवासात एक घटका काढली तर असें वाटतें कीं आपण एका राजकारणी पुरुषाजवळ बोलत नाहीं; एका मंत्र्याशीं विचारविनिमय करीत नाहीं; तर स्वप्नरजनांत गुंग होणाऱ्या, आणि त्यामुळें क्षणभर भोंवतालच्या जगाचाहि विसर पडलेल्या एका कवीशीं गूहगुजन करीत आहों. गोपाल रेड्डींचा साधेपणा आणि त्यांचा मनमोकळेपणा या काव्यात्मवृत्तींतूनच निर्माण झाला आहे. मला आठवतें, सिमल्याच्या रम्य वातावरणांत माझी आणि त्यांची भेट झाली. सभोंवार हिमालयाचे पहाड पसरले होते, त्या पहाडांपैकीं एका निमुळत्या टोंकावर त्याची पर्णकुटि होती. लहानशी; टुमदार! समोर हिरवळ, आणि रंगीबेरंगी फुलांनीं भरलेला बगीचा. त्या बगीच्यात फिरता फिरतां गोपाल रेड्डी मुलाखती देत होते. कधीं खुर्चीवर बसून ते शांतपणें सारें म्हणणें ऐकून घेत. त्या वेळीं त्यांचे कान फक्त ऐकत असत, मुद्रा विचारमग्न असे आणि तोंडातून शब्द बाहेर पडले तर मोजके. त्या शब्दातून त्यांची विनयशीलता तेवढी प्रगट होत असे, आणि कळकळ.

आज सुदैवानें अशी सुसंस्कृत आणि कळकळीची व्यक्ति डॉ. केसकर यांची उणीव भरून काढण्यासाठीं पुढें सरसावलेली आहे. शांतिनिकेतनमधून त्यांनी कलाप्रेम घेतलें आहे. हैद्राबादमधून खानदान आणि खानदानी संस्कृतीचा आविष्कार करणारें शब्दलालित्य आणि पाश्चात्य संस्कृतीच्या सहवासातून त्यांनीं उदार दृष्टिकोन उचलला आहे. या तिहेरी संगमातून त्यांचें व्यक्तित्व उन्नत झालें आहे. साहजिकच त्यांच्या स्वभावात हेकेखोरपणा तर नाहींच; पण आग्रहीपणाहि नाहीं. पण म्हणून आपल्या ऐसपैस वागणुकीप्रमाणें ते कोणत्याहि प्रश्नाच्या बाबतींत निश्चयीपणा धारण करू शकत नाहींत असें मात्र नव्हे.

तो निश्चयीपणा त्यांनीं नभोवाणीची भाषा धडाडीनें सुधारतांना दाखविला आहे त्यांच्याशीं बोलतांना मला उत्कटता आढळली ती भाषेच्या प्रश्नावर. त्यांचें असें खंबीर मत आहे कीं, नभोवाणीची भाषा ही सर्वसाधारण श्रोत्यांना सुगम आणि सुबोध वाटेल अशी असावी. नाहीं तरी नभोवाणी ही आता धनिकाची वा विद्वानाची मिरास राहिलेली नाही. गावोगांवच्या कट्ट्यावर बसणारे, बाजारात फेरफटका करणारे, शहराच्या गल्लीबोळांतून राहणारे असंख्य लोक आज नभोवाणीचे श्रोते झाले आहेत. त्यांची भाषा सुसंस्कृत नसेल, पण जनमनाची पकड घेणारी ती असते. मग त्या भाषेंत सुसंस्कृतांना परभाषा वाटणाऱ्या भाषेंतील शब्दांची गल्लत का झालेली असेना ! गोपाल रेड्डी यांच्या सुसंस्कृत मनाला कोणत्याहि भाषेबद्दलचा वा शब्दप्रयोगांबद्दलचा हा दुस्वास पटत नाहीं. शब्दलालित्यानें लोभावून जाणें हा त्यांचा प्रकृतिधर्म झाला आहे.

# १४.

## निस्तब्ध बसलांत तर

कधीं कधीं असें वाटतें काहीं सांगू नये; कांहीं बोलू नये. स्वस्थ पाहत बसावें. आगगाडी जोरात चालली असली, समोर ढगांचा थयथयाट चालला असला, डोंगरमाथ्यावरून पाढऱ्या शुभ्र पाण्याचे प्रवाह खळखळून उड्या घेत असले म्हणजे वाटतें असेंच नुसतें पाहत बसावें. एकट्यानें टक लावून पाहत बसावें, त्या वेळीं कोणाचा शब्द ऐकू नये असें वाटतें, आपलाहि आवाज ऐकू नये असें वाटतें. पण ती स्वस्थता मात्र हवी, आणि तो आरामहि हवा. म्हणजे माणसांची वर्दळ नसावी. गाडीच्या खिडकीवर रेलून आणि जरा पुढें वाकून एकट्यानें त्या रम्य निसर्गाचा आस्वाद घेतां यावा अशा वेळीं क्षणार्धांत वाऱ्याचा झोत येतो, आणि अंग रोमांचित होते, मधूनच पाण्याचा शिडकावा होतो आणि मनोवृत्ति मोहरून येतात. कधीं ढगांची पांगापांग होऊन त्यांचा जणु पाठशिवणीचा खेळ चालल्यासारखा वाटतो आणि त्या दृश्यानें डोळे आनंदित होतात, चित्त-वृत्ति पुलकित करणाऱ्या या निसर्गाच्या सान्निध्यांत बोलावयाचें तरी काय आणि कोणाशीं ?

होय; पण त्याला एकच अपवाद आहे. रसिकानो, तुम्हाला तो अपवाद कळल्याशिवाय का राहणार आहे ? तोच तो अपवाद–कीं ज्या एका सान्निध्यात निसर्गाचीं हीं मनोवेधक रूपें फिकीं तर वाटणार नाहींतच, पण ज्यांचें वर्णन करण्यासाठीं प्रत्यक्ष रसवतीच आपल्या जिभेवर प्रगट होईल. तिथेंच फक्त आपल्या आवाजाला बंधन पडणार नाहीं, आणि तिथेंच फक्त डोळ्यांनीं आणि मन-श्चक्षूनीं टिपून घेतलेल्या सौंदर्याचा दुसऱ्या कोणाला साक्षात्कार घडवून देण्याची आपल्याला मुभा मिळेल.

तेवढा एकच एक अपवाद वगळला तर मात्र तुम्ही स्वस्थ, निस्तब्ध बसणें हेंच बरें ! अगदीं निस्तब्ध,–नुसतें मुखानेंच नव्हे तर प्रत्येक प्रकारच्या कृतीनें. काय आश्चर्य आहे पाहा ! सौंदर्याचे हे रंग उधळले जात आहेत, आणि आम्ही म्हणे वाचनात दंग झालों आहोंत. कसलें वाचन ? तर रहस्यकथेचें. सृष्टीचीं हीं रहस्यें अनंत रूपांत उलगडलीं जात असतांना मानवी विकृतींचीं चित्रें रंगविणाऱ्या या रहस्यकथांनीं का आपल्याला सोबत करावी ? अरे, काय हा करंटेपणा ! पण तोच जर तुम्हाला करावयाचा असेल तर मात्र तुम्ही बोला, चर्चा करा आणि अटीतटीनें वाद घाला. नाहीं तरी तेंच आपलें जीवन झालें आहे नाहीं का ? चर्चा, वादविवादाचें, अनंत तक्रारींचें आणि चिरंतन आक्रंदनाचें. त्या खेळात आपण मग्न असताना, समोरून वादळी ढग वाहत आहेत, पाढरे शुभ्र प्रवाह झेप घेत आहेत, वारा आपल्या कानाशीं गीत गुणगुणत आहे. पण त्यांच्याकडे लक्ष द्यावयाला आपल्याला वेळ कोठें आहे ? बाबानो, तुम्ही ऐकणार नाहीं माझें. पण अशा वेळीं जो निस्तब्ध समाधि लावू शकेल तो खरोखरच धन्य होय.

## १५.

# जेव्हां १४ वनराज पळाले.

दैनिक वृत्तपत्रामध्यें खळखळून हसावयाला लावणारी एखादी तरी वार्ता असावी असें मला नेहमीं वाटत आलें आहे. पण साऱ्या जगात अशी कांहीं तणातणी वाढत चालली आहे कीं, राजकारणाच्या रुक्ष चर्चा, पुढाऱ्यांचे संदेश, आरोप आणि प्रत्यारोप, पार्लमेंट आणि विधानसभांतील वादविवाद आणि खेळ घेतला तरी त्यात उठणाऱ्या वादाच्या ज्वाळा याबद्दलच्या बातम्यांनींच आपल्या वृत्तपत्राचे रकाने भरून निघतात. वाचकांच्याहि अगवळणीं हें गांभीर्य आतां इतकें पडलें आहे कीं, चुकूनमाकून एखादी हास्यकथा कोठें प्रकाशित झाली किंवा एखादें चटकदार व्यंगचित्र पाहण्यात आलें तरी, त्याच्या मुद्रेवर एखादी स्मिताची लकेर उजळून गेली तरी भाग्य मानावें असें म्हणावयाची वेळ आली आहे.

म्हणून आज जेव्हां मी वार्ता वाचली, " पोस्टमनला पाहून १४ सिंह पळाले " तेव्हा मला जसें खळखळून हसू आलें तसेंच नितान्त समाधानहि वाटलें. आहे बुवा ! मी म्हणालो, एकदां तरी वृत्तपत्रानें आपलें काम केलें, वाचकाचें मनोरंजन केलें. प्रथम मला वाटलें, ही एक कल्पित कथा असेल. नंतर विचार आला कीं, हे सर्कशींतील सिंह असतील. पण नाहीं, आफ्रिकेंतील जंगलातील ते खरेखुरे सिंह होते. असें कळतें कीं, वनराजाच्या, ऐषआरामी जीवनानुसार ते वामकुक्षी घेत भर रस्त्यावर पहुडले होते. रस्ता हा मानवी जीवनातील सुधारणेचें एक प्रतीक आहे. पण वनराजांना त्याचें काय होय ? कदाचित् दाट जंगल झाडींत पाय आखडून बसण्यापेक्षा ऐसपैस पसरलेल्या रस्त्यावर सूर्यकिरणांनीं न्हाऊन निघणें त्या वेळीं यांना अधिक प्रसन्नतेचें वाटलें असेल.

पण त्या दिवशीं त्याचें काय दुर्दैव ओढवलें कोण जाणे ! त्याची वामकुक्षी पुरी होऊ शकली नाहीं. तिचा भंग झाला आणि हा भंग कोणी केला तर एका मानवानें. हा मानव एक पोस्टमन होता. तुम्ही म्हणाल, पोस्टमन ? होय टपालवाला पोस्टमन. यापुढील काळात कधींकाळीं अडखळत पोस्ताची अधेलीं देतांनाच पोस्टमनची आठवण काढू नका बरें ! हा पाहा एक शूर पोस्टमन, कीं ज्यानें एका नव्हे, चौदा वनराजांना पळावयाला लावलें—अक्षरशः जंगलांत पिटाळून लावलें. हा चमत्कार त्यानें कसा केला हें विचारू नका. जें घडलें तेंच तेवढें लक्षात ठेवा आणि आतां दररोज तुमच्या दाराशीं येणाऱ्या, वाऱ्या-वादळांत तुमची सेवा करणाऱ्या, आपल्या अठरा विश्वे दारिद्र्याची खंत न बाळगता तुमच्या प्रियजनाची तुम्हाला खुशाली कळविणाऱ्या पोस्टमनची उपेक्षा करू नका.

वनराज, तुमच्याबद्दल मात्र मी उसासा टाकू नये तर काय ? एका पोस्टमननें तुम्हांला पिटाळून लावावें ! काय झाली ही तुमची दशा !

# १६.

## ‘ घटका जाती पळें जातीं ’

मीं घड्याळात पाहिलें. बरोबर दोन तास उलटून गेले होते आणि तरीहि मी वाट पाहत होतों अधीर मनानें. पण तुमच्या कल्पनेप्रमाणें अस्वस्थ कां व्हावयाचें ? आपलें काम आहे तें थोडेंच घड्याळाच्या काट्यांप्रमाणें वक्तशीरपणें व्हावयाचें आहे ! कधीं आपल्या सोयी-प्रमाणें, कधीं लोकांच्या सोयीप्रमाणें होणार तें. भारी बुवा घड्याळाकडे पाहून काम करण्याची अमेरिकन पद्धति आपल्या अंगवळणीं पडूं लागली ! अरे बाबानो, जरा स्वस्थतेनें घ्या. आतां तुम्ही बसलाच आहांत ना. मग घड्याळाकडे कशाला बघता ? समोरच्या हिरव्यागार लॉनकडे पाहा ना. तिथें पाहा तो अल्सेशिअन कसा निवातपणें झोंपला आहे. त्याच्यासमोर एक कावळा नाचत आहे. कावळा म्हणे एकाक्ष आहे. खरें खोटें कोण जाणे. पण आज त्याच्याकडे टक लावून पाहिलें तेव्हां एका डोळ्यानें न्याहाळत, पण समोवतालच्या प्रत्येक हालचालीची जाणीव ठेवत डौलदारपणानें इतस्ततः नाचत असलेला तो मला दिसला. काळाभोर कावळा हा कुचेष्टेचा आणि तिरस्काराचा विषय झालेला आहे. पण त्याचें कारण असें, कीं आपण शांतपणें त्याच्या डौलाकडे कधीं पाहिलेंच नाहीं.

पाहणार तरी कसे ? सारा वेळ आपला घड्याळाकडे पाहण्यात आणि उशीर होत असल्याबद्दल शिव्याशाप देण्यातच जातो. म्हणे भेटीची वेळ ठरली होती. ठरू द्या. पण ज्या माणसाच्या भेटीसाठी आपण तळमळत असतों त्याचें घड्याळ चुकलें तर काय करावयाचें ? अस्वस्थ मनानें फेऱ्या घालावयाच्या, मनाचा संताप करून घ्यावयाचा ? कशाला तो ? त्यापेक्षा स्वस्थ कोचावर पडा, डोळे मिटा आणि मनावरील सारा ताबा सैल करा. तुम्ही भाग्यवान असाल तर त्या अवधींत तुम्हांला सुरेख डुलकी लागेल. हा पाहा, माझ्याजवळ बसलेला भाग्यवान इसम. त्याला खरेंच शान्त झोंप लागली आहे. त्याच्या मुद्रेवर तरळणारी ती स्मितरेषा पाहा. मला वाटतें त्याला कसलें तरी गोड स्वप्न पडत आहे. हाच खरा सुखी प्राणी बरें. आणखी कांहीं सेकदांनीं, मिनिटांनीं किंवा तासानींहि त्याला आंतून बोलावणें येईल तेव्हां प्रसन्न मनानें तो आंत जाईल आणि भेट घेणारी थोर व्यक्तिच जेव्हा त्याला योऱ्याशा अस्वस्थपणानें म्हणेल “ माफ करा हं, वेळ झाला आपल्याला ! ” तेव्हा तोच हसून म्हणेल “ काही नाहीं हो, तुम्हीं फार कामाचीं माणसें ” लक्षात ठेवा त्याचें काम अधिक तातडीनें होईल बरें.

तात्पर्य काय, कीं आजच्या जगांत धीर धरावयाला आपण शिकलें पाहिजे. “ वेळ हीच संपत्ति ” वगैरे म्हणी ठीक आहेत. सेकदागणिक संपत्तीची वाढ करणाऱ्या कित्येक अमेरिकन लोकाना रात्रींच्या वेळीं झोपेच्या गोळ्या गिळाव्या लागतात हें लक्षात ठेवा. इतकी अधीरता, अस्वस्थता ठेवावयाची आणि मग झोंपेचीहि आराधना करावयाची हें काय जीवन झालें ?

१७.

## ‘ बाई, तोल सोडूं नको ’

प्रे. केनडी याना भारताकडून एक डोलती खुर्ची बक्षीस देण्यांत येणार आहे. केनडी याना डोलत्या खुर्चीवर बसण्याची मोठी आवड आहे म्हणतात. क्षणांत गभीर लेखन करावें, क्षणांत पाठी-मागें रेलून विचार करावा आणि कोणी भेटावयाला आलें तर सहजतेनें गप्पा ऐकतां ऐकता पाठीला विश्रांति द्यावी अशा अनेक क्रिया या डोलत्या खुर्चीत बसून करता येतात असा त्या खुर्चीचा गुणविशेष आहे. केनडी हे तसे गर्भश्रीमत, पण त्याच्यावर जबाबदाऱ्या अशा पडल्या कीं खुर्चीत रेलून ते जी काहीं विश्रांति घेऊ शकतील तेवढीच त्यांच्या वाट्याला येत असे. म्हणून डोलत्या खुर्चीचा त्यानीं आश्रय घेतला.

आतां भारताकडून एक नवी खुर्ची त्यांना भेट म्हणून जाणार आहे. अमेरिकन अध्यक्षाची ही खुर्ची. साहजिकच सारें स्टेट डिपार्टमेंट आणि सारें गुप्तखातें त्याची बारकाईनें पाहणी करील. त्याना काळजी पडणारच कीं ही डोलती खुर्ची डावीकडे तर अधिक झुकणार नाहीं ? ती मागेंपुढें होणारच पण स्थिर होताना तिचा कल उजवीकडे झुकला पाहिजे एवढाच त्यांचा कटाक्ष राहणार. त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मागचा कल. तटस्थतावादी भारताच्या धोरणाप्रमाणें मागे रेलतांना सारा तोलच सुटला तर काय करावयाचें ? हाहि सशय त्यांच्या मनांत डोकावला तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाही.

हे सशय दूर होऊन त्या खुर्चीचा प्रवास सुरू होईल तेव्हा मात्र तिला केवढें महत्त्व प्राप्त होणार आहे. आतापासूनच तिचे फोटो झळकू लागले आहेत. उद्या ती अमेरिकेला पोंचेल आणि या लाकडी, अचेतन खुर्चीचे फोटो घेण्यासाठीं छायाचित्रकारांची एक पलटणच विमान-तळावर उभी राहील. तेथून व्हाइट हाऊस. जगांतील सर्वांत अधिक संपन्न असलेल्या देशाचा सर्वोच्च पुढारी तेथें राहतो आणि तो या खुर्चीवर स्थानापन्न होणार ! कोणाचें भाग्य केव्हां, कसें उजळेल याचा नेम नाहीं खरा.

एक लहानशी डोलती खुर्ची. पण भारत आणि अमेरिका या दोन थोर राष्ट्रांच्या संबधात जिव्हाळ्याचा भाव निर्माण करण्याचें कार्य तिच्या हातून पार पडणार आहे. भारतांतील जाणते लोक तिला एवढेंच म्हणतील, “ बाई, आपला तोल सोडू नको. ” काहीं सावध आत्मे त्याला पुस्ती जोडतील, “ निदान तिसरी पचवार्षिक योजना होईपर्यंत तरी बाई उलटू नको; नाहीं तर आमचा कपाळमोक्ष ठरलेला आहे. ”



...२

# १८.

## पाहूं बरें कोण पुढें पळे तो ?

कॉ. मिकोयान हे रशियातील एक हसरे पुढारी आहेत. त्यांच्यामध्यें विनोदाचें जें अंग आहे तें सहसा कम्युनिस्ट पुढाऱ्यात आढळून येत नाहीं. कम्युनिस्ट हा अति गंभीर असतो. कारण दिवसाच्या प्रत्येक क्षणीं तो जगत्क्रांतीची चिंता वाहत असतो त्या गांभीर्यांत खंड पडून तो हसू लागला तर एक तर तो भेसूर हसतो किंवा त्यात मर्मभेदक उपहासाची छटाच अधिक असते. खुलेपणानें बोलणें आणि खळखळून हसणें या दोन्ही गोष्टी कम्युनिस्टांना वावड्याच असतात.

मिकोयान यांचा नूरच वेगळा आहे. ते स्वतः हसतात आणि दुसऱ्यालाहि हसवू शकतात. खुद्द स्तालिनलासुद्धा ऐन गंभीर प्रसंगीं त्यांनीं हसविल्याच्या दंतकथा रूढ आहेत. या दंतकथात सत्य किती हें सांगणें कठीण आहे. कारण क्रेमलिनच्या बंदिस्त परिसरात स्तालिनच्या वेळीं काय घडत होतें हें सत्य स्वरूपात कधींच उघड झालें नाहीं. पण स्तालिनच्या काळीं सहस्रावधि अनुयायांचें शिरकाण झाल्यानंतरहि मिकोयान हे आपले शिर सलामत ठेवू शकले; ही तरी निदान त्यांच्या वैशिष्ट्याचीच खूण मानतां येईल. असें म्हणतात कीं, स्तालिनचा कल पाहून वागण्याचें कसब मिकोयान यांच्या रक्तांत भिनलेलें होतें, त्याचप्रमाणें विनोदाची फुंकर घालून स्तालिनला रिझविण्याची कलाहि त्यांना पुरेपूर अवगत होती.

हें कसब आणि ही कला क्रुश्चेव्ह यांच्या मनोविनोदनासाठींहि ते उपयोगांत आणतात ती किती यशस्वीपणें, हें त्यांच्या वाढत्या वर्चस्वावरूनहि दिसून येतें. प्रसंगविशेषीं मोठ्या धाडसीपणानेंहि त्यांना विनोदाचा आश्रय घ्यावा लागतो. त्यांच्याबद्दल नुकतीच जी एक दंतकथा प्रसृत करण्यात आली आहे तिच्यावरूनसुद्धां या धाडसाची कल्पना करतां येईल. ही दंतकथा क्रुश्चेव्ह व केनडी यांनीं व्हिएन्नामध्यें ज्या बढाया मारल्या त्यांविषयींची आहे. रशियन शास्त्राच्या प्रगतीची बढाई मारताना क्रुश्चेव्ह म्हणाले कीं, आम्ही मृत माणसालासुद्धा जिवंत करू शकतो. केनडी लगेच म्हणाले, " अहो शास्त्राचें काय सांगतां ? आमचा माणूस तीन मिनिटात १२० मैल धांवू शकतो. चला पैज लावू या ! "

त्यानंतर मॉस्कोला आल्यावर क्रुश्चेव्ह यांनीं मिकोयान यांना चिंतेच्या स्वरात म्हटलें, " कॉमरेड, खरेंच का अमेरिकेत तीन मिनिटात १२० मैल धावणारीं माणसें असतील ? "

" हो तर. " मिकोयान लगेच उत्तरले, " हें पहा, निकिता, मृत माणसाला जिवंत करण्यात आपल्या शास्त्रानें जें यश संपादन केलें आहे असें तुम्ही केनडीला सांगितलें, त्याचा प्रयोग स्तालिनवर केला तर तुम्ही आम्ही सुद्धा एका मिनिटांत १२० मैल अंतर तोडू. "

# १९.

## रानटी युगाचा आचार

पत्नीच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला तर माणसाचें मन उद्विग्न होणें, प्रक्षुब्ध होणें साहजिक आहे. पण अखेरीस पतिपत्नीचे संबंध ही व्यक्तिगत बाब आहे ना ? सुसंस्कृत व्यक्ति मग ती स्त्री असो किंवा पुरुष असो, आपलें हें दुःख हृदयात दडवून ठेवील, कीं बेभान होऊन साऱ्या समाजापुढें आपली जखम उघडी करील ? मला वाटतें आपण आतां विसाव्या शतकात राहात आहों आणि रानटी युग आपण काहीं शतकांनीं मागें टाकलें आहे. त्या शतकाच्या प्रवासात समाज-जीवनाचे व व्यक्तिजीवनाचे काहीं आदर्श आपण आखले. ते आदर्श शिक्षणांतून, सुसंस्कृतपणांतून, नवनव्या मूल्यातून परिणत झाले. व्यक्ति आणि समाज, कुटुंब व त्याचे घटक, पतिपत्नी आणि मुलें यांच्यामधील परस्परसंबंध त्या आदर्शांवर आधारलेले आहेत. त्या आदर्शांचा गाभा कोणता तर कायद्याचें अधिष्ठान, समजूतदारपणा आणि सहिष्णुता. आतां जंगलचा कायदा रूढ होऊ शकणार नाहीं. अन्यायाची दाद मागावयाची असेल तरी न्यायालयाचीच आपल्याला कास धरावी लागेल, व्यक्तिजीवनांत संघर्ष उत्पन्न झाला तरी सामर्थ्याचा उपयोग आपल्याला करतां येणार नाहीं आणि पतिपत्नीसंबधांत बिघाड उत्पन्न झाला तरी आपल्या प्रक्षुब्ध भावना अतिरेकी कृतींत उतरविण्याची आपल्याला मुभा राहिलेली नाहीं.

याचें कारण आपण रानटी राहिलेलों नाहीं; आपण सुधारलेल्या सुसंस्कृत जगाचे घटक झालों आहोंत. पण खरेंच का आपण सुसंस्कृत झालों आहों ? कोण जाणे ! कायद्याचें येथें राज्य आहे. पण व्यवहार ? एका नाविक अधिकाऱ्यानें तो व्यवहार दाखविला. पत्नीच्या चारित्र्या-वर रुष्ट होऊन त्यानें तिच्या प्रियकराचा खून केला. केवढें हें आततायी कृत्य. पण जबाबदार व्यक्तींनीं त्याचें समर्थन केलें आणि समाजानें त्याला वीरपुरुष बनविला. वीरपुरुष ? पूर्वी भगतसिंग, राजगुरु हे आपले वीरपुरुष होते. जतीन् मुकर्जी आणि धिंग्रा यांच्यासाठीं आपण अश्रु ढाळीत होतों. आता एक कमांडर, नाविक दलांतील बहादुरीसाठीं नव्हे पुर पत्नीच्या प्रियकराचा धडधडीत खून केल्याबद्दल वीरोचित प्रशस्ति घेऊ लागला आहे त्याहिपेक्षां आश्चर्य असें कीं आमच्यातील कांहीं सुविद्य आणि सुधारलेल्या महिलांनीं त्याला प्रेमपत्रे पाठवून त्याच्याशीं विवाहबद्ध होण्याची म्हणे इच्छा प्रगट केली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत ही सामाजिक प्रतिक्रिया दिसावी हें का प्रगतीचें लक्षण ?

मी भावना समजू शकतों. व्यक्तीच्या अंत करणात पत्नीच्या प्रेमाला पारखें झाल्यामुळें किंवा तिच्या दुर्वर्तनामुळें केवढ्या यातना होत असतील याची कल्पनाहि मी करू शकतो. पण म्हणून अविवेकी, अतिरेकी उपाय योजणें हें कदापीहि समर्थनीय ठरू शकत नाही. सुसंस्कृतपणाचें तें लक्षण खास नव्हे.

30.

## आंकड्यांची किमया

बेस्ट बसेसवर लवकरच अक्षरांऐवजी आंकडे देण्यांत येणार आहेत. १२७ सारख्या बसेस कांहीं मार्गांवर धावूंहि लागल्या आहेत. हें बरें कीं वाईट हें आजच कसें सागतां येईल ? ए बी सी डी हीं बसेसचीं नांवें आपल्या अगवळणी पडली होतीं. एकेका बसची शान ज्या वस्तींतून ती जाई त्यावरून ठरत असे आणि प्रत्येकाला उगाचच वाटे ही आपली बस. आतां क्रमांक परिचित व्हावयाला आपल्याला थोडा वेळ लागेल. आणि शेकड्याचे आंकडे ध्यानीं धरावयाला त्रास तरी केवढा होईल. पण जग सारखें पुढें जात असतें, त्यात सारख्या सुधारणा होत असतात. हेंच पाहा ना पौंड आणि रत्तल गेले, किलो आले; दशमान पद्धतीचीं नाणीं आलीं त्यावेळींहि आपल्याला कसें चुकल्यासारखें वाटलें. पण आता नया पैशांत गरीबगुरीबांचे आणि शिक्षित-अशिक्षितांचेहि व्यवहार होऊं लागले. तसेच हे आंकडेहि रुळतील आणि मग डी आणि ई रूटच्या बसेस पूर्वीच्या वाहनांप्रमाणें आठवणींचे विषय होतील.

या आकड्यांच्या बसेसचा एक मात्र फार मोठा उपयोग होणार आहे हें तुमच्या लक्षात नसेल. तुम्हीं कधीं ' ओपनिंग ' म्हणून कागदाच्या चिठोऱ्या घेऊन धांवणारीं मुलें पाहिलीं आहेत का ? तो आवाज आला की खिडक्या दरवाजे खटाखट उघडतात आणि बाजारच्या वा दुसऱ्या गर्दीच्या ठिकाणीं क्षणार्धांत लोकविलक्षण, खळबळ उडालेली दिसून येते. ही सारी खळबळ आकड्यांसाठीं असते बरें ! ' ओपनिंग ' आणि ' क्लोजिंग ' हे आकड्यांच्या विश्वांत घालमेल करणाऱ्या लोकांचे अगदीं परवलीचे शब्द असतात. तसें पाहिलें तर न्यूयार्कच्या बाजाराचा चढउतार तेवढा त्यात प्रतीत होतो. पण लक्षावधि रुपयाचा सट्टा त्यावर अवलंबून असतो आणि एका क्षणात त्या आकड्यांच्या प्रभावामुळें सहस्रावधि संसार धुळीला मिळत असतात.

आकड्याचें हें प्रेम आणि त्यांवरील ही भक्ति तुम्हाला समजणार नाहीं. पण पॉपच्या केसावर आणि आमच्या बन्याबापूच्या हाताच्या पट्ट्यावरसुद्धां कित्येकांना आपल्या उज्वल भवितव्याची खूण दिसून येते. बरें भवितव्याच्या अंधारात काय सांठविलें आहे हें कोण सांगू शकणार ? पण एखाद्या आकड्यावरून जर कोणाला आशेचा किरण दिसला तर त्या भाबड्या जिवाचा हा विरंगुळा तरी कोण काढून घेऊं शकेल ? आतां बेस्टच्या आंकडेवाल्या बसेसमुळें हे आशेचे किरणच चमकणार नाहींत तर आशेचा जणु प्रकाशझोत टाकीत त्या बसेस उभ्या मुंबईच्या हमरस्त्यांवरून फिरत राहतील. आता आंकडेच आंकडे आले, खुशाल नशिबाची परीक्षा पाहा !

# ३१.

## पराजयाचें चिन्ह

आज बर्लिनच्या विभाजनाचा स्मृतिदिन आहे. एक वर्षापूर्वी याच दिवशीं पूर्व आणि पश्चिम बर्लिनची फारकत झाली. ते दोन विभाग या दिवशीं एका भिंतीनें एकमेकापासून अलग करण्यात आले. एका रात्रींत ही घटना घडली. उभय बाजूच्या नागरिकाना जाणीव होण्यापूर्वीच काटेरी तारेचें एक कुपण त्यांच्यामध्यें उभारण्यात आलें आणि एका क्षणांत रस्ते आणि घरें विभागलीं गेलीं, प्रियजनाची ताटातूट झाली. प्रथम कोणाला कल्पनाहि झाली नाहीं कीं ही ताटातूट कायमची होणार आहे. पण ती जाणीव होताच ज्याना शक्य होतें त्यानीं मोकळ्या राहिलेल्या वाटानीं पलायन केलें, कोणीं घरांवरून उड्या झोकल्या, कोणीं धैर्यानें ताराहि तोडल्या. पण थोडक्याच काळांत पलायनाचे सारे मार्ग बंद झाले आणि बंदिस्त जगांतून स्वतंत्र जगांत पाऊल टाकण्यासाठीं जिवावर उदार होऊनच प्रयत्न करण्याची पूर्व बर्लिनमधील नागरिकावर पाळी आली.

बंदिस्त जग नव्हे तर काय ? पूर्व बर्लिन आणि पश्चिम बर्लिन एकमेकांसमोर आणि एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभें आहे. त्यात नाकेबंदी करण्याचे कारण काय ? तेथील भूमि सारखी, लोकाच्या अंगीं रक्त सळसळत आहे तेंहि एकाच पूर्वजाचें आणि त्यांच्या परपराहि सारख्याच. आज पूर्व बर्लिन कम्युनिस्टाच्या ताब्यात गेलें आहे. आणि पश्चिम बर्लिन स्वातंत्र्याच्या दिमाखात आपल्या पुनरुज्जीवनाची धडपड करीत आहे पूर्व बर्लिनमध्यें कम्युनिस्ट नंदनवन निर्माण होत असेल आणि पश्चिम बर्लिनचें स्वातंत्र्य फोल असेल तर पूर्व बर्लिनच्या राज्यकर्त्यानीं आपल्याच लोकांच्या संचारावर बंदी घालण्याचें कारण काय ? लोकांना हिंडू द्या, एकत्र काम करू द्या, प्रियजनांच्या भेटी निःशंकपणें होऊ द्या. मग लोकच आपोआप निर्णय घेतील कीं, कोणती राजवट सुखावह आहे, कोणती राज्यव्यवस्था समृद्धीच्या मार्गावर नेणारी आहे.

पण याचीच ज्यांना भीति वाटते ते तारेचीं कुपणें घालतात, आणि भिंतीचा कोट उभा करतात. कारण पूर्व बर्लिनमध्यें आजहि सारें उध्वस्त स्थितींत पडलेलें आहे, तेथे रस्त्याना गर्दी नाहीं आणि दुकानांत माल नाहीं. पश्चिम बर्लिनहि युद्धाच्या खाईतूनच बाहेर पडलेलें आहे. पण सात वर्षांत त्या विभागाची पुनर्रचना झाली, तेथील लोकाच्या जीवनात समृद्धि आली आणि विमुक्त आनदानें आणि अमर्याद आत्मविश्वासानें ते जीवनाचा तर आस्वाद घेत आहेतच; पण बाहेरच्या जगालाहि साहाय्य द्यावयाला ते प्रवृत्त झाले आहेत.

—त्यांच्या आनदांत एकच शल्य आहे तें मधोमध उभारण्यांत आलेल्या अवघड भिंतीचें. ही भिंत शहरच नव्हे तर हृदयें तोडीत आहे. बर्लिनच्या जीवनाची ही शोकांतिका आहे; पण पूर्व बर्लिनमधील कम्युनिस्ट राजवटीच्या अमानुषतेचें तसेंच पराजयाचेंहि तें चिन्हच नव्हे काय ?

# ११.

## अवखळ हिमालय-कन्या

कोसी नदीला महापूर आला आहे. महापूर म्हणजे काय हें पाहावयाचें असेल तर या नदीच्या पात्राकडेच दृष्टि टाकावयाला पाहिजे. उन्हाळ्यांत हें पात्र राजस्थानच्या वाळवंटासारखें होतें आणि पावसाळ्यात त्याला सागराचें रूप येतें वाळवंटांत रस्ता चुकला तर मरण ओढवतें आणि पाणी आलें कीं दृष्टि ठरत नाहीं. अशी ही कोसी नदी आहे. बिहारची ती अन्नदाती पण तिचा कोप झाला कीं विध्वंस अगदीं प्रलयकारी होतो.

कोसीबद्दल म्हणूनच दंतकथा प्रचलित आहेत. एक दंतकथा मोठी सूचक आहे. ती अशी : कोसी ही हिमालयाची कन्या. तिचें एका शेतकऱ्यावर प्रेम जडलें. पण त्यानें तिचा धिक्कार केला. कोसी ही जितकी अवखळ तितकीच हट्टी. तिनें त्या शेतकऱ्याचा नाद सोडला नाहीं. जेथें तो जाईल तेथें त्याचा तिनें पाठलाग केला. कालांतरानें शेतकरी निजधामाला गेला. पण कोसी अद्याप त्याच्या शोधार्थ सैरावैरा हिंडत आहे आणि क्रोधानें व निराशेनें सर्वत्र विनाश तेवढा ओढवून आणीत आहे.

हा विनाश मी डोळ्यानीं पाहिला आणि हिमालयाच्या पायथ्याचें कोसीचें गोजिरवाणें रूपहि पाहिलें. नेपाळांतील विराटनगराच्या आसपासच हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावरून कोसी उड्या घेत खालीं येते. स्फटिकासारखें पांढरें स्वच्छ पाणी आहे तिचें. एवढासाच प्रवाह पण कसा खळखळत बाहेर येतो. किती उन्मादानें धांवतो. त्या पाण्यात पाय टाकले तर ते ठरत नाहींत. हिमालयकन्यकेचा सारा अवखळपणा तिच्या अंगप्रत्यगांत भरलेला आहे. पण नुसताच खळखळाट नव्हे; त्यांत तेज आहे तशीच गभीरताहि आहे. म्हणूनच हिमालय वितळला कीं अवखळ कोसीचें पाणी दशदिशातरीं पसरतें आणि मग त्याला प्रतिबंध घालण्याची कोणाचीहि हिंमत नाहीं.

मानवी प्रयत्न मात्र त्या दृष्टीनें चालले आहेत. कोसीच्या उगमापाशीं एक धरण बांधण्याची योजना हातीं घेण्यात आली आहे. त्यानतर दुतर्फा बांध घालून कोसीचा अवखळपणा आटोक्यात ठेवला जाणार आहे. तो बांध आज उभा आहे. पण कोसीनें उग्र रूप धारण केलें कीं सारे बांध कोसळून पडतात आणि मग ती ज्या सुपीक भागांत पाऊल टाकते तेथें वैराण वाळवट तयार होतें. कोसीला शृंखला घालणें ही एक समस्या आहे. पण ती समस्या सुटली तरच बिहारच्या प्रतिवर्षी उजाड होणाऱ्या भूमीला निवांतपणा मिळेल.

# ३३.

## अवकाशाचा भेद

आकाश ही एक पोकळी आहे हें आपल्याला माहीत होतें. पण या पोकळीचा इतक्या खोलवर भेद घेतां येईल अशी आपली कल्पना नव्हती. अवकाशाबद्दल कांहींच कल्पना नसल्यामुळें आपली एक भाबडी समजूत होती कीं, न जाणो या पोकळीच्या फारच आंत आपण प्रवेश केला तर आकाश फुटेल आणि त्याचे परिणाम कांहींतरी भयानक होतील. आपल्या देवभोळ्या मनाला आंतून अशीहि जाणीव होत असे कीं, " यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परम मम " असें ज्या निवासाचें भगवतानींच गीतेंत वर्णन केलें आहे तें परमेश्वराचें निवासस्थान या निळ्या आकाशा-पलीकडेच कोठेंतरी असेल.

पण आज अंतराळवीरांनीं आकाशाचें आणि अवकाशाचेंहि सारें रहस्य फोडलें आहे. निकिता क्रुश्चेव यानीं नास्तिकाच्या आवेशांत साऱ्या जगाला सांगितलें कीं, " तुम्ही जो ईश्वर आणि स्वर्ग म्हणता तो माझ्या अंतराळवीराना शेकडो मैल आत कोठेंच आढळून आला नाहीं. " त्या वीराना फक्त पोकळी तेवढी आढळली आणि त्या पोकळींतून फक्त साडेअठ्याऐंशी मिनिटांत एक याप्रमाणें त्यानीं पृथ्वीला मन मानेल तेवढ्या प्रदक्षिणा घातल्या. आपण स्वतःलाच केवढे मोठे समजतों. पण आपण विशाल पृथ्वीचे असें एक घटक कीं ज्याची तुलना सागराच्या तीरावरील एका वाळूच्या कणाशींच करतां येईल. मग हा कण एवढा अहंकारी तर पृथ्वीनें केवढा अहंकार करावा ?

आज तो अहंकार पृथ्वीला करतां येईल काय ? विज्ञानानें पृथ्वीचा हा सारा दिमाख उतर-विला आहे. कारण एवढ्या विशाल पृथ्वीची फेरी करावयाला वेळ किती लागतो तर फक्त दीड तास. म्हणजे दीड तासाच्या मुठींत पृथ्वी घेरतां येऊं लागली आहे. त्या पृथ्वीपेक्षां अवकाश कितीतरी पटींनीं विशाल आणि केवढा अजस्र, केवढा भयानक. म्हणे त्या अवकाशात नुसता प्रवेश केला तरी शकलें शकलें उडतात. कोणी म्हणे ज्वालामुखीसारखा जळता रस या अवकाशाच्या पोटात दडलेला आहे. म्हणून जाणत्या जबाबदार लोकांचें सांगणें असें कीं, बाबानो, चंद्रलोक आणि सूर्यलोक, तारका, ग्रह आणि सूर्यमंडळें यांच्याशीं खेळ करण्याच्या भानगडींत पडूं नका. या ग्रहाचा आणि उपग्रहांचा कोप झाला तर तुम्हाला कोणीहि तारूं शकणार नाहीं.

मानवी अहंकार किती दांडगा पाहा ! त्याच्या हव्यासाला मर्यादा नाहीं; त्याच्या कुतूहलाला सीमा नाहीं. हे पाहा अंतराळवीर, हेच ना ते वाळूचे कण. पण आज अवकाशाचा अंतर्भेद करून शुक्र, चंद्र आणि सूर्य यांना गवसणी घालण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. मानवी कर्तृत्वाचा हा विजय रोमांचकारी नव्हे तर काय ?

...१५४२८
नों. दि. १५-१-६८

# २४.

## ‘ मंगल होईल देशांत ’

भव्य बादशाही उपाहारगृह आहे, संगीताचे कोमल सूर निघत आहेत. वातावरण कृत्रिम रीतीनें का होईना थंडगार करण्यांत आलें आहे आणि समोर चटकदार खाद्य पदार्थ सुबक रीतीनें मांडून ठेवलेले आहेत. मग मन प्रसन्न, प्रफुल्लित होईल नाहीं तर काय ?

पण त्याच प्रसन्न वातावरणात जर चर्चेचेहि बदसूर निघाले आणि तक्रारींचा आक्रोश ऐकू आला तर तुम्हांला काय वाटेल ? वाटेल, काहींतरी एक चुकलें आहे. हें वातावरण तरी, नाहीं तर त्यातील आपलें अस्तित्व. कां ? कोण जाणे ! पण आपल्या सामाजिक जीवनात नुसताच कडवटपणा आला आहे. विशेषत. सुशिक्षित, सुधारलेल्या, सधन अशा वरिष्ठ वर्गांत तरी ही भावना दृढमूल झालेली दिसून येते. म्हणून पहिली टीका होते ती : काय हें आपलें राज्य, काय हे मत्री, काय ही लाचलुचपत, किती खालच्या पातळीवर आपण जात चाललों आहो ! होय. तें खरेंहि असेल. पण आपण म्हणजे कोण ? कीं साऱ्या अनाचारांतून, अव्यवस्थेंतून, अदाधुदींतून या मूठभर सात्त्विक संतापानें उफाळून आलेल्या महाभागांना तेवढें वगळावयाचें ? त्यांच्या दृष्टीनें सारेंच बिघडलें आहे. स्वच्छ आणि चकचकीत आहे तें भूतकाळातील जीवन. बाकी आज आणि उद्या सारा अंधार आहे. उद्यां तर अगदीं काळाकुट्ट अंधार.

अंधार का ? तर ‘ दीडदमडीचे ’ लोक राज्यकर्ते झाले आहेत आणि त्याहिपेक्षा अर्ध्या किमतीचे आता पंचायती राज्यात वरचढ होणार आहेत. मग शिक्षणाचें स्वरूप काय राहणार ? संस्कृतीचीं मूल्यें काय शिल्लक राहणार ? अहो, लोकशाही कसली ? नुसता उकिरडा तयार होणार आहे. उकिरडाच नाहीं तर काय ? कोळ्यामाळ्यांचीं मुलें आमच्या मुलांच्या बरोबर शिकणार ! मग त्यानीं आपली संस्कृति सोडून ही नवीन संस्कृति उचलली तर काय नवल ?

या शकाकुशका आणि आगामी संकटाची चाहूल यांनीं वरिष्ठ वर्ग बेजार झाला आहे खरा. पण हीं काळाचीं पावलें आहेत, हें कां बरें त्यांना समजू नये ? आता शिपायांचीं मुलें मोफत शिक्षण घेऊन वर येणार हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. उद्या शेतकऱ्याचीं मुलें वकील, डॉक्टर, न्यायाधीश आणि तज्ञ म्हणून पुढें येतील. राजकारण आणि समाजकारण ही तर त्याचीच मिरासदारी होणार आहे. मग ते नेते झाले आणि नियते झाले तर त्याबद्दल खंत ती काय बाळगावयाची ? उलट भूमिजन हे राष्ट्राचे भाग्यविधाते होत आहेत याबद्दल आपण आनंदोत्सवच केला पाहिजे! त्यांचें मार्गदर्शन करण्याची जबाबदारी अद्याप तरी आपल्यावरच आहे. पण ती वरचढ भावनेनें नव्हे तर सेवाव्रतानें आपण पार पाडली पाहिजे. तरच

“ जगल जळेल वणव्यांत ” आणि

“ मगल होईल देशात. ”

# ३५.

## विनोबा आणि कुराण

विनोबाजी म्हणे ' तें ' कुराण पाकिस्तानमध्यें नेणार नाहींत. ' ते ' कुराण म्हणजे काय ? कुराण तर एकच असतें. हें संपादित कुराण आहे एवढेंच. म्हणजे विनोबाना त्यांतील जो गाभा वाटला तोच त्यांनीं एकत्रित केला आहे. गीतेचें नाहीं का त्यांनीं ' गीताई ' केलें ? त्याचसारखें कुराण त्यांनीं सोपें, सुटसुटीत केलें आहे.

पण पाकिस्तानला हा उपद्व्याप वाटतो. कुराणाचें सपादन ! आणि तें एका काफिरानें करावें ! इन्शाल्ला ! हा काय गहजब आहे ! कुराण तें कुराण. ते एकमुखी निर्माण झालें. एकदिलानें तें पढावयाचें. हे काय हिंदु धर्मग्रंथ आहेत–बहुमुखी, सर्वसंग्राहक ? त्यात वेदवाणी आहे, पुराणकथन आहे, उपनिषद् चर्चा आहे, गीतासंदेश आहे. त्याची चिकित्साहि भिन्न, त्यांत खडणमडणहि आहे आणि पाखंडहि आहे. म्हणूनच गीतेत लोकमान्याना कर्मयोग आढळला, गांधीजींना अहिंसा आणि सत्याग्रहाचा मार्ग दिसला आणि विनोबाना वेदान्ताचा आशय आढळला. कोणीहि उठावें आणि या धर्मग्रंथाची चर्चा करावी, त्यांवर टीकाटिप्पणी लिहावी, त्यातून परस्पर-विरुद्ध अर्थ काढावे, इतकेच काय पण प्राकृतातहि त्याचा अनुवाद करावा !

असली ही ' नापाक ' पद्धति पाक सरकारला कशी चालणार ? कुराणाचें म्हणे सपादन, त्याची काटछाट आणि त्याची संक्षिप्त आवृत्ति. काय हें धाडस ! काय हा बेमुर्वतखोरपणा ! ही काय कादंबरी, किंवा ललित कलाकृति आहे ? तर तिचा सक्षेप करावा ? हे प्रेषिताच्या मुखातून बाहेर पडलेले बोल आहेत. ते सारेच बोल, त्यातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक अक्षर पवित्र आहे. त्यांत निवड कसली करावयाची ? आणि त्या बोलांचा कस कसला ठरवावयाचा ?

म्हणून पाक सरकारनें आणि इस्लामच्या भक्तांनीं " त्या " कुराणाची प्रत आणण्याला बंदी केली. इथें सहिष्णुतेचा आणि स्वातंत्र्याचा प्रश्नच येत नाहीं. पाकिस्तान हें काहीं निधर्मी राज्य नव्हे, तें इस्लामी राज्य आहे. आणि इस्लामी राज्यात कुराणाचा अपमान, तोहि एका काफिरानें केलेला कसा चालेल ? विनोबानीं ' तें ' कुराण नेऊ नये. त्यांना पढावयाचेंच असेल तर ' हें ' आणि एकच एक कुराण त्यांनीं पढावें.

अल्लाची खैर ! विनोबा ' तें ' कुराण मागेंच ठेवणार आहेत.

# १६.

## अशीच एक आठवण

डेक्कन क्वीनमध्यें आता म्हणे खारे काजू आणि सुक्या मेव्याचीं पाकिटें विकली जाणार आहेत. वाहवा ! वाहवा. काय ही आपली प्रगति, वाईगर्दीनें बटाटेवड्याचीं पाकिटें हस्तगत करून कर्जत वा लोणावळ्याला अर्ध्यामुर्ध्या विसळलेल्या कपातून माफक गरम चहाचा अर्धा कप मिळाला तरी आपण समाधान मानीत असू. पण आता ऐटबाजपणें आपल्याला खारे काजू खावयाला मिळणार आहेत. आहे ब्बुवा. निदान एका खाद्य पदार्थाच्या बाबतींत तरी डेक्कन क्वीनची पुराणी शान पुनरपि प्रगट होणार आहे.

डेक्कन क्वीनची ती शान काहीं वेगळीच होती. गर्द जांभळ्या रंगाची ही दख्खनची राणी वेगानें मार्ग कापीत जाऊ लागली कीं डोळे ठरत नसत आणि मन कसें उडून जात असे. तिच्या डब्याची रचनाहि मोठी आकर्षक असे. लांब रुंद अशा तिच्या खिडक्या असत. त्यामुळें रेलून बसलें तरी सारा भव्य देखावा आपल्या डोळ्यांसमोर नाचत नाचत निघून जात असे. आधींच वेगाची भावना सुखद. त्यातच सुसज्जित उपाहारगृहात जाऊन बसल्यानंतर खाद्य आणि पेयें निःसंकोचपणें आपल्या समोर येत. त्या पेयांचें नुसतें दर्शन झालें तरी डोळे चमकू लागत आणि त्याचा ओठाला पहिला स्पर्श झाला कीं वृत्ति उल्हसित होत असत. " बॉय " म्हटलें कीं तत्परतेनें आपल्या सेवेला हजर राहणारे वेटर्स त्या वेळीं त्या उपाहारगृहांत असत आणि अबोल कर्तृत्वानें ते आपली चाकरी बजावीत असत. सुवर्णकांतीच्या पेयाचा प्याला आपल्या समोर ठेवताना त्या वेटरचा जो रुबाब दिसून येत असे तो कधीं काळीं एखाद्या पाश्चिमात्य चित्रातच पाहावयाला मिळतो आणि त्या वेळीं दक्षिणच्या राणीच्या त्या वैभवाची आठवण येऊन मनांत कशी खिन्न हुरहुर निर्माण होते.

त्या आठवणीला आज थोडीशी चालना मिळाली खरी ! होय. आता डेक्कन क्वीनमध्यें खारे काजू मिळू लागणार आहेत. पूर्वीहि ते मिळत होते; पण कोणाच्या तरी संगतींत. ती संगत आता गेली. आनंद, उत्साह निर्माण करणारी ती संगत आज परागंदा झाली. आता फक्त आत्मोन्नति तेवढी शिल्लक आहे. तिच्यासाठीं खारे काजू पाकिटांतून मिळावयाची व्यवस्था होणार आहे. दक्षिणच्या राणीच्या वैभवाचा एक अवशेष पुनरपि आपल्या डोळ्यांसमोर येणार आहे. आजच्या प्रगतीचें हें शुभचिन्ह कीं गत वैभवाचें हें स्मारक म्हणावयाचें ?

# १७

## ‘ अजि म्यां सिंह पाहिला ’

गिरनारच्या अरण्यातील वनराजांची आता नव्यानें शिरगणती होणार आहे. १९५० व १९५५ सालीं सौराष्ट्र सरकारनें ही शिरगणती केली होती. त्या वेळीं या वनराजांची संख्या म्हणे २१९ वरून २९० पर्यंत चढलेली आढळून आली. आता गेल्या सात वर्षांत आणखी किती वाढ झाली हें पाहणें मनोरंजक होईल.

गिरनारचें अरण्य हें वनराजाचें राखीव आश्रयस्थान आहे. येथें शिकाऱ्याच्या हस्तक्षेपाची भीति वा संकोच न बाळगतां सिंहसिंहिणींना निवातपणें कालक्रमणा करता येते. हें एकच ठिकाण असें आहे कीं जेथें निसर्गाच्या सान्निध्यातील विमुक्त वनराज आपल्याला प्रत्यक्षपणें पाहावयाला मिळतात. नाहीं तर “ अजि म्यां सिंह पाहिला ” अशी बढाई मारावी लागते ती सर्कशींतील सिंह पाहूनच.

मानवी मनाला सिंहाचें कांहीं तरी विलक्षण आकर्षण आहे खरें. म्हणूनच “ लायन्स इंटरनॅशनल ” नांवाची एक आंतरराष्ट्रीय संस्थाहि या वनराजांच्या नावानें स्थापन झाली आहे. सिंह आणि सिंहिणींच्या या संघटनेचें जाळें साऱ्या जगांतील प्रमुख शहरांतच नव्हे तर त्या शहरांच्या कोनाकोपऱ्यांतहि पसरत चाललें आहे. हे नगरसिंह आणि त्यांच्या सहचारिणी एक प्रकारच्या उच्च वातावरणात वावरतात आणि समाजाशीं त्यांनीं संपर्क ठेवला किंवा समाजहिताचें कार्य केलें तरी वनराजाना साजेशा रुबाबांत आणि त्यांच्याइतक्याच अलिप्त वृत्तीनें ते हें कार्य पार पाडतात. पण त्याबद्दल त्यांना दोष देतां येईल काय ? नाहीं बरें ! समजा, वनराजानीं अरण्याऐवजीं शहरावर हुकुमत गाजविली असती तर त्याचें सिंहासन ताजमहालच्या क्रिस्टल हॉलमध्येंच अधिष्ठित झालें नसतें का ? वनराजांच्या नांवानें निर्माण झालेली ही संस्था. त्या संस्थेनें नाहीं रुबाब राखावयाचा तर कोणी ? नगरसिंह व त्यांच्या सहचारिणी या मानवी खऱ्या. पण वनराजांच्या त्या मानवी प्रतिकृती.

त्या तुम्हांला दिसतात हेंच केवढें आपलें भाग्य. तुम्ही आम्ही गिरनारच्या अरण्यात कोठें जाणार ? आणि व्ही. आय्. पी. नसलों तर त्या अरण्यांत पाऊल टाकल्याबरोबर वनराजाचें भक्ष्य बनण्याचाच अधिक संभव. त्यापेक्षां नगरसिंह आणि त्यांच्या सहचारिणी पाहूनच आपल्या डोळ्यांचें पारणें आपण कां फेडूं नये ? जगाचें भाग्य तरी केवढें ! लायन्स इंटरनॅशनलमुळें वनराजांच्या या प्रतिकृती आपल्याला ठायीं ठायीं पाहावयाला मिळतात.

# ३८.

## झाडें ? पण पैशाचीं

जॉर्ज वॉशिंग्टनची एक गोष्ट आपण लहानपणीं वाचली आहे. त्याला वडिलानीं एक नवी कुऱ्हाड बक्षीस दिली. बालसुलभ उत्सुकतेनें साहजिकच त्यानें ती दिसेल त्या झाडावर चालविली. पण त्याचे वडील जागरूक होते. त्यांनीं बाल वॉशिंग्टनला झाडाचें महत्त्व सांगितलें आणि त्या बालकाला आपली चूक कळून आली.

आपल्याकडे झाडें तोडण्याच्या बाबतींत सारेच जॉर्ज वॉशिंग्टन झाले आहेत. तो बालक तरी होता. पण आपल्याकडे लहान आणि मोठे, दोघेहि वेली या पिरगळण्यासाठीं आणि झाडें हीं तोडण्यासाठीं होत असेंच समजून चालतात. माणसाचें जाऊ द्या. पण वनमहोत्सव दरवर्षी भाविकतेनें पाळणाऱ्या स्थानिक संस्था व सरकारी खातींहि आपल्याच हुकुमानें प्रचंड वृक्ष जमिनदोस्त करीत असतात. मानवी सुखासाठींच म्हणे हा नाश करण्यांत येतो. पण वृक्ष तरी कशासाठी असतात ? माणसाना आहार आणि आसरा देण्यासाठींच ना ? वनमहोत्सव तरी सुरू करण्यांत आले ते कां ? तर जंगलाच्या नाशामुळें पाऊस कमी होत चालला म्हणूनच ना ?

पण एक खातें वनमहोत्सव साजरें करतें आणि दुसरें वृक्षच्छेदन करतें हाच तर आपल्या जीवनात दैनंदिन अनुभव येत आहे ना ? खरें म्हटलें तर वृक्षसंवर्धनाच्या बाबतींत तरी निदान निरनिराळ्या खात्यांत विचारविनिमय व्हावयाला पाहिजे. पण दिल्लीच्या बसच्या मार्गावर दुमजली गाडी चालविण्याचा एका खात्यानें निर्णय घेतला व त्या बसच्या सोयीसाठीं प्रशस्त वृक्षांना कात्री लागली. भर दुपारच्या दिल्लीच्या उन्हात सांवलीची पाखर घालणाऱ्या त्या वृक्षाच्या फांद्या जेव्हा कडाकड् मोडू लागल्या तेव्हां वस्तुत. त्या खात्याच्या अधिकाऱ्यांच्या काळजाचें पाणी व्हावयाला पाहिजे होतें. पण त्यानाच दोष कां द्यावा ? मुंबापुरीच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या मलबार हिलच्या वृक्षलताची काय कमी ससेहोलपट होत आहे ? ते डेरेदार वृक्ष, ती हिरवीगार वनश्री, बकाली मुंबईतील तेवढेंच एक विश्रांतिस्थान अद्याप हिरवळीनें सजलेलें असें राहिलें आहे. पण ती हरिततृणाची मखमल आता किती दिवस टिकणार ? ते गेले दिवस. " हिरवे हिरवे गार गालिचे " आता बालकवींच्या काव्यांतच पाहावयाला मिळतील.

आणि त्याची जागा घेतली जाणार आहे उत्तुंग इमारतींनी.–ज्यात फक्त पंख्याच्या साहाय्यानें गारवा आणला जाईल आणि ज्यांत डोळ्याना सुखविणारी हिरवळ ही फक्त कांचेच्या पात्रातील " पैशाच्या झाडाची " असेल. यंत्रयुगांतील भारताच्या समृद्ध नगरींत फक्त पैशाचीं झाडें उगवावीं हे सुद्धां आपल्या काळाचें प्रतीकच नव्हे काय ?

## २९.

### ' प्रे नाऊ ; फ्लाय लेटर '

" फ्लाय नाऊ; पे लेटर " म्हणजे आतां हवाई प्रवास करा आणि मग सवडीनें पैसा भरा ही कांहीं दिवसापूर्वी एअर इंडिया इंटरनॅशनलची घोषणा होती. आता हुंडणावळीच्या अरिष्टामुळें त्या घोषणेच्या जागीं नवें घोषवाक्य आलें आहे. " प्रे नाऊ, फ्लाय लेटर ". म्हणजे आता फक्त प्रार्थना तेवढी करावयाची आहे; प्रवास कधीं व्हावयाचा तें रिझर्व्ह बँकेवर अवलंबून.

टाटाच्या एअर इंटर्नॅशनलवर ही आपत्तिच आली आहे. कारण आता सारी गर्दी विमान-तळाच्या रोखानें न होतां रिझर्व्ह बँकेच्या रोखानें होऊ लागली आहे. त्या परिस्थितीचें चित्रण या कंपनीच्या कलाकारांनीं एका पोस्टरच्या रूपानें हृदयगम रीतीनें केलें आहे. पोस्टर्सच्या बाबतींत एअर इंडिया इंटरनॅशनलचा हात कोणीहि धरू शकणार नाही. व्यवहाराच्या क्षेत्रात कला-त्मकता आणि अत्यंत दुर्मिळ विनोदाची छटा एअर इंडिया इंटरनॅशनलच फक्त आणू शकते. दरबारी पोशाखांतील त्याचा राजा आदबीनें वाकलेला दिसला तरी त्याचा रुबाब त्याच्या टोंकदार मिशांतून प्रगट होतो. सध्यां तो राजा एकटाच हवेनें सवार करीत असतो. कारण विमानाचे प्रवासी रिझर्व्ह बँकेच्या बंद दरवाज्याशीं रांगा लावून उभे राहत आहेत. आज तर तो राजा विमानाच्या शिडीवरच हताश होऊन बसलेला दिसत आहे आणि भावी प्रवासी निरनिराळ्या धर्मांचे-आपापल्या पद्धतीनें परमेश्वराची करुणा भाकीत आहेत. ही घटना व्यंग्यचित्राच्या साहाय्यानें एअर इंडियानें किती भावस्पर्शी सूचकतेनें दिग्दर्शित केली आहे.

पण तिचें रसग्रहण करण्यासाठीं विनोदबुद्धि मात्र हवी. ती नसल्यामुळेंच मागें एअर इंडियाच्या प्रसिद्धीपत्रकातील विनोदचित्रांबद्दल संसदेमध्यें केवढी टीका झाली होती. विनोदचित्रेंच तीं. पण त्यांच्या साहाय्यानें विमानांतील प्रवाशाच्या आचारविचारांबद्दल कशी खुसखुशीत टवाळी करण्यात आली होती, ही टवाळी बोचक नव्हे; पण विमानातील होस्टेस अगत्यानें सेवा करणारी, मधुभाषिणी व स्मितवदना आहे, म्हणून कोणी प्रवासी तिच्याशीं सलगी करू लागला तर त्याच्या वागणुकीची टवाळी नाही करावयाची तर काय ? आणि तुम्ही पाहिलेंत किंवा नाहीं कोण जाणें ! पण एके ठिकाणीं एक लठ्ठ शेटजी होस्टेसला मिठी मारीत आहे व ती हळूच त्याच्या खिशातून चोरलेले काटेचमचे काढून घेत आहे असें एक विनोदचित्र छापलेलें आहे. ही आपली एक गंमत. खरोखर दगाऱ्या सोबतींत तासन् तास चालणाऱ्या विमानप्रवासात या गमतीनेंच थोडेंफार मन रिझवितां येतें. एअर इंडियाचा राजा आणि त्याची प्रजा ही याच तऱ्हेनें आपलें मनोविनोदन करीत असते, पण रसिकतेनें त्याचा स्वीकार केला पाहिजे ना !

१२ १२ ६८

# ३०.

## विसरभोळे प्राध्यापक

प्राध्यापकांनाच विसरभोळे कां समजतात हें मला कळत नाहीं. पंडित आणि शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ हेहि असेच विचारात गढलेले असल्यामुळें दैनंदिन जीवनातील महत्त्वाच्या कामाचा त्यांना अनेक वेळा विसर पडतो. माझ्या माहितीचे एक पंडित असेच प्रवासाचें तिकिट काढावयाला निघाले. त्याना मध्येंच आठवण झाली चपला घेण्याची. त्या घेऊन जातां जाता त्यांना कापडाचें दुकान दिसलें. तेथें त्यांनीं कापड खरेदी केलें. पण पैसे देण्याच्या गडबडींत चपलांचा जोड ते दुकानांत विसरले. स्टेशनवर जाऊन त्यांनीं तिकिट काढलें. पण त्या खिडकीवर त्यांनीं कापड ठेवलें होतें तें तसेंच राहिलें. तिकिट खिशात टाकून ते बसमध्यें बसले आणि बसचें तिकिट त्यांनीं काढलें. उतरतां उतरता बसच्या एका अधिकाऱ्यानें त्याच्यापाशीं तिकिटाची मागणी केली. तेव्हा विचाराच्या तद्रींतच त्यांनीं आपलें रेल्वेचें तिकीट त्याच्या हातीं दिलें आणि ते घाईघाईनें खालीं उतरले. ते घरीं आले तेव्हां त्यांच्या हातीं फक्त बसचें एक तिकीट होतें.

याला विचारमग्नता म्हणावें कीं धादरटपणा हें सांगणें कठीण आहे. विसरभोळ्या प्राध्यापकाच्या जीवनावरील एक चित्रपट मीं जो नुकताच पाहिला त्यात त्या प्राध्यापकाची विचार-मग्नताच दिसून येते. त्याला विसर पडतो तो आपल्या विवाह-वेळेचा, पण प्रेयसीचा नव्हे आणि आपला जिव्हाळ्याचा सोबती असलेल्या कुत्र्याचा तर त्याहूनहि नव्हे. आपल्या प्रयोगांत तो गुंग असतो तेव्हा त्याचें एकचित्त ढळत नाहीं. त्या प्रयोगाची सार्थकता आणि साफल्य तो आपल्या कुत्र्याला तितक्याच एकतानतेनें पटवून देत असतो आणि प्रयोग सफल्यावरोबर त्याला प्रथम आठवण होते ती प्रेयसीची. विवाह-वेळ ही त्याच्या दृष्टीनें दुय्यम महत्त्वाची असते. म्हणून ती एकदां नव्हे तीनदां चुकते.

त्याचें भाग्य मात्र एवढेंच कीं त्याच्या प्रेयसीची गाठभेट चुकत नाहीं. नाहीं तर या विचार-मग्न शास्त्रज्ञाला कदाचित् कुत्र्याच्या सोबतींतच जन्म काढावा लागला असता. वेळापत्रकाप्रमाणें आणि घड्याळांतील सेकंद काट्यानुसार चाललेल्या आजच्या यंत्रयुगांत बस आणि बायको यांच्या वेळा चुकविणें हें अत्यंत धोक्याचें असतें. त्या प्राध्यापकाची गोष्ट वेगळी. कारण त्याच्यापाशीं अशी एक उडती मोटार होती कीं जिच्यामुळें तो आपल्या प्रतिपक्षाच्याच डोक्यावर बसू शकत नसे तर प्रत्यक्ष प्रेयसीलाहि उंच हवेंत विहार करावयाला घेऊन जाऊन तिच्या मनावर पगडा बसवूं शकत असे.

तात्पर्य असें कीं, विसरभोळेपणांतून निर्माण होणारी आपत्ति टाळण्यासाठीं आपल्यापाशीं काहींतरी अलौकिकत्व हवें. ते नसेल तर मात्र शहाणपणाचा मार्ग हाच कीं, आपलें डोकें स्थिर आणि वागणूक सामान्य माणसाला शोभेशी असावी. विसरभोळ्या प्राध्यापकाची दंतकथा ऐकणें वा सांगणें ठीक; त्याचें अनुकरण केलें तर कायमची जन्मगाठ तुटावयाची.

# ३१.

## ‘ हे राम ! ’

गांधीजीच्या मुखांतून निघालेले हे अखेरचे शब्द. राजघाटावरील त्यांच्या समाधीवर ते कोरले आहेत. आणि प्रत्येक सहृदय हिंदी माणसाच्या अंतःकरणावर.

भारतीय जीवनाचीच ही शोकान्तिका आहे. गांधीजी हे राष्ट्रपिताच नव्हते; जगाला मार्गदर्शक होऊ शकणाऱ्या एका तत्त्वज्ञानाचे ते प्रणेते होते. पण तें तरी कशाला ? एक वृद्ध पुरुष, प्रार्थनेसाठीं चालला आहे. त्याच्या मनात पाप नाहीं. विचाराच्या तंद्रींतच तो पावलें टाकीत आहे. विचार कसला ? तर सभोंवार जी निर्घृणता प्रतीत होत आहे ती थांबविण्यासाठीं आपला एके काळीं प्रबळ असलेला, पण आज मंद पण म्हणूनच आर्त होत चाललेला आवाज उठविण्याचा. त्या दिवशीं तो आवाज उठण्यापूर्वीच एका खुनी, मारेकऱ्याची निर्घृण गोळी त्या वृद्ध, विचाराधीन माणसाच्या छातींत शिरली. आणि त्यानें प्राणांतिक आरोळी ठोकली नाहीं. त्यानें “ हे राम ” म्हणून अखेरचा निश्वास सोडला.

येथें गांधीजी प्रगट झाले. लोकोत्तर आणि धीरोदात्त आणि निष्ठावान्. “ हे राम ” हा त्यांचा जीवनाचा ध्यास होता. मृत्यूच्या क्षणींहि त्यानीं तोच ध्यास घेतला आणि भूमीवर अंग टाकलें.

केवढी ही करुण घटना ! कुणा महाकवीला काव्य स्फुरावें इतकी हृदयस्पर्शी ! कुणा ललित लेखकाला कादंबरी लिहिण्याची स्फूर्ति व्हावी इतकी रोमांचकारी !

पण भारताचें काय दुर्दैव कीं, एका सामान्य पाश्चात्य कादंबरीकारानेंच ही करुण घटना आपल्या कादंबरीसाठीं हाताळावी. रामचरणीं गांधीजी विलीन झाले. त्यापूर्वीच्या नऊ तासांचें त्यानें चित्रण केलें आहे. पण त्या काळात एकसारखे त्याच्या डोळ्यासमोर तरळत होते ते मारेकरी आणि त्याचे साथीदार. ते कोण होते, काय होते, कसे होते यातून का त्यांच्या कृष्णकृत्याच्या भेसुरतेचा अंदाज घ्यावयाचा ? ते नीतिमान्, अनीतिमान, कसेहि असोत, त्यानी जो गुन्हा केला आहे तो मानवजातीला चिरंतन काळिमा फासणारा आहे. बस्स. यापलीकडे त्याच्या सत्, असत् प्रवृत्तींचा, सदाचरणाचा वा दुराचरणाचा आम्हांला विचार करावयाचा नाहीं. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाबद्दल, कार्याबद्दल, कार्यपद्धतीबद्दल कोणाचे काहीहि मतभेद असोत. त्यांच्या जीवनाचा अंत करणारे लोक हे जितके निर्घृण, तितकेच दुराचारी होत याची हें स्मारक सतत जाणीव देतें.

## ३१.

# एक दुर्मिळ वाहन

सौजन्य-सप्ताह आता कोण पाळणार आहे, माहीत आहे का? मुंबईतील टॅक्सीवाले. त्यांच्या युनियननें तो निर्णय घेतला आहे आणि गमत अशी कीं लोकांची सेवा त्यांना अधिक चांगल्या रीतीनें करतां यावी म्हणून लोकांनीं टॅक्सीवाल्यांशीं सहकार्य करावें, असें एक आवाहनहि युनियननें केलें आहे.

म्हणजे लोकांनीं काय बरें करावें? होय. आपल्या निकडीच्या वेळीं रिकामी टॅक्सी जात असली आणि तिनें आपल्याला आत घ्यावयाचें नाकारलें तर आपण नम्रपणानें त्याला अभिवादन करावें आणि म्हणावें "जा बाबा, अधिक मोल देणारें गिऱ्हाईक तुला मिळो हीच आम्ही प्रार्थना करतों." ऐन पावसाळ्यांत टॅक्सीवाल्यानें सुयोग्य कारणासाठीं नकार दिला तर त्याबद्दल खंत न बाळगता, पावसाच्या पाण्यांत जर ती अडकून पडली तर मात्र ती लोटण्यासाठीं मदत करावी. रात्रीच्या वेळीं टॅक्सीवाल्यानें आपला भाईबंद बरोबर नेण्याबद्दल आग्रह केला तर ती चवथी सीट, आपल्या मांडीवर घेण्याचें सौजन्य दाखवावें. टॅक्सीवाल्यजवळ मोड नसली तर चार आण्यांतील वीस पैसे आपण सोडून द्यावे. पण त्याला पांच पैसेच द्यावयाचे असले तरी त्याच्या हातीं पावली देऊन मोकळें व्हावें.

अशा अनेक तऱ्हानीं आपल्याला या सौजन्य-सप्ताहात काय, नेहमींच टॅक्सीवाल्यांशीं सहकार्य करतां येईल. एक गोष्ट आपण नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं जवळच्या प्रवासासाठीं टॅक्सी हें वाहन नव्हे. तुमचे पाय एवढे कां खकीर नसावे! तुमचें आरोग्य सुधारण्याच्या पवित्र हेतूनेंच टॅक्सीवाला तुम्हाला नकार देत असतो. आणि हो! बॉम्बे सेंट्रलवर तुम्ही उतरला असला आणि तुमच्याबरोबर बायकामुलें असलीं, भरगच्च सामान असलें तर टॅक्सीवाल्याला भीड घालू नका बरें! तो तरी काय करणार बिचारा! त्याचें मीटरसुद्धां या वेळीं बिघडलेलें असतें. तसें पाहिलें तर प्रवासात अवजड सामान नेणें हा एक सामाजिक गुन्हाच आहे. त्या गुन्ह्याची फक्त जाणीवच टॅक्सीवाला या वेळीं नकार देऊन तुम्हाला करून देत असतो! म्हणून त्याच्यावर रागावू नका किंवा त्याच्याबद्दल गैरसमजहि होऊं देऊं नका.

टॅक्सी ही अनेक वेळा तुमच्या आवाजाची परीक्षा करण्यासाठींच तुमच्या समोरून धावत असते त्या आरोळीमुळें तुमचा घसा साफ होतो, फुप्फुसें कार्यक्षम होतात. मग टॅक्सी तुम्हांला न का मिळेना! तोहि आपल्यासारखाच कामात असेल; विवंचनेंत असेल किंवा त्याच्या कानीं तो आवाज गेलाहि नसेल. 'टॅक्सी' असा आवाज देणें हेंच आपलें कार्य. फळाची आशा न धरतां आपण तें कार्य करीत राहिलें पाहिजे. तपश्चर्या करा आणि वाट पाहा. तुम्हांला प्रकाश दिसेल असा आपल्याला गुरुजनानीं संदेश दिलेला नाहीं का? निरामय अंतःकरणानें आणि निरपेक्ष वृत्तीनें तपश्चर्या केलीत तर तुम्हाला टॅक्सीहि मिळेल. सौजन्य मात्र कधींहि सोडता कामा नये.

# ३३.

## वाऱ्यावरची वरात

" हें जें वरातीमागून घोड गेल तें आमच " या उद्‌गारानिशीं पु. ल. देशपांडे हे 'वाऱ्यावरच्या वरातींत सामील होतात. आणि त्याच वेळीं या वरातींतील प्रमुख वऱ्हाडी कोण हें ठरून जातें. त्या वऱ्हाड्यानें मात्र या वेळीं सहकुटुंब सहपरिवार रंगभूमीवर पदार्पण केलें आहे; आणि कहाण्या, दंतकथा, विनोद, अनुभव, स्वभावदर्शन, जीवनचित्रण आणि त्या जीवनांतील सारे चमत्कृतिपूर्ण व विनोदी प्रसंग आपल्या सहकाऱ्यांच्या अभिनयकौशल्यानें प्रगट केले आहेत.

पु. ल. देशपांडे हेच बटाट्याच्या चाळीचे निर्माते व दिग्दर्शक. पण तेथें त्यांनीं बहुरूपी बनून या चाळींतील लोकांचें जीवनचरित्र आपल्यापुढें साक्षात् उभें केलें. येथें पु. ल. देशपांडे यांच्याच व्यक्तिजीवनाचे पैलू प्रगट होत आहेत. पण त्याचें दर्शन त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या अभिनयांतून घडवून आणलें आहे. पु. ल. यांनीं या वेळीं सारी रंगभूमि स्वतःच व्यापून टाकली नाहीं; त्यांनीं इतरांना बोलावयाला व गावयाला लावलें आहे. म्हणून वाऱ्यावरच्या वरातींत पु. ल. चमकले तरी एक प्रमुख पात्र आणि पडद्यामागील दिग्दर्शक म्हणूनच. त्यांच्या परिवारांतील इतर मंडळीहि त्याच वेळीं आपल्या निरनिराळ्या वैशिष्ट्यानें तितकीच उठून दिसतात.

वाऱ्यावरच्या वरातींत तसें म्हटलें तर कथानक नाहीं, तिच्यामागें कांहीं हेतु आहे का? तर तोहि नाहीं. तें नाटक नाहीं, प्रहसन नाहीं, फार्स नाहीं किंवा ती एकांकिकाहि नाहीं. पण या सर्वांचीं काहीं ना काहीं अंगें तींत आहेत आणि आणखी काही तरी. तें आणखी कांहींतरी म्हणजे स्वतः पी. एल्.! त्यांची बैठकच त्या चार तासाच्या कार्यक्रमात खुलून दिसते. पी. एल्. यांची बैठक भरली, कीं त्यांच्या तोंडाला उसंत नसते आणि सवंगड्यांच्या हसण्याला कधीं खंड पडत नाहीं. मग आपल्याला भेटलेल्या 'नमुन्या'च्या गमतीदार आठवणी, मुलांच्या नकला, शेतकऱ्यांचें मिश्कील जीवन, सभा-संमेलनाच्या गमती, गायकांच्या नकला आणि खळखळून हंसावयाला लावणारा अभिजात विनोद याची एकच रंगत त्या बैठकींत उडून जाते आणि त्यांनींच म्हटल्याप्रमाणें सहाव्या कपाच्या किणकिणाटानेंच गेलेल्या वेळेची अस्पष्ट अशी जाणीव होते. पी. एल्. देशपांडे यांच्या रंगतदार बैठकींची माधुरी सर्वांनाच कशी चाखतां येईल! वाऱ्यावरच्या वरातीनें ती सोय सर्वांना उपलब्ध करून दिली आहे.

म्हणून वाऱ्यावरच्या वरातींत काय आहे असा सवाल टाकू नका. पी. एल्. देशपांडे यांच्या व त्यांच्या परिवाराच्या संगतींत चार तास काढा आणि मनमुराद आनंद लुटा.



...३

# ३४.

## हत्तीची आत्महत्या

परमेश्वरा ! तुम्ही निर्माण केलेल्या विश्वसंसाराचें होत आहे तरी काय ! शेषशायी भगवन्, खडबडून जागे व्हावयाची आपल्यावर वेळ आली आहे बरें ! अहो, तुमच्या प्रेरणेनें विश्वकर्म्यानें मनुष्यप्राण्याला अधिक बुद्धि दिली आणि चतुष्पाद जनावरांना कमी बुद्धि दिली. पण आता हीं जनावरें आपल्या बुद्धीचा मनुष्यप्राण्यापेक्षाहि अधिक चांगला उपयोग करू लागलीं आहेत की हो ! हा कीनियातील हत्तीच पाहा. बेट्यानं अगदीं विधिपूर्वक आत्महत्या केल्याचें कळतें.

विधिपूर्वक ? नाहीं तर काय ? कोण जाणें हा हत्ती अमेरिकेंतच जन्माला आला होता की काय ? अमेरिकन तंत्र अगदी पुरेपूर त्यानें आत्मसात केलें होतें. अहो, नवल आहे तें त्यानें आत्महत्या केली हें नाहीं. त्याहिपेक्षा बुद्धिचातुर्य त्यानें दाखविलें तें असें कीं त्यानें आपल्याबरोबर छायाचित्रकार आणला होता. म्हणजे बघा. आधुनिक जगाच्या गरजा त्यानें पुरेपूर जाणल्या होत्या. आता हीं छायाचित्रें सार्‍या वृत्तपत्रांतून झळकतील, त्या छायाचित्रकाराला या वर्षीच्या उत्कृष्ट कलाकृतीबद्दल मानपदकहि मिळेल आणि त्याच्याबरोबरच हा हत्तीहि अमर होईल.

संशोधकांनो, आतां स्वस्थ बसू नका. त्या हत्तीनें जी आत्महत्या केली तिचें गूढ उकलून काढण्याची कामगिरी तुमच्या पायाशीं चालत आली आहे. कवींनो आणि लेखकांनो, तुमच्या प्रतिभेची भरारी कोठवर झेंप घेते याची, सारी वाचकदुनिया आतां उत्कंठेनें वाट पाहील. आणि मानसशास्त्रज्ञांनो, या हत्तीच्या मनाचा मागोवा तुम्ही घ्यावयाचा नाहीं तर कोणी ?

खरोखरच हें गूढ उकलणें कठीण आहे. मनात विचारांचें काहूर उठतें. निरनिराळ्या कल्पनांची एकच गर्दी उसळते. कां हो, या हत्तीचा प्रेमभंग झाला असेल का ? मानवी विश्वात दिलाचे तुकडे व्हावयाला याच्या इतकें प्रबळ कारण दुसरें आढळून येत नाहीं, कीं हा सत्याग्रहाचा, प्राणांतिक उपोषणाचा मार्ग त्या हत्तीनें अंगिकारला ? म्हणजे हत्तींच्या कळपातहि ' कनू ' आणि ' कडू ' असे दोन गट निर्माण झाले आहेत कीं काय ? कीं ब्रिटिशांनीं अद्याप कीनियाच्या स्वातंत्र्यासाठीं नक्की तारीख जाहीर केली नाहीं म्हणून त्याच्या निषेधार्थ या श्वापदपुंगवानें आपल्या जिवाचें बलिदान केलें ? मति कुंठित होते बुवा. मानवी मनाचे व्यापार हुडकून काढता काढताच आधीं जिवाची घालमेल होऊं लागली आहे. आता श्वापदेंसुद्धा मानवाप्रमाणें बुद्धि चालवू लागली तर या विश्वसंसाराची गति होणार तरी काय ?

भगवन्, जरा लक्ष घाला यांत. आणि विश्वकर्म्याला सूचना द्या, कीं बाबा रे, माणसाच्या मस्तकांत बुद्धीचे मापटें टाकताना तू जरा कंजूष होऊं नकोस आणि श्वापदांच्या बाबतींत सढळ होऊं नकोस. कीं भगवन्, आपल्या परधामातहि समान वाटणीच तत्त्व आता आचरलें जाऊं लागलें आहे?

# ३५.

## वादळ उठविणारें व्यक्तित्व

तारकेश्वरी सिंह याचें वैशिष्ट्य असें आहे कीं त्या जशा वादळ उठवू शकतात तशाच वादळाला त्या तोंडहि देऊ शकतात. सार्वजनिक जीवनात स्त्रियांनीं पाऊल टाकलें कीं कीर्तीबरोबरच असूया आणि निंदा ही त्यांच्या वांट्याला यावयाचीच. तारकेश्वरी या तर पंचविशीच्या आंत-बाहेर असतांनाच प्रादेशिक नव्हे तर भारतीय राजकारणाच्या क्षेत्रात उतरल्या आणि त्या आल्या त्या जगावर छाप टाकण्याच्या ईर्षेनें. त्यांनीं ही छाप टाकलीसुद्धा—प्रथम व्यासंगपूर्ण प्रभाच्या आणि नंतर तितक्याच अभ्यासपूर्ण वक्तृत्वाच्या साहाय्यानें त्याचें फळहि त्याना मिळालें. आधीं आर्थिक व व्यापारविषयक प्रश्नांवरील चिकित्सक प्रवक्त्या ही प्रसिद्धी आणि नतर मंत्रिमंडळात स्थान. तारकेश्वरींनीं एकदां मिळविलेलें स्थान दुसऱ्या पार्लमेंटातहि कायम ठेवलें.

तारकेश्वरींच्या या उत्कर्षाबद्दल अनेकांना मत्सर वाटणें साहजिक होतें. तो मत्सर निंदेतून प्रगट होतो आणि ती निंदा अशी कीं 'तारकेश्वरी या जरा भपक्यानें राहतात, खुलेपणानें वागतात आणि बेछूटपणें मतप्रदर्शन करतात.' त्याच्यामध्यें बेछूटपणा आहे यात संशय नाहीं. कारण आपल्या केशरचनेकडे वा वेषभूषेकडे पाहून कोणी नाक मुरडलें तर त्या लगेच म्हणतात, "माझें हें व्यक्तिगत जीवन आहे; गबाळेपणा हीच जर राजकीय जीवनाची इतिकर्तव्यता असेल तर त्या राजकारणाशीं मला कर्तव्य नाहीं. मी राजकारण मानतें तें तत्त्वाशीं निगडित असलेलें. पोशाखावरून ठरणारें नाहीं."

तारकेश्वरी या मंत्री झाल्या तरी त्याच्या दिनक्रमांत फरक पडला नाहीं. सुखवस्तु कुटुंबातील एक गृहिणी या नात्यानें आपल्या आवडत्या अपत्यांचें त्या मनोभावें संगोपन करतात. पण तितक्याच कौशल्यानें त्या मंत्रिपदाची जबाबदारीहि पार पाडतात. हजरजबाबीपणा आणि मनमोकळेपणा हे दोन्ही गुण त्याच्यापाशीं असल्यामुळें पार्लमेंटच्या लॉबींत त्यांना मित्रहि भरपूर तसेच टीकाकारहि. पण मित्रांची स्तुति जशी त्या निःसंकोचपणें स्वीकारतात, त्याप्रमाणें टीकाकाराची टीकाहि त्या खिलाडू वृत्तीनें परतवून लावतात. सेंट्रल हॉलमध्यें अनेक वेळां एक घोळका जमतो आणि त्यांतून एक तरल आवाज खणखणीतपणें निनादून उठतो. तो आवाज कोणाचा हें पाहण्याच्या आतच एक विमुक्त हास्य साऱ्या हास्यलहरींतून उठून बाहेर पडलें कीं सभासद आणि वार्ताहर सारेच आपापसांत कुजबुजतात "हा तारकेश्वरींचा दरबार भरलेला दिसतो आहे."

# ३६.

## घर–घरमें दिवाली

दिवाळीच्या सुमारास रस्त्यात फटाके उडविण्याला पोलिस कमिशनर यांनीं बंदी केली आहे. छान. म्हणजे आणखी एका प्रश्नाबद्दल निषेध प्रगट करण्यास आपल्याला संधि मिळणार ! होय. यात व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला हा आलाच. रस्त्यावर, चौरस्त्यावर, खाजगी, सार्वजनिक, शांततेच्या आणि गर्दीच्या प्रत्येक ठिकाणीं स्वैरसंचार करण्याचा, मन मानेल तसें वागण्याचा आपल्याला अधिकार दिलेला नाहीं का ? मग त्या अधिकारावर आक्रमण झालें तर निषेध नाहीं करायचा तर काय करावयाचें ? पार्लमेंट नाहीं म्हणून बरें आहे. नाहीं तर तहकुबीची सूचनाहि आपल्याला आणता आली असती.

तहकुबीची सूचना ! व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घातला जात आहे म्हणून ! या व्यक्तिस्वातंत्र्या-मुळें लोकांच्या कानठळ्या बसल्या, वाहनांचे घोडे उधळले गेले, अर्भकें कासावीस झालीं, वाहकांचा तोल जाऊन अपघात झाले आणि कोणी अनवधानानें भाजले गेले तरी त्याची आम्ही पर्वा कां करावी ? आमचे सण आम्ही थाटामाटानें, प्रचंड जयघोष करीत, गगनभेदी आरोळ्या ठोकीत शतकानुशतकें साजरे करीत आलों आहोंत. ती परंपरा आम्ही मोडणार कीं काय ? कां मोडावी ? दिवाळीच्या फटाक्यांचा स्फोट ज्यांना सहन होत नाहीं त्यांनीं वाटेल तर कानात बोळे घालावे, वाटेल तर दूर निर्जन अरण्यांत पळून जावें.

आम्ही आमच्या परंपरेनुसार वागणार. त्या परंपरेंत शांततेला वाव नाहीं. गोंगाट, गोंधळ, गर्दी, हें आमच्या साऱ्याच सणाचें वैशिष्ट्य आहे. सार्वजनिक रीतीनें, कोलाहल माजवीत आम्ही ते साजरे करणार. आज नागपंचमी आहे. तेव्हां ' नागाला दूध ' ही आरोळी दाही दिशातून उठ-लीच पाहिजे. मग आली जन्माष्टमी आणि दहिकाला. एकच झुंबड– हंडी फोडण्याची. सणाचा दिवस हा तसें म्हटलें तर सांगतेचा. त्याच्या पूर्वतयारीसाठी आधी पाच पाच दहा दहा दिवस मेळावे आणि मेळे आणि त्याच्या रंगीत तालमी साग्रसंगीतपणें होत असतात. मग कधीं ' मोरया 'चा घोष होतो, कधीं गर्बा पार्टीचे पाय दणदण आदळतात, कधी इलेक्ट्रिकच्या फटाक्यांचे निनाद उठवतात, तर कधीं शिमग्याच्या हुल्लडींनीं सारी पंचक्रोशी डोक्यावर घेतली जाते.

ठणठणाट आणि कानठळ्या बसविणारे आवाज हाच आपल्या जीवनाचा स्थायी भाव झाला आहे, आणि आपलें वैशिष्ट्य असें कीं ज्या वेळीं कामानें शिणलेला माणूस निद्रादेवीची आराधना करीत असतो त्याच वेळीं या कोलाहलाला ऊत येतो. आतां तर काय दिवाळीच आली. " घर घरमें दिवाली है मेरे घरमें अंधेरा " हें कोणाला बरें आवडणार ? पण नुसत्या प्रकाशानें तुम्ही घरे उजळून काढू नका. फटाक्यानीं आजपासूनच तीं निनादूं द्या. आतां आपला एकच ध्यास असला पाहिजे. दुसऱ्यांची झोंप उडविण्याचा !

# ३७.

## फोडणीची लज्जत

श्री. काकासाहेब गाडगीळ हे उपमा आणि दृष्टांत, नेहमींच मोठे रुचकर देतात. पण मराठी भाषेची महती गातांना त्यानीं फोडणीच्या भाताबद्दल जे उपेक्षेचे उद्गार काढले ते मात्र मला मुळींच पटले नाहींत. काकासाहेब असें म्हणाल्याचें कळतें कीं, 'मराठी भाषा ही कामधेनु आहे; मग तिच्याजवळ फोडणीचा भात का मागता ?' महाराष्ट्र झाला पण महाराष्ट्राचें 'महामन' झालें नाहीं हें त्यांना आवर्जून सांगावयाचें होतें हें खरें आहे. पण तें सांगताना फोडणीच्या भाताची त्यानीं जी उपमा दिली आहे ती यथार्थ नाहीं.

खरें सांगावयाचें तर फोडणीचा भात हा एक अवीट गोडीचा पदार्थ आहे. तो शिळा असेल. पण त्याला मिळालेली तिखटमिठाची फोडणी आणि थबथबलेल्या तेलाबरोबरच त्यांत मिश्रित केलेला खमंग कांदा यामुळें त्यात रसरशीतपणा येतो. गोड सुग्रास अन्नाचा एक वेळ नव्हे पण दुसऱ्या तिसऱ्या वेळीं तरी खास कोणाला वीट येईल. दिवाळीच्या किंवा लग्नकार्यांच्या चार दिवसांत गोडधड खाऊन विटल्यानंतर खऱ्या भुकेनें जर कोणत्या पदार्थाचा आस्वाद घेतला जात असेल तर फोडणीच्या भाताचा. त्या पदार्थाची खरोखरच कोणाशींहि तुलना करतां येणार नाही. तुमचे केशरी आणि नारळी भात तर राहू द्याच. पण तुमचे पुलावेहि त्याच्यापुढें फिके पडतील हो! कदाचित् सामिष उपाहार करणाऱ्या लोकाना मात्र सोडे घालून केलेली खिचडी त्याच्या पासगाला पुरणारी आढळून येणें शक्य आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं 'महामना' सारखीच खमंग कांद्याची आणि फोडणीची लज्जत आपल्याला चाखतां आली पाहिजे.

तसें पाहिलें तर खुद्द काकासाहेबांचें भाषण आणि लेखन हें सुद्धां फोडणीच्या भाताइतकेंच चटकदार असतें. त्यात कधीं शिळेपणा राहूच शकत नाहीं. जातां जाता कोणाला नाजुकशी कोपरखळी दे, मधूनच एखादा दृष्टांत दे, एखाद्या संतकवीच्या कडव्याची सहज चुणूक दाखव आणि गंभीर तत्त्वदर्शन करीत असतानाहि घरगुती उपमाअलंकारांनीं विषयाची मांडणी सजवून आपल्या श्रोत्याना वा वाचकांना रिझव. अशी काकासाहेबाची भाषण व लेखनपद्धति असते. त्यामुळें फोडणीच्या भाताइतक्याच अवीट गोडीनें त्याच्या सहवासात सर्वजण रमून जातात. त्याचें कौतुक असें कीं, काळ उलटत असूनहि त्याच्यामधील तिखटपणा आणि रुचकरपणा कमी झालेला नाहीं.

काकासाहेबानीं तरी फोडणीच्या भाताची उपेक्षा करावयाला नको होती !

३८.

## बोलकें दिग्दर्शन

आधुनिक नाट्यतंत्र हें जुन्या नाट्यतंत्रापासून वेगळें असें कीं, त्यांत सूचकतेला प्राधान्य असतें आणि म्हणूनच बुद्धीला येथें ताण पडतो. येथें शब्द अपुरे असतात, सारें काहीं रंगमंचावर प्रगट केलें जात नाहीं आणि दिग्दर्शकाची कल्पकता जें सूचित करूं पाहत असेल तेंहि आपण कल्पनाच काय पण प्रतिभेच्या साहाय्यानें ग्रहण करावयाचें असतें.

विजया खोटे यानीं दिग्दर्शित केलेल्या तीन एकांकिका पाहताना मला हाच प्रत्यय आला. पूर्वी कधींहि न पाहिलेली रंगभूमि माझ्यासमोर या वेळीं प्रगट होत होती. तेथें सजावट नव्हती. भव्य पडदे नव्हते, प्रत्यक्ष जीवनाचें दृश्य स्वरूप अभावानेंच तेथें तळपत होतें. पण मोजक्या शब्दांतून आणि प्रभावी अभिनयांतून मानवी व्यवहाराचें आणि विशेषतः मनोव्यापाराचें किती उत्कट दर्शन विजयाबाईंनीं स्वतः आणि आपल्या सहकाऱ्यांच्या रूपानें घडवून आणलें.

आधींच या एकांकिका नवीन धर्तीच्या आहेत. 'पुढाऱ्या' वरील भक्तिभावाचा किती कठोर उपहास एकींत केला आहे. लोकांच्या भावना निवेदकाच्या वर्णनांतून जशा प्रगट होतात त्याचप्रमाणें दोनच श्रोत्यांच्या अनिवार आणि उच्छृंखल अशा प्रतिक्रियांतून. बाकी सामान्य जीवन सुखाचा शोध घेत कसें धांवत असतें याचें दिग्दर्शन विरोधासाठी विजयाबाईंनीं समर्थपणें केलें आहे. कोण जाणे ! मला जें वाटलें तें चूक कीं बरोबर ! नवचित्रकलेप्रमाणेंच नवनाट्याची चिकित्सा करणेंहि अति धाडसाचें झालें आहे.

मला या एकांकिका आवडल्या त्या त्यांतील प्रभावी दिग्दर्शनासाठीं, उत्कट अभिनयासाठीं. 'पुढारी' नें मला खळखळून हंसविलें. 'पांच दिवस' नीं प्रक्षुब्ध केलें. युद्धाची भयानकता आणि अमानुषता पावलांच्या आणि मुद्राभिनयाच्या जोरावर इतक्या हृदयद्रावक रीतीनें प्रगट झालेली पाहून मन अक्षरशः दिपून गेलें. पण त्याच वेळीं मनात विचार आला कीं, पांच दिवसांची ही लांबण तीन दिवसावर आखडती घेतली तर !

तशाच 'मादीं' तील अखेरचा अश्रूंचा पूर आणि हुंदक्यांचा उमाळा. बाकी किती हृदय-स्पर्शी असा तो प्रसंग आहे आणि विजयाबाई आणि श्रीराम लागू यानीं किती सहजपणें भावपूर्ण अभिनयानें, किती संयमपूर्ण पण प्रभावी उत्कटतेनें तो चित्रित केला आहे. प्रसंगांतहि ही उत्कटता त्यांनींच अभिनयानें आणली आणि त्याच शब्दांना गांभीर्य दिलें. लेखकापेक्षा प्रभावी नट झाला आणि नटापेक्षां अधिक बोलका दिग्दर्शक झाला हेंच 'मादी' च्या प्रयोगाचें वैशिष्ट्य होय.

# ३१.

## पाण्याविना स्वागत

हॉटेलवाल्यानीं आजवर आपली सांस्कृतिक परंपरा चालू ठेवली आहे. ग्राहक हॉटेलांत शिरल्याबरोबर पाण्याचा ग्लास टेबलावर ठेवण्याची साधारणपणें त्याची प्रथा आहे. हें स्वागत दूर-दृष्टीनें ते करीत असले तर कोण जाणे! कारण पाणी पिऊन ताजातवाना झालेला ग्राहक पावणा कपापेक्षां अधिक मोलाची कांहीं तरी ऑर्डर देईल असा त्याचा कयास असणें शक्य आहे. विचारे कांहीं वेळीं निराशहि होतात. कारण आजच्या तंगीच्या दिवसांत एक पावणा कप तिघात वाटून घेऊन ' तीन ग्लास ' पाणी फस्त करणारी ग्राहकेंहि आढळून येतात.

आता मात्र स्वागताच्या त्या परंपरेला फाटा मिळण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. हॉटेलच्या मालकानीं महापालिकेला तशी सूचनाच दिली आहे. महापालिकेला ती सूचना म्हणजे वस्तुतः ग्राहकांना तंबी होय. हॉटेलवाल्याचें म्हणणें असें कीं पाण्याच्या वापरावरील करांत महा-पालिकेनें कपात केली नाहीं तर पाण्याच्या ग्लासासाठीं सुद्धा ग्राहकाकडून पैसे घेणें आम्हाला भाग पडेल. म्हणजे पाहा. थंडगार नसलें तरी कोमट आणि स्वच्छ ग्लासांत आपल्याला जें मोफत पाणी हॉटेलातून मिळत होतें तेंहि बंद होणार! कदाचित् आतां असेंहि होईल कीं " पाणी कम चहा " नावाची जी एक चीज आपल्याला हॉटेलांतून मिळते तीच हॉटेलवाल्यांना अधिक सोयिस्कर वाटेल. कारण त्यामुळें तेवढ्याच लिटर पाण्याचा बचाव होईल.

हॉटेलवाल्यांनीं जाहीर करीपर्यंत इतके लिटर पाणी आपण पोटांत घालीत आहो हें मात्र मला माहीत नव्हतें. त्यानीं जर कचऱ्याचें म्हटलें असतें तर मीं लगेच कबूल केलें असतें. आता सुदैवानें ही सुवार्ता कळली आहे कीं कचरा वाहून नेण्यासाठीं महापालिका या हॉटेलवाल्यावर कांहीं कर लादत असते. म्हणजे कर लादला जातो ही सुवार्ता नव्हे. सुवार्ता ही कीं साराच कचरा आपल्या पोटात जात नाहीं. लहानसहान दयेबद्दलहि कृतज्ञता ठेवण्याचा हा काळ आहे. मग हॉटेलवाल्याच्या या दयेबद्दलहि ती न दाखवून कसें चालेल!

आमची आपली प्रार्थना एवढीच कीं शुद्ध पाण्यावर दर बसवितांना हॉटेलवाल्यांनीं अशुद्ध अन्नाचे दर थोडे कमी करावे.

# ४०.

## वाटाघाटी ! !

" इंच इच भूमि लढवू. प्राणपणानें लढू. अखेरचा सैनिक आणि अखेरची गोळी संपेपर्यंत आम्ही लढू. " किती धीरोदात्त शब्द...आमच्या संरक्षण-मन्त्र्यानीं काढलेले.

पण–आतांसुद्धां पण आहेच का ? होय. पण आहे. आम्ही लढू कोठवर ?–चिनी राज्यकर्ते वाटाघाटीला तयार होईपर्यंत. हेहि सरक्षणमन्त्र्याचेच शब्द. हें " आव्हान " ते केव्हा देत आहेत ? नेफापासून लडाखपर्यंत सारी दोन हजार मैलांची सीमा पेटली असताना, आपल्या सैनिकाच्या हातांतून ठाणीं हिसकावून घेतलीं जात असताना; आपल्या सैनिकाची सरक्षण-मन्त्र्याच्याच शब्दांत सांगावयाचें तर कत्तल होत असताना !

ही आग पेटली असतांना, सुसज्ज सैनिकदलापुढें आपल्याला माघार घ्यावी लागत असताना, आपल्या जवानाची कत्तल होत असतांना भारताच्या सरक्षणमन्त्र्यानीं आपल्यासमोर उद्दिष्ट कोणतें ठेवलें आहे ? – वाटाघाटी. याच त्या वाटाघाटी, ज्याची रशियाला ओढ लागली आहे; भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ओढ लागली आहे, चीनवादी कॉम्रेड रणदिवे यानासुद्धां ओढ लागली आहे. भारताच्या संरक्षण-मन्त्र्यांनाहि वाटाघाटींचीच ओढ लागली आहे.

या वाटाघाटीसाठींच फक्त आपल्या सैनिकानीं लढावयाचें आहे. सरक्षणमन्त्र्याच्या दृष्टीनें काय आपलें दुर्दैव ! अहो, ही लढाईसुद्धां चिनी राज्यकर्त्यानीं उगाचच आमच्यावर लादली आहे. जगांतील मुत्सद्द्यानो, जगांतील वृत्तपत्रानो, याची दखल घ्या. आम्हाला लढाई नको आहे. आम्हांला वाटाघाटी हव्या आहेत. पण चीनचे राज्यकर्ते आमच्या आवाहनाचा स्वीकार करीत नाहीत. ते कृतघ्न आहेत. आम्ही त्याचें भलें करू पाहत होतों. आम्ही त्याना तिबेटसुद्धां घेऊ दिलें. पण त्यांनीं आमच्यावर स्वारी केली. आमचा मुलूख बळकावला. ते आमच्यावर गोळ्या कीं हो झाडीत आहेत ! आता आम्ही उत्तर नाहीं द्यावयाचे तर काय करावयाचें ? पण चीनच्या मुत्सद्यानो, आम्हाला लढाई नको आहे. आम्हांला वाटाघाटी हव्या आहेत. अहो, कोणी तरी चीनला ही जाणीव करून देऊं शकत नाहीं का ? खरेंच आम्हांला वाटाघाटी हव्या आहेत.

वाटाघाटी ! सरक्षण-मन्त्र्यांना वाटाघाटी हव्या आहेत. त्याचें मन त्या वाटाघाटींसाठीं आक्रंदत आहे.

जसें ख्रोमिकोंचें, नंबुद्रिपादाचें आणि रणदिव्यांचें. अरे, काय ही ऊर्जस्वल परपरा ! त्या परंपरेंत आपले संरक्षणमंत्रीहि बसतात.

जय भारत ! जय संरक्षणमत्री !

# ४१.

## ' लीधो ' आणि ' बेचो '

" शेअरबाजार गडगडला " ही आजची ठळक बातमी. कारण काय ? तर युद्धाचें वातावरण, उत्तर सीमेवरील लढाई आणि आपल्या सैन्याची काहीं ठिकाणीं माघार. शेअर बाजारांत त्यामुळें निरुत्साही वातावरण निर्माण झालें आहे. निरुत्साही कां ? तर म्हणे आपली माघार होत आहे. ज्या कारणाकरिता उत्साह निर्माण व्हावयाला पाहिजे, चेव यावयाला पाहिजे त्याच कारणाकरितां आमच्या व्यापारी वर्गांत घबराट उडाली आहे.

काय ही देशभक्ति ! काय हा आपल्या सैन्यदलावरील आणि लोकनियुक्त सरकारवरील विश्वास ? लढाईचें वातावरण आपल्या सीमेवर निर्माण झालें आहे म्हणून ही घबराट. मग कापून टाका तोटे, मिळेल तो फायदा पदरात पाडून घ्या. त्याचे परिणाम देशाच्या हितावर कोणते होतील, देशाच्या सुरक्षिततेवर त्याचा परिणाम काय होईल याची त्यांना काय पर्वा !

फायद्यासाठींच ' लीधो ' आणि फायद्यासाठींच ' बेचो ' बस्स. आपला स्वत:चा फायदा. त्यात देशाच्या कल्याणावर अंगार फिरला म्हणून त्यांना त्याचें काय होय ? हेच व्यापारी दूर देशांत कोठें लढाई पेटेल कीं, काय याची वाट पाहत असतात. मग चढवा भाव. करा जनतेची लूट आणि जो काळा पैसा हातीं येईल तो अधिकच आर्थिक शोषण करण्यासाठीं वापरा.

पंडितजी ज्याला काल समाजविरोधी म्हणाले तो हा वर्ग. त्या वर्गाला समाजाबद्दल काहीं कळकळ असेल, देशाबद्दल कांहीं प्रेम असेल तर भारताची इभ्रत राखण्यासाठीं या आणीबाणीच्या काळींच त्यानें बाजार तगवून धरले पाहिजेत. लोकामध्यें विश्वासाची दृढ भावना टिकवून धरली पाहिजे. देशाच्या सुस्थितींत बाजार चढला, नाणें स्थिर राहिलें तर त्यात काय नवल ? पण नेल्सनच्या आरमारामागें " लॉइडस ऑफ लंडनने " आपली सारी आर्थिक शक्ति उभी केली म्हणूनच ट्राफल्गारची लढाई अखेरीस नेल्सननें जिंकली आणि नेपोलियनचा पराभव केला. हें विसरून कसें चालेल ? आज भारताच्या सीमेवर एक बलाढ्य आक्रमक आपल्या देशाचे लचके तोडण्यासाठीं सज्ज होऊन उभा आहे. त्याचा प्रतिकार आपले शूर जवान करीत आहेत. हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत लढणाऱ्या या जवानांना आपण साथ कशी देणार? ' बेचो ' म्हणून ! बाजार गडगडावयाला लावून ! मग " देशद्रोहा, तुझें नाव व्यापार " असेंच म्हणावें लागेल.

# ४२.

## ' चलो क्यूबा '

एका इंग्रजी कवितेंत म्हटलें आहे, " जे स्तब्ध बसून प्रार्थना करतात त्यांच्या हातूनहि सेवा घडत असते " भारतीय कम्युनिस्ट पक्षातील ज्या कॉम्रेडांचे हात भारताच्या रक्षणासाठीं शिवशिवत आहेत त्यांच्यासाठीं हा आदर्श मी सुचवू इच्छितों. मला वाटतें भारताची त्या दृष्टीनें ते फार मोठी सेवा करतील.

मला ही कल्पना आहे कीं त्याना असें स्वस्थ बसणें फार कठीण जाईल. कारण कार्य, अविरत कार्य करणें, संघर्षांचा झंझावात उठविणें हा त्यांचा प्रकृतिधर्मच बनला आहे. मग राष्ट्र एवढें सकटांत सापडलें असतांना ते स्वस्थ कसे बसतील ? त्यांची देशभक्ति खरोखरच अति जाज्वल्य आहे हें मी कबूल करतों

पण मग मला वाटतें त्यांच्यासाठीं दुसरी देशहिताची कामगिरी कां शोधून काढू नये ? अशी कामगिरी सुदैवानें चालूनसुद्धां आली आहे आणि ती कॉम्रेडांच्या सिद्धान्ताला व निष्कर्षाला जुळणारी आहे. त्याचा सिद्धान्त हाच आहे कीं, युद्धखोर अमेरिकन्स भारत-चीन तेढ वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत व भारत त्याच्या या कारस्थानाना बळी पडण्याची भीति आहे. त्यांचें म्हणणें अगदीं खरें आहे आणि म्हणूनच माझी अशी सूचना आहे कीं, युद्धखोर अमेरिकन्स आतां जी क्यूबाविरुद्ध आघाडी उघडत आहेत त्या आघाडीवर भारतीय कम्युनिस्टांनीं लढावें.

नाहीं तरी त्याचा आत्मा भारतासाठीं नसेल इतका फिडेल कॅस्ट्रो यांच्यासाठीं तळमळत असतो. मग कॅस्ट्रो यांना साहाय्य देण्याची सधि चालून आली असताना त्यानीं तिचा उपयोग का करून घेऊ नये ? त्यामुळें एका दगडानें दोन पक्षी मारले जातील. एक तर आतरराष्ट्रीय आघाडीवर एकबंधुत्वाचा सदेश फैलावला जाईल आणि राष्ट्रीय आघाडीवर अमेरिकनांचा पगडा कमी होईल.

कॉम्रेडस्, तुमचें आणि आमचें एकमत आहे. आपण कार्यक्षेत्राची निवड करू या. श्रमांची विभागणी करू या. चीननें आक्रमण केलें आहे असें तुम्हांलाहि आमच्याप्रमाणेंच वाटतें असें आम्ही मान्य करतों आणि हेंहि कबूल करतों कीं, अमेरिकेला भारत-चीन तेढ वाढवावयाची आहे. त्यावर उपाय असा कीं, भारताच्या सीमेवर आम्ही लढावें आणि तुम्ही क्यूबामध्यें जाऊन अमेरिकन साम्राज्यवाद्यांचा समाचार घ्यावा.

चला कॉम्रेडस्, " चलो क्यूबा " हेंच यापुढील तुमचें घोषवाक्य. आम्ही तुमचें अभीष्ट-चिंतन करतों.

## ४३.

# प्रज्ञावंतांची कदर !

प्रज्ञावंताची आपल्या देशांत कदर नाहीं हेंच खरें. पुण्यांत तर मुळींच नाहीं. किंवा कदाचित् खासदार र. के. खाडिलकर यांच्या बुद्धीची झेप आपल्यासारख्या सामान्य लोकांच्या फारच आवाक्याबाहेरची असावी. मागें लोकसभेत ते परराष्ट्रीय धोरणावरील चर्चेत बोलले आणि त्याचें भाषण इतकें विचारप्रवर्तक झालें म्हणून सांगू ! पण एका सभासदानें मति कुंठित होऊन कीं काय कोण जाणें पण त्यांना प्रश्न केला " अहो तुम्ही चीनच्या बाजूचे कीं भारताच्या ? "

हें त्या सभासदाचें बुद्धिदारिद्र्य. पण खाडिलकराच्या प्रज्ञेची चुणूक त्यातूनच प्रगट होत नाहीं काय ? त्यांचें वैशिष्ट्य असें आहे कीं, ते स्वतःलाच फक्त स्वतःचे गुरु मानतात. कधीं कधीं योगायोगानें त्यांचे विचार मार्क्सशीं जुळतात. कधीं नेहरूशीं, कधीं माओशीं, एवढेंच. तुम्हांला कधीं एखाद्या बौद्धिक खेळात मन रमवावयाचें असेल तर मी आपलें तुम्हाला सुचवीन कीं, खाडिलकरांनीं भाषणांत वा लेखनांत व्यक्त केलेले विचार तुम्ही स्मरणात ठेवा, तेच विचार कधीं निम्मे कधीं शिम्मे कोठल्या तरी तत्त्वज्ञानाच्या, कोठल्या तरी विख्यात स्तंभलेखकाच्या लेखनात प्रगट झालेले तुम्हांला आढळून येतील. त्या वेळीं तुम्हाला महाराष्ट्राच्या या प्रज्ञावताची मातब्बरी कळेल.

खरेंच, काय सांगू तुम्हाला ! खाडिलकरांनीं एकदा भारत – चीन सीमावादाची चिकित्सा केली. बुद्धिदरिद्री सभासदांच्या आकलनाबाहेरील ती चिकित्सा असेल. पण मी आश्चर्यानें थक्क झालों. अहो, त्याच आशयाची चिकित्सा सोव्हियट अॅकाडेमीशियन मदाम एल्. एम्. पीन्हिस्की यानीं " गंगेच्या खोऱ्यातील प्राचीन मंगोलियन जमाती " या विषयावर लिहिलेल्या प्रक्षोभक प्रबंधांत केलेली मला आढळून आली.

सीमावादाच्या बाबतींतील शांततामय तडजोडीची आवश्यकता त्यानीं प्रतिपादिली म्हणून तुम्ही चिडून गेलां आहांत. पण " चेंगीझखानाचा सांस्कृतिक वारसा " या विषयावर एक अमेरिकन संशोधक व लेखक मि. निकर बॉकर ज्यूनियर यांनीं जे विचार व्यक्त केले आहेत त्याच्याशीं खाडिलकर याची भूमिका तंतोतत जुळते हें तुम्हांला माहीत आहे का ? तसेंच कश्याला, सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रकार सॉल्टर ओठमन आणि सोव्हियट समाजशास्त्रज्ञ एम्. झॅडॅनॉव्हस्की यानीं नुकतेच लिहिलेले लेख वाचा म्हणजे भारत-चीन सीमा प्रश्नावर रशिया व अमेरिका हीं दोन्ही राष्ट्रें कशी समान भूमिका घेत आहेत व ती खाडिलकर याच्या विचाराना कशी पूरक आहे हें तुम्हांला कळून येईल.

पण बाबानो, प्रज्ञावताची जरा तुम्ही कदर करा.

# ४४.

## भोळी खुळी गवसति जीं....

कॉ. श्रीपाद अमृत डांगे आज आपल्या घरीं मिस्किलपणें हसत सशयकल्लोळमधील गीत गुणगुणत असतील : " भोळी खुळी गवसति जीं धनिक वणिक बाळें " डांगे यांच्या रक्तातच जणू मिस्किलपणा भिनलेला आहे. म्हणून ते कधीं प्रक्षुब्ध होत नाहींत. प्रक्षुब्ध जमावापुढेंहि ते कधीं गांगरून जात नाहींत प्रत्येक पेंचप्रसंगांतून सहीसलामत सुटण्याचा कावेबाजपणा त्याच्या अगीं पुरेपूर असल्यामुळें ते सदैव शांत आणि अचल राहतात, आणि विरोधकांपैकींहि अनेक भोळ्याभाबड्या जिवांना कौशल्यानें आपल्या जाळ्यांत पकडावयाचें कार्य अविरतपणें चालू ठेवतात.

आज त्याना जाळ्यात पकडावयाचीं आहेत तीं धनिक वणिक बाळें नव्हेत. बुडताना काडीचा आधार घेऊं पाहणारे राज्यकर्ते, शब्दाला भुलणारे, आविर्भावानें हुरळून जाणारे अपरिपक्व विचारवंत, दारिद्र्यानें गांजलेले, विफलतेनें विटलेले, सामान्य लोक यांना भुलभुलावणी दाखविण्याची करामत त्यांना करावयाची आहे. " धरावयास त्यास पाश असति निरनिराळे " हें डांगे यानीं ओळखलें आहे. म्हणून ऐन आणीबाणीच्या वेळीं " राष्ट्रवादाचा " मुखवटा त्यांनीं चढविला आणि आज त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रवादाच्या आवेशांत कम्युनिस्ट पक्ष चीनच्या आक्रमणाचा निषेध करण्यासाठीं पुढें सरसावला आहे.

ते आतां चवाठ्यावर उभे राहून गर्जना करतील " चीन हा आक्रमक आहे. आम्ही त्याचा प्रतिकार करण्यासाठीं सज्ज झालों आहो. चला, आमच्या हातीं शस्त्रें द्या. आम्ही चाललों लढावयाला " त्यांच्या या वीरगर्जनेनें सामाजिक व राजकीय जीवनांतील जाणते लोकहि भुलल्याशिवाय राहणार नाहींत. ते अनघ भावनेनें म्हणतील, " कम्युनिस्ट पक्षसुद्धा बदलला. राष्ट्रवादाचा प्रभावच तसा आहे. " त्यांतूनच कम्युनिस्टांसहित राष्ट्रीय आघाडी स्थापन करण्याची एकच हांकाटी निघेल. आणि मग डांगे व त्याचे सहकारी आपल्या ठरावातील दुसरा मंत्र जपत म्हणतील, " लढाई तर केलीच पाहिजे. पण वाटाघाटींचा दरवाजा तेवढ्यासाठीं बंद कशाला करायला पाहिजे ! राहू द्या कीं तो उघडा. "

तो उघडा राहिला कीं डांगे याचा कार्यभाग फत्ते झाला. मग मात्र लवकरच कधीं तरी वाटाघाटींचा व्यूह यशस्वीपणें रचल्यानतर ते भारतीयांना नेहमींच्याच मिस्किलपणानें म्हणतील :

" आणशपथ मम वचनें मानिलीं खरीं का हसतिल जन म्हणतिल कीं शंभु खरे भोळे. "

# ४५.

## अश्लील आणि ओंगळवाणें

काकासाहेब गाडगीळ यानीं साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण देतांना श्लील आणि अश्लील साहित्याची खूप चिकित्सा केली. वस्तुतः त्याना म्हणावयाचें आहे तें हें कीं, साहित्यिकानीं कांहीं चिरतन मूल्यें पाळलीं पाहिजेत, जतन केलीं पाहिजेत. या मूल्याचें पालन न करणारे लोक ज्याला अश्लील वाङ्मय म्हटले जाते तें लिहीत नाहींत, तर अभद्र वाङ्मय लिहितात.

श्लील आणि अश्लील याची व्याख्या करणें खरोखरच कठीण आहे. व्यक्तीच्या वृत्तीवर, दृष्टिकोनावर ती कसोटी अवलंबून असते. अहो, कोठे नग्न-अर्धनग्न स्त्रियाचीं चित्रें असलीं, जरा भडक शृंगारिक लेखन असलें, कोठें उत्तानतेचा वास आला तरी जाहीर रीतीनें नाकें मुरडणारे लोक आपल्याला खूप भेटतात. पण हीं चित्रे चोरून पाहण्यासाठीं, हें वाङ्मय लपूनछपून वाचण्यासाठीं याच लोकांची गर्दी होत असते. मला वाटतें अश्लीलतेपेक्षां अभद्र आणि बीभत्स लेखन हेंच अधिक निषिद्ध मानावयाला पाहिजे.

कारण थोडीं किंवा फार अनावृत चित्रें पाहिलीं, किंवा भडक शृंगारवर्णन वाचलें तर माणसाच्या वृत्ति उचंबळून येतील. पण त्यांच्या मनात शिसारी निर्माण होणार नाही, विकृति येणार नाहीं. पण अभद्र, बीभत्स, गलिच्छ वाङ्मय वाचलें तर सुसंस्कृत व्यक्तीला अगदीं नकोसें होऊन जातें. अतिवास्तववादाचा एक पंथ अलीकडे फार बोकाळला आहे, त्यांत भर पडली आहे ग्रामीण कथालेखकाची. त्याच्यामधील हिरवटपणा, रानदांडगेपणा मला फार आवडतो. रसरशीत, चैतन्यपूर्ण जीवनाचा मला त्यांत साक्षात्कार आढळतो. पण शेतकऱ्यांच्या वा खेड्यातील मध्यमवर्गीयांच्या बोलण्यांत प्रातर्विधीबद्दलचेहि जे शब्दप्रयोग सर्रास रूढ असतील ते साहित्यांतहि आणण्याचें कांहीं प्रयोजन आहे का? एक साधारण, सुरुचि असलेली व्यक्ति म्हणून मी एवढीच प्रार्थना करीन की असले गलिच्छ, शिसारी आणणारे शब्दप्रयोग तरी कथाकादंबऱ्यांतून आमच्यासमोर आणले जाऊ नयेत.

मी म्हणेन एक वेळ अश्लील म्हणून समजलें जाणारें वाङ्मय चालेल. पण बीभत्स, किळसवाणें वाङ्मय आमच्या डोळ्यासमोर यावयाला नको. सौंदर्यपूर्ण अनावृत देहाचें दर्शन, हें शिसारी तरी आणीत नाहीं. फार तर भावना उत्तेजित करतें. पण बीभत्स, ओंगळ किळसवाण्या शब्दप्रयोगामुळें ती कथाच दृष्टिआड करावीशी वाटत नाहीं तर तें मासिक वा पुस्तकच फेकून द्यावेंसें वाटतें. साहित्यिकांनीं या बाबतींत तरी आमच्यावर खैर करावी.

## ४६.

# श्रद्धांजलि

बघतां बघता वर्ष उलटलें. कै भाऊसाहेब हिरे याची आठवण मात्र अंतःकरणांत ताजी राहिली आहे. मालेगावचे एक वकील म्हणून त्यांनीं महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात पदार्पण केलें. १९३७ सालच्या निवडणुकीनंतरहि ते तसे अज्ञातच राहिले. फार तर नाशिक जिल्ह्याचेंच नेतृत्व त्यांनीं या काळात केलें असेल नसेल. पण केशवराव जेधे कॉंग्रेसमधून बाहेर पडले आणि भाऊसाहेबांच्या कर्तृत्वाला अनेक वाटा फुटल्या. अनेक जबाबदाऱ्याहि त्याच्या शिरावर पडल्या आणि मानसन्मान व कीर्ति ही जणु त्याच्या पायाशीं चालत आली.

ही कीर्ति नुसती महाराष्ट्रातच दुमदुमली नाहीं तर अखिल भारतीय राजकारणांत काका-साहेबांच्या बरोबरीनें भाऊसाहेब हें नावहि परिचित झालें. भाऊसाहेब हिरे याच्या उमेदीच्या काळातील त्यांचें वैभव मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. खुद्द राजधानींतील त्याचा रुबाबहि मी पाहिला आहे. कोणाला आश्चर्य वाटेल, पण एक काळ असा होता कीं, भाऊसाहेबांच्या मुखानून एखादी लहानशी घोषणा बाहेर पडते कीं काय हें पाहण्यासाठीं राजधानींतील वार्ताहर मध्यरात्रींपर्यंत ताटकळत बसत असत. भाऊसाहेब फारसे बोलके नव्हते बहुशः ते हसून सारें साजरें करीत असत. कधीं बोलले तर मोजकेंच गभीरपणें बोलत असत. त्याचें एक वैशिष्टय नमूद करण्यासारखें आहे. दिल्लींत वावरतांना आपल्या बरोबरीच्या सहकाऱ्याना आपल्या प्रकाशाच्या कक्षेत घ्यावयाला ते कधींहि विसरत नसत.

त्यांचा पोशाख हें सुद्धां त्यांचें एक वैशिष्ट्य असे. काचा मारलेलें. धोतर, बंद गळ्याचा शर्ट, वर साध्याच कापडाचा कोट आणि पायांत चपला एवढाच त्यांचा वेष. त्या वेषातच ते पार्लमेंटमध्यें, कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभेला आणि प्रधानमन्त्र्यांच्या वा राष्ट्रपतींच्या भेटीला जात. पार्लमेंटमध्यें ते चमकले नाहींत. कारण तेथें असेपर्यंत संघटनेचा व्यापच त्याचा सारा वेळ घेत असे. भाऊसाहेब हिरे हे मला दिसले ते नेहमीं व्यवहाराच्या वा राजकारणाच्या व्यापांत दंग होऊन अहोरात्र देशभर हिंडत असलेले. त्या फिरतींत आणि राजकीय घडामोडीच्या आवर्तात आपल्या प्रकृतीकडे पाहावयाला त्यांना वेळच मिळाला नसावा.

भाऊसाहेब हे म्हणूनच अकालीं निधन पावले. त्याच्या निधनाची वार्ता आली तेव्हां क्षणभर कोणाचा विश्वासच बसेना. त्याची पहिली पुण्यतिथि उलटून गेली यावरहि तसाच विश्वास बसत नाहीं. एवढें खरें कीं, ते जसे चटका लावून गेले त्याचप्रमाणें पूर्व सुखदुःखाच्या अनंत आठवणी तरंगत ठेवून आपल्यामधुन निघून गेले आहेत.

४७.

## शब्द आणि शब्द

"देश निर्माल्य होण्यापेक्षा निर्मनुष्य झालेला पत्करेल" असे तेजस्वी उद्गार यशवंतराव चव्हाण यांनीं एका सभेत काढले. निर्माल्यवत्, नि:सत्त्व होऊं पाहणाऱ्या देशात चैतन्याची ज्योत चेतविण्याला हे उद्गार समर्थ होतील. पण देश नि.सत्त्व होऊं लागला त्याचा दोष देशातील लोकांना देता येईल का ?

कसा देता येईल ? रणाची हाक आली आणि सहस्रावधि लोकानीं आपल्या छात्या उघड्या केल्या. सैनिकांना रक्ताची गरज लागेल हें कळताच रक्ताचे पाट वाहू शकतील इतकी रक्तदान-केंद्रांत लोकाची गर्दी उसळली. सोनें, नाणें, कपडा, मिळकत सर्व सर्व कांही राष्ट्रनेत्याच्या पायाशीं वाहण्याची लोकानीं तत्परता दाखविली. "तुम्ही मागा आम्ही देतों" एवढीच लोकाची हांक. ही कां नि.सत्त्वतेचीं चिन्हें ? पण–

पण आमचें नेतृत्व किती दैदीप्यमान, किती ऊर्जस्वल. युद्धाच्या या क्षणीं सुद्धां तें शांति-पाठ देत आहे; आपली बाजू लढवीत नाहीं. ती कशी निर्विवाद सत्याची आहे, आणि आपले शत्रू कसे भ्रष्ट विश्वासघातकी आहेत हें आपल्याच लोकाना स्फूर्तिदायक रीतीनें नव्हे तर कटाळ-वाण्या शब्दांत पटवून देत आहे.

शब्द, शब्द आणि शब्द. गेलीं पंधरा वर्षें आपण तेच ऐकत आलों आहोंत. आतां पार्ले-मेंटच्या सहा आठवड्यांत त्याचाच आपल्यावर भडिमार होणार आहे. कौतुक आहे या बोलघेवडे-पणाचें; तसेंच कौतुक आहे आपल्या सहनशीलतेचें. सुदैव आमचें, काल प्रधानमन्त्र्यानीं नियो-जनाची रूपरेखा नाहीं सांगितली. युद्धाच्या वेळीं शांततेवर प्रवचन. शांततेच्या प्रसंगीं आवेशाचें प्रदर्शन, मित्रांना कोपरखळ्या, शत्रूना आवाहन, हा प्रधानमन्त्र्याचा व्यासपीठावरील जीवनक्रम आहे.

त्याची प्रतिष्ठा मोठी, दरारा त्याहिपेक्षां मोठा आणि त्यानीं सूत्रधार म्हणून प्रत्येक प्रसंग आणि समारंभ साजरा करावा ही तर सर्वांचीच तळमळ, म्हणून शिल्पकारांना त्याच्याकडून साहि-त्यावर प्रवचन ऐकावें लागतें. अर्थशास्त्रज्ञाना संस्कृतीचे पाठ मिळतात, वकिलाना वैद्यकीय धडे ऐकावे लागतात, साहित्यिकांना भूमितीच्या सिद्धांतावरील भाष्य मिळतें आणि कलावंताना युद्धनीतीबद्दल ज्ञान मिळतें. हीं भाष्यें कांहीं वेळीं अनवधानानें होतात तर काहीं वेळीं त्या वेळच्या मनःस्थितीचे पडसाद त्याच्या भाषणात उमटतात. कौतुक आहे तें त्यांच्या धाडसाचें. पुन्हा कौतुक आहे तें आपल्या सर्वांच्या सहनशीलतेचें.

आता युद्ध चालले आहे. गोळ्यांचा तिथें तुटवडा आहे. शब्दांनीं त्याची उणीव भरून काढता आली असती तर ? चीननें यावेळीं तिबेटसुद्धां खालीं केला असता !

# ४८.

## अण्णा आणि ‘ बाया ’

काहीं आठवणी पुसट होत नाहींत. कांहीं घटना मनावर कोरल्यासारख्या कायम राहतात. महर्षि कर्वे याना उभा महाराष्ट्र अण्णा म्हणून ओळखतो. त्याच्या पत्नी निदान पुण्यांत तरी बाया म्हणूनच ओळखल्या जात. या पतिपत्नींचें उभें जीवन समाजसेवेंत गेलें. अण्णाना प्रथम उपहास, विटंबना, छळ सोसावा लागला. पण कालांतरानें त्याच्या सेवेचें चीज होऊं लागलें, त्याना मान-मान्यता आणि किर्तीहि भरपूर मिळाली. तसें बायाचें म्हणतां येणार नाहीं. पण पतीच्या मागें त्या सावलीसारख्या हिंडल्या. आणि आपलें साधेपणाचें जीवन त्यांनीं अहोरात्र अण्णांच्या संस्थेसाठीं भिक्षादेहि करण्यात घालविलें.

अण्णांनीहि तेंच केलें म्हणा. आणि त्या दोघाचें वैशिष्ट्य असें होतें, कीं थोरामोठ्याकडून मातब्बर देणग्या जसे ते जमवीत त्याप्रमाणें सामान्यांकडून पै–पैसा मिळविण्यासाठीहि ते घराघराचे उंबरठे झिजवीत. मला आठवतें, अण्णा कधीं इतर वेळीं पुण्याच्या पेठापेठातून पायीं हिंडत आणि रुपयेच नव्हेत तर आणा आणि पै–पैसाहि या वेळीं गोळा करीत. अण्णांची ऋषितुल्य मूर्ति बहुश: सर्वांच्या परिचयाची झालेली होती. त्यामुळें त्यांना कधींहि रित्या हातीं परतावें लागत नसे. उलट गौरवाचा, कृतज्ञतेचा शब्द बायांना क्वचितच ऐकावयाला मिळत असे.

बाया बिचाऱ्या तशा अप्रसिद्ध. त्याची कोठें उपेक्षाहि होत असे. कधी आटयांनींहि त्यांचें स्वागत होत असे. पण अण्णापेक्षाहि खडतर निष्ठेनें त्या काम करीत असत; कोणाच्या उण्याअधिक शब्दाची त्या पर्वाहि करीत नसत. त्या भाऊबीज जमवीत ती फार मोठी नसेल. पण ती जमविण्या-साठीं तन्हातान्हातून त्या जी पायपीट करीत असत ती लक्षात घेतली तर त्यांनीं जमविलेल्या शेकड्याचें मोल अण्णाच्या लक्षावधींच्या देणग्यापेक्षाहि अधिक मोठें मानावें लागेल. अशा पाय-पिटीच्या वेळीं बाया तापलेलें ऊन्ह आपल्या फाटक्या पदरानींच निवारीत असत. कधीं दुपारच्या जेवणाच्या वेळीं त्या पोंचल्या कीं घरच्या गृहिणीनें आग्रह केला तर त्याचा अनादर करू नये म्हणून त्या गोडाधोडाचा पदार्थ तोंडांत टाकीत. पण लगेच नि:संकोचपणें त्या म्हणत, “ माझ्या आश्रमांतल्या मुलींसाठींहि लहानशी पुडी बांधून द्या बर का, खातील तेवढाच घास. ”

अण्णा आणि बाया यानीं अशा अनेक अनाथ महिलाच्या तोंडीं घास घातला आहे, त्याना शिक्षण दिलें आहे, नवजीवन दिलें आहे. बाया गेल्या आणि अनेक कन्याची मानलेली आई हरवली. अण्णा गेले आणि अगणित कन्याचा धर्मपिताच हरपला.

# ४८.

## ' दे दान सुटे गिऱ्हाण '

" दे दान सुटे गिऱ्हाण " असा एकच आक्रोश चंद्र व सूर्यग्रहणाच्या काळात एके काळीं होत असे. त्याचबरोबर अनेक याचकाच्या मुखातून आरोळ्या निघत, "अन्नदान, वस्त्रदान, तांबेदान." आठवतें कां तुम्हाला तें ?

आज चीनचें देशाला ग्रहण लागलें आहे. आणि तें ग्रहण सुटण्यासाठीं आपणहि आक्रोश करीत आहों, " खून दो, धन दो, सोना दो. " तुम्ही ऐकलात ना हा आक्रोश. नागरिक सरंक्षण समितीनें हा आक्रोश मुखामुखातून प्रगट व्हावा म्हणून केवढी बलवत्तर प्रचार मोहीम सुरु केली आहे. तुमचे आवडते चित्रकलावंत आणि चित्रतारका परवा दिवसभर घसा कोरडा करीत होत्या नाहीं का ? तो आक्रोश वाऱ्यावर विरून जाऊ नये म्हणून त्या चित्रकलावंताचा संदेश त्याच्या चित्रासह त्या समितीनें लक्षावधि भित्तिपत्रकांत संग्रहित केला आहे

केवढें हें भाग्य तुमचें कीं, फक्त नेहरूंच्या खालोखाल ज्याची रशियात लोकप्रियता, तो राजकपूर तुम्हांला आवाहन करीत आहे : " खून दो, धन दो, सोना दो. " कशासाठीं ? हा तुम्हाला संभ्रम पडला आहे का ? कां बरें पडावा ? दुसऱ्या एका भित्तिपत्रकात म्हटलें नाही का ?— " दुष्मनको खत्म करो. " हा दुष्मन कोण हें कशाला कळावयाला पाहिजे. तुमचें काम एवढेंच " खून दोन, धन दो, सोना दो. " तुम्हाला केवढा सवाल टाकण्यांत आला आहे याची कल्पना तरी आहे का ? " आझादी मरेगी तो जीयेगा कौन ? " बस्स. तुमचे आवडते कलावंत हा सवाल टाकीत आहेत तुम्हांला.

या आझादीवर कोण घाला घालीत आहे याचें ज्ञान कशाला हवें ? शत्रु कोणीहि असेल. तुमचें कार्य स्वातंत्र्यासाठीं लढावयाचें हेंच. म्हणजे ! अजून आपल्याला स्वातंत्र्य मिळावयाचेंच आहे की काय ? काय बुवा तुमचा संशयी स्वभाव. कसले प्रश्न करीत बसलां आहांत तुम्ही. इतके सारे चित्रकलावंत तुम्हांला आवाहन करण्यासाठीं पुढें सरसावले आहेत. कलावंत बरें ! नेते नव्हेत, वीरपुरुष नव्हेत. निर्मळ कलावंत निवडण्याचें कारण तुमच्या लक्षात आलें नाहीं. अहो, आपण शांतीचे उपासक आहो. त्या शांतीशीं, सहजीवनाशीं विसंगत होतील असे शब्दप्रयोगहि आपण प्रचारात आणतां कामा नयेत. आपला प्रचार कसा काकडीसारखा कोवळा, मैद्यासारखा लुसलुशीत, लोण्यासारखा मऊ असावयाला पाहिजे बरें. इथें युद्धाचा उल्लेख नको, शस्त्रांचें नांव नको, सैनिकांची आठवण नको. येथें फक्त एकच आवाहन "खून दो, धन दो, सोना दो."

दे दान सुटे गिऱ्हाण !



...४

# ५०.

## ' ऑल स्टार क्रिकेट मॅच '

" वॉटर्लूची लढाई ब्रिटननें क्रिकेटच्या मैदानावर जिंकली " असें ब्रिटनबद्दल अभिमानानें बोललें जातें. त्यांतील अर्थ हाच कीं, खिलाडूपणा, सद्वृत्ति, पराभवात हार न मानण्याचा दिलदारपणा, आणि धैर्य व चिकाटी हे जे गुण ब्रिटिश लोकांनीं क्रिकेटच्या मैदानात प्रगट केले त्यामुळें युद्धकाळीं त्याचें धैर्य कधीं खचून गेलें नाहीं.

आमचा हा आदर्श आहे का ? तें कोण जाणें. पण युद्धकाळीं, आणि युद्धासाठीं आम्ही प्रत्यक्षपणें एक क्रिकेटची मॅच मात्र खेळणार आहों. ती " ऑल स्टार क्रिकेट मॅच " आहे बरें ! मुंबईतील यच्चयावत् भिंतींवर सिनेकलावंतांच्या संदेशाच्या जोडीला हेहि भित्तिफलक लावलेले तुम्हीं पाहिलेच असतील. बघा आमची खिलाडू वृत्ति. युद्धाच्या या एका पाठोपाठ भयानक वार्ता ऐकू येत असल्यानंतरहि कशी टिकून राहिली आहे ती. आणि गंमत सांगतों, खेळ आणि व्यापार यांचा संयोग आम्ही किती शिताफीनें घडवून आणला आहे.

खेळापरी खेळ आणि पुन्हा राष्ट्रीय बचत योजनेला आधार. काय, आहे कीं नाहीं करामत. लोकांना आम्ही कळू सुद्धा दिलें नाहीं कीं आपल्या सीमाप्रदेशांत एक युद्ध चाललें आहे आणि त्यांत आपले जवान मृत्युमुखीं पडत आहेत. नाहीं, खेळांतून बचत आणि त्यातून राष्ट्रोद्धार असा एक अपूर्व पवित्रा आम्ही यशस्वीपणें घेतला आहे.

त्याचें असं आहे, युद्ध करावें सैनिकांनीं. आपलें काम " धन दो, सोना दो " आतां हें धन कसें काढावयाचें ? लोकांना त्यांच्या आवडीचें कांहींतरी देऊन. क्रिकेट मॅच इतकी दुसरी आवडीची गोष्ट कोणती असणार ?– अगदीं सिनेकलावंताची मिरवणूक जशी एक चूष, तशी क्रिकेट मॅच ही दुसरी चूष. अहो, लोकांची नस ओळखण्याचें कसब तुमच्यामध्यें हवें आहे. बघा. एक मिरवणूक निघाली आणि लक्षावधि पैशाचा ( रुपयाचा नव्हे ) नुसता पाऊस पडला. आतां विजयांतून विजयाकडे तसा हा क्रिकेट मॅचचा सोहळा मुंबईकरांच्या सेवेला चालून आला आहे.

काय म्हणता ? युद्धाचें काय ? तें आघाडीवर. त्याचा इथें विचार कशाला ! वॉटर्लूची लढाई क्रिकेटच्या मैदानावर जिंकली गेली बरें. आपलें युद्ध ब्रेबोर्न स्टेडियमवरील " ऑल स्टार क्रिकेट मॅच " मध्यें जिंकलें जाणार आहे.

कोणाला सांगू नका. तुम्हालाच एक गुपित सांगून ठेवतां. ही मॅच होऊं द्या. मग तुमच्या आवडत्या चित्रतारकांचीच एक ऑल स्टार मॅच आम्ही घडवून आणू. मग " धन दो " आणि " सोना दो " या घोषणा करावयाचीहि आवश्यकता उरणार नाहीं. सोन्याचा पूर ब्रेबोर्न स्टेडियमकडे वाहू लागेल.

## ५१.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ३६८८४ वि
क्रमांक ९५९६
नों दि: २५-८-६७

# नियतीची वाटचाल

" मला वाटलें मी जणू नियतीबरोबरच पावलें टाकीत आहें. आणि माझें सारें आजवरचें जीवन ही जणु या क्षणासाठीं आणि या कसोटीसाठीं चाललेली अखंड तयारीच होती. "

विन्स्टन चर्चिल यांनीं युद्धकाळीं अधिकारसूत्रें घेताना हे जे उद्‌गार काढले ते यशवंतरावाना किती यथार्थपणें लागू पडतील असा विचार काल चौपाटीवरील त्याचें भाषण ऐकताना माझ्या मनात तरळून गेला. चौपाटीवरील तो देखावा तसाच भव्य होता. पलीकडे अथांग सागर पसरलेला होता. अलीकडे मानवसागरच आपल्या लाडक्या नेत्याला आणि नव्या युद्धमन्त्र्याला निरोप देण्यासाठीं जमला होता. हा निरोप व्यथित अंतःकरणानेंच ते देत होते. कारण महाराष्ट्राची त्यांच्या नेतृत्वाखालीं बसलेली घडी विस्कटून तर जाणार नाहीं ना या आशंकेनें त्यांच्या मनात घर केलेलें होतें. आणि त्यात भर पडली होती ती सीमेवरील पराभवांच्या वार्तांनीं.

पराभवाच्या या काळींच यशवंतराव संरक्षणाची धुरा खांद्यावर घेत आहेत. साऱ्या राष्ट्राची आशा त्यांच्याकडे आतुरतेनें पाहत आहे. ते संरक्षणाची घडी बसवू शकले तर ?—तर पराभूत भारत कृतज्ञतेनें त्याना आपल्या डोक्यावर घेऊन नाचेल. नुसता भारतच का ? आशिया आणि सारें जगसुद्धां. कारण ही लढाई सीमा-प्रदेशासाठीं चाललेली नाहीं. हा लोकशाही आणि कम्युनिझम यांमधील अटीतटीचा सामना आहे. यांत भारताचें निर्माल्य झालें तर आशिया खंड कम्युनिझमचा गुलाम होईल. पण भारतानें जिद्दीनें यशवंतरावाना पाठिंबा दिला आणि पराभव टाळला तर सारें जग सुटकेचा निश्वास सोडील.

कमकुवत दिलाचें राजकारण आज नाइलाजानें यशवंतरावांना साद देत आहे. भारताची भवितव्यताच त्याना जणु आवाहन करीत आहे. त्या आवाहनाला यशवंतरावानीं प्रतिसाद दिला. पण दिल्लीपतींच्या अनुनयवादी राजकारणाचा गाभा फोडण्याचें कार्य यशवंतरावाना आधीं करावयाचें आहे. त्यानंतर चीनचा समाचार. पहिलें जितकें कठीण तितकें दुसरें नाहीं. कारण चक्रव्यूहात शिरण्याचें त्यांच्यामध्यें धाडस आहे. तसेंच चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याचेंहि त्यांच्यामध्यें कसब आहे.

नियति त्यांना या कामीं आधार देत आली आहे. आतांहि नियति व यशवंतराव याची सांगड भारताला विजयाकडे नेईल.'

# ५२.

## आम्हांला काय विचारतां ?

आम्हांला शस्त्रास्त्रे हवीं आहेत. अमेरिकेकडून, ब्रिटनकडून, जेथून मिळणें शक्य आहे तेथून. पण हे अमेरिकन आणि ब्रिटिश लोक मोठे चमत्कारिक खरे. ते आम्हांला विचारीत आहेत, ' कोणतीं ? कसल्या प्रकारचीं शस्त्रे ? '

आता सांगा, हा प्रश्न आम्हाला विचारणें ठीक आहे का ? अहो, आमचें शस्त्र एक, अस्त्र एक, आयुध एक–शब्द. त्याचा भडिमार करूनच आम्ही सारें जग पधरा वर्षें निनादत ठेवलें, दिपविलें; आमच्या पायाशीं आणलें. इतका आमच्या शब्दाचा प्रभाव. तेथे अस्त्राची आणि शस्त्रांची गरजच कोठें उद्भवली ? मग कोणतीं शस्त्रें पाठवा हें आम्ही काय सांगणार !

तुम्ही शस्त्राचारी. तुम्हींच तें ठरवावयाचें. आम्ही खरें म्हटलें तर शस्त्रांचा विटाळसुद्धां होऊं द्यावयाचा नाहीं. आमची अहिंसावादी जीवननिष्ठा इतकी जाज्वल्य असावयाला पाहिजे होती. पण काय सांगणार ? भाईभाईनींच आमचा गळा कापला आणि आम्हाला अखेरीस शस्त्र परजावें लागलें. किती नाखुषीनें म्हणून सांगू ! एकच उदाहरण देतों. आम्ही म्हटलें युद्ध लढावयाचें आहे ना ! लढा. पण प्रत्येक सैनिकाला फक्त सहा गोळ्या आम्ही दिल्या. बस्स. हिंसा करावयाची तीसुद्धा माफक. आमच्या देशाच्या आदर्शांपासून आम्ही हटूं इच्छित नाहीं. आमच्या सैनिकाचे आत्मे अमानुष व्हावे असें आम्हांला वाटत नाहीं.

आमचीं शस्त्र सपलीं. त्यातील गोळ्या सपल्या. म्हणून आम्ही परदेशाना आवाहन केलें. " आम्हांला शस्त्रे द्या. " तेंहि नाइलाजानें आम्ही आवाहन केलें. आमचा हेतु मात्र एवढाच कीं, युद्धसाहित्य आलें तरी तें अमानुष संहार करणारें नसावें. खरेंच सांगतों आम्ही जगाला, आम्ही त्यांतले नाहीं. म्हणून कोणतीं शस्त्रें पाठवा हें आम्ही काय सांगणार !

पाठवा. पाठवा. आमचें दुर्दैव ओढवलें आहे खरें. शस्त्रें पाठवा, अस्त्रें पाठवा. युद्धसाहित्य पाठवा. पण मेहेरबानी करून आम्हांला विचारू नका, आम्हाला काय त्यातलें कळतें ? किंवा असेंच करा ना. रशिया म्हणे चीनला शस्त्रें पुरवितो. मग तुम्ही रशियालाच का विचारीत नाहीं ? तुम्हाला ओळख पाहिजे असेल तर आम्ही डांगे याना चिठ्ठी देतों की. ते लवकरच मॉस्कोला जाणार आहेत. एकांत एक हेंहि काम होऊन जाईल.

शस्त्रसधि त्यांना जमली नाहीं तर निदान शस्त्रास्त्रांची यादी तरी ते तयार करतील. छान, छान कल्पना आहे नाहीं ?

## ५३.

# आतां हंसा बरें !

चिनी योजनेप्रमाणें भारतीय सैन्यानेंहि युद्धविराम करणें धोक्याचें ठरेल, असें एका प्रजा-समाजवादी सदस्यानें राज्यसभेंत म्हटलें. त्यावर प्रधानमंत्री म्हणाले, "सन्माननीय सभासद भारताचे सरसेनापति होण्यास लायक आहेत." (हशा)

सभागृहांत हशा पिकला. तुमच्या मुद्रेवर उमटलें का हो हंसू ? अरेरे. एवढा थोरला विनोद, इतका भेदक उपरोध खुद्द प्रधानमंत्र्यांनीं केलेला आणि तुम्ही हसत नाहीं ? स्मितसुद्धा नाहीं तुमच्या चेहऱ्यावर उमटलें ? काय झालें आहे तरी काय तुम्हाला ! बाबानो, काळ कठीण आहे, मुलुखाच्या चिंधड्या उडत आहेत, जवानांच्या रक्ताचे पाट वाहत आहेत हें सारें खरें आहे. पण याच काळीं, याच भीषण वेळीं आपण आपली विनोदबुद्धि जागृत ठेवली पाहिजे बरें. तेंच जिवतपणाचें, नव्हे सुसंस्कृतपणाचें लक्षण आहे. तें लक्षण सोडलेंत तर अमानुष बनाल बरें अमानुष. प्रधानमंत्र्याना तें नको आहे. म्हणून ते आपल्या विरोधकाची रेवडी उडवीत आहेत आणि आपल्या अनुयायाना खळखळून हंसवीत आहेत.

तेव्हां हसा. राज्यसभेंतील कॉंग्रेसजन हसले ना, तसे हसा. हसूं येत नसलें तरी हसा; उपरोध कळला नाहीं, तरी हसा; विनोद समजला नाहीं तरी हसा ! तुम्हांला एक आपलें गुपित सांगून ठेवतो.—राज्यसभेंतील आणि लोकसभेतील. अहो, नवसाला पावते हें हसू. समजा, प्रधानमंत्र्यांनीं तुम्हांला हसताना पाहिलें तर ? महाराजा, इकडे कान करा. तो...तो.. युनोच्या शिष्टमंडळांत गेला. आणि हा. ..इकडचा उपमंत्री झाला. नांवें आपलीं लक्षांत ठेवा, कोणाला सांगू नका.

आपलें काम, इतर हसले कीं आपण हसायचें, इतरांनीं टाळ्या पिटल्या कीं बांकें बडवायचीं. पण लक्ष मात्र हळूच तिकडे द्यायचें. हां. भलतीकडे हंसतां कामा नये, आणि क्षणार्धांत प्रधानमंत्री गंभीर होतात बरें. मग, आपणहि चर्येवर त्वेष आणला पाहिजे, हाताच्या मुठी वळविल्या पाहिजेत, सागराची गंभीरता मुद्रेवर आणली पाहिजे. लक्षांत ठेवा मात्र, हें सारें त्यांना दिसेल अशा रीतीनें केलें पाहिजे.

संसदेचा तुम्हांला अनुभव आहे का ? तो अनुभव असला तर प्रधानमंत्री सभागृहांत शिरताच आपल्या बांकावर तत्परतेनें कसें बसावयाचें, त्यांचें भाषण चालू असतांना कान टवकारून आणि पुढें वांकून तें कसें ऐकावयाचें, हशा पिकला कीं इतरांपेक्षां अधिक जोरानें कसें हसावयाचें आणि टाळ्या पडल्या तर सर्वांत जास्त बाकें कशीं बडवावयाचीं हें सारें, सारें तुम्हांला अवगत होईल.

एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा. प्रधानमंत्र्यांची भावना ती आपली भावना असें मानून आपण नेहमीं त्यांच्याशीं समरस झालें पाहिजे.

मग आतां उशीरानें का होईना, हसा बरें.

# ५४.

## कालगति

जुना जमाना बदलतो; त्याच्या जागीं नवा जमाना येतो. कधीं क्रांतीनें, कधीं कालगतीनें. कालगतीची वाटचाल केव्हा केव्हां डोळ्यांतहि भरत नाहीं. पण त्यातून होणारे बदल आकस्मिकपणें भासू लागतात आणि मग जाणीव होते : " अरे, गेला बरें तो जमाना. "

आपल्या डोळ्यांसमोरच आणि पायाखालचें मुंबई शहर. त्यांतहि बघा, पाहतां पाहतां किंवा आपल्या नकळत ट्रॅमचा जमाना निघूनहि चालला आहे. गेला तो ठणठणाट, ती चैतन्यपूर्ण धडपड, ती मंदगति, ती लोंबकळून जाणारी भाऊगर्दी, आणि तो स्वस्त प्रवास. एक आणा किंवा फार तर तो दीड आणा टाकला कीं दादरपासून म्युझियमपर्यंतचा साऱ्या शहरलांबीचा प्रवास ऐसपैस रीतीनें करता येत असे. लांबीचाच नव्हे, रुंदीचाहि. कारण एके काळीं बदली टिकिट असे. एक आण्यांत चार-दोन ठिकाणचीं कामें उरकून टाकलीं जात. ट्रॅम कंपनीची सवलत. पण अशा कौशल्यानें लोक तिचा उपयोग करून घेत कीं आण्या दीड आण्यांत निम्म्या मुंबईचीं वळणें डोळ्यांखालून घातलीं जात. याला म्हणावें चातुर्य. सोयीसाठीं सवलत दिली ती कंपनीला गैरसोयीची वाटावी अशा रीतीनें तिचा उपयोग व्हावा हें तल्लख बुद्धीचें लक्षण नव्हे तर काय ?

आतां त्या बुद्धीची मुंबापुरीला गरज राहिलेली दिसत नाहीं. म्हणून ती बदललीहि गेली आणि बदलीची सोय देणारें तें वाहनहि हळूहळू दृष्टिआड होत आहे, अगदीं मुळापासून. कारण साऱ्या शहरभर चकचकणारे ते ट्रॅमचे रूळहि आतां जमिनीखालीं गाडले गेले आहेत. कदाचित् उद्यां युद्धासाठीं पोलादाची गरज लागली तर तेहि मुळापासून उखडून काढले जातील म्हणा. मग मात्र त्या वाहनाच्या नुसत्या आठवणी राहतील.

किती गोड आठवणी. एका आण्याच्या ( अकस्मात तोहि पुढें जात आहे ), धावता धांवतां वाहनांत चढण्याच्या, त्यातून कौशल्यानें उतरण्याच्या, गर्दीच्या वेळीं फुकट प्रवास करण्याच्या, कंडक्टरची मति कुंठित करण्यासारखा बदलीचा प्रवास करण्याच्या, किती किती तरी आठवणी. काय सांगावा तो ट्रॅमचा रुबाब ! प्रधान मंत्र्यासाठीं व्हावा तसा खुला, अनिर्बंध रस्ता मिळत असे तिला आणि केवढ्या ऐटीनें थडीवाल्यांशीं, उन्हातान्हाशीं, सभोंवतालच्या गर्दीशीं झुंज घेत ट्रॅमचा ड्रायव्हर आपल्या अस्तित्वाची क्षणोक्षणीं जाणीव करून देत या अफाट रस्त्यावर आपली हुकमत गाजवत असे.

गाजवत आहे आजसुद्धां—पण मर्यादित मार्गावर. त्याच्या हुकुमतीचा विस्तार कमी होत चालला आहे—आपल्या सरहद्दीप्रमाणें. बोमदिला तेझपूरपासून काटलें गेलें. ट्रॅमच्या साम्राज्यांतून बोरीबंदरपासून म्युझियमपर्यंतचा भाग काटला जाणार आहे. कालगति, कालगति, दुसरें काय म्हणावें !

# ५५.

## शांतिसैनिक !

'बर्फाचे तट पेटुनि उठले' ते चीनच्या आक्रमणामुळें. त्याच आक्रमणामुळें गांधीवादी अहिंसक सर्व सेवकहि आतां पेटून उठलेले दिसत आहेत. लष्करी कारवाईला हातभार लावण्यासाठीं ते म्हणे शांतिसैनिकांची एक फौज उभी करणार आहेत. आणि त्या शांतिसैनिकांना ते सीमा भागात पाठविणार आहेत.

या शांतिसैनिकाचें लक्ष्य चिनी आक्रमक कीं सीमा प्रदेशातील लोक हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. पण पहिलें असलें तर मला असें वाटतें कीं, गांधीवाद्यांचे जे अग्रणी आहेत त्यानाच प्रथम आघाडीवर पाठविणें बरें. साहजिक आहे. आक्रमकांचें-त्यातहि चिनी-हृदयपरिवर्तन करणें ही साधी गोष्ट नव्हे. ४२ सालीं व्यक्तिगत सत्याग्रहाची निवड करतानासुद्धा गांधीजींनीं सर्वोच्च संयम पाळू शकणाऱ्या व्यक्तींचाच निकष लावला होता. तेव्हां ब्रिटिशांच्या सुसंस्कृत राजवटीविरुद्ध सामना द्यावयाचा होता. आतां चेंगीजखानाच्या वंशजाना शांतिमूल्यें पटवून द्यावयाचीं आहेत. तें कार्य निष्ठावान् अहिंसावाद्याशिवाय दुसऱ्या कोणाला करता येईल ?

त्यानीं तें कार्य युद्धविरामांच्या काळांतच सुरू करावें. हिमालयाची बर्फाच्छादित शिखरें जशीं त्यांच्यासारख्या मुक्तात्म्याना प्रतिबंध करू शकत नाहींत, त्याचप्रमाणें भौगोलिक सीमेच्या वा चिनी संगिनींच्या मर्यादाहि त्याना अडवू शकणार नाहींत. बर्फ हा थंड असतो तो जीवात्म्यांना. आणि आगीची झळ लागते तीहि त्यानाच. विमुक्त जीवांना उंचीची काय क्षिति आणि शस्त्रास्त्राची काय भीति ? चिनी सैनिक कदाचित् १ डिसेंबरपासून माघार घेतील आणि मग आपण त्यांचा पाठलाग करणार नसल्यामुळें हिमाच्छादित शिखरें आणि हिमालयाची दऱ्याखोरीं उजाड होतील. त्याच वेळीं अहिंसक सेनानींनीं त्या पर्वतशिखरांवर तळ दिला तर ? तर काय ? आपल्या सेनेला जो मोर्चा बांधता आला नाही तो अहिंसक दल आपल्या सात्त्विक सामर्थ्यानें त्या दुर्गम ठिकाणीं उभा करील. चिनी सैनिक पुढें खालीं उतरू लागले तर त्यांच्या हृदयाला आवाहन करण्याची या अहिंसक दलाला केवढी सुवर्णसंधि मिळेल !

तेव्हा या अहिंसक दलानें दुर्गम पर्वतशिखरांवर वास्तव्य करणाऱ्या चिनी आक्रमकावरच लक्ष केंद्रित करावें. सीमा प्रदेशातील मनुष्य वस्तीच्या सपाट भागात सामान्याचें नीतिधैर्य टिकवून धरण्यात त्यांनीं वेळेचा अपव्यय का बरें करावा ? उच्च, उदात्त ध्येयस्वप्नांत रममाण होणाऱ्या पुण्यवतानीं भूमितळींच्या क्षुद्र जीवनापासून अलिप्त राहणेंच बरें नाहीं का ?

# ५६.

## ....तीं वाघनखें

पाकिस्तानचे उद्योगमंत्री जनाब भूतो हे इतिहासाचे विद्यार्थी दिसतात. इतकीं वर्षें उलटून गेलीं आणि महाराष्ट्रापासून इतक्या दूर जाऊन ते राहिले तरी शिवाजीचा इतिहास काहीं त्याच्या स्मरणातून जात नाही. आज मात्र त्याना "आधुनिक शिवाजी" ची दहशत वाटत आहे.

बरें झालें, भूतोसाहेब रावळपिंडीला आहेत. त्यानीं यापुढें दिल्लीला येण्याच्या भानगडींत पडू नये. न जाणो उद्या संरक्षणमंत्र्याच्या रूपानें जो आधुनिक शिवाजी दबा धरून बसला आहे त्यालाच आलिंगन द्यावयाची त्याच्यावर पाळी आली तर ?

या अल्ला. शेर अफझलची गत काय झाली तुम्हाला माहीत आहे ना ! अफझलखान नव्हे, शेर अफझल बरें ! भूतोसाहेबांनीं त्याला शेर बनविला आहे. पण हे मराठे वेटे खतरनाक. शेरालाहि सव्वाशेर होतात ते.

बिचाऱ्या भूतोसाहेबांचीच चिंता पाहा ना. मेननचें त्याना तेवढें भय वाटलें नाहीं. पण हा महाराष्ट्रीय चव्हाण, ज्याला "आधुनिक शिवाजी" म्हटलें जातें, तो संरक्षणमंत्री झाला. आता काय बरें करावयाचें ? होय. तो प्रतापगड. ते गर्द झाडींत दबा धरून बसलेले मावळे, ती भेट, तें आलिंगन–आणि तीं वाघनखें.

इन्शाल्ला. खैर कर रे, भूतोसाहेबांची. आतां त्याची तहानभूक आणि झोंप उडाली. हा मराठा संरक्षणमंत्री झाला. शिवाजीचा हा छावा. त्याला कसें बरें आलिंगन द्यावयाचें ! त्यापेक्षां मावळे तुरुंगहि बरा नाहीं का ? उजवीकडे अमेरिका, डावीकडे चीन. अशा बंदोबस्तात भूतोसाहेब राहिल्यानंतर हा शिवाजीचा छावा काय करूं शकणार !

पण भूतोसाहेब, वाघनखांच्या भीतीनें आलिंगन टाळलेंत तरी शाहिस्तेखानासारखीं बोटें गमावण्याची वेळ कशावरून येणार नाहीं ? तेव्हां या आधुनिक शिवाजीच्या हाताकडे बघू नका. कधीं काळीं एखादी शादीची मिरवणूक तुमच्या घरासमोरून जाऊं लागली आणि त्यांत मशाली दिसल्या तर शाहिस्तेखानाची आठवण काढून आपलीं बोटेंहि सभाळा.

इन्शाल्ला. आतां दिल्लींत हा मराठा आला. आता आम्ही कोठे कोठें लक्ष द्यावयाचें !

# ५७.

## चमत्कार !!!

भूमिकन्या सीता. जगानें तिला निंदिलें. प्रभु रामचद्रानीं त्या निंदेची दखल घेतली आणि तिचा त्याग केला. तिनें भूमातेशिवाय दुसऱ्या कोणाचा आश्रय घ्यावयाचा ? नितात निर्धारानें तिनें धरणीमातेला हाक दिली. " माते, मी जर निष्कलंक असलें तर मला पोटात घे. " त्या क्षणीं धरणी दुभगली आणि भूमिकन्या सीता धरणीमातेच्या पोटांत गडप झाली. प्रभु रामचद्रानीं साश्रु नयनांनीं तें दृश्य पाहिलें आणि ' हा सीते ' असें आर्त वाणीनें म्हणून ते बेशुद्ध झाले.

हा चमत्कार रामायणकाळांत घडला. आजच्या कलियुगात हाच चमत्कार घडू शकेल काय ? होय. चमत्काराचें युग दुनियेला अद्यापहि पारखे झालेलें नाहीं. तुम्हांला पटो वा न पटो; तुमचा विश्वास बसो वा न बसो. हाच चमत्कार काल या पृथ्वीतलावर, भरतभूमींत पुन्हा एकदा घडला. प्रत्यक्ष या डोळ्याना त्या चमत्काराचें दर्शन घडलें.

काय सांगू तुम्हाला ! इडिया गेटचें तें अतिविस्तीर्ण पटांगण, पचक्रोशींतील लक्षावधि व्यक्तींनीं नुसतें फुलून गेलें होतें. कारण काय ? सांगतों. हिरेन मुकर्जी याच्या शब्दातच सागतो. भारताच्या संसदेंत ते कळवळून म्हणाले, " आजचें युगहि चमत्काराचें असतें तर पृथ्वी आजहि दुभगली असती आणि सीतेचें शील शुद्ध असल्याचा जसा पुरावा मिळाला तसाच कम्युनिस्टाच्या देशभक्तीचाहि पुरावा मिळाला असता. "

हिरेन मुकर्जी यांच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले आणि काय आश्चर्य ! त्या क्षणीं आकाशवाणी झाली " तथास्तु. "

" म्हणजे ? " हिरेन मुकर्जी स्तंभित होऊन म्हणाले, " आजच्याहि युगांत चमत्कार होऊ शकतो. हें कोण बोलत आहे ? "

" वत्सा, ही धरणीमाता तुला आवाहन करीत आहे. तुझे चारित्र्य निष्कलक आहे ना, तुझी देशभक्ति निरपवाद आहे ना. मग ये, सीतेनें जें दिव्य केलें तें समस्त पौरजनापुढें करून दाखव. "

" पण, पण ! " हिरेन मुकर्जी चांचरत म्हणाले, " माझ्या पक्षाची, मध्यवर्ति समितीची मला आज्ञा घेतली पाहिजे. डांगे यांचा तरी मला सल्ला घ्यावयाला नको का ? "

" हे बघ तुझे सारे प्रियजन, तुझ्या मातृभूमींतील आणि पितृभूमींतील, हयात आणि दिवगतहि मी धरून एकत्र आणले आहेत. चल, इडिया गेटच्या पटागणावरच साऱ्या जनतेसमक्ष तूं त्याच्याशीं विचारविनिमय कर आणि तुझ्या मनाचा निर्धार झाला असेल तर माझ्याबरोबर पाताळलोकीं चल. "

" माते, तुझी इच्छाच तशी असेल " हिरेन मुकर्जी अश्रुपूरित नेत्रानीं म्हणाले, " तर चल .. "

" अरे, चल काय ? " डागे हलक्या आवाजात म्हणाले, " ही धरणीमाता प्रतिगामी आहे. साम्राज्यवाद्यांची ती हस्तक आहे. ती दुभगली तर आपल्या सर्वांचा स्वाहा करील. "

" आणि हिरेन, " रणदिवे त्याच्या कानांत कुजबुजले, " तू भारतपुत्र कोठला रे ? अरे आम्ही जसे पेकिंग-पुत्र तसा तू रूसपुत्र. "

काय सांगू तुम्हाला ! धरणीमातेनें तें ऐकलें आणि क्रोधाविष्ट होऊन ती म्हणाली "हेंच का रे तुमचें शील ? कशाला रे सीतेचें पवित्र नाव घेऊन तिची विटंबना करता ? माझी ती कन्या. तिनें अग्निदिव्य केलें. पण, प्रभु रामचंद्राचें समाधान झालें नाहीं. लोकानुराधनासाठीं त्यांनीं तिला पुन्हा दिव्य करावयाला सांगितलें. तें दिव्य का तुम्ही करणार ? अरे, भारतमातेशीं जे एकनिष्ठ राहिले नाहींत, ते धरणीमातेचे काय पांग फेडणार ? "

" माते, माते. ." हिरेन मुकर्जी आक्रोश करीत म्हणाले.

पण त्यांचे शब्द हवेंत विरण्यापूर्वींच धरणीमाता अदृश्य होतां होता शापवाणी उच्चारीत म्हणाली, " अरे, देशद्रोह्यांनो, तुमचें स्थान फक्त रौरव नरकांतच आहे. "

" अरे देवा ! " हिरेन मुकर्जी यांनीं कपाळावर हात मारला. दुसऱ्याच क्षणीं कडकडाट झाला आणि आमच्या डोळ्यांना काय दिसलें ? धरणी दुभंगली होती. पण त्यातून काळाकुट्ट हला-हलासारखा केवढा तरी प्रवाह बाहेर पडला होता. त्या प्रवाहाबरोबर वाहत जाणारे हिरेन मुकर्जी आक्रोश करीत होते, " अरे, मला वांचवा. "

त्याच्याकडे न पाहतांच शांतपणें मोटारींत बसतांना डांगे म्हणत होते, " अरे कोणी तरी म्युनिसिपालिटीला कळवा बरें का ! "

## ५८.

## एकच प्याला

" दारू पीना हराम है " हें घोषवाक्य फार जुनें झालें. पण आता " दारूबंदी हा राष्ट्रद्रोह आहे " अशा तऱ्हेचें घोषवाक्य पुढें येऊं लागलें आहे. दोन टोकें हीं. साहजिकच सुवर्णमध्य हा या दोन टोकांत कोठें तरी असणार हें का सांगावयाला पाहिजे ?

तसें पाहिलें तर दारू हा शब्द आपल्या समाजात फार हीन ठरला आहे. इतका हीन कीं दारू पिणें हें शिष्टसंमत समाजांतच नव्हे तर सामान्य जनातहि निषिद्ध मानलें जातें. पण मग विचार येतो कीं दारूबंदीचा एवढा अट्टाहास कशासाठीं ? दारू पीना हराम है हें जर खरे तर ही हरामी करावयाला फारच थोडे लोक तयार होतील. त्या थोड्या नव्हे मूठभर, लोकांसाठीं मग एवढें आंदोलन कशाला ? त्यांच्या निःपातासाठीं एवढा घटनेचा आधार घेण्याचें तरी कारण काय ? अहो, " सुधाकर " असले तरी हाताच्या बोटावर मोजण्याजोगे. त्यांच्या संपर्कामुळें साऱ्या समाजाची घडी बिघडेल, सार्वजनिक नीतीचा ऱ्हास होईल अशी अवास्तव कल्पना करून घेण्याचें कारण काय ? इतका का आपला समाज नेभळा, दुबळा आहे ?

कदाचित् नीतिकल्पनाची आपल्या मनावरील पकड फारच बळकट झाली असावी. पण नीति आणि अनीति ही दारूच्या एकाच प्याल्यांत समाविष्ट झाली आहे असें समजण्याचें कारण काय ? खरें आहे, तो एकच प्याला कदाचित् एखाद्या घराची धूळधाणहि उडवीत असेल. पण कदाचित् तो एकच प्याला कोणाच्या मनोवृत्तीहि रिझवीत असेल, कोणाचा दुःखभारहि हलका करीत असेल, कोणाचें सुखहि द्विगुणित करीत असेल. 'नाहीं' कोणी म्हणावें ? एकच प्याला, एकच स्पर्श, एकच... वगैरे काव्यमय वचनें हीं जीवनाचीं प्रातिनिधिक मानण्याचें काहीं कारण आहे का ? जग विविधरम्य आहे. त्यांत संत असतात, अवलिये असतात आणि रसिकजनहि असतात. संतांच्या साधुत्वाला कोणी आक्षेप घेतो का ? अवलियाच्या उन्मादाला कोणी बंध घालतो का ? मग रसिकजनांनीं कधीं काळीं एकच प्याल्यानें आपली तल्लफ भागविली तर त्याबद्दलच एवढा कोलाहल का ?

असू द्या हो. दारू पीना हराम असू द्या. तसाच आरामहि हराम आहे. पण त्यावर कोणी बंदी घातली आहे का ? मग समुद्रमथनातून प्रगट झालेल्या फक्त एकाच चिजेवर तेवढी बंदी कशाला ?

## ५१.

# अश्लीलतेचे पुरावे

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुण्यांतील कचेरींत ही गर्दी कां उसळली आहे बुवा. कोणाचें व्याख्यान आहे म्हणून ? अहो, कसचें काय ! चहा चिवडा ठेवूनसुद्धा शमर श्रोते जमणें मुष्किल जातें. मग एखादा परिसंवाद ? म्हणजे पन्नवीसांचीच मर्यादा आली बरें का ! तसे कांहीं प्राध्यापक, साहित्यिक, आणि पत्रकार या गर्दीसाठीं हातचे राखून ठेवलेले असतात म्हणा.

पण ही गर्दी ! अगदीं राजकपूर आणि वैजयंतीमालेच्या दर्शनासाठीं जमते ना तशी उसळली आहे. तुम्हांला कोडें पडलें आहे ना ? इकडे बघा, साहित्य समेलनाचे अध्यक्ष कोण आहे माहीत आहे ना ! आपले काकासाहेब. त्यांची कल्पकता आहे बरे या गर्दीच्या मुळाशीं. अहो, त्यांनीं अगदीं बहार केली आहे. सातार्‍याच्या समेलनानें ठराव केला, अश्लील साहित्याला आळा घालण्याबद्दलचा. काकासाहेब मोठे क्रियाशील. त्यानीं म्हटलें, 'अश्लील, अश्लील म्हणतात तें साहित्य तरी कोठें आहे ? द्या आमच्याकडे पाठवून. अगदीं गेल्या तीन वर्षांतील सगळें—मासिकें, पुस्तकें, चित्रें सर्व कांहीं. आणि त्यावरचें वाचकांचें मतसुद्धां.'

वाचकहि तसेच क्रियाशील. त्यानीं म्हटलें कीं आम्ही मतें द्यावयाला एका पायावर तयार आहों. पण हें अश्लील साहित्य आमच्या नजरेस तर पडू द्या. ही जी वर गर्दी चालली आहे ना, ती हें साहित्य न्याहाळण्यासाठीं आणि चित्रे पाहण्यासाठीं. मी सुद्धा नुकताच वर जाऊन आलों. काय गंभीरपणें तेथें चर्चा चालली होती म्हणून सांगू ! अश्लीलतेचा म्हणे निकष काय ! अनावृतात अर्धावृत बसतें किंवा नाहीं. सूचकता ही सुद्धा अश्लील मानतां येईल किंवा नाहीं ?

ही चर्चा मात्र तरुण मंडळी करीत होती बरें का ? पोक्त आणि वृद्ध मंडळीं—त्यांत साहित्य समेलनाच्या व्यासपीठावरून अश्लीलतेविरुद्ध घनगर्जना करणारीहि कांहीं मंडळी मला आढळली. अगदीं डोळ्याना चष्मे लावून आवृत, अर्धावृत, अनावृत चित्रे मोठ्या बारकाईनें पाहत होती व तोंडानें मात्र म्हणत होती, "छे. छे, भारीच बुवा पांचकळपणा बोकाळला आहे."

"याचा समाचार घेतलाच पाहिजे." ही अर्थातच त्याची घोषणा होती. "कांहो पण..." त्यांच्यापैकीं एकानें माझ्यापाशीं शंका काढली, "आम्ही या साहित्याचा निषेध करावयाचा तर आमच्याजवळ पुरावा नको का त्याचा ?"

"हो तर, तेवढ्यासाठींच तर हें साहित्य गोळा केलें जात आहे" मी अभावितपणें म्हणालों.

"पण असें करा" एक वृद्ध गृहस्थ हळूच माझ्या कानात म्हणाले, "असे जे सज्जड पुरावे आहेत ना, ते माझ्याकडे पाठवून द्याल का ? असा खरपूस समाचार घेतों म्हणतां !"

"अहो अहो," पुन्हा ते वृद्ध गृहस्थ तांतडीनें माझ्याकडे येत त्याहिपेक्षां हलक्या आवाजांत म्हणाले, "पण हे सारे पुरावे नीट गुंडाळून पाठवा बरें का. कोणी पाहतां कामा नये."

## ६०.

# ' लेफ्ट राईट '

विश्वास ठेवा अगर नका ठेवू. पण २६ जानेवारीच्या सैनिक सचलनांत खासदाराना भाग घ्यावयाची परवानगी देतांना इतक्या अनत अडचणी निर्माण होतील अशी प्रधानमन्त्र्यांना कल्पना नव्हती. त्या संचलनाची पूर्वतयारी सुरू होते न होते तोंच स्वतत्र पक्षाचें एक शिष्टमडळ प्रधानमन्त्र्याना भेटलें. त्यांची तक्रार अशी होती कीं, " लेफ्ट, राइट " या तालसुरावर पावलें टाकणें हें आमच्या पक्षाला अपमानास्पद वाटतें. डाव्याना हें अग्रेसरत्व का ? किंवा डाव्यांचा हा उल्लेख तरी कशाला ?

पंडितजी नम्रपणें म्हणाले, " पण तुम्ही डावें पाऊल तरी टाकाल ना ? ".

रगा यांनीं म्हटलें, " टाकू. पण मुखानें घोषणा मात्र राइट, राइट अशीच झाली पाहिजे. "

पंडितजींनीं तें मान्य केलेलें कळताच कम्युनिस्ट पक्षाचें एक शिष्टमडळ त्यांच्याकडे आलें. त्यानें तावातावानें म्हटलें, " प्रतिगामी वर्गाच्या मागणीला मान्यता देण्यांत पडितजी, आपण आमचा अधिक्षेप केला आहे. आजची घडी डाव्यांची आहे आणि आम्ही तर ससदेमध्यें अग्रेसरहि आहों. तेव्हा लेफ्ट, लेफ्ट अशीच घोषणा झाली पाहिजे. "

" म्हणजे ! उजवें पाऊलच बाद करावयाचं कीं काय ? " पडितजींनीं आश्चर्यानें विचारलें.

" होय. आम्ही डाव्या पावलावरच चालू. मग लगडी करीत जावें लागलें तरी हरकत नाहीं. " कम्युनिस्ट प्रतिनिधी निर्धारानें म्हणाले.

पडितजींनीं त्याला मान्यता देताच खासदार खाडिलकर एक शिष्टमडळ घेऊन पडितजींकडे गेले आणि म्हणाले, " पंडितजी, आम्ही सेंट्रिस्ट आहोत. या उजव्या आणि डाव्या गटाचे तुम्ही उगाच चोचले पुरवीत आहा. "

" म्हणजे ! " पंडितजी अचब्यानें म्हणाले, " तुम्ही या दोघांच्याहि विरुद्ध आहात कीं काय ? "

" नाहीं. " खाडिलकर आपल्या विरोधविकासवादी भूमिकेचें दिग्दर्शन केल्यानंतर अखेरीस म्हणाले, " कधीं आम्ही यांच्या बाजूला असतो तर कधी दुसऱ्याच्या विरुद्ध. "

" पण या संचलनात तुम्ही आपला पाठिंबा वा विरोध कसा प्रगट करणार ? " पडितजींनीं हतबुद्ध होऊन विचारलें.

" त्याला एक मार्ग आहे. " खाडिलकर यानीं पाण्याचा घोट घेत म्हटलें, " आमच्यापैकीं एकजण डाव्यांशीं पाय बांधून चालेल आणि दुसरा उजव्यांशीं. "

" अहो, पण ही तीन पायांची कसरत सचलनात कशी चालेल ? " पडितजी आता खो खो हसत म्हणाले.

" तें खरें आहे म्हणा " खाडिलकर विचारमग्न होत म्हणाले, " पण आम्ही पाय मोकळे ठेवून हात बांधले तर ? "

" ठीक आहे. पायाचा उपयोग फक्त चालण्यासाठीच करा म्हणजे झालें. " पंडितजींनीं शिष्टमडळाला निरोप देतांना म्हटलें,

आता पाहा, २६ जानेवारीचें सैनिक संचलन हें अपूर्व नव्हे तर काय होणार !

## ६१.

# उपोषणाचा प्राण वांचला

बरें झालें, लाल निशाण गटाचे नेते श्री. दत्ता देशमुख यांची मुक्तता झाली. त्यामुळें एक प्राणांतिक उपोषणहि टळलें. म्हणजे उपोषणाचा प्राण वाचला. या प्राणांतिक उपोषणात बळी जातो तो उपोषण करणाऱ्या व्यक्तीचा नव्हे; उपोषणाचा. त्याला अपवाद एकच. आंध्रचे श्रीरामलु. त्यांनीं प्राणांतिक उपोषणाचें तंत्र जाणलें नाहीं अहो, मरण ही शरीराची प्रकृति असली तरी ती तत्त्वज्ञानात. जीवन ही विकृति असली तरी तीहि तत्त्वज्ञानांत. बुद्धिमान् माणसानें आपल्या जीवनाचीं क्षितिजें विशाल करण्यासाठीं प्रत्यक्ष मरणाचा उपयोग करून घेतला आहे. प्राणांतिक उपोषण हा त्या मानवी बुद्धीचा व कर्तृत्वाचा आदर्श आहे.

म्हणजे असें कीं, जीवनांतील आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं मरणाला कवटाळण्याची आपण तयारी करतों. पण ही फक्त तयारी! प्रत्यक्ष कवटाळण्याची वेळ आली कीं आपण बाजूला सरावयाचें. आणि उपोषणच मृत्यूच्या हातीं द्यावयाचें. प्राणांतिक उपोषणाचें तंत्र म्हणतात तें हें बरें!

आतां इतकेंच पाहा ना. दत्ता देशमुख यानीं नुसता प्राणांतिक उपोषणाचा निर्धार जाहीर केला. लगेच लाल निशाण गटाचीं चक्रें फिरूं लागलीं पाहिजेत. पहिल्या प्रथम कागदाचीं रिमें गोळा केलीं पाहिजेत. तीं कशाला? मग पत्रकें कशावर काढावयाचीं! अहो, या प्रकारच्या मरणाचा मार्ग मोठेपणाच्या मैदानातून जात असतो हें खरें आहे ना? पत्रकें हें मोठेपणा प्रस्थापित करण्याचें एक बलवत्तर साधन आहे. नतर तारांचे फॉर्म! होय. तारा प्रधानमंत्र्यांपासून सेनापतींच्या पर्यंत करावयाच्या असतात. सेनापति म्हणजे आपले सेनापति बापट. अखेरीस व्यक्तीच्या ऐवजीं उपोषणाचा बळी द्यावयाचा झाला तर प्रधानमंत्र्याची विनंती आणि तिला सेनापतींनीं दिलेली सक्रिय साथ हींच दोन साधनें परिणामकारक ठरतात. प्रधानमंत्र्यानीं विनंती करावयाची— देशासाठीं प्राण वाचविण्याची. आणि मग सेनापतींनीं देशाच्या या भाग्यविधात्याचे मुसुंब्याच्या रसाचा एकच प्याला प्राशन करावयाला देऊन प्राण वांचवावयाचे!

अरे, पण मुसुंबी आहेत ना? हीं अगदीं पहिल्या दिवसापासून तयार ठेवावयाचीं—किमान सहा तरी. नेत्याच्या जीवनाचा सारीपट उधळला जाऊ नये म्हणून अखंड, जागता पहारा ठेवणारी जर कोणती शक्ति असेल तर हीं सहा मुसुंबीं. आणि त्याचा निर्मळ रस पोटात घेणारा तो प्याला. प्राणांतिक उपोषणाच्या तंत्रात कोणत्याहि क्षणीं दुर्लक्ष होऊ द्यावयाचें नाहीं तें या दोन चिजाकडे. तें दुर्लक्ष झालें तर उपोषण प्राणावर मात करील. तेव्हा सावधान.

पण लाल निशाण गटाच्या लोकाना आतां सावधान राहण्याचे कारणच उरलेलें नाहीं. दत्ता देशमुख यांची मुक्तता झाली. चला, आतां आपणच मुसुंबीं फस्त करू या.

## ६१.

# भिंतीवरील साजशृंगार

मुंबानगरी ही एक स्वरूपसुंदर नगरी मानली जाते. अठरापगड जाती आणि जमातींचें माहेरघर म्हणून तिच्या अंगप्रत्यंगात किती विविधता दिसते म्हणून सांगू! तशीच कल्पकताहि. मुंबई नगरींतील नुसत्या भिंती पाहिल्यात तरी या कल्पकतेचा सारा विलास तुमच्या नजरेसमोरून तरळून जाईल. एक इमारत, त्या इमारतीची एक भिंत, उभ्या आडव्या रस्त्यांवरील, गल्ली-बोळातील एक खांब तुम्हांला असा आढळून येणार नाही कीं जो नानाविध भित्तिपत्रांनीं शृंगारला गेलेला नाहीं. मुंबईचा हा जो साजशृंगार आहे ना त्याच्यामागील हेतु तुमच्या लक्षात आलेला आहे का? अहो, नेत्रसुख देणें हा तर हेतु त्यांत आहेच. पण त्याहिपेक्षा महत्त्वाचा हेतु लोकशिक्षण.

नेत्रसुखासाठीं सिनेतारकांचीं चित्रें आहेत, कधीं फ्रेंच बॅले ट्रुपमधील नर्तिकेच्या चंचल पदन्यासाचें मनोवेधक चित्र तुम्हाला पाहावयाला मिळतें. कधीं यक्षगान तर कधीं "सूरत और सीरत" मधील नूतनचें द्विविध रूप. कधीं कधी वाटतें, किती धन्यवाद द्यावा या जाहिरातदारांना, हीं सुरुचिर कल्पनाचित्रें क्षणोक्षणीं आपल्यापुढें उभीं केल्याबद्दल. नुसत्या दगडाविटांच्या, सीमेंटच्या बोडक्या भिंती काय कामाच्या! त्या भित्तिपत्रकानीं भरून काढल्या कीं रुक्षातल्या रुक्ष विज्ञान-मंदिरांमध्येंसुद्धा कसें नवें आकर्षण निर्माण होतें. जाऊं द्या हो, परदेशी पाव्हणे म्हणू द्यात कीं या भिंती कुरूप दिसतात म्हणून! त्याना पौर्वात्य संस्कृतीची कल्पना कोठें आहे?

आणि मी म्हणतों लोकशिक्षण! त्यांत वैचित्र्य आहे, वैदग्ध्य आहे, विविधता आहे, आणि सर्वांना प्रिय असणारी वैषयिकताहि आहे. कोणत्याहि रोगावर रामबाण असा इलाज असतो ना, तसें कोणत्याहि विषयावर हमखास ज्ञान या भित्तिपत्रांतून प्राप्त होत असतें. युद्धाच्या सावल्या त्यांत उमटतात, कर्तव्यपालनाची दिशा त्यांतून मिळते, समर आणि संगीत यांचा मिलाफ कसा घडवून आणावा याचें ज्ञान त्यांतून होतें आणि धन, दौलत, आरोग्य आणि जोम प्राप्त करून घेण्याचा मार्गहि त्यातून दिसतो, फक्त डोळे आपण उघडे ठेवावयाचे आणि रस्त्यानें चालावयाचें. प्रत्येक भिंत आपल्याला आकंठ ज्ञानामृत पाजीत असते.

पण महाराज, ज्ञानाच्या या पाणपोईतून ज्ञानप्राशन करताना जरा सावध मात्र राहा. नाहीं तर नेत्रसुखाचा आस्वाद घेतां घेता कायमचेच नेत्र मिटावयाची वेळ यावयाची.

# ६३.

## मज विफल गमे ग....

" मज विफल गमे ग जीवित माझे सखे "

असें एक निपुत्रिका, यशवतरावांच्या एका काव्यात हृदय पिळवटून म्हणते. तिच्या जीवनात उणीव असेल तर ती एवढीच कीं तिला आपल्या पोटच्या गोळ्याचे मुके घेण्याचें सौख्य व भाग्य लाभू शकत नाहीं. आपल्या मनाचे उमाळे प्रकट करतांना ती दुर्दैवी निपुत्रिका पुढें म्हणते—

मी शिवत बसू ग कुची झबलें कुणा
मी माझ्या मुखिचा घास भरवु ग कुणा
मुख बघुन कोणतें स्वर्गाहि मानू उणा
सुख किती जरी, उणीव ही परी मिळति न शिशुचे मुके

ही एक न भरून निघणारी उणीव आहे, हें एक न सोसवण्याजोगें दुर्भाग्य आहे यांत काय संशय ! दैनंदिन जीवनात सारा दिवस भिरिभिरि हिंडत कामाचे डोंगर उपशीत घालवितांना या दुर्भाग्याचा विसर पडत असेल कदाचित्. पण सध्याकाळच्या कातरवेळीं जेव्हा मन आधींच खिन्न झालेलें असतें, तेव्हा कोणाचे तरी चिमणे बोल ऐकण्यासाठीं जिवाला ओढ लागल्याशिवाय कशी राहील ? त्या ओढीमुळेंच संध्याछायांची हृदयाला वाटणारी भीति नाहींशी होऊ शकते.

मला कळत नाहीं कीं ही ओढ फक्त पोटच्या गोळ्यासाठींच लागत असेल काय ? कदाचित् पोटच्या गोळ्यासाठीं लागणारी ओढ अनिवार असेल. पण दुर्दैवानें मातृत्वाला वंचित झालेल्या स्त्रीला एखाद्या अनाथ अर्भकाचें लागतें लागणारच नाहीं का ? कां लागू नये ? मला माहीत आहे सुप्रसिद्ध अमेरिकन लेखिका पर्ल बक हिनें अशा अनाथ अर्भकांचा सांभाळ करून कित्येक निपुत्रिक कुटुंबाच्या जीवनात नवें चैतन्य आणलें आहे. कित्येक अर्भकांना मातापित्यांच्या वात्सल्याचा लाभ करून दिला आहे.

मानवी मन हें " माझें माझें " म्हणण्यासाठीं आसुसलेलें असतें. मातृत्वाची ओढ ही एक नैसर्गिक प्रेरणा खरी. पण त्यातहि कोणासाठीं तरी जगावें, राबावें, कोणाकडून तरी निर्व्याज प्रेमाची अपेक्षा करावी, हीहि भावना असतेच. या क्षणभंगुर विश्वात सर्वांच्याच सर्व आकांक्षा थोड्याच साध्य होतात ! मातृत्वाची आकांक्षा हीहि कोठें असाध्य राहते. पण मातेचें प्रेम बहाल करणें याला तर प्रतिबंध घातला गेलेला नाहीं ना ? मग ती प्रेमाची पाखर दुसऱ्या एखाद्या अर्भकावर मातेच्या ओढीनें घातली तर ? तर काय ! आपलें जीवित विफळ झाल्याची टोचणी मनाला लावून घेण्याचें कारणच पडणार नाहीं.

# ६४.

## पितृभूमीशीं निष्ठा

लंडनमध्यें कॉ. डांगे बोलले असें वर्तमानपत्रातून जाहीर झालें आहे. ते जें काहीं बोलले त्यावर टीकेची झोड उठली आहे. कां ? तर म्हणे त्यांनीं चीन व भारत यांना एकाच मापानें मोजलें.

आतां जरा विचार करा आणि मग डांगे याना दोष द्या. डांगे हे कम्युनिस्ट आहेत हें तुम्हाला माहीत आहे ना ? मग चीन व भारत यांना ते एकाच मापानें न मोजतील तर काय करतील ! अहो, देश आणि धर्म हीं सारीं धनिक वर्गानें आपलें शोषण अबाधित ठेवण्यासाठीं निर्माण केलेलीं खुळें आहेत. मार्क्सवादी हे भेदभाव जाणीत नाहींत. म्हणून मार्क्सनें घोषणा केली, "जगातील कामगारांनो, एक व्हा." कॉ. डांगे तरी दुसरी काय घोषणा देऊ शकतात ? ते म्हणतात चिनी आणि भारतीय लोकांनीं एकजूट करावी म्हणजे मग सीमासंघर्षच उरणार नाही.

तुम्ही म्हणाल, ही तर चीनवादी रणदिव्यांची भूमिका. मग ? त्यात काय झालें ! अहो, डांगे आणि रणदिवे याच्यांत भेद आहे थोडाच ! तुम्ही आपला मानलात. तुम्हाला वाटलें एक राष्ट्रवादी तर दुसरा राष्ट्रद्रोही. कां उगाच अन्याय करतां बिचाऱ्या डांगे याच्यावर ? खरें सांगू का तुम्हांला ? सच्च्या दिलाचा, जातिवंत, निष्ठावंत, असा जो कम्युनिस्ट आहे त्याला राष्ट्रवादी म्हणून प्रशस्तिपत्र देणें ही त्याची कमालीची विटंबना आहे. हें प्रशस्तिपत्र नव्हे. त्यापेक्षा तापलेली सळई त्याच्या कानात घातली तरी त्याला अधिक सुसह्य वाटेल.

तुम्ही मार्क्स आणि लेनिन वाचला नाहींत. म्हणून तुम्ही कॉ. डांगे याच्या मनोवेदना समजू शकत नाहीं. अहो, लेनिननें म्हटलें आहे कीं देशभक्तिपर युद्ध पेटले तर कम्युनिस्टांनीं आपल्या देशाची बाजू दुबळी करावयाचा प्रयत्न करावा. तरच ते क्रांतिकारक कम्युनिस्ट होतात. रणदिवे तेंच करीत होते; प्रत्यक्षपणें. डांगेहि तेच करीत होते अप्रत्यक्षपणें पण तुम्ही गैरसमज करून घेतलात आणि डांगे यांना देशभक्त केलेंत.

त्याचा परिणाम काय झाला माहीत आहे ? क्रुश्चेव्ह यानीं त्याची कानउघाडणी केली. ब्रिटिश कम्युनिस्टांनीं त्याचे कान पिळले. बिचारे डांगे ! देशामध्यें ते देशभक्त राहिले नाहींत आणि पितृभूमीचे ते द्रोही ठरले. देशाची त्याना फिकीर नाहीं. पण पितृभूमीशीं द्रोह ?

कॉ. डांगे ही नामुष्की कशी सहन करू शकतील ? म्हणून त्यांनीं लंडनमध्यें टोपी फिरवली आणि चीन व भारत यांना एका मापानें मोजलें. मातृभूमीशीं त्यानीं त्या दृष्टीनें द्रोह केला. पण कम्युनिस्ट विचारप्रणालीशीं ते एकनिष्ठ राहिले. रणदिवे यांच्या पंथाचा केवढा हा विजय नाहीं का ?

६५.

## नवें आव्हान

हें एक नवीन आव्हान आहे–तुमच्या कर्तृत्वशक्तीला, तुमच्या कलात्मकतेला. आता परदेशी मद्याची आयातच बंद होणार आहे. म्हणजे ? म्हणजे काय, ती स्कॉचची सुवर्णकांति तुम्हांला पाहावयालासुद्धां मिळणार नाही. तें रूप, तो रंग, तें तेज आणि ती चमक–जी पाहऱ्या शुभ्र ग्लासातून प्रगट होते. आणि जिचें प्रतिबिंब नव्हे, जिच्या प्रत्यक्ष रंगछटा तुमच्या डोळ्यातहि चकाकू लागत असत–तें सारें आता १९६२ पूर्वीच्या युगात नामशेष होणार आहे.

खिस्ताच्या जन्मदिवशींच ही घोषणा व्हावी ना ! पण असे खिन्न होऊ नका. मी म्हणतों, हें आव्हान आहे तुम्हाला, तुमच्या कर्तृत्वशक्तीला, तुमच्या कलात्मकतेला. आयात बंद झाली म्हणून काय झालें ? स्मृति तर तुमच्या अंतरंगात खेळते आहे ना ! त्या रंगाचें चित्र तर तुमच्या डोळ्यां-समोर तरळतें आहे ना ! मग भारताच्या या आडव्या, उभ्या विस्तारांत जीं सत्त्वें आहेत, ज्या रंगछटा आहेत, जी उन्मादकारी सौंदर्यदृश्यें आहेत त्यांचा मिलाफ घडवून आणून स्कॉचच्या सुवर्णकांतीला लाजविणारें एक पेय तुम्ही कां निर्माण करू शकत नाहीं ? मी आव्हान म्हणतों तें हें.

प्राचीन देश आहे आपला. सुसंस्कृत, उन्नत तसाच समृद्ध. आपल्या पूर्वजानीं पराक्रम गाजविला, तसाच विलासहि भोगला. त्याच्या खाणाखुणा ठायीं ठायीं मंदिरांतून, राजप्रासादातून, लेण्यातून आणि स्तूपांवर आढळून येतात. आपण अहिंसक नव्हतों व अनासक्तहि नव्हतों. खूप आसक्तीनें आपण राज्येंहि केलीं आणि राजसदृश सुखेंहि भोगलीं. म्हणून तर म्हटलें जात असे कीं आपल्या देशांतून सोन्याचा धूर निघत असे.

आता सोनें महाग झालें. तर सुवर्णकांतीवरच आपण आपली लालसा कां भागवू नये ? पण येथें आसक्तीचा दिल पाहिजे, रसिकतेची चूष पाहिजे. अहो, तुम्ही असें मुळींच समजू नका, आसक्ति हें पाप आहे; आसक्तीचा अतिरेक हें पाप आहे. सामान्यतः माणसें अतिरेकाकडे वळत नाहींत पण अनासक्ति हीहि सामान्यतः माणसाना पटत नाहीं. सुवर्णमध्य हा परदेशी स्कॉच व देशी हातभट्टी यांच्यामध्यें कोठेतरी आहे.

म्हणूनच म्हणतों, हें आव्हान आहे तुम्हाला; त्याचा स्वीकार करा.

# ६६.

## येशिल कधिं परतून ?

" मेनन येतील का हो पुन्हां मंत्रिमंडळात ? " लोक विचारत होते आपल्या मनांत. पंडित-जींनीं त्यांच्या मनचा प्रश्नच सोडविला आहे. ते म्हणाले, " येतील कीं; पण सध्या नाहीं. " दिल्लीच्या राज्यकारभाराची ज्यांना कल्पना आहे त्याना यांत आश्चर्य वाटणार नाहीं. कारण तेथें मंत्रिमंडळातून लोक बाहेर पडतात ते पुनरागमन करण्यासाठींच !

पंडितजी परवा फार खुल्या दिलानें बोलले. पण केवढें सत्य त्यांनीं सांगितलें. अहो, चार दोन रेल्वे अपघात होतात. त्यात माणसें मरतात, जखमी होतात. लोकक्षोभ होतो. मग कोणावर तरी खापर नको का फोडावयाला ? बहुश: खालच्या पातळीवरील कर्मचारी किंवा फारच हांकाटी झाली तर एखादा बडा अधिकारी या कामीं उपयोगी पडतो. पण अगदीं लोकांच्या डोळ्यांतून क्रोधाचे अंगारच निघू लागले तर मग एखाद्या मंत्र्याची आहुति द्यावी लागते. म्हणजे नुसती नावापुरती. त्याच वेळीं त्याला कानमंत्र मात्र देण्यांत येतो, " बाबा, हा विरह थोड्या दिवसाचा आहे. " तो विरह फारसा टिकतहि नाही.

हेंच पाहा ना ! एवढें मोठें मुदडा प्रकरण झालें. लक्षावधि रुपयांचा व्यवहार, गैरवापर झाला. केवढी तरी जाहीर चौकशी झाली. अगदीं ताशेवाजंत्री व चौघडे लावून लग्न लावावें तसें कर्णे लावून ईश्वरसाक्ष शपथा व लोकसाक्ष सवाल, जबाब झाले. सरकारी अधिकाऱ्यांचा नांवलौकिक गेला. एका मंत्र्याचाहि बळी पडला. पण त्याच वेळीं त्याची समजूत करण्यांत आली, " बाबा, येशील की तू परत, सध्या नाहीं एवढेंच. " तो सध्या निघून गेला आणि मंत्रिमहाशय परत आले.

मेनन याच्या बाबतींत तरी अपवाद का व्हावा ? आपल्या देशात लोक भारी ओरड करतात. रेल्वेचा अपघात झाला, पैशाची अफरातफर झाली. तसाच युद्धांत पराभव झाला. पण लोकांनीं अगदीं काहूर उठविलें. मग आतां काय करणार ? कोणाला तरी बळी द्यायलाच पाहिजे ना ? घ्या बाबानो हा राजीनामा. पण राजीनामा थोड्याच दिवसाचा. जरा दिवस उलटू द्या. मग आपोआप मेनन परत येतील. त्यात तुम्हांला आश्चर्य कसलें वाटतें ? " पुनरागमनाय " हाच अशा निर्वाणाच्या वेळीं आशीर्वाद देण्यात येतो बरें !

त्याला एकच अपवाद झाला. तो तेवढा चिंतामणराव देशमुख याच्या बाबतींत. तेच तेवढे एक मंत्री कीं, ज्यांच्या बाबतींत म्हणतां येईल. " And one did not come back ".

पण त्या अपवादानेंच नियम सिद्ध होत नाहीं काय ?

## ६७.

# नादस्वरम्

हे केळ्याचे घड पाहिलेत तुम्हीं ? अहो ही केळ फळभारानीं नुसती लवली आहे. पण जरा थांबा. हे सूर ऐका ! ती पहा, ती वाकलेली केळ कशी ताठ झाली. आता फक्त तिचा शेंडा तेवढा डोलत आहे. होय ! तुमचें म्हणणें बरोबर आहे. ही पानांची सळसळ नव्हे. नीट लक्षपूर्वक ऐकलेंत तर तुम्हांला कळून येईल, ही केळ मंद, अर्धस्फुट आवाजात भाव व्यक्त करीत आहे. " वाहवा, वाहवा, वहोत खाशी. "

हा सारा सुरांचा प्रभाव आहे बरें. नादस्वरमच्या मंजुळ सुराचा. केळीच्या बनात हे कर्णे आम्ही बसविले आणि काय सांगू तुम्हाला ? मंगलप्रभातीं नुसती सुरावट खुलली आणि वाऱ्याची झुळूक नसतानासुद्धा पानें हलू लागली, केळींचा शेंडा डोलू लागला. हीच ती केळ, जी सुकत चालली होती, निष्पर्ण, आणि निष्फळ होत होती. पण सुरानीं तिच्यामध्ये चैतन्य निर्माण केलें. आज पाहा ही सारीं केळफुलें डवरून बाहेर आलीं आहेत. थोड्याच दिवसांत पिवळे धमक केळ्याचे घड त्यांतून बाहेर येतील.

ही सारी किमया घडविली ती सुरानीं. आता आजूबाजूचीं शेतें आणि वाड्या कर्ण्यानीं फुलून जातील आणि सुरानीं भारून जातील. अन्नधान्याची, फळाफुलाची, आतां टंचाई कशाला ? भात आणि गहू आणि हरभरा, पालेभाज्या आणि फळभाज्या सारें आतां आपल्या दिमतीला उभें राहील. बस्स. एकच कार्यक्रम तेवढा अमलात आणावयाला पाहिजे—नादस्वरम् आणि कर्णे याची योजना.

या नवीन शोधावर आपण संतुष्ट मात्र राहणार नाहीं. संशोधकाना हें एक आव्हान आहे. अन्न पिकवा ही घोषणा पुरेशी नाहीं. कर्णे पिकवण्याची आज वेळ आली आहे. भारताच्या सुजलाम्, सुफलाम् भूमीवर नुसती सुरावट खुलू द्या आणि धान्याच्या ह्या नुसत्या राशी पडतील तुमच्या समोर !

पण जपा बरें, वृक्षलतांच्या भावनांचा नीट विचार करा. त्यांना तंतुवाद्ये हवींत कीं मानवी स्वर हवेत, त्याना शास्त्रोक्त संगीत हवें कीं, हलकीफुलकी गीतें हवींत याचाहि आपल्याला शोध घेतलाच पाहिजे. कोणीं सागावें, आज लताच्या आवाजानें सारी मानवसृष्टि मोहरून जाते. कदाचित् उद्या केळी आणि कर्दळीच्या बनातील आणि जोधळा आणि हरभऱ्याच्या शेतातील वनस्पति-सृष्टीहि त्या आवाजानें बहरून येईल. पण का हो, या वनस्पतिसृष्टीलाहि रॉक ॲन्ड रोलच आवडलें तर ? तर काय, इना, मिना, डिकाबरोबर साऱ्या वृक्षलता नाचायला लागतील आणि मग केळ्यांचे घड आणि जोंधळ्यांचीं कणसें पिकण्यापूर्वीच पायदळीं पडण्याचाहि संभव आहे. असू द्या म्हणा. जीवसृष्टीबरोबर वनस्पतिसृष्टीचाहि रॉक ॲन्ड रोल करावयाचें नियतीनें ठरविलें असलें तर त्याला कोण प्रतिबंध घालू शकेल ?

६८.

## सरदार स्वर्णसिंह

सरदार स्वर्णसिंह हे असे एक केंद्रीय मंत्री आहेत कीं ज्यांच्याबद्दल कधीं वाद माजला नाहीं, वावड्या उडविल्या गल्या नाहीत आणि ज्यांना राजमान्यता वा लोकमान्यता या दोन्ही बाबतींत कधीं उतार दिसला नाहीं. त्याचें एक कारण असें आहे कीं ते स्वतः गटबाजीपासून अलिप्त राहिले आणि नेत्यांचें वा लोकांचेंहि अनुराधन करण्यात त्यांनीं कधी आपल्या कामाचा वेळ खर्च केला नाहीं.

तसे ते पंजाबचे प्रतिनिधि. साहजिकच हिंदु व शीख यांच्यामधील भाषेच्या प्रश्नावरील तेढ, प्रादेशिक कॉंग्रेसमधील सत्तास्पर्धा, शीख समाजातील अकाली व इतर यांच्यामधील फरक, अकाली दलांतीलहि दोन वा अधिक तट या प्रश्नांची झळ त्यांना लागण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. पण त्यांनीं पंजाबच्या सत्तास्पर्धेत कधीं भागच घेतला नाहीं. प्रतापसिंह कायरों व दरबारसिंह यांचीं कॉंग्रेसमधील भांडणें आणि तारासिंह व फत्तेसिंह यांची अकाली दलातील भांडणें हीं त्यांनीं फक्त दुरून पाहिलीं व दिल्लींतील आपल्या आसनावर बसून त्यांनीं अधूनमधून मध्यस्थी करण्याचा तेवढा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं सर्वच युद्धमान गट व शक्ति त्यांच्याकडे सल्लामसलतीसाठीं येत राहिल्या आणि त्यांच्या निःपक्षपातीपणाचा वरिष्ठ गोटात बोलबाला झाला.

सरदार स्वर्णसिंह हे एक नामांकित वकील आहेत. म्हणून बोलण्यात ते पटाईत. पण त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे चर्चेत वा वादात ते कधीं अधीर होत नाहींत. शांतपणानें व विलक्षण आत्मविश्वासानें ते आपली बाजू मांडतात त्यांचा हा धीमा स्वभाव त्यांना पार्लमेंटांत उपयोगी पडतो. तो त्यांना पाकिस्तानशीं झालेल्या सीमाप्रश्नाबद्दलच्या वाटाघाटींत उपयोगी पडला. पाकिस्तानशीं सुरू झालेल्या आजच्या वाटाघाटींत त्यांच्याकडे नेतृत्व देण्यात आलें आहे तें त्यामुळें.

दिल्लीमध्यें सरदार स्वर्णसिंह यांची ख्याति आहे ती कार्यक्षमतेबद्दल. कमींत कमी उद्घाटनें करणारे, कमींत कमी जाहीर व्याख्यानें देणारे व जास्तींत जास्त वेळ कचेरींत काढणारे मंत्री म्हणून सरदार स्वर्णसिंह यांचें नाव घेतलें जातें. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या गाभ्यांत असूनहि जरा वेगळे वाटणारे, नेहरूंच्या फारसे जवळ जात नसूनहि त्यांच्या विश्वासांत असणारे आणि म्हणून ज्यांचें स्थान मंत्रिमंडळांत निर्विवाद राहिलेलें आहे असे सरदार स्वर्णसिंह हे केंद्रीय मंत्रिमंडळांतील एकच मंत्री आहेत.

त्यांचा दृष्टिकोण मात्र थोडासा अलिप्तपणाचाच आहे. आपलें कार्य केलें; आतां फळ दैवाधीन या वृत्तीनेंच ते काम करतात, वागतात. म्हणून नितांत समाधान त्यांच्या मुद्रेवर तरळत असलेलें दिसतें.

# ६१.

## १९६३

नवें वर्ष बघतां बघता उगवलें. १९६२ केव्हां गेलें तें कळलेंसुद्धां नाही. तसेंच याहि वर्षाचें होणार आहे. कॅलेंडरचीं पानें एकामागून एक उलटतात. रोजनिशीवर कांहीं तरी नोंद होण्याच्या आतच तींहि पानें इतिहासजमा होतात. उरतात त्या आपण केलेल्या अपेक्षाच्या आठवणी. कांहीं सफल होतात, काहीं विफल. तसेंच आपले निर्धार. पण मानवी मन योजना आंखीत राहतें, त्यासाठीं निर्धार करतें, आणि आशेनें व अपेक्षेनें प्रत्येक दिवसाकडे पाहतें.

आज नव्या कॅलेंडरचें उद्‌घाटन करतांना तुमच्या मनात हीच आशा आणि अपेक्षा जागृत झाली आहे ना ? हीं पाहा आपल्यासमोरील कॅलेंडरें. राष्ट्रपिता आणि राष्ट्रपुरुष जणु आवाहन करण्यासाठींच आपल्यापुढे उभे आहेत. त्याचें पुण्यस्मरण करण्याची त्यांच्या दर्शनानेंच स्फूर्ति मिळते. आणि हा पाहा एक सुंदर देखावा; आपल्या निसर्गप्रेमाला प्रेरणा देणारा. आणि ही सौंदर्य-देवता; आपल्या कलाप्रेमाची अधिष्ठात्री ! चकचकीत गुळगुळीत कागदावरील हीं कॅलेंडरें आहेत. आज तीं डोळ्याना सुख देत आहेत ना ! बस्स. उद्यां चुरगळू द्या. आजच्या दिवशीं उद्याचा विचार कशाला ?

तशीच ही रोजनिशी. आज पहिल्या पानावर सुरेख, वळणदार अक्षरात आपण नवे संकल्प लिहू या आणि नव्या योजना, नव्या कल्पना, नवें अंदाजपत्रकहि—जें रोजनिशींतील पानाप्रमाणेंच चुरगळून जाणार आहे. पण आजचा पहिला दिवस आहे. आज डावीकडील फक्त प्राप्तीची रक्कम लिहावयाची आहे. ती रुपयात आणि नया पैशातहि लिहूं या. पुढें सारा व्यवहार नया पैशाचाच होणार आहे आणि उधारीचे व्यवहार चालू होणार असल्यामुळें बहुतेक पानें कोरींच राहावयाचीं आहेत. अंदाज आणि हिशेब ! आपल्या युद्धतयारीप्रमाणेंच ते कोसळावयाचे आहेत. चिनी चढाई-प्रमाणें परिस्थिति आपल्याला धुळीस मिळविणारच आहे. आणि लक्षात ठेवा येथें युद्धविराम नाहीं, तयारीसाठींहि अवसर नाहीं. म्हणून रस्तोरस्तींच्या भिंतींवर जें ध्येयवाक्य लिहिलें आहे " नो सीझ् स्ट्रगल " तेंच आपल्या रोजनिशीच्या पहिल्या पानावर दुहेरी अक्षरात लिहून ठेवा.

तो लढा व्यक्तिजीवनातील असेल. पण आपण एकटे थोडेच आहोंत. सारा समाज, त्यांतील अगणित व्यक्ति आपल्याबरोबर आहेत. म्हणून एकाकीपणाची भावना येऊं देऊं नका आणि निराश तर मुळींच होऊं नका. ख्रिस्तजन्मानतर १९६२ वर्षे एकामागून एक गेलीं. आपण तर त्याच्यापेक्षां दुप्पट तिप्पट वर्षें इतिहासजमा केली आहेत. भारतवर्षाचा हा पुरातन आत्मा आपल्याला धीर देत असताना नव्या वर्षाकडे आशंकेनें, भीतीनें आपण कां पाहावें ?

चला कोंबडा आरवला. सूर्याचे कोंवळे किरण अंधारांतून वाट काढू लागले. पाखरांची किलबिल सुरू झाली नव्या वर्षाचा नवा दिवस उगवत आहे. उद्यांचा विचार न करतां आपण या नव्या वर्षाचें स्वागत करू या.

## १०.

# माझिया माहेरा जा

कृष्णा आणि गोदावरी या माझ्या मुली आहेत असें स. का. पाटील यांनीं हैद्राबादमधील एका भाषणात सांगितलें. त्यांच्या म्हणजे महाराष्ट्राच्या मुली. या मुली वयांत आल्यानंतर त्यांचा रीतसर विवाह झाला, आणि आज त्या आंध्र प्रदेशासारख्या सासरीं सुस्थळीं पडल्या आहेत याबद्दल मला आनंद होत आहे, असेंहि पाटील म्हणाले.

महाराष्ट्राच्या लेकींना गृहशिक्षण इतकें चांगलें दिलेलें असतें कीं त्या सासरच्या जीवनाशींच समरस होतात व मुलबाळांनीं भरलेलें व धनधान्यानें समृद्ध झालेलें सासर पाहणें हेंच त्यांच्या जीवनाचें सार्थक होतें. कृष्णा आणि गोदावरी या दोन्ही नद्यांचा उगम महाराष्ट्राच्या सह्याद्रींत झाला. बालपण इथें गेलें. साहजिकच अवखळपणानें बालक्रीडा करताना त्यानीं कडेकपाऱ्यांवरून उड्या घेतल्या, डोंगरमाळ तुडविले आणि डोंगरपठारावरील गोटे आणि माती ओढून आणतांना खरचटल्या गेलेल्या शरीरांचीहि कधीं फिकीर केली नाही. कृष्णेच्या आणि गोदावरीच्या या बाळ-लीला महाराष्ट्रानें कौतुकानें पाहिल्या आणि पित्याच्या वत्सलतेनें त्यांच्यावर मायेची पाखर तेवढी घातली. पित्याच्या त्यागवृत्तीनें कधी त्यांच्यापासून अपेक्षा म्हणून केली नाहीं.

महाराष्ट्राला कौतुक एवढेंच कीं, या लेकी ज्या घरात पडल्या त्या घराचें वैभव त्यानीं वाढविलें, शालीन व शांत पुरंध्रीप्रमाणें त्या घराला डौल त्यानीं आणला. कृष्णेनें आणि गोदावरीनें एकदा विवाह झाल्यानंतर कधीं मागें पाऊल घेतलें नाहीं. आपल्या संसाराची जबाबदारी नीट रीतीनें पार पाडल्यानंतर आपल्या पतीच्या साक्षीनेंच त्या सागराच्या पाण्यांत एकरूप झाल्या. सासरचें ऋण त्यानीं पुरेपूर फेडलें हेंच त्यांचें समृद्ध पण विशाल जीवन साक्ष देत आहे.

पण सासरच्या जीवनाशी समरस झालेल्या मुलीचा माहेरचा ओढा थोडाच कमी होतो ! नाहीं बरें. " माझिया माहेरा जा " अशा काव्यपक्ती कानीं पडतांच सासरच्या सुखानें सुखावलेल्या मुलींचेहि डोळे पाण्यानें भरतात. कृष्णा आणि गोदावरी या नियमाला कशा अपवाद ठरतील ? आंध्रदेशीय पतीनें त्यांच्या मनींचें हितगुज कधीं ऐकलें तर शांतपणे, दुथडी वाहणाऱ्या त्यांच्या जीवनात हीच एक उणीव बोचत असलेली त्याला दिसून येईल कीं, माझ्या पतीसाठीं मीं जीवन समर्पित केलें आणि माझें सासर समृद्ध केलें, पण माझ्या गरीब पित्याच्या संसाराला थोडासा हातभार मीं लावू शकणार नाहीं का ? "

कृष्णेची आणि गोदावरीची ही हृदयव्यथा आंध्रदेशीय पतीला कधीं कळेल काय ?

## ७१.

# मृदूनि कुसुमादपि

काय देश पेटला आहे म्हणून सांगू ! हें छायाचित्र पाहिलेंत का ? रामेश्वरमच्या या महिला बदूक चालविण्याचें शिक्षण घेत आहेत. "बर्फाचे तट पेटुनि उठले" त्याची आग आसेतुहिमाचल भडकल्याची ही चिन्हें नव्हेत काय ?

भारतीय एकात्मतेचें हें दर्शन कोणाला स्फूर्तिदायक वाटणार नाहीं ? एकात्मता अशी कीं शत्रु हिमालयावरून खालीं उतरला आणि रामेश्वरमच्या महिला शस्त्रसज्ज झाल्या. महिला ! जवानाना शस्त्राची वाण पडू देत, नॅशनल कॅडेट कोअरचीं शिबिरें बचतीसाठीं स्थगित होऊं देत, आसामच्या सीमारेषेवरील लोकांचें लष्करी शिक्षण मागें पडू देत, पण दिल्ली, मुंबई आणि मद्रास येथील महिलांची लष्करी शिक्षण घेण्याची आकांक्षा अपुरी राहून कसें बरें चालेल ? भारतीय एकात्मता ही प्रत्यक्ष संरक्षणापेक्षांहि अधिक महत्त्वाची आहे. आपल्या शत्रूला हें कळलें पाहिजे कीं सारा देश या आक्रमणानें खडबडून उठला आणि त्याचा प्रतिकार करण्यासाठीं कुसुमाप्रमाणें मृदु असणाऱ्या महिलांनीहि आपलें हृदय वज्राप्रमाणें कठोर केलें.

खरेंच का त्यांनीं आपलें हृदय कठोर केलें आहे ? या छायाचित्रांत तर तसें दिसत नाहीं. ही पाहा या नाजुक हाताना ही बदूक पेलवतहि नाहीं आणि हा या तन्वगीच्या मुद्रेवरील भाव पाहिलात का ? भ्रमराकडून पाठलाग केल्या जाणाऱ्या भीतिग्रस्त शकुंतलेचा भावच तिच्या मुद्रेवर तरळत आहे आणि दुसराहि भाव–त्या भ्रमरापासून तिला अभय देणाऱ्या दुष्यताच्या दर्शनानें प्रगट होणारा–सकोची लज्जेचा भाव.

बिचारी ! संरक्षणासाठीं सज्ज झाली आहे. पण तिचें संरक्षण करू शकणाऱ्या आधुनिक दुष्यंताला भ्रमर झाडून टाकावयाचे नाहींत. त्याला एका निर्घृण शत्रूशीं सामना द्यावयाचा आहे. पण त्यासाठीं त्याच्याजवळ शस्त्र नसलें तर ?

नसेना. भारतीय संरक्षणक्षमतेचें प्रतीक म्हणून महिलांच्या हातीं बदुका असल्या तरी सध्या पुरे. जेव्हां लढाईची वेळ येईल तेव्हां पाहू. सध्यां लोकांचा उत्साह जागृत करण्यासाठीं हें छाया-चित्र निघत आहे ना ! बस्स. संरक्षणक्षमता व कलात्मकता या दोहोंचा मनोहर मिलाफ तर जगाला पाहूं द्या.

## ७३.

# या इथें तरुतळीं

अन्नमंत्री श्री. पाटील यांच्या काहीं सुखद तशाच रसिक स्मृति त्या दिवशीं चाळवल्या गेल्या होत्या कीं काय कोण जाणे ! पण ताडी व मासे हीं केरळच्या समृद्धतेचीं प्रतीकें होऊं शकतील असें जेव्हा त्यांनी म्हटलें तेव्हा मला, " लाटा आपटता उठे ध्वनि शिरे तो ज्याचिया कदरीं " ही लहानपणीं पाठ केलेली काव्यपंक्ति मात्र तत्काळ आठवली आणि त्याच वेळीं क्षणार्धांत कोचीन बंदरासमोरचा भव्य सागर माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. कोचीन आणि केरळ, अथांग जल आणि हिरवीगार वनश्री, टुमदार घरें आणि उंच माड यांचा असा कांहीं प्रभाव माझ्या मनावर झाला आहे कीं ताडी आणि मासळी यांचा नुसता उल्लेख झाला तरी केरळच्या बागाच तेवढ्या माझ्या दृष्टीसमोर तरळून जातात.

त्या बागांत, दाटीवाटीनें आकाशाशीं स्पर्धा करूं पाहणाऱ्या माडाच्या झाडाखाली बसल्यानंतर वर दृष्टि जाते न जाते तोंच एक संवेदना मनांत जागृत होते. ती संवेदना म्हणजे ताज्या, गोडगोड ताडीच्या सेवनाची. इतकें स्वच्छ, इतकें चवदार आणि इतकें निर्दोष पेय जगांत दुसरें कोणतेंच नसेल. पण हें पेय असतें. आणि त्यांत पौष्टिकता मात्र असते अन्नाची. कोणी या ताडीला मद्य मानलें असेल कोण जाणे ! कदाचित् जीवनाच्या साऱ्या सुखाबरोबरच स्वादिष्ट खाद्यपेयाचाहि त्याग करण्याइतका कडवटपणा ज्यांच्या अंगीं भिनला असेल त्यांनींच या पेयाला विष मानून सामान्यांतील सामान्य लोकांनाहि दुहेरी रीतीनें अन्नाला वंचित केलें असावें.

नाहीं तर,

" या इथें तरुतळीं एक वही कवितेची,
भाकरी एक अन् सुरई एक सुरेची,
आणखी एक तू जवळ गात विजनीं,
अन् हें न रान मग, नन्दनवन तें हेंचि "

या उमरखय्यामच्या अमर काव्यपंक्तींचा आस्वाद ज्या हिरव्यागार बागांत घ्यावयाचा तेथें ताडीलाच बंदी घालण्याची अरसिकता का दाखविली गेली असती ? केरळ हें तर उजाड माळरानहि नव्हे. खरोखर तेथील तरुतळीं, समुद्राच्या लाटांचा धीर-गंभीर आवाज आणि वाऱ्यानें डुलणाऱ्या उंच उंच माडाच्या झावळ्यांची सळसळ ऐकत ताडीचा पांढरा शुभ्र प्याला घ्यावयाचें आणि त्याच्याबरोबर तळलेले काजूचे गर आणि मासे खावयाचें सुख मिळालें तर एखादा काव्यात्मा शाहेनशाह शहाजहां यांनीं दिवाण-इ-आमवर कोरलेला शिलालेख उध्दृत करीत म्हणेल " गर फिरदौस बर रूए जमीनस्त । हमीनस्तो हमीनस्तो हमीनस्त " ( या पृथ्वीतलावर कोठें नंदनवन असेल, तर तें येथें, येथें; येथें. )

## १३.

# जिद्द खरी !

हिंदु महासभेच्या गोटात जर एक आधुनिक मन असेल तर ते वि. घ. देशपांडे हेंच होय. त्यांचें शरीर आपल्या संघटनेसारखेंच दुबळें झालेलें आहे. पण मनाची जिद्द आणि रंगेलपणा! तो विदर्भाच्या मातीचा गुण आहे म्हणा किंवा स्वतः देशपांडे यांच्या लढाऊ, अजिंक्य वृत्तीचा परिपाक आहे म्हणा. देशपांडे हे मनानें कधीं खचलेच नाहीत—संघटनेचा दुबळेपणा डोळ्यासमोर दिसत असतांना, स्वत:चा निवडणुकींत पराभव झाला असताना किंवा व्याधींनीं शरीर पोखरून निघालेलें असतानाहि.

त्यांच्या संघटनेंतील सहकाऱ्यांत बहुश: अभावानें प्रगट होणारी विनोदबुद्धि ही त्यांच्या मनांच्या निर्धारासारखीच त्यांची सोबतीण आहे. त्या विनोदबुद्धीनें ते जगाकडे आणि आपल्या स्वतःकडेहि पाहतात. साहजिकच त्यांना निराशेचा झटका बसत नाहीं. तसेंच ते आशेनेंहि हुरळून जात नाहीत.संसदेमध्यें ते निवडून आले होते त्या वेळीं साधारणपणें ते एकटेच आपल्या पक्षाचे प्रतिनिधि असत. पण त्यांचा आवाज असा खणखणून उठे कीं, सभागृहाला त्याची दखल घ्यावीच लागे. शिवाय त्यांचें बोलणें धारदार असूनहि मुद्देसूद. प्रतिपक्षावर कडाडून हल्ला चढवितानाहि ते कधीं पातळी सोडावयाचे नाहींत. म्हणून त्यांच्या कडक भाषणात विखार आढळून यावयाचा नाहीं, त्यांच्या उपरोधामुळें जखम व्हावयाची नाहीं.

त्यांचा खरा उपरोध मात्र सभागृहाच्या बाहेर खाजगी संभाषणात प्रगट होत असे. देशपांडे यांनीं आधुनिक राजकीय विचारप्रणालींचा व तत्त्वज्ञानांचा चांगला अभ्यास केला आहे. म्हणून काँग्रेसच्या समाजवादाचा उपहास करताना ते मार्क्सवादी शब्दप्रयोगाचा उपयोग करूनच आपल्या काँग्रेसवादी मित्रांना निरुत्तर करीत.

म्हणून त्यांच्या सहवासात बसून त्यांचा हास्यविनोद ऐकल्यानतर मात्र कधीं कधीं वाटत असे कीं, देशपांडे यांचें मन त्यांच्या संघटनेंत रमतें किंवा नाहीं कोण जाणे! वाटे, असें हें आधुनिक, चोखंदळ मन, हिंदुसभेसारख्या पुराणप्रिय, रम्य भूतकाळाच्या चिंतनात गुंगून गेलेल्या, संघटनेंत कसें गुंतून राहूं शकेल? पण देशपांडे यांच्या मनाची अढी अशी पक्की आहे कीं ते अट्टाहासानेंच त्या संघटनेंत कायम राहतील आणि आपल्या मनाचें समाधान करण्यासाठीं "हिंदु-समाजवादा" सारखें नवें रक्त त्या संघटनेच्या गोठलेल्या रक्तांत ओतण्याचा निष्फळ प्रयत्न ते करीत राहतील. कोणीं सांगावें! स्वतः देशपांडे हे आपल्या या उपक्रमाकडेहि विनोदबुद्धीनेंच पाहात असावे!

## १४.

# सिमेंटमधील वाळू

सिमेंटमध्यें म्हणे वाळू घातली ! मग त्यात काय झालें एवढें अस्वस्थ व्हावयाला ! अहो, इमारत बांधावयाची आहे ना. त्याचे घटक कोणते—पाया, भिंती आणि दारें-खिडक्या. आता या पायात दगड, सिमेंट आणि माती भरली आहे कीं आणखी कांहीं भरलें आहे याच्याशीं तुमचा संबध काय ? आर्किटेक्टानीं घराचा प्लॅन आंखला, इंजिनियरांनीं ती योजना हातीं घेतली आणि विटांवर विटा रचून भिंती कशा बांधाव्या, ठरलेल्या ठिकाणीं दारें खिडक्या कशा बसवाव्या, याचें दिग्दर्शन केलें. आतां प्रत्यक्ष अमलबजावणी करावयाची ती कॉन्ट्रॅक्टरानीं. त्यांनीं भिंती उभ्या केल्या, त्यावर मजले रचले, सारी इमारत उभी केली.

ही पाहा तुमच्यासमोर इमारत उभी आहे. बघून घ्या तिची शान, डोळे भरून तिचें रूप पाहा. तुमच्या डोळ्यांना सुख मिळालें ना ! बस्स. आतां त्या इमारतीची चीरफाड कशाला करता ? तुम्हांला सौंदर्यदृष्टि नाहीं हेंच खरें.

रूपयौवना स्त्री आहे. तिचे नाकडोळे कसे रेखीव आहेत, तिची कांति किती मुलायम आहे. पण तो एक जोनाथन स्विफ्ट नांवाचा इंग्रजी लेखक निघाला. भारी हुशार. पण दिवस्याची कवटी जणू उलटी लागलेली होती. तो म्हणतो काय ! म्हणे सुंदर स्त्रीची कांति सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहावी आणि मग .........

पाहा काय कपाळ ! त्यानें स्त्रीच्या सौंदर्याची पाहणी करण्याची ही शिफारस केली. तुम्ही इमारतीचें सौष्ठव पाहण्यासाठीं भिंती उकरून काढीत आहांत ! आणि म्हणत आहांत, सिमेंटमध्यें म्हणे वाळू घातली ! मग त्यात काय झालें एवढें अस्वस्थ व्हावयाला ?

मी तर म्हणतो चार दिवस जाऊ द्या. मग पावसाचा शिडकावा होईल आणि ज्या बंद भिंती आहेत ना, त्यात लहान लहान झरोके पडतील आणि मंजुळ वाऱ्याची झुळुक त्यांतून आत येईल. प्रकाशाचीं किरणें तुमच्या एकान्तांत डोकावतील.

आणि तुम्हाला सौंदर्यदृष्टि असेल, कलात्मकता असेल तर याच वाळूच्या भिंतींतून आधुनिक चित्रकलेचे कितीतरी मनोरम नमुने प्रगट झालेले तुम्हांला आढळतील आणि कंत्राटदाराच्या या देणगीबद्दल तुमच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रु चमकतील.

# ७५.

## ' आजि नवल वर्तलें '

तुमचा विश्वास बसत नाहीं ना ? पण ' अजि नवल वर्तलें ' हें आपण म्हणतों तें अशाच वेळीं. आचार्य विनोबा भावे माझ्यासमोर उभे राहिले तेव्हा क्षणभर माझाहि डोळ्यांवर विश्वास बसेना. अहो, पॅन्ट आणि बुशशर्ट घातला होता त्यांनीं आणि हाताच्या मुठी वळवून ते आव्हानपूर्वक म्हणत होते " ग्रामदान आणि चिनी कम्यून्स याची भूमिका समान आहे. " त्यांच्या तोंडून हे उद्‌गार बाहेर पडले आणि " हिंदी चिनी भाईभाई " या घोषणांनीं सारें वातावरण दुमदुमून गेलें. क्षणार्धात दुसरी आरोळी उठली " कॉम्रेड विनोबा भावे झिंदाबाद. "

मीं म्हटलें, मी स्वप्नात आहें कीं जागा ! होय, होय; मी जागाच होतो. अगदीं डोळे ताणताणून पाहत होतो. कशाकडे माहीत आहे ? आज मला जणू वेड लावावें असाच नियतीचा हेतु होता कीं काय कोण जाणें ! पण मी प्रत्यक्ष पाहिलें. आचार्य विनोबा भावे मान खालीं घातलेल्या, एका कार्यकर्त्याला आधार देत होते. तोंडानें ते म्हणत होते, " बाबा, असा लाज् नकोस, तुझें हें नवजीवन सुरू झालें आहे. माझ्यासारखेंच. घे, शपथ घे, अहिंसेची शपथ घे. उभा भारतवर्ष, नव्हे सारी शांतताप्रेमी दुनिया तुझ्या या मतपरिवर्तनाला प्रचंड उत्साहानें साथ देईल. "

" बोला, आचार्य भवानी सेन की जय " विनोबा भावे गर्जना करीत म्हणाले. मीं काय पाहिलें ? माझ्या डोळ्याना काय दिसलें ? कालचे कॉम्रेड भवानी सेन, आज लुंगी लावून अनवाणी, मान खालीं घालून उभे होते. डोक्यावरचे केसहि त्यांनीं काढून टाकले होते. पूर्वाश्रमींच्या सन्यस्त विनोबा भाव्यांच्या प्रमाणें ते दिसत होते आणि विनोबांचा वेदान्ती अवतार अंगात संचरल्याप्रमाणें ते म्हणत होते, " बंधूनो, आज आम्हाला अहिंसेची महति पटली आहे. आचार्यांशीं एक तासभर आम्ही चर्चा केली आणि आम्हांला कळून आलें, आमचा मार्ग चुकत होता. या जगांत एकच शाश्वत तत्त्व आहे आणि तें म्हणजे " अहिंसा परमो धर्मः " त्या अहिंसेचे पाईक म्हणूनच यापुढें आम्ही आमचा देह कारणीं लावू ".

मीं पुन्हा पाहिलें; आचार्य भवानी सेन याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. कॉम्रेड विनोबा भावे मात्र त्याच वेळीं मुठी वळवून ओरडत होते, " ग्रामदान झिंदाबाद; चिनी कम्यून्स झिंदाबाद. "

## १६.

## तुमच्या आरोग्यासाठीं !

अरे, असे तीन नये पैसे बसच्या भाड्यात वाढणार म्हणून तुम्ही अस्वस्थ होतां ! नाहीं बरें. जरा विचार करा म्हणजे तुम्हांला कळून येईल कीं ही भाववाढ तुमच्याच कल्याणासाठीं आहे. हे तीन नये पैसे वाढले नाहींत, सात नये पैसे वाचले आहेत आणि शिवाय वाढणार आहे तें तुमचें आरोग्य.

कल्पना करा तुम्ही किती पोशाखी बनला आहात त्याची आणि आरोग्याबद्दल किती निष्काळजी बनला आहात त्याचीहि. ही ताबडी बस दिसते तुम्हाला आणि तुम्ही तिच्यामध्यें उडी घेता. क्षणार्धात सात नये पैसे तुम्ही गमावता. एक दोन नव्हे सात नये पैसे आणि ते किती अंतरासाठीं माहीत आहे ? फक्त पावणेदोन मैलासाठीं. नव्हे आजच्या परिमाणेंत दोन बिंदु आठ किलोमीटर्ससाठीं.

हें एवढेंसे अंतर. पण पृथ्वी आणि स्वर्ग किंवा नरक ( तुमच्या पापपुण्याप्रमाणें ) यांत दुवा जोडणारें तें अंतर असू शकतें हें तुमच्या ध्यानात आहे का ? अहो, या शहरी जीवनात तुम्हांला व्यायाम तरी मिळतो का ? मग तुमचें आरोग्य कसें टिकून राहील बरें. बसा तुम्ही बसमध्यें. सात नये पैसे घालवा आणि वर आरोग्याची जी गुरुकिल्ली तुमच्या हातीं आहे तीहि गमावून बसा. मग स्वर्गाचें किंवा नरकाचें द्वार तुमच्यासाठीं खुलें न होईल तर काय ?

आपली बेस्ट कंपनी आणि आपले नगरपिते आहेत ना, ते तुमच्यासारखे निष्काळजी नाहींत. त्यांना तुमच्या आरोग्याची काळजी आहे, या पृथ्वीतलावर तुम्ही अधिक काळ मुक्काम करावा अशी त्यांची कळकळीची इच्छा आहे. म्हणून त्यांनीं बसचा दर वाढवायचें ठरविलें बरें !

त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका. बाबांनो, प्रसन्न हवा खात चला. निसर्गाचें सान्निध्य तुम्हांला मिळेल. उन्हाळ्यांत सूर्याचे किरण तुमची कांति सतेज करतील. पावसाळ्यात वर्षाधारा तुमचीं मस्तकें शांत ठेवतील. हिंवाळ्यांत उबदार कपड्याचा शोक तुम्हाला पुरा करता येईल. हें सारें तुमच्या सुखासाठी आहे बरें, तुमच्या आरोग्यासाठीं.

आणि शिवाय एका वेळीं सात नये पैसे तुम्ही वांचवाल. सात नये पैसे. हिशेब करा वर्षाकांठच्या बचतीचा. चौदा कॅरटचा एक दागिनासुद्धां तुम्हांला पैदा करता येईल.

## १७.

# रायगडाला जेव्हां जाग येते

रायगडाला जेव्हा जाग येते, तेव्हां महाराष्ट्रात काळोख पसरलेला असतो. ही जाग उशीरा आली. नियतीनें छत्रपति शिवाजी महाराजाच्या भोंवतीं आधींच फास विणले होते. हिंदवी स्वराज्याची उभारणी त्यांनीं केलेली असते. पण त्या व्यवधानात दौलतीचा वारस होणाऱ्या आपल्या लाडक्या शंभुराजांच्या भावनाकडे लक्ष द्यावयाला त्याना वेळ मिळालेला नसतो. छत्रपति म्हणून त्यानीं उभा महाराष्ट्र जोडलेला असतो. पण लाडक्या पुत्रापासून मात्र ते दुरावलेले असतात.

छत्रपति आणि वडील. राजपुत्र आणि मुलगा. यात जो संघर्ष निर्माण होतो, त्यानें राज्याला धोका येतो आणि मनें उध्वस्त होतात. किती हा हृदयभेदक सघर्ष, किती हृदयस्पर्शी त्याच्या प्रतिक्रिया. त्या नाट्यपूर्ण इतिहासांतून, त्या कारुण्यपूर्ण व्यक्तिजीवनांतून ज्या उत्कट भावना छेडल्या गेल्या त्यांना शब्दरूप देणें हें अलौकिक प्रतिभावताचेंच कार्य होय. वसतराव कानेटकर यांनीं प्रतिभेची ती झेप घेतली आहे. तिला साजेशा उदात्त पण तितक्याच करुणरम्य मानवी प्रतिकृती निर्माण केल्या आहेत आणि त्याच्या मुखातून असे बोल ऐकविले आहेत, आणि नैसर्गिक मीलनाचे, अनैसर्गिक ताटातुटीचे असे काहीं प्रसग त्याच्याभोवती गुफले आहेत कीं ते प्रसग पाहताच डोळ्यात पाणी तरारून यावें आणि त्याना वाचा फुटतांच हुदका दाबून धरणें कठीण जावें.

ज्या नाटककारानें हें यश मिळविलें त्याची प्रतिभा असामान्य नव्हे तर काय ? त्या नाटकाचें कथानकहि थोर, त्यांच्या रोमाचकारी जीवनातील घटनाहि उदात्त, आणि त्यांच्या धीरोदात्त जीवनातील ज्या उत्कटतम मनोव्यथाचें दिग्दर्शन करण्यात आलें आहे त्याहि तशाच हृदयाला भिडणाऱ्या. त्याचा परिणाम असा होतो कीं महाराष्ट्रांच्या इतिहासाचा एक ऊर्जस्वल कालखड आणि त्या काळांतील शिवप्रभूच्यासारखा आदर्श नेता आपल्या डोळ्यांसमोरून जात असलेला पाहून त्या इतिहासाच्या आठवणीनें मन रोमाचित, स्तिमित होतें. पण त्याच वेळीं शिवाजीराजे व शंभुराजे यांच्या कौटुंबिक जीवनांतील सघर्ष, त्याच्या हृदयव्यथा, त्याचा सताप आणि पश्चात्ताप, त्याचा कठोर निर्धार आणि हृदय वितळविणारी शरणागति याचीं चित्रें पाहतांना आपल्याच जीवनाची साक्ष पटून मनाला गहिंवर येतो.

तोच तो गहिंवर जो अनेक वेळां अश्रूंत प्रगट होतो, हृदयापासून येणाऱ्या उमाळ्यांतून जाणवतो. असें समर्थ व्यक्तिचित्रण, अशी भावनोत्कट भाषा आणि विचाराना चालना देणारा असा इतिहासकालीन व्यक्तींबद्दलचा दृष्टिकोन क्वचितच एखाद्या नाट्यकृतींत पाहावयाला सांपडत असेल. त्याच प्रकारच्या इतिहासाची आज पुनरावृत्ति होत असतांना साहजिकच मनांत प्रश्न दाटून आल्याशिवाय राहत नाहीं कीं, "आजच्या राज्यकर्त्यांनाहि नव्यानें स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या सरक्षणासाठीं व सवर्धनासाठीं योग्य तो अवसर मिळेल काय ?"

कोण जाणें शिवाजीराजांची ती तेजस्विता, शंभुराजांची ती तडफ, बाल रामराजाची आत्मसमर्पणाची ती वृत्ति ही आमची वारसदारी होणार आहे कीं सोयराबाईची राज्यतृष्णेंतून निर्माण

झालेली असूया आणि अष्टप्रधानमंडळाची मतलबी फंदफितुरी हीच आमची प्रेरकशक्ति ठरणार आहे ! रायगडाला पुन्हां जाग आणण्याची वेळ आली आहे. शिवाजीराजाचा आत्मा आज पुन्हा एकदा तळमळत म्हणत असेल, “ शंभुराजे, दोन वेळा काळसर्पाच्या शेपटीवर पाय देऊन तुम्ही सहीसलामत परत आलात. पण याद राखा, राजे, पुन्हा जर मोगलाच्या तावडीत सापडलात तर त्या वेळीं तुम्हाला सोडविण्यासाठीं आबासाहेब या जगात असणार नाहींत. ”

रायगडाला पुन्हां जाग आली तर तो हेंच म्हणेल, “ राजा, वैऱ्याची रात्र आहे; सावध राहा. ”

# १८.

## नजरबंदी

पतिपत्नीमध्यें प्रेमाचा रंग भरलेला असतो पण सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ रामन् म्हणतात त्याप्रमाणें साडीच्या रंगामुळें त्या रंगाचा बेरंग होतो. साडींतील चमक, तिच्यामधील रंगछटा, त्या साडीचा पोत आणि परिधान करणाऱ्या व्यक्तीचा रंग व तिचें रूप यांच्याशी साडीची होणारी रंगसंगति वा रंगवैचित्र्य अशा अनेक गोष्टींचा कार्यकारणभाव या बेरंगाच्या मुळाशीं असू शकतो पण रामन् यांनी असें विधान केलें आहे कीं बऱ्याच पुरुषांना रंगाचें आकलनच होत नाहीं निदान त्यांच्या मतें अनेक स्त्रियांची अशी समजूत आहे खरी आणि त्यामुळें साड्या आणि पातळें खरेदी करण्याचें काम त्या आपल्या पतिराजावर सोपवीत नाहींत.

खरें असेल बुवा तें ! रामन् हे शास्त्रज्ञ आहेत. पण शास्त्राभ्यासजड असे ते झालेले नाहींत. मानवी मनाचें आकलन करण्याचीहि त्यांची प्रवृत्ति आहे आणि त्याच्या जोडीला त्यांच्यामध्यें रसिकताहि आहे. कोणीं सांगावें, स्वानुभवावरूनहि त्यांनीं हें सत्य सांगितलें असेल. पण मग मात्र त्यांना असें विचारावें लागेल, " शास्त्रज्ञा, पंडिता, स्त्रीमनाचें हें कोडें तुम्हीं उलगडलेंत खरें. पण तें शास्त्रीय दृष्टिकोनांतून. आतां व्यवहारी दृष्टीनें आम्हांला एवढेंच सांगा कीं रंगाची जाणीव जी पतिमनातून नाहींशी होत असेल ती डोळ्यातील अंगभूत दोषामुळें, कीं साडीचा रंग व भपका त्या डोळ्यांना सहन होऊ न शकल्यामुळें, की त्या साडीला जी एक बारीकशी कागदी चिठ्ठी अडकविलेली असते तिच्यावरील आकड्यांची करामत पाहिल्यामुळें ? "

तशीं काहीं अन्य कारणें नसतीं तर कवि गोविंदाग्रजांनीं ' गुलाबी कोडें ' घालताना कां बरें विचारलें असतें,

> " रंग इकडचा तिकडे वठला छटा कुठुनि गेली,
> ही जादूची नजरबंदि कुणी कधीं कधीं केली ? "

विनोदचतुरा अशा मुग्धाबालेनें निजनाथाला हा प्रश्न केला आणि त्यानें जादूची काहींतरी नजरबंदी केली. ती नजरबंदी हा आपला विषय नाहीं. पण त्यातील सत्य प्रगट झालें तें असें कीं त्या मुग्धाबालेच्या नाथाला तिच्या कपोलावरील बदलती रंगछटा पुरेपूर दिसली.

मग आतां सांगा ! पतिमनाला रंगाची जाणीव नसते असें कसें म्हणतां येईल ? कदाचित् असें मात्र म्हणता येईल की कवीचें मन, शास्त्रज्ञाचें मन, स्त्रीचें मन आणि व्यवहारी पुरुषाचें मन यांत संगति घालणें कठीण असावें. ती संगति घातली जाईपर्यंत व्यवहारचतुर पुरुषानें मला वाटतें आपला आंधळेपणा झांकून ठेवण्यासाठीं पत्नीनें केलेल्या खरेदीवर निःसंकोचपणें पसंतीचें शिक्कामोर्तब करावें. गृहसौख्याचा तोच एक सरधोपट मार्ग आहे.

# १९.

## नष्ट होणारा दुवा

ही रम्य हवा, ही प्रसन्न थंडी आणि ही शेकोटी. आपल्या जीवनांत शेकोटीला स्थान तरी कोठें उरलें आहे ? खेड्याच्या जीवनातील सारी रंगत शेकोटीभोवतीं कोंडाळें करून बसल्यानंतरच प्रगट होत असे. आतां ती थंडी राहिली नाहीं, कांहीं प्रमाणांत कोठें भासली तरी लोकांना उसंत कोठें आहे ? आणि समजा, असली तरी जळण कोठें आहे ? साहजिकच शेकोटी ही संस्थाच नामशेष झाली आणि तिच्याबरोबर त्या रंगणाऱ्या गप्पा, तो वार्ताविहार, त्या रोचक कुटाळक्या आणि त्या उन्मादकारी रंगविलासाच्या आठवणीहि नाहींशा झाल्या.

शहरी जीवनात शेकोटी कोठून असणार ! पण कोठें थंड हवेच्या ठिकाणीं साहेबानें आपल्या घरचा तो आराम आणला आहे. कृत्रिम अशा वातावरणांतहि ' फायर प्लेस ' पेटली कीं क्षणभर ' त्या ' ग्रामीण जीवनाचा पडताळा येतो आणि एका नव्या विश्वात प्रवेश केल्या-सारखें वाटतें. लहानशीच ती लकडी, नाजूकसे ते कोळसे क्षणार्धांत धडाडून पेटतात. आणि मग विजेची रोषणाई बंद केली कीं मंद अशा तांबडसर प्रकाशाच्या छटा साऱ्या दिवाणखान्याभर पसरतात. त्या प्रकाशाला साजेसाच आवाज तेथें बसलेल्या व्यक्तिसमूहांतून उमटतो आणि मग साऱ्या गप्पाष्टकामध्यें एक वेगळाच आपलेपणा, वेगळाच जिव्हाळा प्रगट होतो.

तो जिव्हाळा ' हीटरच्या ' उष्णतेंत येऊ शकत नाही. त्याची धग जास्त खरी पण ऐसपैस पसरलेल्या कोंडाळ्याचा पुरेसा परिघ कांहीं तो उष्ण करू शकत नाहीं. तो धगधगून पेटला कीं जणु रागीट माणसाच्या सहवासात बसल्यासारखें आपल्याला वाटतें आणि मग आपल्या न कळत गप्पा-ष्टकावर नियंत्रण पडतें.

' फायर प्लेस ' चा नूरच काहीं वेगळा. त्यात उष्णता असते, पण धग नसते. तिचा पल्लाहि मोठा आणि म्हणून अनेकांना ती एकाच वेळीं सामावून घेऊ शकते, अनेकांना आपल्या मायेची ऊब ती देऊ शकते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, शहरी आणि ग्रामीण जीवन यांच्यामध्यें ती एक अपूर्व असा दुवा प्रस्थापित करू शकते.

पण तें भाग्य प्राप्त करून देणाऱ्या हवेचें सान्निध्य आपल्याला हवें ना ! जेथें स्वेटरचा ऊबदार स्पर्श अनुभविण्यासाठीं चार दोन घटकाच्या थंडीची करुणा भाकावयाची वेळ येते तेथे ' फायर प्लेस ' आणि ' शेकोटी ' यांचा विचार तरी कशाला !

कधीं काळीं एखाद्या कादंबरींतच त्याचीं वर्णनें वाचावयाचीं किंवा एखाद्या पाश्चात्य चित्र-पटातूनच त्याचा अनुभव घ्यावयाचा.

राजधानीच्या विलासी जीवनात मात्र त्याची माधुरी आज उपभोगावयाला मिळत आहे खरी !

# ८०.

## मी त्यांना म्हटलें

सांगण्यासारखें पुष्कळ आहे. पण सांगतां येईल किंवा नाहीं कोण जाणें! राजनैतिक वा राजकीय जीवनांत हेंच घडून येतें. तुम्हालाच म्हणून सांगतों. अगदी तुमच्या—आमच्यामधील गुपित. पण खरेंच का हें ?

तें विचारू नका. आपण विश्वासानें सांगावयाचें—दुसऱ्यानें विश्वासानें ऐकावें म्हणून; पण तें षट्कर्णी होतें. त्याला आपला काय इलाज! अखेरीस आपण आपल्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करावयाचें एवढेंच आपल्या हातीं. पण एकाकडून दुसऱ्याकडे अशीं गुपितें पसरतात. मग कोणाच्या चारित्र्यावर घाला पडतो, आणि कोणाच्या कीर्तीतहि भर पडते.

दुसरी गोष्ट दुर्मिळ. कारण समोरासमोर स्तुतीचा वर्षाव होतो. पण पाठ फिरताच निंदेचें जहर प्रगट होतें. वरकरणी स्तुति करून मोठ्या कौशल्यानें संशयजाल पसरविणारे लोक मात्र अधिक धोक्याचे. संसदेमध्यें कोणीं भाषण केलें तर हे लगेच बक्ताक्षणी म्हणतील, “ फार सुरेख भाषण. पण मला वाटतें भूमिका अधिक तर्कशुद्ध हवी होती आणि शैलीसुद्धां नेहमींसारखी मोहक नव्हती. ”

म्हणजे मग सुरेख भाषण कसें ? तें विचारू नका. संरक्षणमंत्री नव्यानें दिल्लींत आलेले. केवढा अभिमान या लोकांना वाटला. महाराष्ट्राचें वैभवच जणु दिमाखानें दिल्लींत प्रगट झालें. या झाल्या घोषणा. पण कुजबूज अशी : ‘फार मोठ्या अपेक्षा लोक बाळगीत आहेत. त्या पुऱ्या झाल्या नाहींत तर ? ’ म्हणजे आपण अचब्यानें म्हणतों, “ त्या पुऱ्या होत नाहींत कीं काय ? ” जरा अडखळत उत्तर येतें, “ कांहीं लोक असें म्हणत होते खरें. मीं त्यांना म्हटलें. . ”

त्यांनीं काय म्हटलें असेल त्याची तुम्हीच कल्पना करा. माझा स्वतःचा अनुभव असा कीं ते जें काहीं म्हणतात त्यानें फक्त एकच गोष्ट साध्य होते आणि ती ही कीं आजूबाजूच्या लोकांत संशयाचें दाट जाळें पसरलें जातें. त्यांत तसें मोठें वाईट नसतें. पण आपलेपणाच्या आविर्भावांत तें पसरविलें जातें म्हणून त्याचा डंख अधिक बसतो.

पण हें सारें तुमच्या—आमच्यामधील गुपित. तें षट्कर्णी होऊ नये हें आवाहन. त्याला वाच्यता मिळावी ही मात्र इच्छा. तथापि ज्यानें अगदीं विश्वासानें हें सांगितलें त्याला कानावर हात ठेवण्याचा जन्मसिद्ध हक्क असतो. कोणत्याहि गोष्टीचा साफ इन्कार करणें हा तो हक्क गाजविण्याचा शिष्टसंमत मार्ग. नेतृत्वाचा आदर्शहि त्यातूनच प्रगट होत असतो.

## ८१.

# सुवर्णतुला

एक मण आणि पधरा शेर. श्रीमती इंदिरा गांधी यांचें हें वजन. सुवर्णतुलेच्या वेळचें. सध्यां सारे नेते काट्यावर उभे आहेत. पलीकडील काट्यावर सोनें किंवा चांदी भारभार ठेवली जाते. नेतृत्वाचा कसहि या धातूवरूनच लागतो. आता कांहीं दिवसांनीं लोक ओळखू लागतील " हा सोनेवाला, हा चांदीवाला, " आणि कालांतरानें " तांबे–पितळवाला. "

राष्ट्राला आज खरी वजनदार पुढाऱ्याची गरज आहे. प्रत्यक्ष शारीरिक दृष्ट्या वजनदार आणि कसाच्या दृष्टीनेंहि वजनदार. राष्ट्रीय संरक्षण निधीत शंभर नंबरी, बावीस-तेवीस कॅरटच्या सोन्याची भर पडावयाची असेल तर असे जास्तींत जास्त वजनदार व कसदार पुढारी आपल्याला शोधून काढले पाहिजेत.

पण लवकर; अति लवकर. कारण आतां शंभर नंबरी सोन्याचे दिवस चालले. थोड्याच दिवसात चौदा कॅरटचें सोनें रूढ होईल. मग सुवर्णतुला ही सोन्या–ताब्याची तुला होईल आणि मग नेत्यांचें वजन करावयाचें झालें तर खटाऱ्यातून दागिने भरून आणावे लागतील. कांहीं दिवसांनीं आपल्यासमोर पेंच पडेल तो दुधात पाणी कीं पाण्यांत दूध या प्रकारचा !

बिचारे सोनार. त्याना प्रश्न पडेल : बावीस कॅरटच्या दागिन्यांचा कस होत असे चौदा कॅरट. तर आतां चौदा कॅरटमध्यें सोनें तरी कसें हुडकून काढावयाचें ? जाऊं द्या. होतें तें भल्यासाठीं होतें. दागिन्यांचा आपल्याला भारी सोस. आधुनिक युगांत आपण राहतो आणि आस कसली धरतों तर शंभर नंबरी सोन्याची. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत शंभर नंबरी सोनें ? काय हा परंपरागत दृष्टिकोन !

तो दृष्टिकोन सोनारांनीं ठेवला नव्हता बरें ! अर्थमंत्र्यांना आज जें सत्य उमगलें तें सोनारांनीं जन्मजात गृहीत धरलें होतें त्यांना जर विश्वासांत घेऊन कोणी विचारलें असतें तर त्यांनीं हळूच, अति हलक्या आवाजांत सांगितलें असतें, " ऑल दॅट ग्लिटर्स इज नॉट गोल्ड. "

बस्स. आपण लहानपणीं जी म्हण शिकलों ती आतां प्रत्यक्ष जीवनात आणावयाची ही वेळ आली आहे. १४ कॅरटचा साधा अर्थ हा आहे. त्यात तुम्हाला एवढा अनर्थ काय दिसतो कोण जाणे ! मी तर म्हणतों : प्रांताच्या, शहराच्या, गांवाच्या नेत्याना आता आपली सुवर्णतुला करून घेणें अधिक सुलभ होणार आहे. श्रेयापरी श्रेय सुवर्णतुलेचें. मग त्यांत ताब्याची खुशाल का भरती असेना !

# ८१.

## बाळलेणें

जुहूच्या किनाऱ्यावर अनेक दुर्घटना घडल्या आहेत. पण एका कुटुंबाची पूर्वनियोजित आत्महत्या हा एक अपूर्वच प्रकार मानावा लागेल. अपूर्व पण किती भयकर आणि अमानुष ! त्यांतील अमानुषता ही कीं जाणत्या अशा आईबापांनीं आपल्या निरपराध अर्भकाचाहि त्या आत्मघातात बळी दिला.

दहा, सात आणि नऊ वर्षांचीं हीं कोंवळीं पोरें. त्याना आपल्या वडिलांच्या व्यवहाराची काय कल्पना असणार आणि कर्जाचा बोजा काय असतो हें तरी त्यांना काय कळणार ! बिचारीं जन्माला आलीं, अल्लड बाळलीला करण्याइतपतच त्यांची वाढ झाली आणि जरा कोठें पाकळ्या उकलतात न उकलतात तोंच तीं फुलें निष्ठुरपणें चिरडून टाकण्यांत आलीं.

मानवी जीवनातील क्रूरता जर कोणती असेल तर अर्भकाच्या शरीराला व मनाला दुःख देणें ही होय. आपला अहंकार प्रगट करावयाला, आपल्या भावनेची तीव्रता व्यक्त करावयाला इतर कमी का माणसें जगात आहेत ? वयांत आलेलीं तीं माणसें असतात. दोन द्यावयाची व दोन घ्यावयाची त्याची तयारी असू शकते. त्याच्याशीं कोणी सामना दिला तर तो तुल्यबल व्यक्तीं-मधील तरी सामना होईल.

पण कोंवळीं मुलें ! अजाण, अनघ, निष्पाप. तीं पुढेंमागें मोठीं होणारच आहेत, त्याना दारुण जीवनसघर्षाला तोंड द्यावेंच लागणार आहे. पण खेळण्याबागडण्याचे, आकसाविना स्पर्धा करण्याचे, फुलपाखराप्रमाणें स्वच्छंद जीवन जगण्याचे, जबाबदारीशिवाय सुख मिळविण्याचे त्याचे दिवस आहेत तोंपर्यंत तरी त्याना कडवटपणापासून मुक्त राहू द्या ना ! तुम्ही आणि आम्ही झगडू या, त्याग आणि कष्ट करू या, पण त्याची झळ–तुमच्या अभिमानाची, प्रतिष्ठेची, दुर्दैवाची, विफल-तेची झळ त्याना कशाला लागूं देतां ?

नाहीं बरें ! तीं तुमचीं, तुमच्या रक्तामांसाचीं मुलें असतील. पण म्हणून त्याना स्वतत्र व्यक्तित्व नाही असें का बरें समजता ? त्यांना व्यक्तित्व आहे, तसेंच स्वतत्र अस्तित्वहि आहे. तुमचा त्याच्यावर अधिकार असला तर तो फक्त प्रेमाचा. त्या प्रेमानें तुम्ही त्यांना बांधू शकतां, रागानें नव्हे; आणि अधिकाराच्या अंमलबजावणीनें तर खासच नव्हे.

जबाबदारीची त्याच्यापासून अपेक्षा करूं नका. कर्तव्याचीहि करू नका. उलट त्याच्या बाल-वाणीमुळें, बाललीलांमुळें तुम्हाला जो निर्भेळ आनद मिळतो त्याची थोडीशी तरी भरपाई करण्या-साठीं त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव तेवढा करा. तें तुमचें कर्तव्य आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..३८८८५.. दि ..
क्रमांक ..९५९८.. नों दि ..१५-८-८४

८३

# पर्ल बक

पर्ल बक या विख्यात झाल्या त्या ' गुड अर्थ ' या त्यांच्या कादंबरीमुळें. चीनच्या जीवनावरील ती कादंबरी आहे. पर्ल बक यानीं आपली मातृभूमि ज्या देशाला मानली तो हा चीन. त्या देशाशीं त्या समरस झाल्या होत्या. इतक्या कीं चीन हें त्यानीं आपलें सासर केलें, तेथील लोक हे त्यानीं आपले भाईबंद मानले.

चीनच्या भूमीला त्यानीं ' मंगलभूमि ' असें नाव दिलें यातच चीनबद्दलचा त्याचा भक्तिभाव व्यक्त होतो. आजहि चीन किंवा चिनी लोकाबद्दल त्यांच्या मनात किंतु नाहीं. असला तर खेद. तो त्यांना वाटतो, कारण त्यांनीं ज्या भूमीला मातृभूमि मानलें त्या देशाला नव्या राजवटींत त्या पारख्या झाल्या आहेत. त्या राजवटींत चीनच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा विच्छेद झाला आहे याचें त्याना अधिकच दुःख होतें. पण तरीहि चीनबद्दल त्या तिरस्कारानें बोलत नाहींत. गेल्याच वर्षी दिल्लीला त्या पत्रकाराना भेटल्या; त्या वेळीं आपलें हृदगत् जाहीर करतांना त्या म्हणाल्या होत्या, " चीनचा आत्मा केव्हा ना केव्हां तरी जागृत होईल आणि आज तेथील लोकांच्या खांद्यावर जें जोखड बसलें आहे तें दूर सारून चीनच्या पुरातन संस्कृतीचें तेथें पुनरुज्जीवन केलें जाईल."

पर्ल बक यांचा हा विश्वास त्यांच्या उत्साहाइतकाच दुर्दम्य आहे. वाढत्या वयाची त्याना क्षिति नाहीं; वार्धक्याची त्याना भीति नाहीं. त्यांच्या मनींच्या आकांक्षा एकसारख्या वाढतच आहेत. आतां तिबेटी निर्वासितांच्या जीवनावर एक कादंबरी लिहिण्याचें कार्य त्यानीं हातीं घेतलें आहे. त्यासाठीं दलाई लामांच्यापासून सामान्य तिबेटी निर्वासितापर्यंत त्यानीं अनेकांच्या भेटी घेतल्या आणि दूरदूरच्या ठिकाणाचा प्रवास केला. त्याच्याच जोडीला भारतीय जीवनाशीं निगडित असा एक चित्रपटहि इतरांच्या सहकार्यानें त्या तयार करू पाहत आहेत.

संध्याछाया ज्यावेळीं साधारणपणें आपल्या देशातील लोकाना भेडसावूं लागतात आणि परमार्थ चिंतनाकडे ज्यावेळीं त्यांचा कल होतो त्या वयांत पर्ल बक या नवीन योजना हातीं घेत आहेत आणि त्यासाठी सात समुद्र ओलांडून येण्याचे कष्ट घेत आहेत. त्यांचा उत्साह, जीवनाबद्दलचें त्याचें आकर्षण आणि मानवतेवरील प्रेम हेंच त्यांच्या कलाकृतींत प्रगट होतें आणि म्हणूनच अक्षर वाङ्मयात त्या कलाकृतींची गणना होते.

## ८४.

# रेंगाळणारा दिवस

" द लॉंगेस्ट डे " हा एक नुसता चित्रपट नव्हे. ती एक नुसती कलाकृतीहि नव्हे. तो एक इतिहास आहे—चैतन्यानें भरलेला, चैतन्य निर्माण करू शकणारा. तो चित्रपट पाहताना क्षणोक्षणीं विचार येत असे, " असा दीर्घ मुदतीचा दिवस भारतात उगवला तर ? "

तो उगवणार नाहीं असें कोणीं सांगावें ? आजवर अशी अपेक्षा करता येत होती कीं, आपल्याला शांत निवातपणें विकास करतां येईल. पण चीननें त्या अपेक्षेचा, त्यामागील स्वप्न-सृष्टीचा भग केला आणि आता हिमालयाच्या अभेद्य आघाडीला तडे गेल्याचें व शत्रूच्या काळ्या छाया भारतावर पडू लागल्याचें आपल्याला आढळून आलें आहे.

त्या काळ्या छाया अनिवार्यपणें यापुढें पसरूं लागतील आणि आपल्या मनांत असो किंवा नसो, आपल्याला विजयासाठी केवळ मतदान नव्हे तर प्रत्यक्ष युद्ध करावें लागेल. युद्ध ?—होय. " द लॉंगेस्ट डे "—मध्यें दृष्टीस पडतें तसें भयानक, विनाशकारी युद्ध.

तें भयानक खरें. पण तितकेंच चैतन्ययुक्त, स्फूर्तिदायक. त्यात लष्करी सामर्थ्याची प्रचीति आहे, मानवी मनाचा निर्धार आहे, मृत्यूशीं झुंज घेणाऱ्या सैनिकाचें साहस आहे, लक्षावधि तरुणाना मृत्युमुखीं पाठवितानाहि भावनोत्कटतेनें पापणीहि न लवविणाऱ्या सेनानायकाची अढळ श्रद्धा आहे. त्यात काय नाहीं हें सागणें कठीण असलें तरी एवढें मात्र निश्चितपणें सागता येईल कीं त्यांत कच खाणारी मनोवृत्ति नाहीं, माघार घ्यावयाला लागणारा डळमळीतपणा नाहीं, सकट सामोरें आल्यानतर प्रगट होणारा तात्त्विक पलायनवाद नाहीं.

कोणाला वाटेल हें सारें युद्धच अमानुष आहे. तें अमानुष तर खरेंच. पण हुकुमशाहीच्या पदाघातानें सारीं मानवी मूल्यें, प्रत्यक्ष मानवता चिरडली जाऊ लागली तर तिच्या रक्षणासाठीं अमानुष अशा युद्धाचा मार्ग स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय तरी कोणता राहतो ? तो पर्याय नाझी हुकुमशाहीचा पाडाव करण्यासाठीं लोकसत्तावादी राष्ट्रानीं उघड्या डोळ्यांनीं स्वीकारला. तोच पर्याय चीनच्या अमानुष आक्रमणाविरुद्ध लोकसत्तावादी भारताला स्वीकारावा लागणार आहे.

—आणि मग वर्षानुवर्षें चालणारें युद्ध हा आपला दिनक्रम होईल आणि त्या दिन-क्रमाचा अंत जवळ आणणारा एक दीर्घ मुदतीचा दिवसहि भारतांत उगवेल. तोच आपला खरा मुक्तिदिन होईल.

## ८५.

# बोला अमृत बोला !

जयप्रकाशजी असेंच बोलत राहा. तुमचे अमृतबोल ऐकून आजवर तुमचे मित्र व भक्तजन पुलकित होत असत. आज तुम्हाला शत्रुस्थानीं मानणारे क्रुश्चेव हर्षभरानें तुमच्यावर सुमनें उधळीत म्हणतील. " धन्य, धन्य, धन्य ! "

खरोखरच तुम्ही धन्य झाला आहांत. आम्हा पामराना अहिंसेच्या सामर्थ्याची जाणीव झाली नव्हती. अलीकडे तर अहिंसेचा आम्हांला विसरच पडत चालला होता. आम्हांला वाटे, गांधीजींच्या निर्वाणाबरोबरच अहिंसेनेंहि भारतांतून प्रयाण केलें. बापू ! अहिंसेचे उपासक ! ते निघून गेले आणि राष्ट्र अनाथ झालें. त्यापेक्षाहि अधिक अहिंसा पोरकी झाली.

पण नाहीं. जयप्रकाशजी, बापूजींना अहिंसेचा जो आदर्श लोकांसमोर ठेवतां आला नाहीं तो तुम्ही ठेवला आहात. अहिंसेंतून जें मानसिक धैर्य निर्माण होतें, जी शुद्ध बुद्धि परिणत होते, जी हृदयपरिवर्तनाची ऊर्मि उसळते, तिचें सर्वोच्च स्वरूप तुम्ही आज प्रगट केलें आहे. भगवान बुद्धांना गहिंवरून यावें, महावीरांच्या डोळ्यांत पाणी तरारून यावें, आणि गांधीजींना लाजल्या-सारखें व्हावें असा अहिंसावादी अपरिग्रहाचा आणि हृदयपरिवर्तनाचा आदर्श तुम्ही आज जगासमोर ठेवला आहे.

आतां मावत्से तुगना म्हणावें, भारताच्या या आत्मिक बलाशीं सामना द्या. हा बघा, आमचा सीमासंघर्ष आम्ही क्रुश्चेव यांच्यापुढेंच मध्यस्थीसाठीं, लवादासाठीं टाकला आहे. असें समजू नका कीं चीन-रशिया याच्यामधील सत्तास्पर्धेचा फायदा उठविण्यासाठीं हा डाव आम्ही टाकीत आहों. नाहीं बरें ! जयप्रकाशजींच्या मनात असे हे क्षुद्रपणाचे, हीन वृत्तीचे विचार कदापीहि येणार नाहींत.

तशी कसोटीची वेळ आली तर मी, तुम्हाला ग्वाही देतों, शांतियात्रा पेकिंगला पोचू द्या, जयप्रकाशजी खुद्द माक्त्से तुगनाच सांगतील कीं, ' कॉम्रेड माओजी, क्रुश्चेव्ह राहू द्या. आम्ही तुम्हालाच या सीमासंघर्षांत लवाद नेमतों. '

त्या शुभमंगल दिवसाची आपण वाट पाहू या आणि तोंवर जयप्रकाशजींच्या मुखांतून निघणाऱ्या अमृतबोलांचें स्वागत करीत म्हणू या : " धन्य, धन्य, धन्य ! "

## ८६.

### हुंडा म्हणून–

भारतांतील रशियन वकील मि. बेनेडिक्टॉव्ह यांनीं भारत-रूस मैत्री दृढ करण्यासाठीं एक अभिनव उपाय सुचविला आहे. ते म्हणतात कीं, भारतातील तरुणांनीं रशियन मुलींशीं विवाह करावा. म्हणजे या दोन देशांतील मैत्रीचे संबध चिरकालिक स्वरूप धारण करतील.

ही कल्पना फार फार चांगली आहे. त्यावरून मला पूर्वीं महाराष्ट्रातील एका सामाजिक कार्यकर्त्यानें भारतीय स्वातंत्र्य हस्तगत करण्यासाठीं जी एक कल्पना सुचविली होती तिची आठवण झाली. ते म्हणत, " भारतांतील तरुणांनीं जरा जिद्द ठेवली पाहिजे. त्यांच्यापैकीं कोणी ब्रिटिश राजकन्येशीं प्रेमसंबंध जुळविला पाहिजे. अरे, हुंडा म्हणून स्वराज्य घेऊ. "

त्या वेळीं हुंड्याला प्रतिबंध नव्हता. तेव्हां एखाद्या साहसी प्रेमवीरानें राजकन्येच्या हृदयाची चोरी केली असती तर संघर्षाशिवाय हुंड्याच्या रूपानें आपल्याला स्वराज्य मिळवितां आलें असतें. आता हुंडा–प्रतिबंधक कायदा मंजूर झाला आहे. त्यामुळें रशियन तरुणींकडून उघडपणें हुंड्याची मागणी करणें कठीण झालें आहे.

पण कायदा असतो तिथें पळवाटा या असतातच आणि जेथें व्यक्तिहिताचा नव्हे तर देशहिताचा प्रश्न येतो तेथें साधनांबद्दल विधिनिषेध मानण्याचें कारण काय ? आपलें उद्दिष्ट स्वच्छ असलें आणि हेतु उच्च असला कीं कायद्यातील पळवाटेचा उपयोग करावयाला हरकत नसते.

आतां हेंच पाहाना रशियाच्या सदिच्छा मिळविणें हेंच भारत-चीन संघर्षांतून सहीसलामत सुटण्याचें एकमेव साधन आहे. या सदिच्छा आपल्या तेथील वकिलाला मिळवितां आल्या नाहीत. म्हणून तर रूसवादी डांगे याना आपण तेथें पाठविलें. त्याच्याऐवजीं आपल्या रशियन सुना मॉस्कोला गेल्या तर क्रुश्चेव यांची भेट अधिक सुकर होणार नाहीं का ?

म्हणजे पाहा, प्रेमसाफल्य आणि देशहित अशा दोन्ही गोष्टी एकाच वेळीं साध्य होतील. त्या वेळीं हुंडा म्हणून आपल्याला स्वराज्य मिळवावयाचें होतें. आतां हुंडा म्हणून नव्हे पण देणगी म्हणून ( हें कायद्यात बसतें बरें का ! ) स्वराज्यावरील संकटाचें आपल्याला निवारण करतां येईल.

## ८७.

# साधु संत येती घरा

दारूबंदीबद्दल चौकशी करण्यासाठीं एक केंद्रीय समिति नेमली गेली आहे. तिचें अध्यक्ष स्थान भूषविणार आहेत संत तुकडोजी महाराज. त्या समितीचें कामकाज १ एप्रिलपासून सुरू होणार आहे.

मारा डफावर थाप, अगदीं योग्य मुहूर्त सरकारनें शोधून काढला म्हणून. तुमचें आमचें सर्वांचें मत अजमाविणार आहे ही समिति. कशाबद्दल ? दारूबंदीबद्दल, तशीच ती रद्द करण्याबद्दलहि.

म्हणजे मला कळत नाहीं हा प्रश्नच कोठें उद्भवतो ? दारू पीना हराम आहे हें आम्हीं जन्मापासून ऐकत आलो आहों, आमच्या नेत्यानीं घसा फुटेपर्यंत या आरोळ्या दिल्या आहेत. प्रत्यक्ष घटनेंत मार्गदर्शक तत्त्व म्हणून दारूबंदीचा स्वीकार करण्यात आला आहे. मग दारूबद्दल आम्ही दुसरें मत तरी काय देणार ?

आणि तेंहि संत तुकडोजी महाराजांना ! ' साधु-संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा ' हें आपलें ब्रीद. मग तुकडोजी महाराजांनीं आमच्या घरीं पायधूळ झाडल्यावर आम्ही त्याना काय सांगणार, आम्हांला दारू हवी म्हणून !

नाहीं बरें ! आमच्या साऱ्या हातभट्टया आम्ही दडवून ठेवूं. लोकशाहीच्या या जमान्यांत आम्हांला व्यवसायस्वातंत्र्य मिळालें आहे बरें का आणि त्या लोकशाहीचे सेवक असे जे पोलिस त्यांना तर या व्यक्तिस्वातंत्र्याबद्दल कल्पनातीत आस्था आहे. म्हणून आमच्या हातभट्टया आम्ही राजरोस चालवितों आणि हप्तेबंदीनें त्या अबाधितहि ठेवतो.

आता प्रश्न एवढाच आहे कीं साधु संत आमच्या मनाचा ठाव घ्यावयाला आले कीं त्यांचा आदर राखण्यासाठीं या हातभट्टयाना भूमिगत कसें करावयाचें ? मोठा बिकट प्रश्न आहे. हातभट्टया राजरोसपणें चालतात. भूमिगत असतें तें त्यांतील पेय. तेंहि एका अज्ञातातून दुसऱ्या अज्ञातांत गडप होतें. म्हणजे पाहा, त्या क्षणापुरती तरी दारूबंदी झाली कीं !

संत तुकडोजी महाराजांना आमचें सांगणें आहे कीं आमचें मत दारूबंदीच्या बाजूचेंच आहे. दारू नाहींशी करणें हाच तुमचा आमचा दोघांचाहि हेतु आहे. तुम्ही हितोपदेशानें तो साध्य करीत आहां; आम्ही प्रत्यक्ष कृतीनें.

## ८८.

# तेजोवलय

शांतियात्रा ! शंकरराव देव यांची शांतियात्रा ! सासवडहून सुरू झालेली त्यांची भूदान-यात्रा तुम्हांला आठवत असेल. ऐन पहाटे, सूर्यकिरणांचा दाह चुकविण्यासाठीं डोक्यावर चादरीच्या घड्या घालून ते बाहेर पडले होते म्हणतात. दिल्लीच्या तीन इलेक्ट्रिक लेनमधून असेच ते सात्त्विक संतापानें अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीसाठीं निघालेले मी पाहिले होते. त्या वेळीं पंडितजींना आव्हान देण्यासाठीं ते निघाले होते

कधीं आव्हान; कधीं आवाहन. आलटून पालटून ते आपल्या जीवनाचा क्रम बदलत आलेले आहेत. कधीं 'राष्ट्रासाठीं बलिदान' तर कधीं 'महाराष्ट्रासाठीं प्राणदान' असा घोष त्यांच्या मुखांतून निघतो. कधीं काँग्रेसला गांधीवादाकडे खेंचून नेण्यासाठीं ते पंडितजींशीं दोन हात करावयाला सरसावले, तर कधीं महाराष्ट्र राज्याचा मंगलकलश पंडितजींच्या हातून महाराष्ट्रांत आणण्याची त्यांनीं महत्त्वाकांक्षा ठेवली. झालें असें कीं, दोन हातानीं झुंज करणें बाजूलाच राहिलें. ते हात पंडितजींच्यापुढें विनम्र भावानें फक्त जुळले.

आतां शंकरराव, महाराष्ट्र आणि राष्ट्र सोडून आंतरराष्ट्राकडे वळले आहेत. तेवढ्यासाठींच त्यांची शांतियात्रा सुरू होणार आहे. शांतियात्रा—आसामच्या मळ्यातून, हिमालयाच्या पर्वत-शिखरांवरून, ब्रह्मदेशाच्या जंगल-दलदलींतून, पेकिंगकडे जाणारी शांतियात्रा. केवढी ही महत्त्वाकांक्षा ! केवढी ही उज्ज्वल आकांक्षा. महत्त्वाकांक्षा ! जगातील सर्वप्रबळ नेत्याच्या हृदयपरिवर्तनाची. आकांक्षा ! शांतिमार्गाकडे त्याला वळविण्याची !

त्या महत्त्वाकांक्षेनें शंकरराव केवढें अग्निदिव्य करावयाला सज्ज झाले आहेत ! गांधीजींनीं जें हातीं घेतलें नाहीं, विनोबांनीं ज्याची अपेक्षा केली नाहीं, ते शंकरराव साध्य करू पाहत आहेत. बा, महाराष्ट्रा, जो मंगलकलश तू शंकररावांच्या हातून घेतला नाहींस, —बा भारता, पंडितजींनीं भारताचा घेतलेला शोध मान्य करण्यासाठीं तू शंकररावांच्या प्रज्ञेची हेटाळणी सुद्धा केलीस—तो मंगलकलश आणि तें अमर तत्त्व आतां शंकरराव मावत्से तुंग यांच्या हातीं समर्पण करणार आहेत. बस्स, भारताचा विनाश आला होता. आता ?—

शांतियात्रेतून जो नवचीन बाहेर पडेल त्याकडे नुसतें पाहत राहा. आतांच तुम्हांला, या शांतियात्रेतील यात्रिकांच्या भोंवतीं एक तेजोवलय उमटलेलें दिसत आहे ना ? तेंच मी म्हणतों त्या भवितव्याचा निर्वाळा.

## ८१.

# मोशीचें ' पानशेत '

आज काहीं सांगू नये असें वाटतें. सांगणार तरी काय ? साफ बनविलें कीं आम्हांला मोशीला ! केवढी मोठी परिषद. किती उदात्त तिचे हेतु. आफ्रो-आशियाई एकजुटीचें तिनें कंकण बांधलें होतें. सहजीवनाशिवाय ही एकजूट कशी बरें करता येईल ? म्हणून चीन आणि भारत या दोन्ही राष्ट्राच्या प्रतिनिधींना तेथें एकत्र आणण्यात आलें होतें. एकत्र ? अहो, भारतीय आणि चिनी प्रतिनिधींनीं किती किती प्रेमानें हस्तांदोलन केलें. सभागृहांत नुसता टाळ्यांचा कडकडाट झाला.

तुम्हाला एक गमत माहीत नाहीं. भारतीय प्रतिनिधी इतके अधीर झाले होते, चिनी बांधवांना कवटाळण्याची त्यांना इतकी ओढ लागली होती कीं चिनी माणसासारख्या दिसणाऱ्या पहिल्याच प्रतिनिधींना पाहून त्यांनीं उचंबळून येऊन त्यांना आलिंगन दिलें. काय योगायोग पाहा. हे प्रतिनिधि इंडोनेशियाचे निघाले–म्हणजे तत्त्वतः चीनचेच नाहीं का ? ऐतिहासिक अपरिहार्यता जशी असते ना, तशीच ही अंतरींची खूण अपरिहार्यपणें पटल्यासारखी झाली.

हो ! हो ! तुम्ही आता अधीर होऊं नका. आपल्या माननीय प्रतिनिधींनीं नंतर खऱ्या-खुऱ्या चिनी प्रतिनिधींशीं हस्तांदोलन केलेंच. काय तो प्रसंग वर्णूं ! अलिप्ततावाद्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटावें असाच तो प्रसंग होता एवढेंच मी तुम्हांला सांगतो. सहजीवनाचा, निर्व्याज आफ्रो-आशियाई एकजुटीचा आदर्श कोणता असेल तर तो, एवढेंच तुम्ही लक्षांत ठेवा.

— पण ? आता पण का बरें ? काय सांगू तुम्हांला ! तसेंच कांहीं तरी घडलें. आमच्या अपरोक्ष. आणि आम्हांला आढळून आलें तें असें कीं आफ्रो-आशियाई एकजूट परिषदेनें, तिच्या संचालकांनीं, आम्हांला साफ बनविलें आहे. अरेरे ! तीं आमचीं भाषणें, तो आमचा सभात्याग, तें विजयी पुनरागमन, तें प्रेमपूर्ण हस्तांदोलन–सारें सारें काहीं स्वप्नवत् ठरलें.

आमचा तो ठराव ! तोहि जागृतीनें भंग पावलेल्या स्वप्नासारखा विरघळून गेला. केवढे आम्ही मनात मांडे खात होतों, केवढ्या विजयाच्या पताका आम्ही फडकविल्या होत्या, केवढ्या हिमालयीन सहिष्णुतेनें आम्ही चीनच्या हृदयाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला होता पण ?— मोशीचें अगदीं ' पानशेत ' झालें. आमच्या ठरावाची ' शिफारस ' झाली.

म्हणून आज काहीं सांगू नयेसें वाटत होतें. मोशीनें आम्हांला साफ बनविलें हें सांगावें तरी कोणत्या तोंडानें ?

१०.

# परमेश्वर साक्ष

तुम्ही हिशोब लिहितां का ? जमाखर्च करतां का ? मग आपल्या मुख्यमन्त्यानीं सांगितल्या-प्रमाणें आतां एक युद्धखर्च खातें सुरू करा मात्र त्यात नोंद करावयाची आहे ती जमेची; खर्चाची नव्हे हें लक्षांत ठेवा.

तुमच्या मुद्रेवरील स्मितहास्य मला दिसत आहे. त्याचा अर्थहि मला समजला आहे. अहो, तुम्ही म्हणता आहां, कसली खातीं घेऊन बसला आहात; आमचें एकच एक खातें आणि तें अकलखातें ! तें सारी जमा खाऊन टाकतें आणि मग खर्चाचा हिशोब लावावयाचीहि आवश्यकता राहत नाहीं.

कोणीतरी एक किस्सा मागे सांगितला होता मला; एका पतिपत्नीच्या व्यवहाराचा. पतीनें रोजनिशी दिली आपल्या पत्नीला. कां ? तर तिनें म्हणे साऱ्या खर्चाची नोंद करावी. महिन्याच्या अखेरीस त्यानें सारा हिशोब पाहिला. पण दर दिवशीं त्याला एक नोंद अगदीं हटकून आढळत असे, आणि मोठ्या रकमेची. प्रत्येक ठिकाणीं लिहिलेलें असे, " जी. ए. के. " त्याला कळेना हें " जी. ए. के. " खातें कसलें आणि त्यावर एवढा खर्च का होत आहे ? अखेरीस त्यानें पत्नीला विचारलें. तिनें शांतपणें सांगितलें, " जी. ए. के. म्हणजे गॉड अलोन नोज ( परमेश्वर जाणे ) "

परमेश्वर जाणे अशा प्रकारचाच तुमचा आणि आमचा खर्च होत आहे नाहीं का ? मग आपण पुष्कळ मनांत ठरविलें कीं हा भाड्यावर, हा खाण्यावर, हा युद्धखात्यावर खर्च करावयाचा तरी त्याचा काय बरें उपयोग होणार ? परमेश्वर जाणे आमचा खर्च आणि परमेश्वरच देवो आम्हांला स्फूर्ति युद्धखात्यावर खर्च करण्याची !

एक मात्र शक्यता आहे. नाहीं म्हटलें तरी आपलें अंदाजपत्रक तुटीचेंच आणि आतां तर काय ? तें अधिकच तुटीचें होणार. आपल्या पोलादमन्त्यानीं नाहीं का परवां सांगितलें " लोक हो, हृदयें पोलादाचीं करा; नवे कर येत आहेत. त्यांचें उल्हासानें स्वागत करा. " आता या नव्या करापायीं नवी तूट येणार नव्या तुटींतून नव्या जबाबदाऱ्या वाढणार. त्यात युद्धखात्याच्या जबाबदारीची भर पडेल एवढेंच. चला, एकादशीच्या वरीं शिवरात्र आली काय आणि उलटें झालें काय ? एकदा तूट हा जीवनाचा नियम झाला कीं ती कमी काय आणि जास्त काय. दोन्हीहि गोष्टी सारख्याच.

म्हणून आता परमेश्वराला साक्ष ठेवून आणखी एक खातें उघडा. दुसरें काय ?

# १९.

## पतंगाची झेंप

राष्ट्रीय नेत्यांनाच नव्हे तर वीरपुरुषाना मागे टाकण्यांत चित्रपटातील कलावंत आज यशस्वी झालेले दिसत आहेत. चित्रतारकांची कथा तर वेगळीच आहे. त्याची लोकप्रियता इतकी पराकोटीला गेली आहे कीं लोकांच्या अपार उत्साहापासून बांचविण्यासाठीं प्रत्यक्ष पोलिसाचें त्याना सरक्षण द्यावें लागतें.

हा कलेचा विजय कीं ही सौंदर्याची मोहिनी ? कोण जाणे ! एवढें खरें कीं सिने कलावंतांची जनमनावर जी पकड बसली आहे तिचा उपयोग आतां राजकीय पक्षोपपक्षांच्या निवडणुकीसाठींच नव्हे तर प्रत्यक्ष परचक्र निवारण्यासाठीं केला जाऊ लागला आहे. नुकतींच तुम्हीं भित्तिपत्रकें पाहिलीं नाहींत का ? तुमच्याच आवडत्या कलावतानीं तुम्हाला युद्धप्रयत्नासाठीं आवाहन केलें होतें. त्यासाठीं हेच कलावत प्रत्यक्ष झोळ्या घेऊनहि बाहेर पडले होते. त्या झोळ्यांत कितीशा रकमेची भर पडली हें अद्याप जाहीर झालेलें नाहीं. पण ती कितो झाली हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. महत्त्व आहे तें ह्याला कीं, राष्ट्रपुरुषाच्या आवेशांत, हे कलावत, भूमिजनांना आवाहन करीत आहेत, " उठा, जागे व्हा आणि त्याग करा. "

किती उज्ज्वल सदेश ! किती रोमाचकारी आवाहन ! या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठीं लोकानीं त्यांच्या भोंवतीं गर्दी केली, त्याना डोळे भरून पाहतां यावें म्हणून ते जरा जवळ गेले, त्याचा जयजयकार करण्यासाठीं त्याच्या निवासस्थानाकडे मोर्चे काढले तर त्यांना कसा बरें दोष देता येईल ? अहो, राष्ट्रनेते झाले आहेत ते. राष्ट्रनेत्यांना साध्य करतां येणार नाहीं, तें ते साध्य करीत आहेत.

त्याचें श्रेष्ठत्व यांत आहे कीं लोकप्रेम त्यानीं संपादन केलें आहे आणि लोकप्रेम म्हटलें कीं त्यात थोडाफार अतिरेक हा यावयाचाच; दर्शनोत्सुक समाज असतो तो. चित्रतारक आणि चित्रतारका यांना पाहिलें कीं त्यांचीं अतःकरणें उचबळून येतात, मग गलका होतो, गोंधळ होतो; कोठें हस्तस्पर्शासाठीं भावनाहि अनावर झालेल्या दिसतात. मग एखादें स्मृतिचिन्ह हस्तगत होतें कीं काय यासाठींहि ओढ लागते. एखादें फूल, वेणींतील गजरा आणि धन्य व्हावयाचें असेल तर एखादा सुगधित हातरुमाल हीच या स्मृतिचिन्हाच्या आकांक्षेची वाढती कमान. भोळा, भाबडा, कलाप्रेमी, सौंदर्यलोलुप जीव या ईर्षेनेंच पतगाप्रमाणें दिव्य ज्योतीवर झेंप घेतो बरें.

पण हाय ! ही झेंप बहुशः जीवघेणीच ठरते ! आकांक्षा आणि साफल्य यात केवढी खोल, अनुल्लघनीय दरी पसरली आहे तें याच वेळीं कळून येतें.

# १३.

## आमची बिदागी

परवां एस्. एम्. जोशी यांनीं आवाहन केलें कीं रद्दीचे पैसे संरक्षण फंडासाठीं राखून ठेवा. रद्दी ही चीज अशी आहे कीं ती मुख्यतः वृत्तपत्रांशीच निगडित असते. जिला भाव असतो ती ही रद्दी होय. बाकीची रद्दी, म्हणजे सरकारी वा परदेशी वकिलाती यांच्याकडून येणारीं माहिती पत्रकें हीं रद्दींच्या दृष्टीनें अगदींच रद्दी असतात. त्यांचा भाव रद्दी विकत घेणारा माणूस अशा वेळीं जे नाक मुरडतो त्यावरून सुद्धां कळून येतो. वर्तमानपत्रांची रद्दी ही खरी मोलाची असते आणि मी म्हणतों ती एका प्रकारें अमोलिकहि असते.

तुम्ही कल्पना करा. महिन्याच्या सुरुवातीला तुमच्या खिशात पैसे खुळखुळत असतात त्या वेळीं रुपयाला तसें मोल नसतें. पण महिन्याच्या अखेरीला ? नया पैशाला सुद्धा रुपयाचें मोल येतें. कारण या वेळीं नये पैसे हे सुद्धा अभावानेंच तळपूं लागतात. अशा वेळीं जिवाचा आणि कुटुंबाचा एकमेव आधार म्हणजे घरात गोळा झालेली रद्दी होय. म्हणूनच मी म्हणतों रद्दी ही एकप्रकारें अमोलिक असते.

ही अमोलिक चीज निर्माण करण्यांत आपण हातभार लावतों याचा पत्रकारांनीं कां बरें अभिमान मानू नये ? आता तर आमच्या अभिमानात अधिकच भर पडत आहे. कारण आमच्या परिश्रमातून जी रद्दी बाहेर पडत आहे ती आता एस्. एम्. जोशी यांच्या आवाहनाप्रमाणें संरक्षण-कार्यासाठीं खर्ची पडावयाची आहे.

आजवर आम्ही कोसळणाऱ्या सरकारांना ऐन वेळीं हात देत होतों. आतां राष्ट्राची कोसळ-णारी सरहद्द सुरक्षित ठेवण्यासाठीं आमची पुण्याई खर्ची पडणार आहे. घाबरू नका. पुण्याई म्हणजे आम्ही जें लेखन करतो त्यांतून निर्माण होणारी नव्हे. तशी आमची स्वतःबद्दल अवास्तव कल्पना नाहीं. आम्ही वाकबगार आहोंत ते रद्दी तयार करण्यात.

आमचें भाग्य एवढेंच कीं आमच्या रद्दीला भाव आहे. चला कोणी विचारसंपदा उधळतो, कोणी स्पष्टतोडपणानें खडे बोल ऐकवितो, कोणी लोकनिष्ठेनें सत्यदर्शन घडवून आणतो. विचारवंताची हीं कामें, शूरांची ही करणी, येरागबाळाचें तें काम नोहे. आम्ही आपलें यातच समाधान मानावें कीं आपला काटा खालीं गेला तेव्हा एका सुगृहिणीच्या डोळ्यात एक बारीकशी चमक प्रगट झाली आणि दिवसाभराच्या निश्चितीनें तिनें एक निश्वास सोडला. बस्स; ही सुद्धा बिदागीच नव्हे काय ?

## १३.

# बालहत्या

अपघात कीं आत्मघात ? असा संदेह निर्माण करणारी आणखी एक दुर्दैवी घटना काल मुंबईत घडली. त्याचा शोध आणि बोध पुढें घेता येईल. पण हृदय पिळवटून टाकणारें जें सत्य त्यांत प्रगट झालें आहे, तें म्हणजे त्यात झालेली एक बालहत्या.

चार वर्षांचें एक अर्भक. कोण्या आई वडिलांच्या किंवा तरुण-तरुणीच्या निष्काळजीपणाला किंवा निर्घृणपणाला बळी पडावें ही केवढी करुणाजनक घटना आहे. निष्काळजीपणा असला तरी तो गुन्हा आहे. निर्घृणपणा असला तर तो गुन्हा आहे तसेंच तें पाप आहे. ते दोन तरुण जीव प्राणाला मुकले, शासनाच्या पलीकडे गेले. पण त्यानीं जी कटु आठवण आपल्यामागें ठेवली आहे तिचा विचार केला तर कधींहि न पुसून जाणारा कलंक ते मागे ठेवून गेले आहेत असेंच म्हणावें लागेल.

खरोखर शाप हें एक सत्य असतें तर या कोवळ्या बालकाच्या मृत्यूबद्दल त्या तरुण-तरुणीला कोणीहि शापच दिला असता. मला हें कळत नाहीं कीं मुलें ही आईबापांची खाजगी मालमत्ता कां समजली जाते! जन्माला आलेलें मूल हें आईचें आणि बापाचेंहि धन नव्हे. तें स्त्रीधन नाहीं आणि पुरुषधन तर नाहींच नाहीं. ती समाजाची, राष्ट्राची अनमोल संपत्ति आहे.

माफ करा, पित्याच्या अहंकारात आणि मातेच्या जिव्हाळ्यात तुम्ही असें समजू नका कीं तुम्हीच त्या अर्भकाचे भाग्यविधाते आहात. असाल, काहीं प्रमाणात असाल. पण तें प्रमाण अगदीं थोडें. जन्माला आलेला जीव आपल्याहि कर्मानें पुढें किंवा मागें जातो. मातापित्याच्या जिव्हाळ्यानें तुम्ही त्या जीवनाला कलाटणी द्या ती कलाटणी योग्य मिळाली तर तुमचें मूल उत्कर्षाची वाटचाल करील आणि त्याबद्दल कदाचित् तें कृतज्ञहि राहील. पण तें कृतज्ञ राहो किंवा न राहो. तुम्हीं मात्र कधींहि त्याच्याशीं कृतघ्न होता कामा नये.

आपल्या किंवा कोणाच्याहि अपत्याच्या घाताला प्रवृत्त होणें हा शुद्ध कृतघ्नपणा आहे. त्याच्याशीं आणि समाजाशीं सुद्धा. तुमच्या भावना मी समजू शकतों. तुमच्या प्रक्षुब्धतेचाहि अर्थ मला कळतो. पण त्या प्रक्षुब्ध भावनेच्या भरात बालहत्या ?— अरेरे, याच्याइतकी दुसरी कोणतीहि निर्घृणता नसेल.

# १४.

## नाचरीं पावलें

बॅले! आपल्याकडे हा नृत्य प्रकार अज्ञात आहे. हें केवळ नृत्य नव्हे. व्यक्तिगत, सांघिक, लोकनृत्याबरोबरच त्यांत भाव–भावनाची उत्कटता व्यक्त करणारें नाट्यहि असतें. संगीत, नृत्य आणि अभिनय याचा बॅलेमध्यें जो मधुर मिलाफ घडून येतो त्याची सर कोणत्याहि नाट्याला आणि संगीतालाहि येणार नाहीं.

पाश्चिमात्याचा हा नृत्यप्रकार आहे–जितका परिणत तितकाच विकसित होणारा. त्याच्या प्रगतीला मर्यादा नाहींत हेंच खरें. शिडशिडीत अंगकाठी, पण तिचा बांधा कसा डौलदार आणि नाजुक. अवयवांत चपलता अशी कीं सळसळणारा सर्प आणि इवल्याशा पायावर क्षणार्धहि स्थिर न होणारी खार यांनासुद्धा या तेजस्वितेचा हेवा वाटावा. तेजच खरें. कडकडणाऱ्या, चमचमणाऱ्या विद्युल्लतेचें तेज!

पण या तेजाबरोबरच भावनाचा किती हृदयगम आविष्कार प्रत्येक कृतीबरोबर, पदन्यासा-बरोबर होत असतो. सुरावटीची साथ नसेल तर बॅलेचें सारें चैतन्यच नाहींसें होईल. आणि विविधरंगी प्रकाश–योजनाच्या साहाय्यानेंच नाचऱ्या पावलातून प्रगट होणारें काव्य हृदयाला भिडू शकेल. मला कळत नाहीं, नाचऱ्या पावलाची नाजुकता अधिक गहिरी, कीं अंगप्रत्यंगातून प्रगट होणारी भावनाची उत्कटता अधिक हृदयस्पर्शी कीं मुद्राभिनयांतून व्यक्त होणारा आशय अधिक चित्ताकर्षक? कोण जाणे! एवढें मात्र खरें कीं, ऑर्केस्ट्राची विविधरम्य सुरावट खुलत असतानाच गोऱ्यापान, शिडशिडीत आणि नाजुक अशा युवयुवतींची देहयष्टी लवलवू लागली, आणि कधीं नुसतेंच प्रसन्न नृत्य, तर कधीं नृत्यातूनच प्रगट होणारी प्रणयकथा तर कधीं भावना प्रक्षुब्ध करणारी हृदयव्यथा आपल्यासमोर उघड होऊ लागली कीं क्षणभर असा आभास निर्माण होतो कीं आपण जणु हवेंत तरगत आहों, कोठल्या तरी स्वप्नसृष्टींतच विहार करीत आहों.

त्या स्वप्नसृष्टीचा पुढें भंग झाला तरी बॅलेचें तें दृश्य डोळ्यांसमोर तरळत राहतें आणि हृदयाच्या एका गाभ्यांत तो अनिर्वचनीय अनुभव कायमचा घर करून राहतो.

बॅले म्हणजे एक सुखस्वप्नच आहे.

# १५.

## पोर रुसली !

देवा, असा प्रसंग वैऱ्यावरहि येऊ देऊं नको. साऱ्या ज्योतिषांना विचारून मुहूर्त ठरविला. सर्वांना समारभाचीं आमत्रणें दिलीं. हाराची व्यवस्था केली. शुभमगल होतांच अभ्यागताचें तोंड गोड करण्यासाठीं तबकभर पेढे तयार ठेवले. सारें सारें काहीं मनासारखें झालें होतें. नियोजित वर कसा खानदानी. उभ्या पृथ्वीवर त्याचा अहोरात्र स्वैर सचार चालू आहे. त्याची श्रीमती कुबेरालाहि लजविणारी. विश्वभाडारच जणू त्याच्या खजिन्यात साठवलेलें आहे असें म्हणा ना. तो उदार तरी कसा ? अगदीं कर्णासारखा. साऱ्या मित्रपरिवाराचे नव्हे त्रिखंडातील लोकांचे, दोष तो पोटात घालतो आणि सारें स्वच्छ करून दुनियेला परत करतो.

खरोखर त्रिभुवनांत असा उदार, असा परोपकारी, असा कर्तव्यतत्पर वर मिळणें कठीण आहे. काय वर्णू त्याचे गुण. नुसता त्याचा जीवनक्रम पाहा. घड्याळ चुकेल पण त्याचा वक्तशीर-पणा निमिषार्धानेंहि ढळणार नाहीं. उभ्या दुनियेंत त्याची जी प्रशस्ति होत असते त्याचें मूळ या गुणात आहे बरें !

चला, आम्हांला वाटलें असा वर सपादन करून आम्ही कृतकृत्य झालों. पोरीनें नशीब काढलें होतें. तशी तीहि मोठी गुणाची. तिच्या सौंदर्यावरच तर वर भाळला. गोरीगोमटी, रेखीव अवयवाची. अहो, तिला दृष्ट लागेल म्हणून कधीं कोणाच्या नजरेससुद्धा तिला पडू दिलें नव्हतें आम्ही. नियोजित वरानेंच तेवढें तिला पाहिलें आणि काय सांगू तुम्हाला ? सागराच्या लाटा उसळतात ना तसें त्याचें अतःकरण उचंबळून आलें.

पोरीनेंहि होकार दिला. म्हणून फाल्गुन शुक्ल तृतीयेचा मुहूर्त विवाह समारभासाठीं ठरविला. शुभलक्षणी मुहूर्त आहे अशी साऱ्या ज्योतिषांनीं ग्वाही दिली होती. म्हटलें चला, शुभमगल होईल आणि वर वधूचें मीलन झालें कीं, आपली एक मोठी जबाबदारी पार पडेल.

पण–पण तें मीलन झालें नाहीं. वर आला, वधूहि आली. सारे वऱ्हाडी जमले. रुपेरी वर्ख लावलेला नारळहि समारभानें फोडला गेला. पण ऐन वेळीं काय झालें कोणास ठाऊक. पोर रुसली. ती मुळीं बोहल्यावर चढावयासच तयार झाली नाहीं. वरानें वाट पाहिली. आणि निराश अंतः-करणानें तो परत गेला. त्याच्याबरोबर वाऱ्यावरची वरातहि परत फिरली.

कां बरें, पोर कां बरें रुसली ?

कोण जाणे ! ' गोदावरी ' ऐन वेळीं कां रुसली ? सागराला तिनें का झिडकारलें ?

# १८.

## " नामदार अर्थमंत्री "

आज अंदाजपत्रक सादर करण्याचा दिवस. अनेक आठवणी मनात उसळतात. डोळ्यासमोर अनेक चित्रें तरळू लागतात. संसदेच्या सभागृहासमोर केवढी लांबलचक रांग लागलेली आहे. अर्थमंत्र्यांचें अंदाजपत्रक त्यांना ऐकावयाचें आहे.

होय. आज अर्थमंत्र्याचा दिवस आहे. बाकीचे सर्व दिवस प्रधानमंत्र्याचे असतात. एका वर्षीं तर याहि दिवशीं तेच ' दूल्हा ' बनून पुढें आले. अर्थखात्याचा तात्पुरता कारभार त्यांनीं हातीं घेतला होता. प्रधानमंत्र्यानीं त्या दिवशीं चामड्याची बॅग हातीं घेतली आणि त्यांतील करभाराचें रहस्य दडविण्यासाठीं जणु ती आपल्या हृदयापाशीं धरून ते सभागृहात आले. त्यानीं बॅग खाली ठेवली आणि लोकाना काय दिसलें ? त्याच्या छातीवरील नेहमीं तजेलदारपणें असणारें गुलाबाचें फूल चुरगळून गेलें होतें.

त्यावरून आठवण झाली. एकदा चिंतामणराव देशमुखहि अंदाजपत्रक सादर करताना कधीं नव्हेत ते गुलाबाचें फूल लावून आले. समोरच्याच स्पीकरच्या गॅलरींत दुर्गाबाई बसल्या होत्या. लोकाना वाटे, अर्थमंत्री आज अडखळत आहेत ते त्यांची नजर अधूनमधून वरच्या गॅलरीकडे जात आहे म्हणून. त्यानी करभार लादला आणि आम्ही प्रतिक्रिया अजमावूं लागलो. कोणीतरी दुर्गाबाईनाच प्रश्न केला. त्यांनीं नकार दिला. तेव्हा एका अवखळ पत्रकारानें त्याना प्रश्न केला, " श्रीमतीजी, देशमुख साहेबांना तुम्ही आजच गुलाबाचें फूल कां बरें दिलेंत ? " दुर्गाबाईनीं स्मितहास्य केलें आणि त्या बोलू लागल्या.

आज अर्थमंत्र्याच्या इतकीच पार्लमेंटरी खात्याचे मंत्री सत्यनारायण बाबू यांची गडबड आहे. ते बाहेर येऊन अर्थमंत्र्यांचें स्वागत करतात आणि त्यांना इतमामानें सभागृहांत घेऊन जातात—चामड्याच्या बॅगसह. अंदाजपत्रकाला ही जोड लागतेच. पण एके दिवशीं मोरारजी देसाई याच्या हातीं कागदाचीच बॅग दिसली. कोठून तरी गुणगुण ऐकू आली कीं, चामड्याची बॅग न नेण्याचा ज्योतिषानीं सल्ला दिला होता. हो, अलीकडे एकतरी प्रख्यात ज्योतिषी या दिवशीं स्पीकरच्या गॅलरींत अगदीं हटकून आढळतो.

योगायोग असेल तो. पण वार्ताविहार कसली जोड कोठें घालून देईल हें कोणी सांगावें. अंदाजपत्रकातील कर–आकारणीबद्दलचें भाकित कोणी चलाख वार्ताहर करतात, तसाच हाहि वार्ताविहार. पण आता घोडामैदान जवळ आहे. तें पाहा, सभागृह तुडुंब भरलें आहे. साऱ्या प्रेक्षकांच्या गॅलऱ्या ओसंडून गेल्या आहेत. अर्थमंत्र्याच्या पुढील बांकावर एक चौकट ठेवली आहे. त्यांत एक सुशोभित विद्युद्दीप आहे. तो दिमाखानें चमकू लागला बरें. त्याबरोबर सभापतींचा आवाज घुमतो.

" नामदार अर्थमंत्री. "

स्वतंत्र भारताचें आणखी एक अंदाजपत्रक सादर केलें जात आहे.

१७.

# पितृछाया गेली

राजेंद्र प्रसाद हे चटका लावून गेले खरे. एक काळ असा होता कीं त्याच्या नाडीच्या ठोक्याबरोबर प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर पडत असे. पण काल्च्या सब्ध दिवसांत त्याच्या जिवाची घालमेल चालू असतांना त्यांच्या आजारीपणाची वार्ताहि जगाला कळली नाहीं. कळली ती त्याच्या निधनाची वार्ता. आणि ती कळली तेव्हां लोकांना धाला पडल्यासारखें वाटलें.

आज राजेंद्रबाबूंचा नश्वर देह अनतांत विलीन होत आहे. त्यांना अखेरचा निरोप देतांना सारें राष्ट्र अश्रुपूरित नेत्रानीं म्हणेल, " आज पुन्हा एकदा आमची पितृछाया गेली. " गांधीजींच्या मृत्यूनतर राजेंद्रबाबू हेच उभ्या भारताला पितृस्थानीं झाले होते.

पण हा पिता मातेच्या वात्सल्यानें आपल्या परिवाराकडे पाहत असे. त्याच्यापाशीं दरारा नव्हता; फक्त ओसडून वाहणारें प्रेम होतें. त्या प्रेमाच्या बळावर त्यानें प्रभुत्व गाजविलें. असें प्रभुत्व कीं, सन्मानपदें त्याच्या चरणीं अर्पण करण्याशिवाय राजकारणी पुरुषांना गत्यंतरच राहत नसे. त्याची प्रतिष्ठा असामान्य; कॉंग्रेस पक्षांतील त्यांचें पाठबळहि लोकोत्तर. म्हणून घटना परिषदेचें अध्यक्षपद आणि दोन वेळां राष्ट्रपतिपद अनाहूत असें त्याच्या पायाशीं चालत आलें. तिसऱ्या खेपेला त्यांनीं स्वत.च राजसन्यास घ्यावयाचें ठरविलें.

राजसन्यास ! एखाद्या राजानें सन्यास घ्यावा त्यावेळीं जसा सोहळा होई त्याला साजेशा समारभानें सरकारनें त्याना निरोप दिला. आणि लोकांनीं ? मूक अश्रू गाळून. जे अश्रु, पूर्वीं राजेंद्रबाबू सेन याच्या नर्सिंग होममध्यें जीवनमरणाचा लढा खेळत होते त्यावेळीं असंख्य लोकानीं आवरून धरलेले; त्या अश्रूना आज मात्र निःसंकोचपणें वाट करून द्यावयाची वेळ आली आहे.

राजेंद्रबाबू गेले. ते राष्ट्रपति झाले, भारतरत्नहि झाले. पण लोकांचे ते राजेंद्रबाबूच राहिले. योग तरी पाहा. किंवा याला सफल योग-साधना म्हणता येईल का ? राजेंद्रबाबूना जें हवें होतें तेंच घडलें. राष्ट्रपतिपदावर असताना त्यानीं मृत्यूला परतविलें. पण सदाकत आश्रमात आपलें पूर्वाश्रमींचें जीवन जगत असताना मात्र त्यांनीं सहजपणें मृत्यूच्या हातीं स्वतःला स्वाधीन केलें. जणु त्यांच्या मनींची इच्छा एकच होती, कीं मरण यावें तें राजवैभवांत नव्हे; तपोवनाच्या, प्रिय आश्रमवासीयांच्या सान्निध्यांत तें यावें. घडलें तसेंच.

राजेंद्रबाबूनीं आपल्या आवडत्या सदाकत आश्रमांत देह ठेवला. जेथें त्यांचें त्यागमय जीवन सुरू झालें तेथेंच त्यांनीं आपल्या त्यागी जीवनाचा अत केला.

१८.

## नशिबाचा खेळ

गरगरा, गरगरा, गरगरा फिरलें ! एक देऊळ. ज्ञानेश्वराच्या काळीं म्हणे हा चमत्कार झाला. त्याची जाहिरात आपल्या समतानद गद्रे यानीं या शब्दात विसाव्या शतकांत केलेली मला ठळकपणें आठवते. कोणत्या चित्रपटाच्या निमित्तानें कीं नाटकाच्या तें मला नीटसें आठवत नाहीं.

आज प्राइझ बॉंडच्या भाग्यपेट्या गरगरा फिरू लागल्या त्या वेळीं या प्रसंगाची मला प्रकर्षानें आठवण झाली. तुमचें सर्वांचें भाग्यच जणू फिरत होतें. पण काय गमत पाहा. तुमच्या अपरोक्ष. कोण जाणे, कदाचित् तुमचा भाग्यवान क्रमाक येईल, येऊनहि गेला असेल आणि तुम्हांला त्याची कल्पनाहि नसेल. तुमच्यापैकीं अनेकाना पुढेंहि कधीं येणार नाहीं.

दैवाचें हें असें असते बघा. चक्रवाक पक्षी नाहीं का ? आपल्या प्रियेची रात्रीच्या शुभ वेळीं तो आतुरतेनें वाट पाहत असतो. तिला साद घालीत असतो, तिच्यासाठीं आकात करीत असतो. त्याची प्रिया सुद्धां तशीच संगमोत्सुक झालेली असते. आणि दैवाची गति अशी कीं ते दोघेहि एकमेकांच्या जवळ असतात. पण त्यांना परस्परांचा माग लागत नाहीं.

तसेंच हें भाग्य त्या भाग्यपेटींत फिरत असतें. रिझर्व्ह बॅंकेचे अधिकारी बिचारे तुमच्यासाठीं त्या पेट्या घुसळून काढीत असतात, भाग्यवताचे क्रमाक उच्चरवानें जाहीर करीत असतात. केवढा खटाटोप, केवढा आटापीटा, केवढी निरपेक्ष धडपड. कशाकरिता ? तुमचें भाग्य उजळावें म्हणून. इथें तुम्ही म्हणजे भाग्यवान् क्रमाकाचे मानकरी. त्या मानकऱ्याचा शोध निःपक्षपातीपणानें व्हावा म्हणून ही सारी धडपड.

तुम्हाला त्याची कल्पना नाहीं. तुम्ही कोण, त्याची रिझर्व बॅंकेला कल्पना नाहीं. आपलें कर्तव्य ती करीत राहते, सेवेच्या भावानें भाग्य घुसळलें जातें. क्रमांकाची घोषणा होते. तिची जाहिरातहि सरकारी गॅझेटातून रीतसर होईल. जे जागे असतील त्याना आपल्या भाग्याचा पडताळा मिळेल. असे भाग्यवत थोडे. हजारांनीं कमविणारे अगदींच हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे. शेकड्यांनीं कमविणारे दोन हाताच्या बोटावर मोजण्यासारखे. दशकांत कमविणारे शेंदोनशें. हे सारे कोट्यवधि लोकांपैकीं.

पण कोणी सांगावें ? कोणाचें दार भाग्य केव्हा ठोठावील तें ! बघा आपले ! जागरूक राहा. नशिबाचा खेळ आहे हा !

## ११.

# सवतीमत्सर

९३७३६

दोन राण्या असल्या कीं त्यांतील एक पट्टराणी मानली जाते. दोन सवती असल्या कीं त्यांतील एक आवडती मानली जाते. म्हणजे दुसरी राणी मानानें कमी, दुसरी सवत नावडती असें समजावें काय ? निदान निरनिराळ्या राण्यांचा आणि सवतींचा तसा समज होतो खरा. त्यातून सवतीमत्सर निर्माण होतो आणि राजदरबारात वा घरांत रुसवा फुगवा आणि धुसफुस पेट घेते.

भगवान् श्रीकृष्णाना सुद्धा हा संघर्ष टाळता आला नाहीं. पण ते अतिचतुर. एकदा पारिजातक वृक्षावरूनच रुक्मिणी व सत्यभामा या त्यांच्या दोन राण्यांमध्यें कलह पेटला. श्रीकृष्णानीं त्यावर सुरेख तोड काढली. त्यानीं वृक्ष लावला सत्यभामेच्या दारीं; पण त्याचीं फुलें मात्र पडत रुक्मिणीच्या अंगणात.

तशीच कांहीशी तोड घटनाकारानीं लोकसभा व राज्यसभा या दोन सभागृहांच्या परस्पर संबंधांबद्दल काढली आहे. म्हणजे त्याना दाखवावयाचें आहे तें हें कीं या सभागृहांत कोणी आवडतें नाहीं, कोणी नावडतें नाहीं; कोणी उच्च नाहीं कोणी नीच नाहीं. पण तरीहि या दोन सभागृहांत सवतीमत्सरासारखा प्रकार घडून येतोच. आणि या दोन्ही सभागृहांत तर असे खंदे वक्ते आहेत, प्रज्ञावत आहेत कीं त्यांच्या आक्षेपांतून जें रण माजतें तें आटोक्यांत ठेवणें सभापतींनाहि कठीण जातें.

तसें पाहिलें तर दोन्ही सभागृहातील सदस्यांचा दर्जा एकच, तनखाहि सारखा आणि सोई-सवलतीहि सारख्या. पण लोकसभेला वाटतें प्रत्यक्ष लोकमतावर आपण निवडून आलो. तेव्हा अप्रत्यक्षपणें निवडून आलेल्या वरिष्ठ सभागृहाच्या सदस्यांपेक्षा आपली प्रतिष्ठा अधिक असावयाला पाहिजे, आपले अधिकार वरचढ असावयाला पाहिजेत. त्या प्रतिष्ठेचा साक्षात्कार निदान वर्षांतून एकदां तरी होतो आणि तो अंदाजपत्रक मांडलें जातें त्या दिवशीं. अंदाजपत्रक प्रथम ऐकण्याचा मान लोकसभेलाच् मिळतो.

पण त्यावरील चर्चा मात्र प्रथम राज्यसभेंत सुरू होते. सत्यभामेच्या दारीं पारिजातक पण फुलें मात्र रुक्मिणीच्या अंगणात असा काहींसा हा प्रकार आहे का ? लोकसभेच्या सदस्यांना तसें वाटलें खरें. राज्यसभेला ही भावना अपमानास्पद वाटली आणि तिनेंहि अकांडतांडव सुरू केलें.

राजकारणातील हा सवतीमत्सर हीं दोन सभागृहें आहेत तोंवर असाच चालू राहणार. सध्या जवाहरलाल नेहरू श्रीकृष्णाच्या चातुर्यानें त्या दोन सभागृहात दिलजमाई ठेवतात. पण त्यानाहि कधींकधीं हा कलह मिटविणें कठीण जातें. पण दोन राण्या आणि दोन सवती यांच्यामधील भांडण इतरेजनांना मनोरंजकच वाटतें नाहीं का ? पत्रकारांची आणि वार्ताहरांची या दोन ' सभागृहाच्या संघर्षा ' तून अशीच करमणूक होत असते.

## १००.

# ही कबर कोणाची ?

स्तालिनची समाधि म्हणा, कबर म्हणा, आज त्याच्या दहाव्या मृत्युदिनाच्या दिवशीं बर्फानें आच्छादिलेली होती. सूर्यकिरणांनीं तें बर्फ वितळलें आणि ती कबर मोकळी झाली.

पण तिच्यावर एखादा पुष्पगुच्छ ठेवण्याची आजहि कोणाला आठवण झाली नाहीं. स्मृतिदिनाचीच जेथें आठवण विसरली गेली तेथें पुष्पमाला कोण घालणार ? दहा वर्षें झालीं. फक्त दहा वर्षें. आणि एके काळचा सोव्हियट युनियनचा चंद्र, सूर्य, तारा आज निखळलेल्या ताऱ्याप्रमाणें कोळसा होऊन पडला आहे.

साऱ्याच हुकुमशहांची ही दशा होते का ? हिटलर. जगज्जेता होणार होता तो. पण अखेरीस पराभूत अवस्थेंत आत्मघात करावा लागला त्याला. आणि कसला आत्मघात ? इव्हा ब्रॉनला आपली धर्मपत्नी म्हणून मान्य केल्यानंतर कांहीं तासांच्या आंत विषप्रयोग करून घेतला त्यानें. त्या दोघांच्या मृत देहांना कोणीतरी अग्नि दिला.

हिटलरपेक्षांहि अधिक विटंबना झाली मुसोलिनीची. तसाच एक प्रबळ हुकुमशहा तो. पण प्रेयसीसह रस्त्यात प्रेत तुडविलें गेलें त्याचें. त्याला कोणी मूठमाती दिली, कशी दिली हेंहि अद्याप कोडेंच आहे. हिटलरप्रमाणेंच त्याची प्रेयसी क्लारा पेटाक्सी अखेरपर्यंत त्याच्या पाठीशीं उभी राहिली हेंच त्या दोघांच्याहि अपमानित मृत्यूंतील साम्य.

स्तालिन परात्या गादीवर पडल्या पडल्याच मृत्युमुखीं पडला. कोणी म्हणतात त्याच्यावरहि विषप्रयोग झाला. वदंता अशी आहे कीं तीन दिवसपर्यंत त्याच्या मृत्यूची वार्ताच जगाला कळू देण्यांत आली नाहीं. असेलहि. भेदरून त्याच्या भोवती वावरणाऱ्या शिष्योत्तमांना दिलासा मिळावयालाच तेवढे दिवस आवश्यक झाले असतील. ते आपापसांत म्हणाले असतील, " खरच कां स्तालिन गेला ? बघा बरें, तो डोळे उघडील अचानक. "

स्तालिननें डोळे उघडले नाहीत. तीन दिवस गेले. तीन वर्षेंहि उलटलीं. स्तालिनच्या पापण्या मिटलेल्याच राहिल्या. त्याचें कलेवर निश्चेष्ट राहिलें. आणि मग सोव्हियट युनियनच्या नव्या राज्यकर्त्यांना धाडस झालें. कसलें ? त्याचें कलेवर हलविण्याचें, त्याची आठवण पुसून टाकण्याचें, व त्यासाठीं क्रूर, कर्दनकाळ म्हणून त्याचें चित्र रंगविण्याचें.

स्तालिन आज आठवणींत राहिला असेल तर तो एक दुरात्मा म्हणून. या दुरात्म्याला वंदन कोण करणार ? त्याची आठवण तरी कोण करणार ?

स्तालिनच्या कबरीवर म्हणूनच आजच्या त्याच्या दहाव्या मृत्युदिनींसुद्धा एकहि पुष्पगुच्छ कोणी ठेवला नाहीं.

## १०१.

# आज हमारी होली

" रक्त गुलाल से भर ले झोली आज हमारी होली " हें गीत हरींद्रनाथ चट्टोपाध्याय यांनीं १९३० सालच्या कायदेभंगाच्या आंदोलनाच्या संदर्भात रचलें होतें. पण होळीच्या समारंभात दरवर्षी त्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. कारण उत्तर हिंदुस्थानांत तरी होळी ही रंगपंचमीसारखीच साजरी केली जाते. तो रंगोत्सवच असतो—जितका भडक तितकाच दिलखुलास.

त्या वेळेसारखे दिलखुलास वातावरण दुसऱ्या कोणत्याच सणांत आढळून येणार नाहीं. तेथें गरीब आणि श्रीमंत स्त्री आणि पुरुष तरुण, वरुण आणि अरुण, असा कोणत्याच प्रकारचा भेद नसतो. सर्वांना एकत्र, समान पातळीवर आणण्याचें कार्य रंगानें पार पाडलेलें असतें.

आज तुमचा दिमाख मात्र चालणार नाहीं. रस्त्यावरचा वाटसरूहि आलीशान गाडींतून जाणाऱ्या स्त्रीपुरुषांना रोखून धरून आज त्यांचीं मुखकमलें लाल, हिरवीं, पिवळी करील. त्या रंगाची पिचकारी तुमच्यावर रोखली गेली नाहीं तर मात्र तेवढेंच तुमचें भाग्य समजा. अरे बाबांनो, आज कपाळावरच्या आठ्यांना कोणी घाबरणार नाहीं. संकोच आणि संयम यांना आज अणुमात्रहि वाव नाहीं. पण एक गोष्ट लक्षांत ठेवा. हा जल्लोष आणि ही रंगाची उधळण संमिश्र समाजांत होत असते आणि म्हणूनच सभ्यतेच्या मर्यादांचें त्यात कधींहि उल्लंघन होत नाहीं.

थोडा फाजील उत्साह, थोडासा अतिरेक कोठें दाखविला जात असेल, नाहीं असें नाहीं. पण तो, रंगछटा गडद बनविण्याच्या किंवा त्या रंगाचा मारा करण्याच्या बाबतींतच. त्याची झळ राष्ट्रपतींपासून मानानें आमंत्रण देऊन बोलावलेल्या परदेशी पाहुण्यापर्यंत कोणालाहि पोचू शकते. गेल्या वर्षीच पाहाना. जॅकलीन केनेडीसुद्धां त्या माऱ्यातून वाचू शकल्या नाहींत. प्रधानमंत्र्याच्या घरीं जाऊन त्यांहि प्रत्यक्षपणें हा रंग खेळल्या. किती आगळा अनुभव त्यांना आला असेल नाहीं !

खरोखर आज जर त्यांना कोणी होळीची आठवण करून दिली तर गतवर्षीच्या दिल्लींतील होलिकोत्सवाचा पुनःप्रत्यय घेण्याची स्फूर्तिसुद्धां त्यांना झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपली स्फूर्ति मात्र आज आटलेली आहे. राजेंद्रबाबूंच्या निधनाचें दुःख अंतःकरणांत सलत असतांना, " आज हमारी होली " म्हणून चौफेर रंग उधळण्याइतकी निर्लेप वृत्ति कोण दाखवू शकेल ?

# १०३.

## पंडितराज जगन्नाथ

उर्दू शायरीची नजाकत, संस्कृत काव्याची धीरगंभीर प्रतिभा आणि मराठी भाषेचा गोडवा यांचा मनोहर मिलाफ ' पंडितराज जगन्नाथ ' या नाटकात झाला आहे. तसाच संयोग झाला आहे तो अभिजात काव्य आणि नर्म विनोद, दर्दभरा दिल आणि क्षुद्र मनोवृत्ति, शास्त्रोक्त संगीत आणि फुटकळ शेर, उत्स्फूर्त सवाल जबाब आणि ओढून ताणून आणलेलीं नृत्यें यांचा होय.

एका उदात्त कविराजाच्या जीवनावरील हें नाटक. तसें गंभीर. पण अर्ध्या भागांत नाटककाराच्या मनोवृत्तीचा व जीवनदृष्टीचा असा कांहीं प्रभाव पडला आहे कीं आपण हें नाटक पाहत आहों कीं फार्स याबद्दलच संभ्रम निर्माण व्हावा. नाटक हें पाहण्यासाठीं असतें, नुसतें वाचण्यासाठीं नव्हे. त्याची खुमारी नाट्यप्रयोगांतच कळून येते. ती खुमारी गंभीर प्रवेशात जाणवते. पण त्याहिपेक्षां अधिक जाणवते ती कळस गाठणाऱ्या विनोदपूर्ण प्रवेशात.

एवढें खरें कीं, पंडितराज जगन्नाथ पाहावयाला गंभीर मुद्रेनें येऊन चालणार नाहीं. त्यात काव्य आहे, नाट्य आहे, संगीत आहे, खळखळून हसविणारा विनोद आहे, खूपसा धांगडधिंगा आहे, भरपूर शृंगार आहे; शब्दांची, कल्पनांची व कोट्यांची आतषबाजी आहे आणि खूपसा वाह्यात्‌पणाहि आहे, नाटककार मोठा रसिक आणि प्राजळ. संकोच असा तो मानतच नाहीं. कशाला मानावा ? नाट्यगृहात जमलेल्या संमिश्र समाजालाहि त्या निःसंकोच वृत्तीचें वावडें वाटलें नाहीं.

खूप रंगला तो समाज. स्त्रीसौंदर्याचें उत्तान वर्णनहि त्यानें ऐकलें. स्त्री–सहवासाबद्दलची लालसाहि त्यानें पाहिली आणि दिल खुष होऊन कलंदराच्या कलंदर वृत्तीशीं तो समरस झाला. पण म्हणून पंडितराजाच्या पहिल्या प्रीतीचा बहर ओसरून ते भक्तिमार्गाकडे वळले तेव्हा त्या समाजाला कांहीं अनैसर्गिक वाटलें असें मात्र नव्हे. गंगा आणि यमुना हीं त्या समाजाच्या भावभावनांना अभावितपणें स्पर्श करून जाणारीं पवित्र स्थानेंच आहेत. त्या नद्या, तीं तीर्थस्थानें, तीं स्तवनें आणि तें प्रभुचिंतन यांना भक्तिपर भारतीय समाजाच्या अंतःकरणांत एक आगळेंच स्थान प्राप्त झालेलें आहे. मग प्रीतीकडून भक्तीकडे, भोगाकडून त्यागाकडे जाणारा नाटकाचा प्रवाह पाहून त्या समाजाच्या चित्तवृत्ति पुलकित कां होणार नाहींत ?

पंडितराज जगन्नाथाच्या जीवनाचा पट उघळला गेला तेव्हां, म्हणूनच करुण भावनेनें प्रेक्षकांचीं मनें भरून गेलीं. पण तरीहि त्यांच्या अंतर्मनात तरळत राहिली ती त्या नाटकातील मैफलीची अवीट गोडी.

१०३.

## सामर्थ्य मात्र द्यावें

पुणें हें एके काळीं सर्व दृष्टींनीं सुरक्षित व सोइस्कर असें स्थळ मानलें जात होतें. हवा प्रसन्न, पाऊस माफक, उन्हाळाहि मर्यादित, शिक्षणाच्या सुखसोयी, फळें आणि भाजीपाला मुबलक आणि एकदरीनें जीवन सुखाचें अशी पुण्याची ख्याति. त्यामुळें विद्यार्थ्यांना पुण्याचें आकर्षण आणि निवृत्तांना तर उरलेसुरलेले दिवस सुखासमाधानानें घालविण्याचें एकमेव स्थळ असें वाटून त्याच्या पुण्यावर उड्या पडावयाच्या.

पण पानशेत फुटलें आणि पुण्याचें नशीबच जणु फुटलें. त्या दिवशीं पुण्याची शान आणि सुरक्षितताहि वाहून गेली. घरें बुडालीं, चीजवस्त गेली. लोक अनाथ, बेघर झाले. मग पाण्याचा तुटवडा आला, सारींच नियंत्रणें आलीं. लोकांनीं एक मानलें, चला जीवन तर जगतें आहे ना. पाणी मोजूनमापून घ्यावें लागत आहे. ठीक आहे; हेहि दिवस निघून जातील.

ती गोष्ट दूरची खरी. पण आशेवर माणसें जगत होतीं आतां त्या आशेला तडा पडण्यासारखी आणखी एक आपत्ति पुण्यावर कोसळली आहे. काल पाण्याचा आणि विजेचा असा दोन्हींचाहि पुरवठा बंद झाला. पूर्वी दैवी आपत्ति आली. आतां मानवनिर्मित. पुण्याची जणू कसोटीच दैवानें पाहावयाची ठरविली आहे.

होऊ द्या म्हणावें. कसोटीला पुन्हां एकदा पुणें उतरेल. आज पुण्याचे लोक परमेश्वराची करुणा भाकतांना एवढेंच म्हणतील, “ आकाशिच्या कुऱ्हाडी, माथां खुशाल पाडी । आघात सोसण्याचें, सामर्थ्य मात्र द्यावें ! ”

हें सामर्थ्य आणि थोडी अधिक गुणग्राहकता. मी म्हणणार होतों कृतज्ञता. पण म्हटलें नको ! पुण्याचें भाग्य केवढें मोठें. त्याच्यावर संकट कोसळलें आणि सारी सरकारी यंत्रणा त्या शहराच्या पुनर्वसनासाठीं अहोरात्र झटू लागली. त्यात भर पडली ती गावोगांवच्या, दूरदूरच्या लोकांनीं केलेल्या उत्स्फूर्त मदतीची. पैशाचा नुसता पूर लोटला, दात्यांनीं दोन्ही हातांनीं उदंड दिलें.

गरीबगुरीबानीं अन्नधान्य, कपडे, भांडींकुडीं, पैसे घेतले—कृतज्ञतेच्या भावनेनें. बिचाऱ्यानीं आपल्या अश्रुवाटे आपल्या भावना व्यक्त केल्या. या भावनांना सर्वांनींच साथ दिली असें म्हणतां येईल काय ? पानशेतच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या वेळीं पुण्यांतील भाषणांतून आणि लेखनातून प्रामुख्यानें ऐकूं आली ती कुरकुर नव्हे आक्रोश—आणि दोषदिग्दर्शन. वाणी-लेखणींत पटाईत असलेलें पुणें कृतज्ञतेचा शब्द देण्यात कंजूष झालें.

पुण्याच्या आपत्तीनें कळवळून येणारा महाराष्ट्र आणि भारत पुण्यापासून जरा निराळी अपेक्षा करतो.

## १०४.

### संपादक महाराज.

माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री डॉ. गोपाल रेड्डी यानीं मोठ्या प्रांजलपणें सांगून टाकलें कीं, मी बहुधा अग्रलेख वाचीत नाहीं. मला वाटतें त्यांनीं स्वतःचेंच नव्हे तर बहुसंख्य वाचकांचें हृद्गत सांगितलें.

गोपाल रेड्डी हे दैनिक वृत्तपत्रांतील अग्रलेखांबद्दल बोलत होते हें येथें कटाक्षानें लक्षांत ठेवलें पाहिजे. नाहींतर आक्रोश आणि आकांडतांडव करणारे संपादक शिरा ताणून या संदर्भांत लोकमान्य आणि आगरकर आणि इतर महनीय संपादकांच्या परंपरेची ख्याति गाऊन संपादकवर्गाचा अपमान झाल्याच्या घोषणा करूं लागतील.

तसा अपमान वगैरे यांत कांहीं नाही. वस्तुस्थितीचें हें दिग्दर्शन आहे. उज्ज्वल परंपरा, ऊर्जस्वल लेखन, प्रक्षोभक विचारप्रदर्शन वगैरे वगैरे शब्दप्रयोग व्याख्यानांत ठीक आहेत. येथें सवाल आहे तो दैनिक वृत्तपत्राच्या बहुसंख्य वाचकांच्या आवडीनिवडीचा. वृत्तपत्र हा धर्म आहे कीं धंदा आहे, याच्याबद्दल सामान्य वाचक उरस्फोड करीत बसत नाहीं.

तो आपल्या आवडीच्या चुरचुरीत बातम्यांकडे वळतो, त्यांवर सहज घाईगर्दींत दृष्टिक्षेप टाकतो. बहुशः मथळ्यांवरच त्याची दृष्टि खिळते आणि त्यांत त्याला रस वाटला तर ठळक काळ्या अक्षरांतील परिच्छेदापर्यंत तो नजर फिरवितो. 'नजर फिरविणे' हें महत्त्वाचें आहे त्या क्रियेंतून त्याला वार्ता कळते आणि बस्स ! तेवढ्यानें त्याचें समाधान होतें. दैनिक वृत्तपत्र हें वृत्तासाठीं वाचलें जातें हें तर त्याच्या नांवावरूनच सिद्ध होत नाहीं काय ?

आतां वृत्त किंवा वार्ता याचें आकर्षण प्रत्येकाच्या आवडीनिवडी, लहरी आणि वृत्ति यांवर अवलंबून असतें. कोणा गंभीर प्रकृतीच्या लोकांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या वार्ता आवडतील तर कोणी खळबळ उडविणाऱ्या घात-अपघात-आत्मघाताच्या बातम्यांचे षोकिन असतील. तथापि सर्वांचें एकमत होतें तें वृत्तपत्राच्या या स्वरूपाबद्दल. बातम्या-चुरचुरीत, दिलखुलास आणि ठळकपणें सुशोभित केलेल्या हेंच दैनिक वृत्तपत्राचें प्रधान अंग असतें.

तेवढ्यासाठींच पहिल्या पानाला दैनिकाच्या जीवनांत मानाचें स्थान दिलें जातें. तेंच खरें मानाचें पान. आणि अग्रलेखाचें पान ?-त्याचाहि क्रमांक पहिला म्हणा. पण उलट्या बाजूनें. संपादक महाराज, ही वस्तुस्थिति आहे. गोपाल रेड्डींनीं ती खुल्या दिलानें कथन केली. वाचकांची नाडी ज्यांना समजते त्यांचेंहि मत यापेक्षा वेगळें असणार नाही.

माझेंहि मत तेंच आहे हें का सांगावयाला पाहिजे ?

१०५.

## सागरा, तूंच मला आधार

अरे, आज हें झालें आहे तरी काय ? केवढा गजबजाट, केवढी धावपळ, धावपळच का ? नुसती शर्यत लागलेली असते. अष्टौप्रहर एका वेळीं तीन तीन वाहनें दुतर्फा वायुगतीनें धावत असतात या रस्त्यानें. पलीकडे अथाग सागर. अलीकडे रस्त्याची चंद्रकोर. त्या चंद्रकोरीच्या आकर्षणानेंच जणु सागराच्या लाटा उन्मादानें घनगर्जना करीत येतात आणि निराश होऊन परततात.

भरती आणि ओहोटी हा सागराचा जीवनक्रम. पण कधींहि न मावळणाऱ्या या चंद्र-कोरीची ओढ अशी जबरदस्त कीं सागराला तिच्या सहवासापासून कधींहि दूर जाता येत नाहीं. न जाणो, ती एखाद्या शुभक्षणीं आपल्यावर प्रसन्न होईल आणि आपण नसलों तर ? हाच विचार सागराच्या मनांत तरळत असेल.

होय. कधींकधीं रस्त्याची ती चंद्रकोर सागराला आवाहन करते बरें ! पण त्या आवाहनाची वेळ कोणती ? आकाश सारें मेघानीं व्यास झालें आहे, पावसाच्या सरीवर सरी कोसळत आहेत. अशा वेळीं, " अंग भिजलीं जलधारानीं " अशा अवस्थेंत ती चंद्रकोर आपलें अंग लपवीत असतांना सागर धिटाईनें पाऊल पुढें टाकतो आणि उचंबळून येऊन तिच्या अंगावर झेप घेतो. एकच झेप. अल्लड चंद्रकोर क्षणभर सागराच्या कुशीत विसावते. पण दुसऱ्याच क्षणीं ती अंग चोरून घेते आणि बिचारा सागर निराश होऊन मागें फिरतो.

पण परत येण्यासाठीं. सागराचा आणि चंद्रकोरीचा हा लपंडाव साऱ्या वर्षाऋतूत चालू असतो—आणि त्यानंतर ? रस्त्याची ही चंद्रकोर आधुनिक जीवनाशीं समरस होऊन जाते. तिला सागराचें भानहि राहत नाहीं. ती गुंग होते ती मानवी जीवनाची धांवपळ पाहण्यात.

कसली ही जीवघेणी धांवपळ. या पाहा चकचकीत मोटारी, रंगीबेरंगी, लहानमोठया, चित्रविचित्र आकाराच्या. सागराचा धीरगंभीर निनाद त्या विजेप्रमाणें चमकणाऱ्या, चकाकणाऱ्या आधुनिक वाहनांना ऐकू येत नाहीं आणि चंद्रकोरीच्या त्यांवर खिळलेल्या दृष्टीलाहि त्या सागराची साद ऐकू येत नाहीं.

पण ?—पण आज हें काय झालें ? आज ही चंद्रकोर अशी उदास का ? आणि आज ती अशी एकाकी, हताश कां ? कोठें गेला तो चकचकाट, कोठे गेली ती वर्दळ ?

काय ? काय म्हणतां तुम्ही ? रस्त्याच्या या चंद्रकोरीवर—आज वाहनांना बंदी आहे ? का ती ? पंडितजींचें चौपाटीवर भाषण आहे म्हणून ? हाय रे दैवा !

ती पाहा, ती पाहा चंद्रकोर. जणु आक्रंदन करीत म्हणत आहे, " सागरा तूच मला आधार. "

१०६.

## खुणेचा शब्द

गेले कांहीं दिवस उन्हाळ्याची चाहूल लागत होती. आज त्याची खूण पटली. हा खुणेचा शब्द कोयल गीतातून उमटला. ज्याला 'प्लेन्टिव्ह नोट' म्हणतात ती त्या 'कुहू कुहू' या कर्ण-मधुर आवाहनातून प्रगट होते. हें आवाहन कीं आक्रदन ? क्षणभर त्या हाकेंतील आर्तता जाणवते आणि वाटतें कीं हें विरहिणीचें आक्रदन तर नव्हे ?

पण ते सकाळच्या प्रसन्न वेळीं कशाला ? नाहीं नाहीं. सतारीचे बोल नाही का अशाच रीतीनें हृदय पिळवटून काढीत ? पण हृदय फुलविणाऱ्या, आनंद निर्माण करणाऱ्या नादलहरीहि त्यांतूनच उमटतात. कोकिळेच्या कुहू गीतात आर्तता असेल. पण प्रसन्न हृदयानें अरुण-किरणाचें स्वागत करण्याची उत्कटताहि त्यातून व्यक्त होत नाहीं काय ?

प्रसन्न वेळ, प्रसन्न वातावरण. त्या वातावरणांत कोकिळेचा आवाज घुमतो. किती दुरून आल्यासारखा तो वाटतो. किती दूरवर पोंचतो. पानाच्या दाट झाडींत आवाजाची ही जन्मजात देणगी लाभलेली कोकिळा दिसतसुद्धां नाहीं. त्या इवल्याशा देहांतून सारें आसमंत भारून टाकणारी ती लल्कारी निघते तरी कशी कोण जाणे !

पण ती ऐकताच हें कोडें उलगडण्याचा विचारसुद्धा मनाला शिवत नाहीं. नादलुब्ध अंतः-करणांतून उचंबळून उद्‌गार तेवढे निघतात. "ऐकव तव मधु बोल, कोकिळे, ऐकव तव मधु बोल." ते बोल कानीं पडण्याचें भाग्य मात्र आजच्या शहरी जगांत ज्यांच्या वांट्याला येत असेल असे भाग्यवंत विरळाच.

दिवसेंदिवस ते अधिक विरळ होत जातील—जसे वृक्ष आणि त्यावर विसावणाऱ्या लता. आजच्या नवोदित आणि नियोजित भारतात वृक्षाना महत्त्व आहे तें फक्त घोषणांच्या पुरतें. या घोषणा होतात, वनमहोत्सवहि साजरे केले जातात पण त्याच वेळी रस्तोरस्तीं, जंगलमाळातून निर्घृण-पणें वृक्षांचा संहार केला जातो. हा संहार सरकारी पातळीवरून होतो तसाच लोकांच्या लहरीप्रमाणेंहि होत असतो.

सारेच जॉर्ज वॉशिंग्टनचे अवतार. फक्त वृक्ष तोडण्यापुरते. या बाल वॉशिंग्टनांची फौज कैऱ्याच्या शोधार्थ निघते आणि मुसमुसून बाहेर आलेला आम्रवृक्षाचा मोहरहि त्याच्या निर्दय बाळलीलाना बळी पडतो.

मोहर, फुलें, फळें आणि वृक्ष. सारेच बळी. आणि मग उरलेल्या उजाड माळातून कोकिळेचें कूजित तरी कोठून ऐकू येणार ?

# १०७.

## गुढ्या आणि तोरणें

"नवें वर्ष तुम्हाला सुखाचें जावो" अशी सदिच्छा प्रगट करण्याची महाराष्ट्रात प्रथा नाहीं. पण आपल्या नव्या वर्षाच्या सुरुवातीला घरोघरीं गुढ्या उभारून आपण या मंगल दिवसाचें स्वागत करीत असतो.

गुढ्या आणि तोरणें हीं आनंदाचीं तशीच शुभेच्छेचीं प्रतीकेंच आहेत म्हणाना. नव्या वर्षाचें स्वागत जसें आपण या गुढ्या--तोरणांनीं करतों तसाच विजयाचा आनंद आणि प्रियजनांच्या भेटीचा उत्सवहि आपण त्याच तऱ्हेनें साजरा करतो.

काय योगायोग आहे पाहा. कॉंगोतील आपल्या काहीं पलटणी याच सुमारास मुंबईच्या बंदरात उतरत आहेत. त्यांचें हार्दिक स्वागत करण्यासाठीं खुद्द संरक्षणमंत्री येथें येऊन थडकले. लोकांनींसुद्धां आपल्या या शूर सैनिकांचे तितक्याच उत्साहानें स्वागत केलें. आधींच हा सणाचा दिवस; त्यांत प्रियजनांचें स्वगृहीं आगमन.

मग घरोघरीं उभारलेल्या गुढ्यातोरणांना निराळाच अर्थ आला तर त्यात काय नवल! मायदेशीं परतलेल्या शूर सैनिकांनो, हीं गुढ्या-तोरणें केवळ नव्या वर्षाचें स्वागत करण्यासाठींच उभारलेलीं नाहींत. विजयी वीरांचें यथोचित स्वागत करण्याचें उद्दिष्टहि मनोमनीं तरळत असलेलें तुम्हांला त्यात आढळून येईल.

भारत आणि कॉंगो यांच्यामध्यें केवढें तरी अंतर-वर्णाचें, भाषेचें, संस्कृतीचें, भिन्न विचार-सरणीचें. पण खऱ्याखुऱ्या शांतिदूतांचें कार्य करण्यासाठीं आपलें सैनिक तेथें गेले. सैनिक आणि शांतिदूत! होय. या वेळीं शांतताप्रस्थापनेचेंच कार्य आपल्या सैनिकांना करावयाचें होतें आणि तें शक्य तितकें कमी रक्त सांडून, प्रसंगीं आपल्या जिवाचें मोल देऊन, पण त्या देशातील लोकांचे प्राण वांचवून. भारतीय सैनिकांनीं शांतिदूताचें तें अवघड पण तितकेंच नाजुक कार्य अपेक्षेबाहेर यश मिळवून पार पाडलें.

हे खरे शांतिदूत कीं ज्यांनीं शस्त्र हातीं असूनहि अहिंसेचें पालन केलें. हे खरे शांतिदूत कीं ज्यांनीं सभोंवतीं काहूर उठलें असतांनाहि आपल्या मनाची शांति ढळू दिली नाहीं. तत्त्वाशीं निष्ठा त्यांनीं ठेवली आणि देशाची कीर्ति या निष्ठेनें त्यांनीं उजळ केली--इतक्या उज्ज्वल रीतीनें कीं शांतीचा बकवा करणाऱ्या, अहिंसेचा जप करणाऱ्या शांतियात्रींनीं त्यांच्यापासून बोध घ्यावा.

पण ते अहंकाराचे पुतळे भारताच्या शूर पण तत्त्वनिष्ठ सैनिकांपासून धडा कसा घेतील! बरें आहे बाबांनो, खुशाल शांतियात्री म्हणून पेकिंगला जा. आम्ही आमच्या शूर सैनिकांच्या आणि खऱ्याखुऱ्या शांतिदूतांच्या स्वागतासाठीं घरोघरीं गुढ्या-तोरणें उभारू.

१०८.

## जिवाची मौज

महालक्ष्मी ! देवालय नव्हे, शर्यतीचें मैदान. तें आता उजळून निघणार आहे. शर्यतीचें मैदान-माणसांनीं कसें फुलून जातें. नुसती रीघ लागलेली असते लोकाची आणि उत्साह केवढा, चैतन्य केवढें आणि उलाढाली तरी केवढ्या. सहस्रावधि, नव्हे लक्षावधि रुपयांचा तेथें व्यवहार होतो आणि चुराहि होतो.

मग रित्या खिशानें लोक परततात. बरें तर बरें. त्या वेळीं काळोख पडूं लागलेला असतो. भकास, उदास चेहरे न्याहाळून पाहिल्याशिवाय दिसत नाहींत थोड्याच वेळांत गर्दी ओसरते. सारें मैदान निर्जन होतें आणि त्यावर काळोखाचें साम्राज्य पसरतें.

पण आतां तें मैदान उजळून निघणार आहे बरें. आता घोडे धांवतील, शर्यती लागतील त्या भडक, झगझगीत प्रकाशांत. साऱ्या शर्यती आतां सूर्यास्तानतर सुरू होतील. होय सूर्यास्तानतर. कारण कारखान्यांत, कचेऱ्यांत काम करणाऱ्या लोकाना दिवसा गुतून राहावें लागतें त्याची सोय नको का बघावयाला ?

शर्यती आहेत. त्यातील घोड्यावर तुम्ही पैसे लावीत आहात, नशिबाची परीक्षा पाहत आहात. कोणी कोणी तर नुसता एक खेळ पाहावयाची हौस भागवीत आहेत. मग ती चूष आणि तो खेळ सर्वांना खुला कां ठेवला जाऊ नये ?

खेळ ? अरे बापरे. आपल्यामध्यें असे कांहीं लोक आहेत कीं घोड्यांच्या शर्यतींना खेळ म्हटलें म्हणून त्यांच्या डोक्यांत अगार भडकेल. ते म्हणतील हा खेळ नव्हे हा जुगार आहे–जीव घेणारा जुगार, संसार धुळीला मिळविणारा जुगार.

आणि आतां तो जुगार, दिवसाढवळ्या होता, तो प्रत्यक्ष विजेच्या रोषणाईंत होणार ! काय हें ? अरेरे, आपल्या अवनतीला, सामाजिक ऱ्हासाला कांहीं मर्यादाच राहणार नाहीं काय ?

सामाजिक नीतीच्या रक्षकानो, जरा शात व्हा. असे अधीर होऊ नका. जीवन हें कर्तव्य-पालनासाठीं असते तसेंच आनद लुटण्यासाठींहि असतें. तो आनद लुटण्याच्या निरनिराळ्या रीति असतात. त्यापैकीं कांहीं तुम्हांला आवडत नसतील. पण ज्याना आवडतात त्यांच्यावर तुमचीं बंधनें कां बरें लादता ?

जाऊ द्या, महालक्ष्मीचें रेसकोर्स उजळून निघत आहे ना. करू द्या लोकाना क्षणभराची जिवाची मौज.

१०१.

## गड आणि पुतळे

सिंहगडावर गेल्यानंतर पूर्वीच्या रोमांचकारी इतिहासाचें स्मरण होऊन मुख्य मन्त्र्याचें हृदय जसें उचंबळून आलें तसेंच ते गहिवरल्यासारखेहि झाले. " गड आला पण सिंह गेला " ही मराठ्यांच्या इतिहासातील स्फूर्तिदायक कहाणी येथें घडली. इथेंच नरवीर तानाजी मालुसरे याची समाधि आहे. इथेंच तो कडा आहे कीं जेथून घोरपडीच्या साहाय्यानें मराठमावळे प्राण पणाला लावून चढून आले.

इथेंच तें देवटाकेंहि आहे कीं, ज्यातील अमृतासारखें पाणी गांधीजींच्या उपवासाच्या काळात गडावरून ठाकरसी पर्णकुटीकडे नेण्यांत येत असे. इथेंच पुन्हां तो लोकमान्यांचा बंगला आहे कीं, जो इतिहासाच्या स्मृतिशेषाप्रमाणेंच सिंहगडाचें एक अबोल आकर्षण झालें आहे.

इतिहास--जुना आणि नवा. त्याच्या आठवणीनें मन उचंबळून न आलें तरच नवल. मुख्यमंत्री तर भावनोत्कट. ते एकदम उद्‌गारले, " अहो, आपण इथें तीन पुतळे उभारू कीं जे पुण्यातील लोकांनासुद्धां दिसू शकतील. "

कल्पना भव्य आहे. रोमांचकारीहि आहे. पण कन्नमवारसाहेब, पुतळ्याच्या पलीकडे आपण नाहीं का जाऊ शकणार ? भव्य पुतळे आपल्या देशात किती कितीतरी विखुरलेले आहेत. त्यांत आणखी तीन पुतळ्यांची भर घालण्याचें कारण आहे काय ? सिंहगड हेंच मुळीं या इतिहासकालीन वीरांचें आणि आधुनिक लोकमान्यांचें स्मारक आहे. चालतें बोलतें स्मारक व्हावें अशा तऱ्हेची स्फूर्ति नुसती सिंहगडाच्या दर्शनानें मिळते.

मग कशाला हवेत हे पुतळे ? दगडी आणि ब्रॉझचे. काळ असा येत आहे कीं, भारताच्या आधुनिक तीर्थस्थानाच्या प्रगतीच्या मार्गात पुतळ्यांची अडगळ होऊ लागली आहे म्हणून त्याना बाजूला हटवावें लागत आहे. मग रस्ते रुंद होतात, प्रयोगशाळा उघडतात, धरणाची उभारणी होते. प्रत्यक्ष देवमूर्तींनासुद्धां जेथें भारताच्या प्रगतीसाठी आपल्या मंदिरांसह बाजूला व्हावें लागतें तेथें महापुरुषाच्या पाषाणमूर्तींचा काय पाड ?

त्यापेक्षां सिंहगडाच्या या परिसरात हिरवीगार झाडी, निसर्गसुंदर वनश्री तयार करण्यात आली तर ? बस्स ! निसर्गाच्या सान्निध्यात, शिरवाडीच्या बहाद्दराच्या टुमदार समाधीपाशीं क्षणभर विसावा घेण्याचें भाग्य जर भारताच्या नागरिकाना लाभलें तर देवटाक्याचें चवदार पाणी घटाघटा पिताना, कन्नमवारसाहेब, तुम्हाला ते केवढा दुवा देतील बरें !

पण माफ करा, आता पुतळ्यांचें नांव काढू नका.

## ११०.

# एप्रिल फूल

एप्रिल फूल ! झालांत का तुम्ही काल ? झाला असलां तर वाईट वाटून घेण्याचें मुळींच कारण नाहीं. अभिजात विनोद करण्याचा, अनुभवण्याचा हा एक दिवस आहे. खंत कसली करतां आणि राग तरी कशाचा ?

बनविण्यात जशी गमत आहे, तशीच बनविले जाण्यातहि गमत आहे. होळीच्या आणि रगपचमीच्या दिवशीं आपल्या कपड्यांची इस्त्री ढळली नाहीं असा अभिमान बाळगण्यांत काय बरें पुरुषार्थ ? अरे, एक दिवस खुल्या दिलानें रग खेळता येतो आहे, उधळतां येतो आहे त्याबद्दल आनंद मानण्याऐवजीं असे अग चोरून काय बसतां ?

तसाच हा एप्रिल फूल करण्याचा दिवस. लहान-थोर, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद याहि दिवशीं राहात नाहीं. असेल नसेल तो खेळकरपणा या दिवशी दाखवा आणि बुद्धीची चमक आणि कल्पकतेची भरारीसुद्धां. बघा, कसा निरागस आनद तुम्हांला प्राप्त होईल तो.

पण लक्षांत ठेवा, दुसऱ्याची जशी फसगत होईल तशी तुमचीहि होण्याचा सभव आहे बरें. दुसरा वसरला तर आपण खुदकन् हसतो. पण आपल्यावर ती पाळी आली तर ? दुसऱ्याच्या दांत विचकण्याचा आपल्याला राग येतो.

कां रे बाबा ? स्वतःच्या हेटाळणीचाहि खिलाडू वृत्तीनें स्वीकार करावयाला आपण का बरें शिकूं नये ? हंसावयाचें तें आपण, दुसऱ्याच्या वर्मांवर बोट ठेवून. पण आपल्यावर मात्र कोणी विनोद करता कामा नये अशी विषम वांटणी कशी बरें चालेल ? हंसायचें तें दुसऱ्याकडे पाहून तसेंच स्वतःकडे पाहूनहि हसू या कीं.

दोन घडीचा डाव खेळावयाचा आहे आपल्याला. तो कधीं दुसऱ्यावर उलटतो, कधीं आपल्यावर. कधीं आपण दुसऱ्याला एप्रिल फूल बनवितों; कधीं आपण बनतों. बनूया कीं एकदां. आपली बुद्धि कधी कमी पडते, दुसऱ्याची कल्पकता अधिक ठरते. आपला पराभव होतो. मग त्यात काय बिघडलें ? पराभव मान्य करावा, ताडावर स्मित झळकू द्यावें आणि खिलाडूपणानें हात पुढें करावा.

जीवनांतील चढ-उतार, हार-जीत आपण सहन करू शकतों ती या दिलदार वृत्तीमुळें. आज तर काय स्पर्धाहि नाहीं, हारजीतहि नाहीं. आज फक्त हास्यविनोद करावयाचा आहे. बस्स. शहाण्यांच्या जगांत वावरताना जे कष्ट होतात त्यांचा शीण आज नाहीसा करावयाचा आहे. मूर्खांच्या नदनवनात आज मस्त आनद उपभोगावयाचा आहे. चला तर मग. कोणी का असेना, "एप्रिल फूल"चें आपण मुक्तकंठानें स्वागत करू या.

१११

# परिसंवाद

परिसवाद हा आधुनिक जगातील एक नवा बुद्धिवळाचा खेळ आहे. साहजिकच बुद्धि-वतानाच त्या खेळाची गोडी चाखतां येते. म्हणजे परिसवादात भाग घेण्यासाठीं बुद्धिवत असलेंच पाहिजे असें मात्र नाही. तसा समज निर्माण करणारें व्यक्तित्व तुमच्यापाशीं असलें तरी पुरे.

म्हणजे पाहा, तुमच्या कपाळाला उलट्या आठ्या आहेत का? आहेत. मग चला तुम्ही आंत. तुम्ही सामान्य जनाप्रमाणें सतापी नाहींत तर बुद्धिवतांप्रमाणें विचारी आहात हें त्या आंठ्या प्रगट करतात. तुम्हांला टकल असेल तर सरळ अगदीं पुढील खुर्च्यांवर जाऊन बसा. बुद्धिनिष्ठेची यापेक्षा अधिक ठळक खूण कोणती असणार? आणि हें काय? तुमच्या हातांत पुस्तक कोणतें आहे? जॉ पॉल सार्त! चला महाराज, बेधडक त्या कोचावर जाऊन बसा.

सार्त! त्यातला 'र' उच्चारला न उच्चारला अशा रीतीनें अस्पष्टपणें, नाजुकपणानें तुम्ही उच्चार केलात ना! बस्स. बुद्धिवादी वर्गातील तुमच्या प्रतिष्ठेचा निर्वाळाच मिळाला की. आता ते पाहा सारे विचारवत जमले. तो आवाज ऐकलांत? जगावेगळा, नाही आगळा आहे ना? अशीं वैशिष्ट्यें तुम्हाला क्षणोक्षणीं आढळतील. तो पाहा, हनुवटीवरील लहानशा दाढीचा विचारवंत. तो काय बोलत आहे हें कळत नाहीं तुम्हाला? बौद्धिक दृष्टीनें तुमची पातळी किती खालची आहे हेंच त्यावरून स्पष्ट होतें.

ओ हो हो हो हो हो! काय बुद्धीची ही झेप आणि 'फ्रेज' काय? 'सेन्सिबिलिटी ब्लंट' होते. शाबास. आणि एकेक शब्द कसा पडत आहे! एसोटेरिक! का बरें? घड्याळाकडे का पाहताय? कॉफी ब्रेक आत्ता होईल एका मिनिटांत आणि असें पाहा. कॉफीबरोबर तीं खाराव-लेली बिस्किटें जरूर खा ह. म्हणजे असें आहे, बौद्धिकाची ही प्रक्रिया सुरू झाली कीं आपल्याला घाम फुटतो आणि मग क्षारयुक्त पदार्थांची व पेयाची आपल्या शरीराला आवश्यकता भासते असें वैद्यकशास्त्राचें निदान आहे.

हेंच पाहा. जरा डोक्यावरून हात फिरवा म्हणजे या बौद्धिकाचा प्रभाव तुम्हांला कळून येईल. पण हें काय? अहो, अहो, अहो, हा तळवा सारा काळा झाला आहे. अरे देवा! म्हणजे परिसवादाला सुरुवात होते न होते तोंच केंस गळून पडू लागले कीं काय?

... महाराज, तुम्हीं बसा इथें. हें बौद्धिक आम्हाला नाहीं परवडणार. आम्ही आपले 'ब्रेक'—कॉफी, टी, लन्च—ला तुम्हाला भेटू.



...८

# ११२.

## अज्ञान हें वरदान नव्हे

अज्ञान हें वरदान समजता कीं काय तुम्ही ! परिसंवादाची योजना जे करतात त्याची अशी समजूत नसते. ते वैचारिकतेची एक विशिष्ट पातळी गृहीत धरतात आणि मग साहजिकच तिला साजेशी परिभाषा अपरिहार्य ठरते. तुम्ही काय परिसंवाद म्हणजे चौपाटीवरील सभा समजता कीं काय ? कीं त्याची बौद्धिक पातळी ही दैनिकाच्या अग्रलेखात प्रगट होणाऱ्या विचार-संपदेच्या ( ! ) तोलामोलाची तुम्ही समजता ? म्हणे भाषा सुगम असावी. मग बाळबोध नको का ?

तें पाहिलेत का बाळबोध भाषेचे व विचाराचे पुरस्कर्ते ! त्यांच्या मुद्रेवर जो भाव आहे तो अगदी प्राजलपणें सांगत आहे कीं ही सारी चर्चा फार तर त्यांच्या केसांना स्पर्श करून जात असेल. ते तरी बिचारे काय करणार ? पांढऱ्यावर काळें केलेंच पाहिजे म्हणून ते 'कॉप्या' लिहितात. त्यांतून विचाराचा शोध घेण्यासाठीं संशोधनच करावयाची पाळी येते. पण दैनिकाचे संपादक म्हणून, सभासमेलनाचें—नव्हे परिसंवादाचेंहि त्यांना आमंत्रण मिळतें.

खरें सांगावयाचें तर एकेकदा वाटतें कीं त्यांना सरळ सांगून टाकावें कीं, महाराज, तुमचा विचारांशीं आणि परिभाषेशीं संबंध असतो अशी कां बरें भाबडी समजूत करून घेता ? तुम्ही जें कांहीं लिहितां तें तोलून मापून घेणारी व्यक्ति कोण हें जर तुम्हांला कळलें तर तुमची लेखनावरील श्रद्धाहि ढळून जाईल बरें. अहो, ताजव्यांतूनच तुमच्या लेखनाचें खरें मोल ठरतें.

म्हणून आता परिसंवादाला आलांच आहात ना तर जरा शांतपणें ऐका. असे विचार ऐकावयाला मिळणें हें सुद्धा भाग्यच असतें. त्यातला एखादा विचार चुकूनमाकून का होईना, तुमच्या मेंदूपर्यंत पोंचेलहि आणि मग तुमच्या भारंभार लेखनातील एखादा परिच्छेद कदाचित् त्या विचार-संपदेनें समृद्धहि होईल. आणि असें पाहा, बाळबोध वाचनमालेवर इतकें अव्यभिचारी प्रेम करण्याचेंहि कारण नाहीं. वयाबरोबर शब्दावलीहि वाढावयाला पाहिजे आणि ज्ञानाबरोबर परिभाषे-चाहि विस्तार व्हावयास पाहिजे.

हो, मला ठाऊक आहे तुम्ही काय म्हणणार आहांत तें. घाबरू नका. तुम्हांला अगदीं अस्वस्थ वाटायला लागलें तर तें पाहा, पलीकडे टेबल ठेवलें आहे ना, तिथें भरपूर खाद्य पदार्थ ठेवलेले आहेत. बौद्धिकांच्या वातावरणात तुम्हांला अगदीच चुकल्यासारखें वाटूं नये म्हणून मुद्दाम ही व्यवस्था करण्यात आली आहे.

## ११३.

... ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८८५ वि: निबंध
क्रमांक ८५९८ नों दि ३५-९-६७

## बेटा सिराजुद्दीन..

सिराजुद्दीन. काय भाग्य उजळलें त्याचे पाहा. भारतातील प्रत्येक वृत्तपत्रात आज त्याचें नांव झळकत आहे, पार्लमेंटात त्याच्या नांवाची घोषणा होत आहे, केन्द्रीय मंत्रिमंडळांतील मंत्री धडाधड त्याच्याबद्दल निवेदनें करूं लागले आहेत.

हा सिराजुद्दीन आहे तरी कोण ? धूमकेतूप्रमाणें हा अकस्मात उगवला तरी कसा ? त्यानें असें जगावेगळें केलें तरी काय ? काहीं नाहीं हो. त्यानें फक्त हिशेब तेवढे लिहिले. आतां तो तरी काय करणार ? त्यानें कांही खर्च केला, कोणाला कांहीं रकमा दिल्या तर त्यानें आपल्या जमाखर्चाच्या वहींत त्या लिहू नयेत ?

आता असें झालें कीं ज्याला रक्कम त्यानें दिली ती केशवदेव मालवीय यांच्या सांगण्या-वरून. पण त्यानें मालवीयांचेंहि नांव लिहिलें. योगायोग असा चमत्कारिक कीं त्या वह्या पोलिसांच्या हातीं गेल्या. आणि मग केन्द्रीय सरकारातील आणखी दोघां मंत्र्यांनीं आणि उडीसांतील एका मंत्र्यानें अशाच सूचना दिलेल्या आढळून आल्या.

फक्त सूचना पैसे देण्याबद्दलच्या. पण त्या कॉंग्रेस फंडासाठीं, निवडणुकींतील कोणा कॉंग्रेस उमेदवाराच्या मदतीसाठीं. सिराजुद्दीन हा उदार तसाच कॉंग्रेसप्रेमी. त्यानें महनीय त्याग केला यात स्वार्थ नव्हता; यात काहीं हेतुहि नव्हता. फक्त त्यागाची बुद्धि होती. खरें सांगू का ? सिराजुद्दीनला कॉंग्रेसचें तिकीट देणें तर इष्ट आहेच. पण मंत्रिमंडळातहि त्याला स्थान देणें आवश्यक आहे.

आणि या प्रकरणात गुंतले गेलेल्या मंत्र्यांना ? राजीनामे ? अहो म्हणतां काय ? बढती द्या त्याना बढती. राजीनामे कां द्यावयाचे ? सिराजुद्दीन यांची कंपनी निःस्वार्थ बुद्धीनें पैसे द्यावयाला तयार झाली. मंत्री म्हणाले, 'जरूर द्या.' त्यांनीं ही सूचना करतांना केवढा विशाल दृष्टिकोन ठेवला. भारताची एकात्मता राखण्यासाठीं मालवीय साहेबांनीं कलकत्त्याच्या सिराजुद्दीन कंपनीला उत्तर प्रदेशाच्या बस्ती जिल्ह्यांतील एका उमेदवाराला साहाय्य करावयाला प्रवृत्त केलें. पाहा येथें प्रांतभेद नाहीं, धर्मभेद नाहीं. एकात्म भारताचें इतकें मनोवेधक दर्शन कोठें बरें पाहावयाला सापडेल ?

बेटा सिराजुद्दीन, तू धन्य आहेस. तुझी ही निःस्वार्थ सेवा देशाच्या चरणीं रुजू आहे. आणि मालवीयसाहेब तुमचें आणि तुमच्या काहीं सहकाऱ्यांचें निरपेक्ष कॉंग्रेस–प्रेम निःसंशय तुमच्या यशाला उजाळा देत राहील.

बघू या. पुढील वर्षाच्या पदवीदानात या महाभागाची बूज कशी राखली जाणार आहे.

## ११४.

# रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग

" माननीय सभासदहो, माननीय अध्यक्षजी " एवढे चार शब्द म्हणून लोकसभेच्या सभापतींच्या आगमनाचा पुकारा करणें हेंच सभागृहाच्या मार्शलचें एक महत्त्वाचें कार्य असतें. सभापतींच्या हाकेबरोबर सेवेला सज्ज होणें हाच त्याचा दिनक्रम असतो. ही सेवा बहुशः औपचारिक स्वरूपाची असते व मार्शल या नावात जो लष्करी आविर्भाव अभिप्रेत असतो त्याचा प्रत्यय सभागृहाला सहसा येत नाहीं.

येत नसे असेंच आतां म्हटलें पाहिजे. निदान विधानसभापुरते तरी. येथेंहि ' मार्शल 'ला हाच पुकारा व याच प्रकारची सेवा करावी लागते. बहुशः औपचारिक. पण आता विधानसभेच्या काहीं सभासदांना असें वाटू लागलेलें दिसत आहे कीं ' मार्शल 'सारखा अधिकारी आदाब अर्ज करण्यांत फुकट घालविण्यापेक्षां त्याला लष्करी थाटाचें काहींतरी कार्य उपलब्ध करून देणें आवश्यक आहे.

नेहमींप्रमाणे उत्तर प्रदेशानें मार्शलच्या हा कार्यविस्तार करण्यात पुढाकार घेतला. समाजवादी पक्षाच्या नेत्यानें सभापतींची आज्ञा मान्य करण्याचें नाकारून मार्शलला झटापटीचें तंत्र आत्मसात् करावयाला भाग पाडलें. त्या दिवशीं प्रथमच मार्शल घामाघूम झाला. कारण विधानसभेंतील आसन व पुढील कठडा या चिंचोळ्या जागेंत आपलें अवजड शरीर अडकवून ठेवणाऱ्या समाजवादी नेत्याला बाहेर काढण्यासाठीं त्याला आपली सारी शक्ति आणि युक्ति एकत्र करावी लागली.

उत्तर प्रदेशाचें हें लोण पुढें मध्यप्रदेशापर्यंत पोचलें आणि आतां महाराष्ट्राच्या विधानसभेंतहि तो कित्ता गिरविला जाऊं लागला आहे. लोकशाहीच्या प्रगतीची ही खूण कीं काय हें ज्याचें त्यानें ठरवावयाचें आहे. माझें आपलें म्हणणें एवढेंच कीं महाराष्ट्र विधानसभेच्या एका सभासदानें तरी मार्शलच्या कार्याची व्याप्ति वाढविण्याच्या दृष्टीनें जागरूकता दाखविली आहे खरी.

अहो, मार्शल आहे ना तो ? ' सार्जंट ॲट आर्म्स ' असें काहींतरी वीरोचित नामाभिधान त्याला दिलें गेलें आहे ना ? मग त्यानें काय नुसता सभापतींच्या आगमनाचा पुकारा करावा आणि एखाद्या शांतिदूताला साजेशा नम्रतेनेंच तेवढें सभासदाच्या पुढें पुढें करावें ? नाहीं बरें. आमदार धोटे यांना तसें वाटत नाहीं. त्यांना वाटतें कीं ' सार्जंट ॲट आर्म्सनें ' थोडा तरी लढाऊपणा दाखवावा.

म्हणून त्यांनीं सभापतींचा हुकूम मान्य केला नाहीं. मार्शलला त्यांनीं आपल्या लष्करी अधिकाराची जाणीव करून दिली. बघा बरें. आपले कांहीं सभासद तरी किती जागरूक आहेत. किती दूरदृष्टीनें ते मार्गदर्शन करावयाचा प्रयत्न करतात.

. . मार्शलसाहेब, " रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग " असें म्हणण्याची आपल्यावर आतां पाळी येणार बरें !

## ११५.

# सोमपान आणि सुरापान

' सोमपान ठीक; सुरापान निषिद्ध. ' असा संदेश डॉ. नरवणे यानीं नशाबंदी सप्ताहाच्या निमित्तानें दिला आहे असें कळतें. ऋषिमुनी हे सोमरस पीत होते, सुरापान करीत नव्हते अशी पुराणकालीन माहितीहि त्यानी दिली आहे.

आता त्यावेळचा सोमरस काय होता हें ऋषिमुनींनाच ठाऊक. विसाव्या शतकांतील तुमच्या आमच्यासारख्या पतित जनाना त्याची काय कल्पना असणार ? एवढें मात्र खरें कीं दंतकथा जें सागतात त्यावरून अनेक ऋषिमुनी हे सोमरसाचा आस्वाद घेऊन बेहोष झालेले असत आणि प्रत्यक्ष वसिष्ठ ऋषीसुद्धा सोमरस-पानानतर गोमासभक्षण शास्त्रोक्त रीतीनें पण मोठ्या रुचीनें करीत असत.

जो रस बेहोष करतो तो सुरेपेक्षां वेगळा कसा व किती प्रमाणांत असा प्रश्न या बाबतींत विचारण्यांत अर्थ नाहीं. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं बेहोष व्हावयाला हरकत नाहीं. फक्त तें सुरापानानें होता कामा नये. दारू पीना हराम है, बेहोष होणें हें हराम नाही. ऋषीमुनींचा आपल्यापुढें आदर्श आहे ना ? मग बस्स. त्यांच्याप्रमाणें सोमरस प्या; सुरापान मात्र करू नका.

तुम्हीं हें आणखी, मादक द्रव्याचें प्रमाण वगैरे काढलें आहे ना तेंहि योग्य नाही. प्रमाण ? तें असे ना कां जास्त ! आता हेंच पाहा ना, बीअर नावाचें जें एक मद्य आहे त्यांत मादक द्रव्याचें प्रमाण सात टक्के किंवा फार फार तर दहा टक्के असतें. पण नरवणे यांच्या आयुर्वेदिक औषधांत तें प्रमाण बारा टक्के असतें. आतां प्रश्न आहे तो तत्त्वाचा. बीअर हें मद्य आहे. आयुर्वेदिक औषधें हीं औषधें आहेत. अगदीं सुरापान व सोमपान यातील हा फरक आहे

तो फरक नेहमीं लक्षात ठेवा. सोमरसपानानंतर डोळे तांबडेलाल झाले, शरीराचा तोल गेला, वाचेनें फक्त " बमोला " असें म्हणण्यापलीकडे जास्त सुसगत बोलतां आलें नाहीं तरी त्यात निषिद्ध काही नाहीं निषिद्ध आहे तें सुरापान. त्या सुरेंत मादक द्रव्याचें प्रमाण कमी असलें, तुम्ही सुरापानानंतरसुद्धा नीट माणसासारखे वागलात तरी जें निषिद्ध तें निषिद्धच.

म्हणून नशाबंदी सप्ताहाचा एक सदेश लक्षांत ठेवा " सोमपान ठीक; सुरापान निषिद्ध. "

## ११६.

# हिमालयापेक्षां प्राचीन

पुण्यांत म्हणे अश्मयुगातील काही अवशेष सांपडले. अश्मयुग ? सुमारें दीड लाख वर्षांपूर्वी तें अस्तित्वांत होतें. आता आली ना पुण्याची कल्पना ! उगाच नाही ती पुण्यनगरी म्हणून ओळखली जाऊ लागली. म्हणजे पाहा; दीड लाख वर्षांपूर्वी पुणें अस्तित्वात होतें. कोण जाणे हिमालय पर्वत तरी त्यावेळीं हयात होता किंवा नाही–म्हणजे पर्वत म्हणून. कोणी कोणी म्हणतात तेथें सागर होता. त्या सागराचे अवशेष हिमालयावर आढळून येत आहेत. म्हणून तर तेथें तेलाकरिता संशोधन चालू आहे.

पण पुणें पाहा. तें हिमालयापेक्षांहि अधिक प्राचीन आहे. अहो, हत्यारें सापडलीं हत्यारें तिथें. अगदीं मुळा मुठेच्या काठावर. ज्या ठिकाणीं अस्मादिकाचें वास्तव्य असे, इतर पुणेंकर थोर पुरुषाच्या बरोबर आज ऊर अगदीं भरून येतो. जिथें पुणेंकर राहतात तिथेंच दीड लाख वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज राहत होते. केवढा हा उदात्त, उज्ज्वल वारसा. दीड लाख वर्षांपूर्वी आमचे हे पूर्वज काय करीत होते ? हत्यारें तयार करीत होते. सारें सुसंस्कृत जग ज्यावेळीं रानटी अवस्थेत आपलें जीवन कठीत होतें त्यावेळीं पुणेंकराचे पूर्वज शौर्यांची साक्ष देणारीं हत्यारें तयार करीत होते.

त्याच या मुळा–मुठा नद्या बरें. त्यांचीं नावें काय बरें असतील ? चला, भारत-इतिहास संशोधन मंडळाला एक नवीन संशोधन कार्य मिळालें. मुळा आणि मुठा दीड लाख वर्षांपूर्वीच्या त्या नद्या. आता संशोधनाच्या क्षेत्रांत अवगाहन करावयाचें तें दीड लाख वर्षांचा कालखंड ध्यानांत धरून शिवप्रभूंनीं केस वाढविले होते कीं घेरा ठेवला होता याबद्दल निदान करण्याइतकें हें सोपें कार्य नाहीं. आतां अज्ञातरम्य, गूढ अशा अश्मयुगात आपल्या संशोधकाना प्रवेश करावा लागणार आहे

केवढें हें काळाचें आव्हान. पुणें शहराचें वैशिष्ट्य तरी किती ऊर्जस्वल. ते आव्हान मिळालें आहे ते पुण्यनगरीला. अहो, काय बघता काय असे ? आधींच तुमची छाती पुढें होती. आता दीड लाख वर्षांच्या इतिहासाचें वरदान तुम्हांला मिळालें आहे.

चला. पुढें व्हा. आतां एकच संदेश. खणा. घ्या, कुदळी घ्या, फावडीं घ्या खणा. या पवित्र मुळामुठेच्या काठांवर तुम्हाला हत्यारें मिळालीं. आणखी खणा. तुम्हाला कदाचित् त्या अश्मयुगांतील मानवी अवशेषहि मिळतील.

काय म्हणता ? ते अवशेष अगदीं चालत्या बोलत्या स्थितींत भरपूर आढळून येत आहेत.

हा मात्र शुद्ध आकस झाला ह.

११७.

## आध्यात्मिक अस्त्र

शांतिदूतानंतर आता साधु. तेहि आतां सीमाभागांत संचार करून तेथील लोकांची हिंमत वाढविण्याचा प्रयत्न करणार आहेत. हृषीकेशच्या शांत वातावरणात बसून नियोजन मंत्र्याच्या नेतृत्वाखालीं त्यानीं हा निर्णय घेतला. म्हणजे बघा ! नंदाजींच्या हातीं किती शस्त्रें, अस्त्रें आणि साधनें आहेत. फक्त हीं शस्त्र अहिंसक आहेत एवढेंच.

आता हिमालयातील गिरिकंदरांतून जो साधूंचा आवाज घुमत असे तो सीमाभागातहि घुमू लागेल. चिनी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं ज्या नीतिधैर्याची आवश्यकता आहे ती साधूंच्या-खेरीज कोण बरें देऊं शकेल ? त्या धीरगंभीर मुखांतून " क्यू करता है डावा डोल । हरहर गंगे हरहर बोल " अशी घोषणा निघाली कीं सारा सीमाविभाग रोमांचित होऊन आपल्या मनातील सारी अनिश्चितता दूर झटकून टाकील.

सीमा विभागांतील भाग्यवंतांनो, पाहा केवढें तुमचें भाग्य उजळून निघालें आहे ! तुम्हांला माहीत आहे ना ? " साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा. " आता दिवाळी आणि दसरा एकाच वेळीं तुमच्या घरीं चालून येणार आहे. होय. घोडाघोडासहित. कारण, साधुसंत अगदीं सात्त्विक अन्न खातात आणि थबथबलेल्या तुपांतील शिऱ्याइतकें सात्त्विक आणि साजुक अन्न दुसरें कोणतें बरें असू शकेल ?

बघा. म्हणजे नीतिधैर्याबरोबर समृद्धताहि तुमच्या जीवनात प्रवेश करणार आहे. या घटनेचें मुक्त कंठानें स्वागत करा; या मंगल वेळेची आतुरतेनें वाट पाहा. हेच ते साधु, ज्याची तुम्ही सेवा करीत होतां. आता ते तुमच्या सेवेला हजर होणार आहेत. आजवर प्रभुनामाखेरीज त्यांच्या वाणीनें दुसरें नांव घेतलें नाहीं. तुकोबांची अभंगवाणीच फक्त संत तुकडोजी महाराजांच्या कंठांतून डफावर थाप मारीत बाहेर पडत होती.

पण आता ? ते पाहा विदेही आत्मे, प्रत्यक्ष शरीररूपानें तुमच्या समोर उभे राहणार आहेत आणि ते तुम्हाला संदेश देणार आहेत–प्रभुपूजेचा नव्हे. नीतिधैर्य टिकविण्याचा. साधुजनाचा सहवास, साधुसमाजाचें आवाहन. आतां नीतिधैर्य खचेल कसें ? चिन्यानो, आता तुमच्याच नीतिधैर्याची कसोटी लागणार आहे. तुम्ही खुशाल अणुबॉंब तयार करा आमच्या या आध्यात्मिक अस्त्रापुढें तुमचा निभाव कसा लागेल ?

## ११८.

# शंभर टक्के महाराष्ट्रीय

सेतु माधवराव पगडी म्हणतात कीं, सूर्याजी पिसाळ हा मुळीं अस्तित्वातच नव्हता; त्याच्या फितुरीचा इतिहास हें एक थोतांड आहे.

काय या इतिहास-संशोधकांना म्हणावें. अहो, सूर्याजी पिसाळ हें केवढें प्रबळ हत्यार आहे आमच्या हातचें. अगदीं शंभर टक्के महाराष्ट्रीय हत्यार. हा हा म्हणतां आम्ही कोणालाहि घायाळ करू शकतो तें हत्यार परजून. घायाळ ? नाहीं तर काय, बदनामीइतकें धारदार असें दुसरें कोणतें हत्यार असू शकेल ?

मीं वर म्हटलें, शंभर टक्के महाराष्ट्रीय. हो तर काय ! अहो, आमची अशी महत्त्वाकांक्षा आहे कीं, महाराष्ट्र हा प्रत्येक बाबतींत वरचढ असला पाहिजे. आमची जशी वीरपरंपरा अग्रभागीं असली पाहिजे तशीच फितुर परंपराहि. त्यांतहि आमचें वैशिष्ट्य आणि श्रेष्ठत्व असलें पाहिजे. म्हणजे असें कीं युद्धकाळात फितुराला ' क्विसलिंग ' म्हटलें जात असे. मी म्हणतों, साहेबाचा हा आदर्श कशाला पाहिजे ? आपण असें म्हटलें पाहिजे, " अरे तो क्विसलिंग ना ? सूर्याजी पिसाळ आहे तो नॉर्वेचा. "

महाराष्ट्राचें नांव इतिहासप्रसिद्ध आणि जगप्रसिद्ध होईल कीं नाहीं त्यानें ? त्याचे काय सांगावें, एखादें अमेरिकेंतील स्टॅनफर्ड विश्वविद्यालय, फितुरीच्या तत्त्वज्ञानावरील संशोधनात, सूर्याजी पिसाळ यांचें मूल्यमापन करण्यासाठी एखादी अनुदानाचीहि योजना आखील. कोट्यवधि डॉलर्स अशा रीतीनें रायगडाच्या परिसरातील जीर्णपत्रांचें, शिलालेखाच आणि दगडाधोंड्यांचेंहि संशोधन करण्यासाठीं खर्च होतील.

पण हाय ! सेतु माधवराव पगडी म्हणतात कीं, सूर्याजी पिसाळ हा अस्तित्वांतच नव्हता. अरेरे, केवढ्या त्वेषानें, आपण आपल्या प्रतिस्पर्ध्यांची अब्रू फक्त एकाच नामोच्चारानें धुळीस मिळवीत होतो. फितुरी, दगलबाजी, विश्वासघात, घरभेदीपणा यांचें जणु प्रतीक झालें आहे तें नाव. ती फितुरी प्रत्यक्षपणें कोणीं केली पाहिजे असें नाहीं. तिचा पुरावा आपल्या हातीं पाहिजे असेंहि नाहीं. बस्स. एकाच गोष्टीची आवश्यकता आहे आणि ती म्हणजे आपल्या विरोधकांना खच्ची करण्याची. तें करण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे 'सूर्याजी पिसाळ' हा किताब आपल्या विरोधकांना देणें आणि प्रक्षुब्ध होणाऱ्या जनमनाचा देखावा पाहण्यांत मग्न होणें.

तो आनंद–आसुरी का असेना–आज हिरावून घेतला जात आहे. केवढें हें महाराष्ट्राचें दुर्भाग्य !

# ११९.

## गुलमोहोर

पाहता पाहता गुलमोहोर फुलला. जसा झडून गेला होता. तसाच मोहरला. आता वाटतें हेंच कां तें झाड जें सुकून, वठून गेलें होतें. पानझड ऋतु आला आणि त्या झाडाचीं पानें गळून पडलीं. उरलें तें नुसतें खोड. दिवसांमागून दिवस गेले; महिने उलटले. पण तें झाड निष्पर्ण अशा अवस्थेंत उभें तेवढें राहिलें. त्या झाडाची ती दशा पाहून वाटत असे, आता कधीहि त्याच्यामध्यें चैतन्य येणार नाहीं. असेंच उन्हें खात खात तें एके दिवशीं कोसळून पडेल.

पण काय आश्चर्य पाहा. एप्रिल उगवला आणि त्याच चैतन्यहीन निष्पर्ण झाडावर कोठें कोठें हिरवी पालवी दिसू लागली. अरे, हे तर नुसते फाटें होते—पांढरा कातळच जणू आणि त्यावर ही पालवी उगवते तरी कशी ? महाराज, नुसती पालवी नाहीं. आज तेंच शुष्क झाड पाहा. हिरव्यागार पालवीच्या जोडीनें तेथें तांबडा लाल गुलमोहोर उगवला आहे.

उगवला नाहीं; फुलला आहे. गुलमोहोर. तो जसा डोळ्यांत भरतो तसेंच हें नांवहि हृदय रोमांचित करतें. वसंताची बहार निदर्शित करणारा हा पुष्पसभार. त्याच्याकडे नुसती दृष्टि टाका. तुमचे डोळे नाचूं लागतील, मन बेमान होईल. अशाच बेमान झालेल्या कविहृदयानें त्या फुलोऱ्याला नाव दिलें गुलमोहोर.

तो आज फुलला आहे. वठलेल्या एका झाडावर फुलला आहे. निसर्गाची काय किमया तरी. जादूची कांडी फिरवावी त्याप्रमाणें तो ऋतु बदलतो आणि त्याबरोबर रूपहि बदलून टाकतो. मग कालचा शुष्क झालेला ओहोळ कापाय रंगी होऊन खळाळून डोंगरमाथ्यावरून झेप घेतो आणि कालचा वठलेला वृक्ष हिरव्या लाल रंगानें मोहोरून निघतो.

सृष्टीचे हे उन्मेष मानवापासून तेवढे कां बरें हिरावून घेतले जावे ? पण खरेंच का तसें आहे ? कीं मानवी मनात अहंकाराचीं, असूयेचीं, क्षुद्रतेचीं जीं कोळिष्टकें जमा होऊन पडलेलीं आहेत त्यांमुळें निसर्गानें साऱ्या सृष्टीला दिलेल्या वरदानाची मानवी मनाला जाणीव होत नसावी.

तसेंच नाहीं तर काय ! वठलेला वृक्ष जर कालांतरानें मोहरून निघतो तर वठलेलें मानवी मन प्रफुल्लित कां बरें होऊ नये ?

होईल. होईल. गुलमोहोर फुललेला पाहा तर खरा एकदां. तुमच्या अपरोक्ष तुमचे डोळे आनंदानें नाचू लागतील; तुमचें मन बेमान होईल.

# १२०.

## " हें काय असें होई "

आतां काहीं बोलायची सोयच उरली नाहीं. म्हणे हृदयाचा आणि प्रेमाचा कांही संबंध नसतो म्हणजे झालें का! शतकानुशतकें प्रेमाचा उगम झाला कीं हृदयातून कळ उठत आली आहे. किती असंख्य हृदयें अशा रीतीनें निकामीं झालीं आहेत आणि आतां हे शास्त्रज्ञ म्हणतात कीं नाजुक भावनांची आणि प्रेमाची जागा हृदय आहे असें समजणें चुकीचें आहे.

चुकीचें काय आहे ? स्वतःच्या हृदयालाच विचारा बरें. हृदयाचें तें स्पंदन, ती धडधड, ती कळ, प्रत्यक्ष जाणवत असतांना शास्त्रीय आधाराचा हवाला तरी कशाला पाहिजे ? अहो, हृदय म्हणजे दिल. त्याचे तुकडे तुकडे होतात, ते प्रत्यक्ष भासतात, जाणवतात.

आतां कोणी शस्त्रवैद्य म्हणू लागला, " दाखवा बघू ते तुकडे. " तर त्याला काय म्हणायाचें ! तसाच हा शास्त्रीय आधार शोधण्याचा प्रकार आहे. पहिली संवेदना मेंदूत प्रगट होते कीं हृदयांत याची चर्चा करण्यात काय बरें अर्थ आहे ! खरें सांगू का, मेंदू ही चीज जरा खतरनाकच आहे. ती ज्यांच्याजवळ असेल ते थोडेसे अभागीच म्हणावयाचे. कारण मग लगेच कार्यकारणभाव, अंडें आधीं कीं कोंबडी आधीं, बीज आधीं कीं वृक्ष आधी हा सगळा तत्त्वज्ञानाचा काथ्याकूट सुरू होतो.

हृदयाचें तसें नाहीं. तें मेंदूप्रमाणें स्थिर नसतें. तें हरवतें, गवसतें, हरखून जातें, आक्रंदनहि करतें. मेंदूशीं त्याचा शरीरधर्मानुसार जो काहीं संबंध येत असेल त्याचा शास्त्रज्ञानीं खुशाल विचार करावा. पण प्रेमिक मात्र या शास्त्रज्ञाना कळवळून सांगतील कीं बाबांनो, मेंदूची नव्हे, हृदयाची हाक ऐकली म्हणून तर आम्ही प्रेमात पडलों, प्रेमासाठीं वेडे झालों.

हृदयाची ही वेडी हांक. कधीं ती हृदयाला भिडते. कधीं ती वाऱ्यावर विरून जाते. हृदयाला ती भिडली तर हृदयाचें मीलन होतें, भिडली नाहीं तर हृदयें दुभंगून जातात. दोन्ही ठिकाणीं वादळें उठतात तीं हृदयांत.

मला कळत नाहीं प्रेमाचा आणि हृदयाचा संबंध तुटला तर काय होईल काय होईल ? नुसतेंच जिवाचें नाही. काव्याचें काय होईल ? कादंबरीचें काय होईल ? नाटकाचें काय होईल ? आणि मग

" हें काय असें होई साशंक धपापे ऊर.
डोळ्यांत जमे पाणी डोक्यात उठे काहूर. "

या काव्यपंक्ति तरी कशा कळवळून बाहेर पडणार ? या काव्यपंक्तींकडेच पाहा. हें असें कांहीं तरी झालें तें उरांत बरें ! आणि मग डोक्यात काहूर उठलें.

शास्त्र काहीं म्हणो, संवेदनेचा उगम कोणता हें तुमच्या ध्यानात आलें ना ?

## १३१.

## शेजारच्या घरीं तूं...

छान. तुम्ही काय समजलां होता कीं "अंग्रेजी हटाव" संमेलन म्हणजे नुसत्याच मुठी वळवणें आणि तारस्वरानें घोषणा करणें ? नाहीं बरें, या समेलनानेंसुद्धां कांहींतरी नवीन, अपूर्व, भावुक म्हणजेच रोमॅन्टिक कलाटणी दिली आहे.

आता हेंच पाहा ना निरनिराळ्या भाषाचें मूल्यमापन एका अध्यक्षानीं कसें केलें. ते म्हणाले, "मराठीवरील माझें प्रेम आईसारखें, हिंदीवरील मावशीसारखें आणि इंग्रजीवरील ?" इथेंच तर रोमान्स आला. ते बहुधा लाजत म्हणाले असावेत, "शेजारणीवरील प्रेमासारखें."

अरे वा ! म्हणजे 'चोरटें प्रेम !' कां हो पण, सर्वसाधारण संकेत असा आहे कीं, या प्रेमाची लज्जत कांहीं न्यारीच असते. आईचें ठीक आहे "थोर तुझे उपकार" पासून तों यश वताच्या "स्वामी तिन्ही जगाच्या आईविना भिकारी" या काव्यपक्तीपर्यंत सारेचजण आईच्या प्रेमाची महति गात आले आहेत. पण बहुशः प्रेम करते ती आई. आईवरील प्रेमाची त्याला साथ मिळतेच असें नाहीं. आणि व्यवहारी जगानें एक कठोर म्हणच रूढ केली आहे. "माय मरो, मावशी जगो."

अर्थात् हा जीवनाचा अनुभव आईची पातळी कमी करणारा असण्यापेक्षा मावशीच्या प्रेमाचा आविष्कार प्रकर्षानें प्रगट करणाराच असतो. पण 'चोरट्या प्रेमा'च्या बाबतींत तसें म्हणता येईल का ?

हें शेजारणीवरचें प्रेम अध्यक्ष महाराज, जरा कठीणच होईल बरें का. त्या प्रेमाची एकदां ओढ लागली, चोरट्या भेटीगाठी होऊ लागल्या, असफलतेंतून चिरकालीन अतृप्तता निर्माण होऊ लागली कीं तुमचें चित्त थाऱ्यावर राहणें दुरापास्तच आहे बिचारी आई मग कष्ट करीत राहील, मावशी जिवापाड परिश्रम करील, आणि तुमचे डोळे मात्र शेजारची चाहूल घेत राहतील, चित्त शेजारणीवरच खिळून राहील.

मग कशाची हटवतां इंग्रजी ? अहो गृहस्वामिनी मग कोणी का असेना, चित्ताची आराध्य-देवता मात्र इंग्रजीच राहील. छे ! छे ! अशा या चोरट्या प्रेमाच्या फंदात पडू नका.

मात्र तुमची कल्पना अगदीं फर्मास रोमॅन्टिक आहे !

१३३.

## घार आणि विमान

'आमचा हिमालय' प्रदर्शनातील एक वेचलेला क्षण म्हणजे एका लहानशा विमानाचा घारीनें केलेला पाठलाग होय. आकाशात स्वैर संचार करणारी घार सहसा कोणाच्या वाटेला जात नाहीं. शांतपणें आणि केवढ्या रुबाबानें ती वर जाते. पंखांची बारीकशी फडफड आणि क्षणार्धात ती केवढा उच्च पल्ला गांठते आणि मग अनंत आकाशांत जणु वाऱ्यावर ती आपलें इवलेंसें शरीर झोकून देते.

आकाशात उडणाऱ्या घारीकडे पाहिलें की वाटतें कीं प्रत्यक्ष डौलच जणु तिच्या रूपानें पृथ्वीवर अवतरला आहे. वर जातांना डौल, घिरट्या घालताना डौल आणि उच्च आकाशातून खालीं झेप घेतानाहि तोच डौल. मला वाटतें, विमानाची कल्पना कोणाला सुचली असेल ती घारीचा हा आकाशांतील संचार पाहूनच.

मानवाच्या संशोधक मनानें तो लहानसा जीव आकाशांत संचार करीत असताना पाहिला पंख खुले करून तो जीव आकाशात तरंगतो. काय गंमत पाहा. त्याला जणु विसावाच मिळत असतो या अवस्थेंत. म्हणून त्याच्या पंखाची फडफड होत नाहीं, जिवाची धडपडहि होत नाहीं. तोच आदर्श ठेवून मानवी मनानें विमानाची बांधणी केली.

पण निसर्गकृति आणि मानवनिर्मिति यांत केवढा फरक आहे पाहा. अरे काय तरी ही धडपड, केवढा आटापीटा, केवढा आवाज! कानठळ्या बसवीत, कर्कश किंकाळ्या मारीत तुमचें तें विमान आकाशात जातें आणि तिथें गेल्यावर तरी स्वस्थता आहे का? नाहीं. पंख्याची घरघर चालू. जणू धापा टाकीतच तुम्ही आकाशाचें अंतर तोडीत असता.

होय. चढतां उतरताना घारीचा डौल तुम्ही आणता. पण नक्कल ती. किती कृत्रिम! आणि शांतपणानें कांहीं तुम्हांला पृथ्वीतळावर उतरतां येत नाहीं. तोच बरें, तोच गोंगाट त्या घारीला मानवला नाही.

कल्पना करा. संध्याकाळची ती वेळ. आकाशातील स्वैरसंचार आटोपून, वृक्षाच्या कुशींत शिरावयाची ती घटका. सूर्यनारायणाला त्या दिवसापुरता अखेरचा प्रणाम करून हिरव्यागार वृक्षाच्या फांद्यामध्यें आपलें अंग लपवावयाचें म्हणून तर ती घार सथपणानें पण डौलानें खाली येत होती.

आणि हें काय? त्या घरट्याभोंवतीं ही कोणाची फडफड चालली आहे? असेल. तुमचें प्रदर्शन असलें म्हणून काय झालें? सायंकाळच्या या प्रशांत वेळीं घरट्यांत शिरतांना तरी आमच्या शांततेचा भंग करू नका. पण गोंगाट करणाऱ्या मानवांना हें कधीं कळणार?

बिचारी घार. तिनें चिडून, वैतागून त्या मानवनिर्मित यंत्राचा पाठलाग केला.

# १३३.

## महाराष्ट्रस्य राज्यस्य ....

प्रतिपच्चंद्रलेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता
महाराष्ट्रस्य राज्यस्य
मुद्रा भद्राय राजते.

महाराष्ट्र राज्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्यानें जी सुवर्णमुद्रा काढली होती तिच्यावर हा श्लोक कोरण्यांत आला होता. बरोबर तीनशे वर्षें लोटल्यानंतर पुन्हा एकदां महाराष्ट्र राज्य स्थापन होत होतें. फरक एवढाच कीं शिवप्रभूंच्या राज्याप्रमाणें तें एक सार्वभौमराज्य म्हणून अस्तित्वात येत नव्हतें. तर सार्वभौम भारतीय राज्याचा एक स्वायत्त घटक म्हणून भारताच्या नकाशात तें पदार्पण करीत होतें.

पण केवढ्या दिमाखानें, केवढ्या आत्मप्रत्ययाच्या जाणीवेनें, केवढ्या उज्ज्वल भवितव्याच्या आकांक्षेनें! हा दिमाख, हा आत्मप्रत्यय, ही आकांक्षा महाराष्ट्र राज्यांत निर्माण झाली त्याचें कारण असें होतें कीं प्रथम उभा महाराष्ट्र संघर्षाच्या, त्यागाच्या धर्गीतून तावूनसुलाखून निघाला होता. त्यानंतर असें एक नेतृत्व महाराष्ट्रात निर्माण झालें होतें कीं, ज्यानें आपल्या कर्तृत्वाचा, राजकाजकुशलतेचा आणि निष्ठेचा भारतीय नेतृत्वाला प्रत्यय आणून देऊन त्या नेतृत्वाचा विश्वास संपादन केला होता. आणि अखेरीस महाराष्ट्राला आपल्या परंपरेची, इतिहासाची इतकेंच नव्हे तर आपल्यामध्यें सतत सळसळणाऱ्या स्वातंत्र्यप्रीतीची इतकी साक्ष पटलेली होती कीं, स्वतंत्र भारताबरोबर आपलाहि भविष्यकाल आपण उज्ज्वल करू याबद्दल महाराष्ट्राला तिळमात्रहि संशय राहिलेला नव्हता.

म्हणूनच राजभवनाच्या विस्तीर्ण आवारात, समुद्राच्या लाटांचा धीरगंभीर आवाज घुमत असताना १ मे १९६० च्या ऐन मध्यरात्रीं पंडित जवाहरलाल नेहरूंना यशवंतराव चव्हाण यांनीं आश्वासन दिलें कीं कधींकाळीं हिमालयावर संकट आलें तर महाराष्ट्राचा सह्याद्रि हिमालयाच्या संरक्षणार्थ प्राणपणानें लढेल. प्रखर आत्मविश्वासानें दिलेलें हें आश्वासन आज महाराष्ट्र, यशवंतराव चव्हाण यांच्या रूपानेंच नव्हे तर सैन्यांत सामील होणाऱ्या सहस्त्रावधि जवानांच्या रूपानें तंतोतंत पाळीत आहे.

त्या रात्रीं हें आश्वासन देण्यांत आलें आणि त्याच वेळीं राजभवनामध्यें, बिस्मिल्ला यांच्या शहनाईच्या आर्त सुराबरोबरच त्याहिपेक्षा आर्त आवाजात, लता मंगेशकर यांच्या एका भूपाळीचे सूर घुमले. महाराष्ट्राची ती अमर भूपाळी महाराष्ट्र राज्याच्या जन्मक्षणीं म्हटली जावी, हा सुद्धां एक अपूर्व योगायोगच म्हणावा लागेल. ती भूपाळी म्हणत होती—

" घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ॥
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळिं मित्र आला ॥

त्या भूपाळीचे सूर तेथे जमलेल्या लोकांच्या कानांत घुमले आणि मला स्वतःला माहीत आहे, त्या क्षणीं आनंदाश्रूंचा पूर कोणालाहि आवरतां आला नाहीं.

# १३४.

## महाराष्ट्र–दर्शन

शंभरावा प्रयोग आणि एका कलापथकाचा; धंदेवाईक कंपनीचा नव्हे राष्ट्र सेवा दलानें खरो-खरच एक इतिहास घडविला आहे.

महाराष्ट्र–दर्शनाचा हा प्रयोग. हें दर्शन कलापथकानें महाराष्ट्राबाहेरील लोकांनाहि घडविलें. पण ते दर्शन खुद्द महाराष्ट्रीय लोकानाहि जितकें कलात्मक तितकेंच बोधप्रद वाटेल. त्यापेक्षाहि अधिक वैशिष्ट्यपूर्ण अशी जी घटना या कलापथकानें घडवून आणली आहे ती म्हणजे पन्नासावर नव्हे शंभरावर कलावंताना आणि कार्यकर्त्यांना सेवेच्या भावानें, ध्येयाच्या प्रेरणेनें आणि कलेच्या प्रेमानें थोडेथोडके दिवस नाहीं, तीन वर्षें एकत्र गुंफून ठेवणें ही होय.

हे कलावंत आणि कार्यकर्ते अनामिकच राहू द्यात. कारण त्यांत उजवे डावे, सरसनिरस ठरविणें शक्यहि नाहीं आणि इष्टहि नाहीं. कसें शक्य आहे? कार्यक्रमाची आखणी कोणा एकानें केली, संकलन केलें, दिग्दर्शन केलें तरी सुरेल तान ही दुसराच कोणी तरी घेणार, आणि नाचरीं पावलें दुसरेंच कोणीतरी टाकणार ना! एक का प्रसंग त्यात चित्रित झाला आहे? नाहीं. तीनशें वर्षांच्या इतिहासातील शेंकडो पैलू. त्यांत भावभक्ति आहे, वीरश्री आहे, काव्य आहे; नृत्य आहे. महाराष्ट्राचें जीवनसर्वस्व त्यांत ओतलेलें आहे. त्या जीवनसर्वस्वाचें दिग्दर्शन करताना कोणी कला-कार भारावून गेले. हंसले. बागडले, खेळले आणि व्यक्तिशः आणि सामुदायिक रीतीनें नाचलेहि.

तीन तासपर्यंत मी महाराष्ट्राचें तें दर्शन घेत होतों. अनिमिष नेत्रानीं घेत होतों. आनंदाच्या ऊर्मी ओसंडून बाहेर पडेपर्यंत घेत होतो, भारावलेल्या अंतःकरणानें घेत होतों. त्या तीन तासात एक क्षणभरहि माझ्या पापण्या मिटल्या नाहींत; चित्त विचलित झालें नाहीं. समोर दिसत होते तें आजच्या युगांतील महाराष्ट्रीय नागरिक. पण ते असे प्रभावी कलाकार कीं क्षणभर वास्तव जगाचा विसर पडून इतिहासजमा झालेल्या त्या महाराष्ट्राचाच जणु मला आत्मप्रत्यय येऊ लागला.

मनाला वेड लावणारा, चित्तवृत्ति पुलकित करणारा तो आत्मप्रत्यय होता. तो आत्मप्रत्यय घेतांना मला वाटलें, अरे, आपला हा महाराष्ट्र इतका उज्ज्वल आहे, इतका स्फूर्तिदायक आहे याची पुरेशी जाणीव आपल्याला नसावी हें केवढें आपलें दुर्दैव! राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकानें ती जाणीव करून दिली, मलाच नव्हे. सहस्रावधि, लक्षावधि स्त्रीपुरुषाना.

या कलापथकाचें सर्वांत मोठें कार्य हें आहे. तें कार्य त्या पथकानें शंभर प्रयोगांतून केलें, एकसष्ट शहरांतून केलें. त्या कलापथकाची, त्यातील शंभरावर स्त्री–पुरुष, सर्व जातींच्या, सर्व थरा-तील कलाकारांची ही कामगिरी. हीसुद्धां महाराष्ट्राच्या नव्हे भारताच्या इतिहासात रुजू होईल. कारण महाराष्ट्र दर्शन हें या कलापथकाचें पहिलें पाऊल आहे. तें पाऊल टाकतांना त्या पथकानें "जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार" अशी आरोळी ठोकून महाराष्ट्राचें जयगान केलें आणि आपल्या प्रयोगाचा शेवट केला तो "जय हिंद, हिंद आनंदभुवन, जय भारतवर्ष महान्" या भारतवर्षाच्या गुणगानानें.

तें गुणगान ही "भारत दर्शना"च्या प्रयोगाची सुरुवात कशावरून होणार नाहीं?

# १२५.

## विषाची परीक्षा

सत्य हें कादंबरीपेक्षांहि अधिक अकल्पित असतें असें कधींकधीं प्रत्ययास येतें खरें. केंद्रीय आरोग्यमन्त्र्यांनीं सांगितलेली ही गोष्टच पाहाना. त्या म्हणाल्या, एका माणसाला आत्महत्या करावयाची होती म्हणून त्यानें विष घेतलें. पण तो मेला नाहीं. कारण त्या विषात भेसळ होती. त्यामुळें एक दुःखान्तिका टळली. पण ती सुखान्तिका मात्र व्हावयाची नव्हती. कारण दैवयोगानें जीव वाचल्यामुळें त्या माणसाला कांहींतरी खावें असें वाटलें. त्यानें खाद्य पदार्थ आणले आणि त्यांचें सेवन केलें आणि तो मेला. कारण त्या अन्नपदार्थांत विषाची भेसळ होती.

म्हणजे प्रथम दुःखान्तिका टळली ती अकल्पितपणें. नंतर सुखान्तिका टळली तीहि अकल्पितपणें. प्रथमचें बरें कीं नंतरचें वाईट झालें, हें ज्याचें त्यानें ठरवावें. माझें आपलें म्हणणें एवढेंच कीं, ही सत्यकथा कल्पित कथेपेक्षांहि अधिक चमत्कारिक आहे.

तुम्ही या कथेवरून तात्त्विक बोध वगैरे घेण्याचा प्रयत्न करू नका ह कारण मग लगेच आत्महत्या इष्ट कीं अनिष्ट, अन्नांत भेसळ करणें हा सामाजिक कीं नैतिक गुन्हा, मरण ही शरीराची प्रकृति आहे आणि जीवन ही विकृति आहे, यांत सत्य कोठें दडलेलें आहे, वगैरे वगैरे तत्त्वचर्चा सुरू होईल. किंवा योगायोगाचें जीवनांतील स्थान याबद्दल जी स्मशान-वैराग्याच्या काळात चर्चा सुरू होते तिला अकस्मात तोंड फुटेल.

मला ही तत्त्वचर्चा नको आहे. कारण ती शुष्क डोकेफोड हवी कशाला ? तो माणूस मरू पाहत होता त्यावेळीं जगला आणि जगू पाहत होता त्यावेळीं मेला. यात काहींतरी अपूर्व, अकल्पित आढळले आणि माझ्या दृष्टीनें हें सत्य विलक्षण चमत्कारिक आहे, अगदी कल्पना कुंठित करण्याइतकें चमत्कारिक आहे.

पण यामुळें पंचाईत होणार आहे ती अशी कीं, विष घेऊन आत्महत्या करणें हें आतां सोपेंहि राहिलें नाहीं आणि निर्धास्तपणाचेंहि राहिलें नाहीं. कारण विषाचा प्याला घेतल्यानंतर देवदूताची वाट पाहणें हेंच जिवाला वैतागलेल्या प्राण्यासमोरचें उद्दिष्ट असे. आतां भीति अशी आहे कीं उद्या विष घेतल्यानंतर कदाचित् देवदूताच्या ऐवजीं काळ्या डगल्याचे पोलिसच तुमच्या-समोर येऊन उभे राहावयाचे.

म्हणून आत्महत्येसाठीं म्हणा किंवा परहत्येसाठीं म्हणा विषप्रयोग करू पाहणाऱ्या महाभागांनो, एक गोष्ट लक्षांत ठेवा. आधीं विषाची परीक्षा करा आणि मगच विषाचा प्याला हातीं धरा.

# १३६.

## एक आकांक्षा, एक स्वप्न

" स्वतः विकत घेऊन पुस्तकें वाचा " ही एक लहानशी, साधी योजना. मर्यादित पुस्तकांची, मर्यादित प्रकाशकांनीं मंजूर केलेली आणि मर्यादित काळापुरती. त्या योजनेंत समाविष्ट झालेली पुस्तकें हीं १९६२ सालातील चांगलीं प्रकाशनें. तीं उत्कृष्ट आहेत किंवा नाहींत हें वाचकांनीं ठरवावयाचें

वाचकासाठीं थोडीशी निवड तेवढी करण्यात आली. चोखंदळ वाचकासाठीं नव्हे; सामान्य वाचकांसाठीं. त्याना थोडेंसें मार्गदर्शन हवें असतें. ते स्वतः हीं सारीं पुस्तकें कोठून वाचणार ? कोणीतरी वाचून त्याच्यासाठीं एक यादी तयार केली, अर्थात् ती यादी अपुरी असणार, अनेकांना ती पसंत पडणार नाहीं हें ओघानेंच आलें.

पण सामान्य वाचकांना थोडासा आधार त्या यादीनें दिला तरी पुरे कीं. ते म्हणतील, चला, निदान पुस्तक-विक्रेत्याना काहीं नांवें तर सांगतां येतील. त्यांच्या या समाधानात थोडीशी भर पडली आहे ती अशी कीं, या सामान्य वाचकासाठीं आपल्या पुस्तकाचे दर कमी करण्याची कांहीं प्रकाशकांनीं तयारी दाखविली आहे.

त्यांतूनच एक सुखस्वप्न नजरेसमोर तरळू लागलें. तें स्वप्न आपलें स्वत:चें एक बुकशेल्फ असण्याचें. लहानसें बुकशेल्फ. मोठें असणार तरी कसें ? खोल्या, दोन खोल्यांतील संसार. पण त्या संसारात आपण एखादें कॅलेंडर लावतों, एखाद्या नेत्याचें छायाचित्र लावून भिंतीला शोभा आणतों. कोठें एखादा लहानसा रेडिओ आपल्या मधुर आवाजानें तो संसार भारून टाकतो. लहानशा आकांक्षा. त्या साध्य झाल्या कीं मन हरखून उठतें.

तशीच ही बुकशेल्फची एक आकांक्षा. चारसहा पुस्तकें हारीनें ठेवू आपण त्यावर. ही सुरुवात झाली. त्यातूनच ओढ लागेल पुस्तकें घेण्याची. जागा थोडी म्हणून निवडक पुस्तकेंच आपण घेऊ. सध्या शेल्फ नाही. नसू द्या, एखाद्या फळीवरच तीं ठेवू. मग वेताचें एखादें शेल्फ आणू. कधीं काळीं काचेचें कपाट त्याची जागा घेईल. ही एक आकांक्षा. हें एक स्वप्न.

तें प्रत्यक्षात आणण्यासाठीं ही योजना आंखण्यांत आली आहे. ही योजना मोठी विचारानें तयार झाली आहे असें नव्हे. कल्पना आली, तिची वाच्यता झाली प्रकाशकांनीं तिला मंजुरी दिली. कोणाच्या फायद्यासाठीं ? फक्त सामान्य वाचकांच्या. त्यांना कांहीं पुस्तकें, काहीं काळ कमी किंमतींत मिळणार आहेत. आणि हीं सर्व १९६२ सालचीं चांगलीं पुस्तकें.

असेल. त्या योजनेंत उणीव असेल, दूरदृष्टीचा अभावहि असेल, कोणाचें नुकसानहि होईल. पण फायदा होणार आहे तो सामान्य वाचकाचाच ना ! प्रकाशकांचा, पुस्तकविक्रेत्यांचा हाच ना खरा ग्राहकवर्ग.

मग त्याची एखादी आकांक्षा सफल झाली तर त्याबद्दल निरागस आनंद नको का मानावयाला ?

# १२७.

## आत्म्याला आवाह्न

बर्ट्रान्ड रसेल याना जगसेवेची एक अमूल्य सधि प्राप्त होणार आहे. त्याबद्दल त्यानी जय-प्रकाशबाबूंचे मात्र आभार मानले पाहिजेत. हे सगळे शातिदूत सध्या पेटले आहेत. आणि पेटलेल्या अवस्थेंत ते सैरावैरा धावू लागले आहेत.

हेंच पहा ना, शकरराव देव चागले सासवडच्या आश्रमांत आपला वृद्धापकाळ घालवीत होते. अलीकडे आदोलनाच्या अभावीं ते गजून चालले होते, समाजाच्या उपेक्षेमुळें थड होत होते. पण चीनचें आक्रमण आलें आणि तिकडे बर्फाचे तट पेटुनि उठले आणि इकडे शकररावाचें मन पेटुनि उठलें. म्हणजे चीनच्या विरुद्ध नव्हे. छे छे. सर्वोदयी नेते इतक्या क्षुद्र पातळीवरून जगाच्या प्रश्नाकडे पाहत नाहीत. ते पेटले ते या आशकेनें कीं न जाणो गांधीजींच्या या भारतांत आक्रमकाचा प्रतिकार सशस्त्र केला जाईल कीं काय ?

नाहीं बरें, भारताचा असा अधःपात ते होऊ देणार नाहींत. म्हणून त्यानीं आपला आश्रम सोडला आणि पेकिंगच्या हृदयस्थ परमेश्वराला आवाहन करण्यासाटीं ते तडक पेकिंगला निघाले.

पण पेकिंग किती आडमुठें पहा. त्याना आपले मित्रहि कळत नाहींत, हितकर्तेहि कळत नाहींत. त्यानीं शकररावाच्या शातियात्रेलाच आपला दरवाजा बद केला. शकरराव बिचारे पेकिंगला आवाहन करीत आहेत कीं अहो, थोडें तुमचें चुकलें, थोडें आमचें चुकलें; सीमारेषा ती काय ! कोठें एखाद्या उचवट्यावर, दऱ्याखोऱ्यात इकडे तिकडे झाली म्हणून काय झालें ! आपण लवादाकडेच तो वाद सोपवूं. पण काहीं झालें तरी शाततेचा भग होऊ देणार नाहीं. तरी पेकिंग म्हणतें आहे कीं हे शांतियात्री आमच्या परिसरांत नको आहेत.

आतां काय सागावें या पेकिंगला. आमची तर अगदीं मति कुठित झाली बुवा पण जयप्रकाशजींना त्या निराशेच्या अधारातच एक प्रकाशकिरण दिसला.

तो, तो पहा किरण. एका तत्त्वज्ञान्याच्या अतरगांतून प्रगट होणारा किरण. किती शात, सौम्य. सीतल चादण्यानें सुद्धां त्याच्या स्निग्ध दीप्तीपुढें मान लववावी. आता हा शीतल किरण पेकिंगचा अतरात्मा उजळून काढील, आणि मग सीमेचीं बंधनें, तत्त्वांचा सघर्ष, देशाच्या आशा-आकांक्षा या सर्वांवर मात करणारा शांतीचा महामत्र पेकिंगमधील राज्यकर्त्यांच्या हृदयाचा ठाव घेईल आणि ते आपले दरवाजे शकरराव देवांना खुले करतील.

भारत–पाकिस्तान-ब्रह्मदेश ते पेकिंग हा शातियात्रेचा मार्ग आहे. पण हा झाला आधि-भौतिक मार्ग. आध्यात्मिक मार्ग आणि जो खरा मार्ग आहे तो शकरराव देव–जयप्रकाश नारायण–बर्ट्रान्ड रसेल ते चू एन् लाय असा अतरात्म्याचा छेद करून जातो बरें ! सध्यां आपण बर्ट्रान्ड रसेल यांच्या आत्म्यालाच आवाहन करू या.



...९

## १२८.

## तोचि साधु ओळखावा

साधुसमाज ही संघटना भारताचा नैतिक स्तर उंचावण्यासाठीं निघालेली आहे. ठीक आहे. आपल्या नीतीची सर्वांनाच काळजी लागली आहे. मग साधु समाजानेंहि तीच चिंता का करूं नये? जरूर करावी. पण जाता जातां आपल्या समाजाकडेहि म्हणजेच साधूकडे त्यानीं लक्ष दिलें तर !

—तर नीतीचा दिवसाढवळ्या खून पाडणाऱ्या असंख्य साधूच्या व्यवहारांची त्याना कल्पना येईल. आधींच साधु हे बाडगुळाप्रमाणें समाजाच्या उपकारावर विनाकष्ट चरत असतात. आपला भोळा भक्तिभावहि असा प्रबळ कीं साधूच्या सरबराईसाठीं समाज सढळ हातानें खर्च करीत असतो. त्याचें पर्यवसान पुढें अंधभक्तींत होतें आणि मग साधूची मोहिनी अशी पडते कीं कोणत्याहि विचाराला—नव्हे अविचारालाहि मर्यादा राहत नाहीं.

हाच अविचार जबलपूरमधील एका तरुणीनें केला. तिला आपल्या प्रियकराचें मन वळवायाचें होतें आणि त्यासाठीं एका साधूनें वशीकरण विद्येचा प्रयोग करण्याचें तिला आश्वासन दिलें. भोळी, भाबडी, प्रेमलविव्हल तरुणी, आशेनें बिचारी साधूच्या दर्शनाला गेली आणि अखेरीस प्राणाला मुकली.

साधु महाराजानीं तिचा खून केला आणि तिचे सारे दागदागिने लुटले असें कळतें. हा गुन्हा तर घडलाच. अतिशय गंभीर गुन्हा. पण तो, भगवें वस्त्र परिधान केलेल्या एका निःसंग म्हणून मानल्या गेलेल्या साधूनें केला ही त्याहिपेक्षां गंभीर घटना आहे.

या घटनेचा आपण विचार केला पाहिजे तो असा कीं किती काळ आपण हा भोळा, भाबडा, आंधळा भक्तिभाव ठेवणार? होय. आपल्याला कोणाच्या तरी आधाराची आवश्यकता असते हें मान्य. दुबळ्या मानवी मनाला हा आधार लागतोच. पण खरेंच का हा आधार मिळतो? तो मिळत असल्याची कल्पना ही सुद्धा एक फसवणूकच नव्हे काय? जरा शांतपणें विचार केला तर आपलें आपल्यालाच कळून येईल कीं आधार घ्यावयाचा झाला तरी तो डोळसपणें घेणें अधिक इष्ट आहे.

अहो, ज्याची ब्रह्मानदीं टाळी लागली आहे ते साधु या संसारी जगातील प्रश्न कसे सोडवू शकणार? ते सोडविण्याची आकांक्षा त्यानीं धरली किंवा तशी आशा ते दाखवू लागले तर बिनधोकपणें तुम्ही समजा हा साधु नव्हे; हा शुद्ध भोंदू आहे.

# १३१.

## स्त्री आणि मुत्सद्दी

एका गांधीवादी विचारवंतानें नुकतीच स्त्री आणि मुत्सद्दी यांची तुलना केली आणि कांहीं मार्मिक निष्कर्ष काढले. हे निष्कर्ष जसे मार्मिक आहेत तसेंच ते उद्‌बोधकहि आहेत.

म्हणजे असें पाहा ! ते म्हणतात कीं, स्त्रीनें 'नाहीं' म्हटलें तरी त्याचा अर्थ तो नकार होय असें नाहीं. स्त्री ही कधींहि ' होय ' म्हणत नाहीं. तिनें तसें म्हटलें तर ती स्त्रीच नव्हे. आता हा निष्कर्ष उद्‌बोधक नाहीं तर काय ? प्रेमिकाना खरी आशा देणारा हा निष्कर्ष आहे. ही आशा अशी कीं, आज प्रेयसी नाहीं म्हणत आहे; म्हणू दे. तिला कदाचित् दुसरेंच कांहीं म्हणावयाचें असेल. पण एकदम ती कसें म्हणणार ? जरा थांबा; कदाचित् त्या मधूनच होकार येईल

म्हणजे मुखानें नव्हे बरें; कदापिहि नाहीं. स्त्रीनें होय म्हटलें तर ती स्त्रीच कसली ? आणि त्याच्या उलट मुत्सद्याची रीत. तो बेटा कधीं ' नाहीं ' म्हणत नाहीं. पण त्याचा होकार हा स्त्रीच्या नकारासारखाच उलटा असतो. त्यातून अर्थ काढावयाचा असा कीं, त्यानें 'होय' म्हटलें आहे ना, मग त्याला नाहीं हेंच अभिप्रेत आहे. कदाचित् कालांतरानें तो थोडासा बदलेल किंवा बदलल्यासारखं दाखवील. पण त्याचा भरवसा नाहीं. तुमच्या मनात आहे ना, तुम्हांला जें वाटत आहे ना, त्याच्या अगदीं उलट त्याचा निर्णय झालेला असेल.

किती भयानक सत्य आहे तरी हें ! म्हणजे ' चंचलता हें स्त्रीवर्गा तुझें नांव ' असे जळजळीत उद्‌गार ज्या स्त्रीवर्गाबद्दल शेक्सपियरनें काढले त्या स्त्रीपेक्षाहि अधिक फसवे हे मुत्सद्दी असतात तर !

होय बरें. म्हणूनच ' राजकारण हा बदमाशांचा अखेरचा निवारा ' असा निर्वाळा दिला गेला आहे. ते तरी बिचारे काय करणार ! स्त्रीची अखेरची ओढ ही मीलनाचीच असते. मुत्सद्याची अखेरची ओढ ही विभाजनाची असते. मीलनांतूनच स्त्रीत्वाचा विकास व्हावयाचा असतो. विभाजनांतूनच मुत्सद्याची प्रगति व्हावयाची असते.

म्हणून स्त्री ही 'नाहीं' म्हणता म्हणतांच धरणी न्याहाळते आणि रसिक प्रियकर तिचा भाव लक्षांत घेऊन आनंदला जातो. मुत्सद्दी हा त्याच्या उलट हसतमुखानें 'होय' म्हणतो आणि त्याच वेळीं आपल्या हातांतील नकाराचें शस्त्र परजतो. चतुर प्रतिस्पर्धी त्याच्या मनांतील कपट ओळखल्याशिवाय राहत नाहीं.

यावरून बोध एवढा घ्यावयाचा कीं, स्त्रीप्रेमाची ओढ लागलेल्या पुरुषानें कधींहि आशा सोडता कामा नये आणि राजकारणी पुरुषानें सदैव निराशेचीच अपेक्षा ठेवली पाहिजे.

## १३०.

# झाकिर हुसेन

डॉ. झाकिर हुसेन हे उपराष्ट्रपति झाले म्हणून मानमान्यता पावले असें नव्हे. मानमान्यता पावल्यामुळेंच हा आणखी एक सन्मान त्यांना बहाल करण्यांत आला. झाकिर हुसेन यांचें चारित्र्य व कर्तृत्व इतकें असामान्य आहे कीं कोणताहि सन्मान त्यांच्या बाबतींत अपुराच वाटावा.

त्यांचें कर्तृत्व प्रकर्षानें प्रगट झालें तें शैक्षणिक क्षेत्रात. राजधानींतील 'जामिया मिलिया' या शिक्षण-संस्थेचे ते संस्थापक व संवर्धक आहेत एवढेंच लक्षात घेतलें तरी त्यांचें नाव शिक्षण क्षेत्रात मशहूर का झाले याची कल्पना करता येईल. ही संस्था दिल्लीचेंच नव्हे तर भारताचें भूषण होईल अशा योग्यतेची आहे. निधर्मी मुसलमानी संस्कृतीचें ती प्रतीक आहे. होय. तुमच्या कपाळावर उमटलेल्या आठ्या मला दिसत आहेत. तुम्ही जणु म्हणत आहा, मुसलमान आणि निधर्मी ?

लक्षात ठेवा. निधर्मी ! अधर्मी नव्हे. झाकिर हुसेन हे मुसलमान आहेत; धार्मिकहि आहेत. पण धर्मनिरपेक्ष वृत्तीनें ते समाजाकडे, राजकारणाकडे पाहू शकतात. मुसलमानी संस्कृतीचा त्यांना अभिमान आहे. पण ती सुसंस्कृति-जी धर्मद्वेष करीत नाहीं, जी उर्दू भाषेचा अभिमान बाळगते, तिच्या विकासासाठीं झटते, पण राष्ट्र वा प्रादेशिक भाषेला गौण स्थान देत नाहीं, जी इस्लामी परंपरा ही भारतीय संस्कृतीचा एक घटक मानते, अशी सुसंस्कृति.

या सुसंस्कृतीचे सारे लोभसवाणे संस्कार झाकिर हुसेन यांच्या व्यक्तित्वावर व चारित्र्यावर झालेले आहेत. म्हणूनच गांधीजींच्या सर्वोदयाची प्रतिमा इतरत्र त्यांच्या अनुयायांनीं विकृत केलेली आढळून येत असली तरी जामिया मिलियामध्यें मात्र झाकिर हुसेन यांच्या मार्गदर्शनामुळें गांधीजींना प्रिय असलेल्या हिंदुस्थानी भाषेचा फुलोरा डौलदारपणें विकसत असलेला आणि त्यांच्या मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग विधायक कर्तृत्वानें नटलेला दिसून येतो.

झाकिर हुसेन यांच्या शांत, शालीन, संयमी पण निर्धाराच्या व्यक्तित्वाचा प्रभाव या संस्थेप्रमाणेंच उत्तर भारतांतील सामाजिक व राजकीय जीवनावरहि अनेकविध रीतीनें पडलेला आहे. धार्मिक मुसलमान असूनहि राष्ट्रीयत्वाला पारखें न होणें, आणि सांस्कृतिक विविधतेची जोपासना करतांनाहि भारतीय एकात्मतेला बाधा न आणणें हा चमत्कार प्रत्यक्ष जीवनांत घडवून आणणारे जे कांहीं थोडे किमयाकार या देशांत आहेत त्यात झाकिर हुसेन यांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल.

पण म्हणूनच हा किमयाकार आज भारताच्या उपराष्ट्रपतिपदावर विराजमान झाला आहे.

१३१.

## लाल फीत

लाल फीत आणि त्यातून निर्माण होणारी दिरगाई ही आपल्या इतकी अंगवळणीं पडली आहे कीं तिच्याबद्दल त्वेष येण्याऐवजीं तिच्याकडे विनोद म्हणून पाहण्याचीच प्रवृत्ति बळावत चालली आहे. दफ्तरदिरगाई ही जोंवर जीवनाशीं खेळ करीत नाहीं, तोंवर राज्याचा कारभार 'आलबेल' चालल्याची ही निशाणी विनोदविषय व्हावयाला हरकत नाहीं. पण या दिरगाईतून एखादी हृदय पिळवटून काढणारी शोकान्तिका निर्माण झाली तर मात्र या लाल फितीविरुद्ध समाजाची सद्सद्विवेक बुद्धि खवळून उठावयाला पाहिजे.

नागपूर विभागांत अशीच एक शोकांतिका नुकतीच घडली. एका ओव्हरसिअरच्या बाबतींत ती घडली. बिचारा सहा महिने पगाराशिवाय राहिला. कां ? तर त्याची बदली एका सरकारी खात्यांतून जिल्हा परिषदेकडे झाली. महाराष्ट्र सरकारच्या त्या खात्यानें नोकरीचें स्वरूप व पगाराची रक्कम याबद्दलचा दाखला जिल्हा परिषदेला सादर करावयाला विलंब लावला हें पगार न मिळण्याचें कारण. सहा महिने पगाराशिवाय राहणें आणि तेंहि पत्नी व सात मुलें एवढ्या मोठ्या कुटुंबाचें पालनपोषण करण्याची जबाबदारी असताना ! वेड लावण्यासारखीच ही परिस्थिति नव्हे तर काय ? त्याला वेडच लागलें व त्यांतच त्याचा मृत्यु झाला.

त्या मृत्यूला जबाबदार कोण ? व्यक्तिशः कोणीहि नाहीं. सरकार ! तेंहि नाहीं. जबाबदार फक्त लाल फीत. राज्यकारभार सुसंगत चालावा म्हणून नियम करण्यात आले. त्या नियमातूनच लाल फीत आली. तिचा एकदा संबंध जडला की, कचेरीच्या कागदपत्रांची वाटचाल सुरू होते. एकदां खालून वर आणि दुसऱ्यादा वरून खालीं. मधेच एखाद्या ठिकाणीं कागद अडतो, आणि मग तो असंख्य कागदांच्या ढिगाऱ्यात दिसेनासा होतो. हा कागदांचा प्रवास खात्याखात्यांतूनसुद्धा होत असतो. म्हणजे मग रेल्वेच्या जंक्शनवर गाड्याची बदली करतांना जसा वेळ वाया जाणें अपरिहार्य होतें तशीच या कागदाची गति होते.

गति ? चुकला शब्दप्रयोग. लाल फितीच्या साम्राज्यांत गतिमानतेला स्थान नाहीं. स्थितिप्रियता, अखंड विलंब आणि बेछूट बेपर्वाई हीं लाल फितीचीं लक्षणें आहेत. तुम्ही तिच्या जाळ्यांत अडकलात कीं तुम्हांला एकच तरणोपाय आहे—चिरनिद्रा ! म्हणजे लाल फीत राहिली तरी तुम्ही सुटलात !

# १३३.

## सागराला आव्हान

काळोख दाटला आहे. तुफान दर्या समोर पसरला आहे. अंधाराच्या या साम्राज्यांत, सागरलाटांच्या थैमानाशीं टक्कर देणारे हे लुकलुकणारे दिवे तरी कोठले? सागराच्या आणि निसर्गाच्या रौद्रस्वरूपी सान्निध्यात आकाशांतील काजव्याप्रमाणेंच जणु ते चमचम करीत आहेत.

किती सुरेख दृश्य आहे तें. मला तर हरिद्वारच्या गंगाप्रवाहाची आठवण होत आहे. दुथडी भरून वाहणारा तो प्रवाह; पवित्र गंगाजलाचा प्रवाह. त्या जलाचें पावित्र्य वाढविण्यासाठींच जणु भक्तगण त्या प्रवाहात एकामागून एक दिवे सोडतात. गंगेच्या प्रवाहातून हारीनें वाहत जाणाऱ्या त्या दिव्याची शोभा काय वर्णावी !

तेच, तेच का दिवे आज या सागरांत सोडले गेले आहेत? दूरवरून या अंधाराचा भेद घेताना मानवी श्रद्धेचें प्रतीक झालेल्या दीपमाळेसारखेच हे लुकलुकणारे दिवे भासत आहेत. पण, गंगेसारखा सागर शांत थोडाच आहे! एकेका लाटेसरशी तो अजस्र बोटींनाहि आपल्या पोटात घेतो तर या लहानशा दिव्याची कथा काय?

नाहीं बरें, हे मानवी भक्तीचें प्रतीक झालेले दिवे नव्हेत. हे मानवी शक्तीचें, आव्हानाचें निशाण फडकविणारे मार्गदीप आहेत. जरा बारकाईनें, डोळे फाडून पाहा, म्हणजे तुम्हांला दिसून येईल कीं, या दिव्यांच्या अंधुक प्रकाशात मानवी शक्ति निसर्गाला आव्हान देत आहे, रौद्ररूपी व क्रूर सागराला वेसण घालू पाहत आहे.

तुम्हांला दुरून जो एक लुकलुकणारा दिवा दिसला ना, तो एका पडावातील दिवा आहे. त्याचें शीड फडफडत आहे. त्यातील चार दोन व्यक्तींची अजस्र धडपड चालली आहे. कारण, खुशींत आलेला समिंदर त्यांची बोट ठरू देत नाहीं आणि त्यांना सागराशीं सामना देत, त्याचें रत्नभांडार लुटावयाचें आहे.

हेंच तें रत्नभांडार उद्यां तुमच्यापुढें खुलें होईल. आणि मग खमग, चुरचुरीत अशा खाद्य-पदार्थांनीं तुमची थाळी भरून जाईल. पण ही थाळी भरण्यासाठीं साऱ्या रात्रभर किती लोकाना कष्ट करावे लागले, कितीक लोकाना आपला जीवसुद्धां धोक्यांत घालावा लागला याची तुम्हांला कल्पना तरी आहे का?

ते पाहा, ते लुकलुकणारे दिवे सागरपुत्रांच्या बहादुरीचीच जणु ध्वजपताका फडकवीत आहेत.

## १३३

# उठा बंधूंनो, उठा भगिनींनो—

शाबास ! बोलावें तर असें खणखणीत. अहो, दिल्लीकर ठगे आहेत. त्याना स्वच्छपणें सांगितलें पाहिजे कीं कृष्णेचें पाणी आमचें आहे. आम्ही तें घेणार. घेणार नव्हे घेणारच. हा 'च' ही महाराष्ट्राची अस्मिता आहे बरें !

आता आली ह वेळ अस्मिता प्रगट करण्याची. तुम्हाला आठवतात ना ते दिवस. ते दिवस हो, जेव्हा शंकरराव देव डावा हात फोंफावीत दिल्लीश्वराना आव्हान द्यावयाला जात होते ते दिवस. आणि तेहि दिवस जेव्हा महाराष्ट्राचे पुढारी हातवारे आणि जयघोष करीत दिल्लीला जात आणि हात हलवीत मनमाडमार्गे पुण्याला परत येत असत.

पण तुम्ही असें समजू नका; आम्ही कोणाची गय केली म्हणून. आम्ही असें बोललों, असें बोललों; अशा धमक्या, अशीं आव्हानें दिलीं कीं, दिल्लीकर नुसते भांबावून गेले. अहो, इतके भांबावून गेले कीं, आम्ही काय म्हणतों हेंच त्यांना कळेनासें झालें.

ते जे पर्याय आले ना, ते त्यातूनच. आम्ही असे मुत्सद्दी. एकेक पर्याय आला कीं त्याला शह देण्यासाठीं आम्ही दुसरा पर्याय सुचवावयाचे. तुमच्या आपलें कानात गुपित सांगतों. अखेरीस आम्हीं कोणता पर्याय स्वीकारला आणि कोणता नाकारला हें आमचें आम्हांला सुद्धा कळेनासें झालें.

आता तरी पाहा, आम्ही या ठग्यांचा कसा गोंधळ उडवून देतों तें. गोदेचें पाणी कृष्णेंत सोडावें ही कल्पना आम्ही १९५१ सालींच सुचविली होती. बघा ! दूरदृष्टि बघा आमची. पण आजकालचा दिल्लीचा प्रघात असा आहे कीं, ज्याचा हात ज्याच्यावर पडतो तो तें लांबवतो. आमच्या कृष्णेचें पाणी सुद्धा असेंच लांबविलें जात आहे.

पण तें आम्ही सुखासुखी सोडणार नाहीं. दिल्लीकरांचा असा गोंधळ उडवून देऊं आम्ही कीं, गोदेचें पाणी कृष्णेंत सोडावें कीं कृष्णेचें पाणी गोदेंत सोडावें, याबद्दल त्यांच्या मनात भ्रांति; निर्माण झाली पाहिजे. आता पुन्हां एकदा पर्यायांची फेर झाडावयाला लागू आम्ही. होय, पर्याय गोदेबद्दलचे आणि कृष्णेबद्दलचे. कालव्यासाठीं पाणी कीं विजेसाठीं पाणी याबद्दलचे. पाणी पूर्वे-कडून पश्चिमेकडे न्यावयाचें कीं पश्चिमेकडून पूर्वेकडे न्यावयाचें याबद्दलचे.

महाराष्ट्राला जीवन देणाऱ्या पाण्यासाठीं लढावयाची वेळ आली तर हा पहा शब्दांचा आणि पर्यायांचा धबधबा आमच्यापाशीं तयार आहे.

## १३४.

# फ्लॅश, फ्लॅश, फ्लॅश

दैनिक वृत्तपत्राच्या दैनंदिन यशापयशाचें मोजमाप कशावरून होत असेल तर त्याच्या मथळ्यावरून. रात्रपाळीच्या संपादकाना वेध लागतात ते मथळा देणाऱ्या बातमीचे. घड्याळाचे कांटे जसजसे फिरतात तसतशी या बातमीबद्दलची आतुरता वाढत जाते. डोळे टेलीप्रिंटर मशीनवर खिळतात आणि मनोमनीं एकच प्रार्थना केली जाते, " देवा, फ्लॅश, फ्लॅश, फ्लॅश, हे तीन शब्द त्या मशीनवर मला दिसू देत. "

तुम्हाला समजला का ' फ्लॅश 'चा अर्थ ? भूकंप, अंतराळ–भ्रमण, युद्ध, दंगे, वाटाघाटींचा अंत, प्रसिद्ध पुरुषाचें निधन आणि अशाच विषयाची वार्ता ही डोळ्यात भरेल अशा रीतीनें जेव्हां दिली जाते तेव्हा एक, दोन किंवा तीन वेळां मशीनवर ' फ्लॅश 'ची सूचना देण्यात येते. झोपेला आलेल्या रात्रपाळीच्या संपादकाला इषारा देण्यासाठी, प्रसंगीं खडबडून जागें करण्यासाठीं हा ' फ्लॅश ' दिला जातो.

तो पाहिल्याबरोबर रात्रपाळीचा संपादक किती आनंदित होत असेल म्हणून सांगू ? सारी चिंता, त्या क्षणीं त्याची नाहींशी होते, चिंतेतून निर्माण झालेला त्याचा रक्तदाब क्षणार्धात खालीं येतो. मला आठवतें, अशाच एका चिंताग्रस्त झालेल्या संपादकानें अखेरीस विनोदबुद्धीनें मथळा दिला होता " मजकूर आला, मथळा नाहीं. "

दैनिक वृत्तपत्राचा आजचा वाचक लगेच म्हणेल, " संपादक महाराज, तुमचा मजकूर वाचायला आम्हांला वेळ नाहीं. आठ अकराची २१ डाऊन पकडतां पकडता जेवढे मथळे वाचतां येतील तेवढीच तुमच्या वृत्तपत्राची आणि आमची डोळेभेट. तेथें तुमच्या मजकुरावरून आम्ही नजर केव्हा फिरविणार ? "

वाचकाची नजर खिळवून घेणारी हेडलाईन हें तर वृत्तपत्राचें वैशिष्ट्य तें वैशिष्ट्य डोळ्यांत तेल घालून जपणारा रात्रपाळीचा संपादक म्हणूनच ' त्या ' एका, वार्तेसाठीं अधीर, बखवखलेला असतो. त्या संपादकाला आजवर आधार देत असे ' ती ' वार्ता. पण आतां आणखी एक जादुगार त्याच्या मदतीला धावून येऊ पाहत आहे.

होय; हा जादूगारच आहे आणि तो भविष्यवेत्ताहि झाला आहे. त्याने म्हणे ' टाइम्स 'चा मथळा दोन दिवसापूर्वीच हेरून ठेवला होता.

रात्रपाळीच्या संपादकांनो, आता तुमची काळजी मिटली बरें का ! बस्स, आजवर चातक जशी पावसाची वाट पाहतो तशी तुम्ही वार्तेची वाट पाहत होतां. आतां जादुगाराशीं संधान बांधा. मथळा तुमच्या पायाशीं चालत येईल.

१३५.

## जन्ममरणाचा फेरा

आतां म्हणे मुंबईच्या भाटिया बागेंतील झाडें तोडलीं जाणार आहेत. त्यात काय आश्चर्य म्हणा ! समतोल राखणें हा आपला धर्म आहे. एकीकडे वनमहोत्सव आपण करतो ना ! मग जितकें वृक्षारोपण होतें तितकें वृक्षच्छेदन केलें म्हणून काय झालें ? जगातील राजकारणांत जसा समतोल तसा वृक्षवेलींच्या विश्वातहि आपल्याला समतोल राखलाच पाहिजे. नाहीं तर नुसतींच जगलें वाढावयाचीं.

भाटिया बागेंतील जंगलसुद्धां तोडण्यात येणार आहे ते कशाकरिता माहीत आहे का ? साध्यासुध्या कारणासाठीं नव्हे. अहो, मुंबईतील धनिकांच्या मोटारींसाठीं तेथें एक कायमचा स्टँड बनविण्यात यावयाचा आहे. म्हणजे पाहा, हीं वेढब, उगाचच उंच वाढलेलीं झाडें पाहण्याऐवजीं आलीशान, चकचकीत मोटार गाड्या तुमच्या दृष्टीस पडू लागतील.

झाडें आणि त्याची सावली. झुळझुळ वाहणारा वारा आणि विश्रांतीसाठीं पहुडलेले लोक. ठीक आहे. काव्यासाठीं ठीक आहे. उमर खय्यामची आठवण काढीत कोणी कविजन म्हणतील " या इथें तरुतळीं. . . . "

पण " या इथें तरुतळीं " बसून आधुनिक जग नाहीं निर्माण करता येत. आधुनिक जगांत सारें कांहीं हुकुमाप्रमाणें तयार होत असतें, तुमच्या दिमतीला उभें राहत असतें. कशाला हो झुळुझुळु वारा पाहिजे ? वातानुकूलि यंत्र बसविलें कीं सारें आसमंत थंडगार होतें. योजनांच्या या युगात लोकांनींसुद्धां विशाल दृष्टि ठेवली पाहिजे, आपल्या आकांक्षाचें क्षितिज उंचावलें पाहिजे. निसर्गावर नुसतें अवलंबून राहून कसें चालेल !

होय ! होय. झाडें पाहिजेत आम्हांला. तेवढ्यासाठींच तर आम्ही वनमहोत्सव साजरे करू लागलों आहों. एकेका वृक्षारोपणासाठीं आम्ही मंत्री जमवितों; केवढा समारंभाचा थाट उडवून देतों. कां ? तर लोकांना वृक्षराजींचें महत्त्व कळावें. अहो, आपल्या साऱ्या योजना भावी पिढ्यांसाठीं चालल्या आहेत ना. वनमहोत्सव हासुद्धां भावी पिढ्यासाठींच आपण आंखलेला एक कार्यक्रम आहे.

पण त्याच वेळीं आजच्या जगाच्या गरजासुद्धा आपल्याला आवाहन करीत नाहीत का ? तेवढ्यासाठीं तर मोटार स्टँड उभारण्यात यावयाचा आहे. तुम्ही कांहीं काळजी करू नका. प्रत्येक वृक्ष पाडतांना आम्हीं एका सन्माननीय पाहुण्याला आमंत्रण द्यावयाचें ठरविलें आहे कुऱ्हाडीचा त्यानें घाव घालावयाचा आणि वृक्षसंगोपनावर एक व्याख्यान द्यावयाचें अशी आम्ही योजना आंखली आहे. एकदा भाटिया बाग साफ झाली कीं तेथेंच भव्य मंडप घालून वृक्षसंगोपनावर एक परिसंवाद घडवून आणण्याचाहि आमचा विचार आहे. या बरें का त्या परिसंवादाला !

# १३६.

## तुम्ही आणि आम्ही

केनेडी साहेब, तुमचा दिनक्रम तुम्हांलाच लखलाभ होवो. अहो, मिनिटामिनिटागणिक तुमच्या मुलाखती आणि लेखन, वाचन आणि राज्यकारभाराबद्दलची चर्चा चाललेली असते म्हणे! प्रत्येक क्षण तुमचा कामकाजांत व्यतीत होतो. आतां काय सांगावयाचें तुम्हाला?

अध्यक्ष ना तुम्ही? राज्याचे प्रमुख ना? मग तुम्ही काम करावयाचें? प्रत्यक्ष काम! आणि का हो, सरळ टेलिफोनवरून लोकांशीं बोलता तुम्ही! म्हणजे मग तुमचा रुबाब तो काय राहिला! आणि तुम्ही अधिकृत रीतीनें विश्रांति घेता? आणि दुपारच्या वेळीं अधिकृतपणें झोपतां?

छे, छे, हें सारेंच काहीं चमत्कारिक आहे. म्हणजे दिवसभर मिनिटामिनिटाला काम करणें हेंहि चमत्कारिक आहे आणि अधिकृत रीतीनें झोपणें हेंहि चमत्कारिक आहे. त्याचें असें आहे केनेडी साहेब, कामाच्या वेळीं काम आणि विश्रांतीच्या वेळीं विश्रांति. हा आदर्श सामान्य लोकांना ठीक आहे पण मंत्री आणि अध्यक्ष यांनीं असें सामान्यांप्रमाणें वागून कसें चालेल?

त्यांनीं कामाच्या वेळीं डुलकी घेतली पाहिजे. आणि लोक झोपतात ना, त्या वेळीं आपले दिवे जळत ठेवले पाहिजेत. आमचा कामाचा खाक्या असा आहे बरें! उगाच नाहीं आमचें नेतृत्व टिकत? नाहीं तरी साहेब, आपलें उद्दिष्ट काय? लोकांवर छाप टाकणें. राज्यकर्त्यांनीं, नेत्यांनीं तेंच उद्दिष्ट आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें पाहिजे. म्हणजे काय? लोकांना असें पटलें पाहिजे, त्यांची मनोमन खात्री झाली पाहिजे कीं कारभारी आणि मंत्री असावा तो असा.

असा म्हणजे ऐन कामाच्या गर्दीत जो डुलकी घेतो. या डुलकीचा अर्थ काय माहीत आहे का? तिचा अर्थ असा कीं, या मंत्र्यानें आणि नेत्यानें उभी रात्र कामानिमित्त जागून काढली आहे. पुरावा? मध्यरात्रीं जळणारे दिवे. बघा, आमचा मुत्सद्दीपणा कसा आहे तो. सामान्य आणि असामान्य यातील फरक आहे तो हाच. सामान्यानें काम केलें पाहिजे. असामान्यानें काम करतों असें दाखविलें पाहिजे.

ही आमची ऐन कामाच्या वेळची डुलकी आणि ऐन मध्यरात्रीची जाग, हीच बरें आमच्या कर्तृत्वाची निशाणी; आमच्या नेतृत्वाची साक्ष!

केनेडी साहेब, तुम्हाला काम करावें लागतें? मग कसले हो तुम्ही नेते?

## १३७.

## धन्य, धन्य, धन्य

शाबास. मध्यप्रदेश सरकार धन्य आहे. याला म्हणतात जिद्द. याला म्हणतात धैर्य. चीनला म्हणावें हें पाहा आम्ही आव्हान स्वीकारलें आहे तुमचें. तुम्हाला काय वाटलें ? हल्ला झाला कीं भारताची सारी राज्यव्यवस्था कोसळून पडेल भारताचा सारा विकास खुंटेल, भारताची आर्थिक परिस्थिति हलाखीची होईल.

नाहीं बरें ! नाहीं. आक्रमण झालें तर त्याचा आम्ही प्रतिकार करू, करीतच आहों. पण आमच्या दैनंदिन जीवनाची चाकोरी आम्ही सोडणार नाहीं, गलितधैर्य होऊन आमच्या विकासाला पायबंद घालणार नाहीं.

ही पाहा मध्यप्रदेशाच्या विकासाची जागती खूण. बघतां काय असे ! आठ नवे उपमंत्री आम्ही नेमले. चीनच्या नाकावर टिच्चून. आता चीनच्या राज्यकर्त्यांना कळून येईल कीं भारत हा असा कच्च्या दिलाचा देश नाहीं. आक्रमणाची काळी छाया पडलेली असताना, आणीबाणीची वेळ आली असतांनासुद्धा शूर भारताचा एक घटक नव्या योजना हातीं घ्यावयाला कचरत नाहीं.

आठ उपमंत्री म्हणजे तुम्ही समजता काय ! आठ बंगले आता उजळून निघतील, आठ बंगल्याच्या आवारात आतां उत्पादनाला केवढी चालना मिळेल, आठ टेलिफोन आता केवढ्या कार्यशक्तीला प्रेरणा देतील, आठ मोटारी कसा सारा भूभाग टायरखालीं घालतील. आठांचे सोळा चिटणीस, त्या चिटणीसांच्या हाताखालील चौसष्ट दुय्यम चिटणीस, त्यांच्या नेतृत्वाखालील उपचिटणीस, टकलेखक, अधिकारी, दुय्यम श्रेणीचे अधिकारी, तिय्यम श्रेणीचे कारकून, चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी असा केवढा तरी जनसमुदाय कार्यप्रवण होईल.

कशासाठीं ? देशासाठीं. मध्यप्रदेशच्या विकासासाठीं. कल्पना करा. मध्यप्रदेशला आज नवे आठ सेनापति मिळाले. त्याचा परिणाम त्या भूप्रदेशावर केवढा होईल, याचा नुसता विचार करा. मग तुमचें मन त्यासाठीं होणाऱ्या खर्चाकडे सशयी दृष्टीनें पाहणार नाहीं. खर्च ! महाराज, ही विकासाची खूण आहे. जितका खर्च अधिक तितका विकास अधिक आणि विकास करावयाचा तर मन्त्र्याच्या शिवाय तरणोपाय तरी कोणता !

आता बघा, खर्चाला नुसत्या चौफेर वाटा फुटतील. आठ मन्त्र्यांनीं एकदा सूत्रें हातीं घेतलीं कीं, योजनांचा नुसता पाऊस पडेल. आतां नियोजन मंडळाला म्हणावें, तुम्ही कबर कसा. आणि अर्थखात्याला म्हणावें, कारभार कसा हलका करावा याची काळजी करू नका.

शूर वीरांचा मध्यप्रदेश आता नव्या जोमानें कामाला लागला आहे. त्याचे आठ नवे सेनापति चिन्यांचा तसाच द्रव्याचा फडशा पाडण्यासाठीं बद्धपरिकर झाले आहेत. शाबास ! मध्यप्रदेशाची शाबास आहे.

१३८.

## व्ही. आय्. पी.

व्ही. आय. पी. हा शब्दप्रयोग आता सामान्य लोकानाहि कळू लागला आहे. दिवसेंदिवस ही एक नवीन जातच निर्माण होऊ लागली आहे म्हणा ना. तुम्ही असें समजू नका कीं तीन अक्षरानींच त्याचें वर्णन करतां येतें. कांहीं वेळां आणखी एक ' व्ही ' सुद्धा मागें जोडला जातो. आणि मग ?—

अरे बापरे, मग त्याचा रुबाब प्रत्यक्ष पाहावयालाच पाहिजे. तुम्ही कधीं रस्त्यानें जाताना ' सायरन ' ऐकली आहेत ना ? बस, ही एक खूण. काल मला आणखी एक खूण पटली विमान-तळावर. त्या तळापासून विमान उभें असेल फार तर अर्ध्या किंवा एका फर्लांगावर. सहज कोणीहि पायांखालून घालवें असें हें अंतर पायीं तोडलें तर व्ही. आय. पी. तो काय !

नाहीं. तो असा चालणार नाहीं. मग एक मोटार येते. डौलानें निशाण फडकवीत. साऱ्या लोकांच्या दृष्टि खिळतात. तिच्यावर आणि त्याच्यावर. आजूबाजूला कुजबूज होते. " कोण हो ? " विमानांतून जाणारे दुसरे उतारू थांबतात. ते टक लावून मोटारीकडे पाहतात आणि ती वेगानें आणि तशाच डौलानें विमानाला लावलेल्या शिडीच्या पायथ्यापाशीं जाऊन उभी राहते.

व्ही. आय. पी.; व्ही. व्ही. आय. पी. वगैरे वगैरे. ज्याच्या नुसत्या दर्शनाबरोबर पाय फटाफट जुळतात, सलामींच्या फैरी झडतात, स्वागताला वा निरोपाला आलेल्या लोकांच्या कबरा वाकतात, हार टोपल्यांतून बाहेर पडतात आणि कधींमधीं जयघोषहि ऐकू येतात.

त्याचप्रमाणें नाजुक आवाजांतील " हॅलो ", मधुर हस्तिदती, लाडिक विचारपूस, हळुवार हस्तांदोलन आणि कुठें कुठें गमतीचे तर कुठें कांहींसे भीतीचे, वार्तालाप. हें सगळें असें पद्धत-शीरपणें होत असतें; इतक्या सफाईनें होत असतें कीं व्ही. आय. पी अगदीं हृदयापासून आनंदून जातो आणि त्याचे भक्तगण व आश्रित मनातल्या मनांत हरखून जातात.

कोण जाणे पण मनातल्या मनात कीं वरकरणीं ? कारण काल मी सहज एक संभाषण ऐकलें " किती वाजले हो ? "

" कां बरें ? "

" नाहीं म्हटलें, विमान सुटावयाला किती वेळ आहे पाहावें. "

" का हो ? "

" × × × उगाच त्रास. "

व्ही. आय. पी बद्दलची ही आस्था ही सुद्धां त्याच्या मोठेपणाची एक खूणच समजा-वयाची काय ?

## १३९.

# चारशें वीस

चारशें वीस हा एक साधा आंकडा. पण काय त्याला महत्त्व प्राप्त झालें आहे पाहा. इंडियन पीनल कोड ज्यानें रचलें त्याला कल्पना तरी असेल का, कीं या कोडातील एका कलमाला व्यवहाराच्या बाजारात महत्त्वाचें स्थान मिळेल. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष भाषेंत तें समाविष्ट केलें जाईल. आज ना उद्या लोकांच्या बोलींतून रूढ झालेला हा आकडा शब्दकोशातहि त्याच्या अर्थासहित व अनर्थावह वैशिष्ट्यासहित नमूद केला गेल्याशिवाय राहणार नाहीं.

काय गमत आहे पाहा. साधें कलम. पण त्या कलमाखालीं फसवाफसवी करणाऱ्या, लफंग्या लोकांना शासन करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. म्हणून "श्री ४२०" म्हणजे एक लबाड, लफंग्या असा शब्दप्रयोग रूढ झाला. शब्दप्रयोग ? अहो त्यावर एक महान् बोलपट तयार झाला, त्या बोलपटाला पुढें साऱ्या जगात नांव मिळालें, त्या बोलपटातील नायक हा जगप्रसिद्ध झाला. म्हणजे पाहा ४२०-चा प्रभाव कसा उलटसुलट पडतो तो. चारशेंवीसी केली तर कैदखान्यांत जावें लागतें, तिचें दर्शन घडविलें तर कीर्तीचें शिखर गांठता येतें.

पण एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा, 'श्री चारशेंवीस' असें म्हणणें मात्र गुन्हा आहे बरें का. त्यानें बदनामी होते असा नुकताच न्यायालयानें निर्णय दिला. न्यायालयाचें म्हणणें असें कीं, एखाद्या व्यक्तीला चारशेंवीस म्हणून म्हटलें तर त्याची प्रतिष्ठा कमी होते. ज्याच्या बाबतींत हा निर्णय देण्यात आला तो म्हणे प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाचा एक सभासद होता. त्यामुळें मात्र असा एक संशय मनांत डोकावूं लागला आहे कीं, व्यक्तीला चारशेंवीस म्हटलें म्हणून त्याची बदनामी झाली कीं, तो कॉंग्रेसजन होता म्हणून त्याची बदनामी झाली ?

कसेंहि का असेना, कायद्याच्या या शब्दच्छलात तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य जनांनीं पडूं नये हेंच उचित. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, कायद्यातील एक कलम हें आज बदनामीच्या खटल्यात समाविष्ट होऊन सामाजिक व्यवहाराच्या बाबतींत इषारा देऊं लागलें आहे.

हा त्या कलमाचा सन्मान आहे खरा. पण महाराज, बँकेचें टोकन घेतांना, हॉटेलांतील खोली घेताना, नव्हे परीक्षेचा क्रमांक पाहताना आपल्यावर या आकड्याचा अनुग्रह होऊं नये हीच प्रत्येकाची मनोमन प्रार्थना नसते का ? नसेल तर काय ? "चारशेंवीस" म्हणून पुकारा झालेला कोणाला आवडेल बरें ?

## १४०.

# आनंद–निधान

प्रवेशद्वार खुलें झालें का तुम्हांला ? अभिनंदन. पण जे तुमच्यासारखे भाग्यवान ठरले नाहींत त्यांच्याकडे मला प्रथम वळूं द्या. बाळानो, एस्. एस्. सी ची परीक्षा हें प्रवेशद्वार आहे खरें. पण तें कांहीं स्वर्गद्वार नव्हे. आणि तें दार खुलें झालें नाही म्हणून तुम्ही नरकांत खितपत पडणार आहात असेंहि नव्हे. म्हणून म्हणतों मरीन ड्राइव्हची जी भिंत आहे तिच्या आसपास फिरकूं नका. जीवन हें इतकें स्वस्त नाहीं कीं पहिल्याच अपयशानें तें मातीमोल व्हावें. अरे, जीवन हा एक संग्राम आहे. त्यांत कितीक लढाया तुम्हाला हराव्या लागतील. मग या पहिल्याच चकमकींत तुम्ही हरलांत म्हणून समरांगण सोडून पळून जाणार ? नाहीं बरें. ही ओहोटीची लाट पाहा. चैतन्यहीन झालेली असूनसुद्धा झेप घेण्याची तिची वृत्ति कायम आहे. आणखी कांहीं तासाच्या आंतच ती फोफावून खवळून किनाऱ्याला धडक देईल.

ओहोटी आणि भरती हाच जीवनाचाहि क्रम आहे. तुमचे दुसरे सवंगडी पाहा. यशस्वी झाल्यामुळें त्यांच्या आनंदाला आणि उत्साहाला उधाण आलें आहे. येऊं द्या. दुःखाच्या या काळांतसुद्धां त्यांच्या आनंदांत तुम्ही सहभागी झालें पाहिजे. परीक्षेंतील यशापेक्षाहि हें अधिक मोठें यश आहे.

यशस्वी झालेल्या बाळानो, हें पाहा, विश्वविद्यालयाचें द्वार तुम्हांला खुलें झालेलें आहे. शाळेच्या शिस्तबद्ध जीवनांतून कॉलेजच्या खुल्या अनिर्बंध वातावरणांत तुम्ही प्रवेश करीत आहा. स्वातंत्र्याचा आनंद कांहीं वेगळाच असतो. आता तुम्ही तुमचे मालक झाला आहां. अभ्यास करावयाचा आहे तो तुमचा तुम्ही. प्राध्यापक तुमचे मार्गदर्शन करतील. पण गुरुजीप्रमाणें टोंचणी लावावयाला त्यांना अवसर मिळणार नाहीं. कसा मिळणार ? एवढ्या समुदायांतून ते व्यक्तिशः तुमच्याकडे कसे लक्ष देऊं शकतील ?

म्हणून तुम्ही जबाबदारीनें आपल्या स्वतःकडे पाहा. पण त्या जबाबदारीच्या जाणीवेचें ओझें मात्र बाळगूं नका. कारण, जीवनांतील हीं एवढींच चार वर्षे तुमची निर्भेळ सुखाचीं आहेत. त्यानंतर ? उभा जन्म संग्राम.

त्या संघर्षाच्या जीवनांत जो विसावा तुम्हांला लाभेल तो कॉलेजांतील जीवनाच्या आठवणींचा. म्हणून तें जीवन जितकें प्रसन्न, स्फूर्तिदायक, जितकें रोमॅन्टिक करणें शक्य आहे तितकें करा. एकेक दिवस हा वेंचून काढा. त्या प्रत्येक दिवशीं कृतकृत्य झाल्याचें समाधान लुटा. कारण पुढेंमागें कधींतरी—

" कितीक सांठवणी पूर्व सुखदुःखाच्या  
खुल्या करून कथाव्या कुणास आठवणी ? "

असें म्हणावयाची तुमच्यावर वेळ येणार आहे.

कॉलेज विश्वातील या सांठवणी हेंच भावी आयुष्यातील तुमचें आनंदनिधान होणार आहे हें लक्षांत ठेवा आणि बाळानो खूप खूप आनंद लुटा.

## १४१.

# सत्कारांची पर्वणी

मन्त्र्यांनो आणि नेत्यानो, समाजधुरीणांनो आणि न्यायमूर्तीनो, चला. सांगलीला चला, कऱ्हाडला चला, फलटणला चला दरवर्षी जून महिन्यात जी पर्वणी येते ती आजहि आली आहे. सत्काराची पर्वणी. हे सत्कार कोणा भारतरत्नाचे, पद्मविभूषणाचे किंवा नित्यनैमित्तिक मन्त्र्याचे नव्हेत. हे सत्कार एस्. एस्. सी च्या परीक्षेंत पहिले, दुसरे, तिसरे आलेल्या यशस्वी मानकऱ्यांचे.

हा पहिला, दुसरा क्रमांक वाटेल त्या मार्गांनें वाढविता येतो म्हणजे सबंध परीक्षेंत पहिला येण्याचेंहि कारण नाहीं. त्या गांवात पहिला, त्या शाळेंत पहिला, त्या समाजात पहिला असे अनेक पहिले या लक्षावधि विद्यार्थ्यांच्या समुदायातून हुडकता येतात. महत्त्व आहे तें माननीयांच्या उपस्थितीला. पहिले आलेल्या भाग्यवतानो, तुमचे भाग्य अधिकच उजळून निघत आहे तें ज्या थोर विभूति तुमच्या सत्कारासाठीं आपलीं सारीं व्यवधानें बाजूला सारून येत आहेत त्यामुळें.

होय. देशांत आणीबाणी आहे. मन्त्र्यांचा आणि नेत्यांचा आणि न्यायमूर्तींचा कार्यव्याप फार मोठा आहे. हें सारें खरें आहे. पण बाळानो, तुमच्या यशाबद्दल तुमचें अभिनंदन करण्यासाठीं, तुम्हाला उत्तेजनाचे चार शब्द ऐकविण्यासाठीं आणि विशेषतः सत्कारांचे फड उभारणाऱ्या योजकांची उमेद वाढविण्यासाठीं हे थोर पुरुष मोटारीनें आणि गाडीनें आणि केव्हा विमानानें-सुद्धा तुमच्या लहानशा गांवांत पायधूळ झाडीत असतात बरें. बघा, त्यांची केवढी कार्यतत्परता, केवढा त्यांचा प्रेमळपणा, केवढी व्यापक वृत्ति.

तुम्हांलाहि अशीच व्यापक वृत्ति ठेवावी लागेल बरें का. भाग्यवतानो, आजवर तुम्ही पुस्तकांचीच तेवढी सोबत केलीत, ज्ञानार्जनांतच तेवढा आनंद मानलात, गुरुजनांच्या आशीर्वादांतच तुम्ही संतुष्टता मानलीत. पण आता हें संकुचित वातावरण सोडून तुम्हाला आपलीं क्षितिजें व्यापक करावीं लागतील.

कारण, तुम्ही आतां व्यासपीठावर येत आहां, नेत्यांशीं हस्तांदोलन करणार आहांत, त्यांच्या-प्रमाणेंच हारमंडित होणार आहात. अरे, या लहानग्या वयात नेत्यांबरोबर तुमचे फोटोहि निघतील.

मग आणखी काय पाहिजे ? थोडे दिवसासाठीं पुस्तकें बांधून ठेवा. पुस्तकांनीं आजवर कायमची सोबत केली ना तुम्हांला. हार हे थोड्या दिवसांचे सोबती. उद्यां ते सुकून सुद्धां जातील. अभ्यासाच्या बाबतींतील तुमच्या उत्साहाप्रमाणें आणि विरविरीत होत जाणाऱ्या यशाप्रमाणें.

# १९६३.

## साजिरें गीत

अरेरे ! काय ही जीवनाची परवड. उमललेलें फूल, उमलणारें तारुण्य, रसिक हृदयाला त्याचीच साद येते आणि भूल पडते. कुणा चित्रकाराच्या दृष्टीला तें सौंदर्य पडलें तर त्याचा कुंचला हलुवारपणें त्या सौंदर्याचें चित्रण करतो, जगांतील महान् कलाकृतींचा जन्म त्यांतूनच झालेला आहे.

पण त्या चित्रकलेचा आदर्श कोणता ? कलाकाराची अंतःस्फूर्ति होय. पण त्या अंतःस्फूर्तीला प्रेरणा देणारें व्यक्तित्व आणि सौंदर्य त्याच्यासमोर उभें ठाकतें तेव्हांच ना त्याच्या कुंचल्यातून रंगछटांचा फुलोरा प्रगट होतो ? तें मूर्तिमंत व्यक्तित्व आणि सौंदर्य म्हणजेच त्याच्यासमोर आदर्श म्हणून उभें राहणारें मॉडेल.

मॉडेल ! स्त्रीसौंदर्याचें तें कोणतें तरी एक मॉडेल उभें राहिलें आणि राजा रविवर्म्यांच्या कुंचल्यातून देवदेवतांच्या अमर कलाकृति निर्माण झाल्या. तसेंच एक मॉडेल व्हीनस द मिलोच्या रूपानें संगमरवरी शिलांत कोरलें गेलें आहे अशाच तऱ्हेच्या एका मॉडेलच्या जीवनावर आधारलेल्या एका चित्रपटाला " सॉंग ऑफ सॉंग्ज " साजिऱ्यातील साजिरें गीत असें एक हृदयस्पर्शी नांव देण्यांत आलें होतें.

हेंच तें साजिरें गीत कोण्या एके काळीं मेरिलिन मन्रोनेंहि मूर्तरूपाला आणलें होतें. तिनें आपल्या देहसौष्ठवाचें अनावृत रूप साऱ्या जगाला दर्शना साठीं खुलें केलें आणि त्याची मोहिनी पडलेल्या जगानें तिच्या जीवनाच्या लहानशा कालखंडाला 'मेरिलिन युग' असें गौरवपर नाव दिलें.

मॉडेलचा असा हा रोमांचकारी इतिहास आहे. पण सुसंस्कृत जगाच्या जीवनाची परवड तरी काय झाली आहे पाहा. ब्रिटनमधील त्याच प्रकारचें एक मॉडेल ख्रिस्टाइन कीलर हिच्या सौंदर्यापेक्षा तिच्या सवंगड्याकडेच अधिक कसोशीनें लक्ष पुरविण्याची जगावर वेळ आली आहे. कारण ? कारण तिचा एक सवंगडी म्हणे एक रशियन मेजर होता.

ब्रिटनच्या युद्धमंत्र्यांप्रमाणेंच तोहि कदाचित् तिच्या सौंदर्यावर आकृष्ट झाला असेल. पण शीतयुद्धाच्या या काळात हेरगिरीला कोठें, कसें उत्तेजन मिळेल हें कोणी सांगावें ?

तें सांगणें कठीण आहे म्हणूनच ब्रिटनच्या युद्धमंत्र्यांना आपल्या अधिकारपदाचा त्याग करावा लागला आणि त्याबरोबर ख्रिस्टाईन कीलर ही फक्त मॉडेल राहिली नाहीं. राजकीय रहस्यजालांतील ती एक नायिका बनली.

काय हा दैवदुर्विलास ! राजा रविवर्म्या, केवढें रे तुझें भाग्य कीं शीतयुद्धाच्या काळापूर्वीच तू चमकून निघून गेलास. आणि म्हणूनच तुझी मॉडेल्स आजमुद्धा देवदेवतांच्या साजिऱ्या रूपांतच आम्हांला पाहावयाला मिळत आहेत. बये ख्रिस्टाइन, काय ग तुझें फुटकें नशीब कीं तुझ्या सौंदर्याला तुझ्या सवंगड्यांनीं असा कलंक लावावा !

## १९५३.

# सुरसुख–खनि तूं विमला

माझ्या प्रवासाची–होय ! खूप दूरवरचा, साता समुद्रापलीकडील–सुरुवात अशी साग्रसगीत, नव्हे नाट्यसंगीतमय होईल अशी माझ्या आशावादी मनालाहि कल्पना नव्हती.

पण दिल्लीला जाणारें व्हायकाउंट सतरा हजार फुटावर चढलें आणि अकस्मात क्लॅरिओनेटच्या मधुर आवाजानें विमानाचा अन्तर्भाग भारून गेला. त्याच्या पाठोपाठ खजिरीवरील थाप, चार सहा हातांनीं धरलेला ताल आणि 'हाय्'सहित एका पजाबी लोकगीताचे सूर कानांवर पडले.

तालासुरावरील हें संगीत सुरू होताच सारे उतारू चकित होऊन समोर पाहू लागले. तों काय आश्चर्य ! रजतपटावरील शुभ्रसुदरी म्हणून विख्यात झालेली सिनेतारका नरगीस मुक्तहास्य उधळीत या साऱ्या आनंदोत्फुल्ल कलाकाराच्या उत्स्फूर्त संगीताचा आस्वाद घेत असलेली त्याना दिसली.

आतां तुम्हीच सागा, नाट्यमयता ती आणखी कोणती असू शकेल ? नुकतेंच मी राष्ट्रपतींचें अमेरिकेंतील एक भाषण वाचून पुरें केलें होतें. त्यांनीं भारतीय सिनेसृष्टीच्या वैभवाची व लोकप्रियतेची ग्वाही देतांना म्हटलें होतें कीं, आमच्या देशात राजकारणी पुरुषापेक्षाहि सिनेकलावत अधिक गर्दी खेचून घेतात. गर्दी ? अहो प्रत्यक्ष दिल.

आणि येथें तर सिनेरसिकांच्या हृदयसुदरीचेंच दुर्मिळ दर्शन घडून येत होतें–पांढऱ्या शुभ्र मेघराशींवरून उड्डाण करीत असतांना, उन्मादकारी सगीताचे सूर कानीं पडत असतांना, या सगीताबरोबर तालबद्ध हावभाव करणाऱ्या मशहूर तारक–तारकाचें मूकनृत्य पाहताना.

काय सागू तुम्हाला ! याला योग म्हणतात, योगसिद्धीचा आनंदहि यापेक्षा निराळा नसेल.

अरे, प्रवास तो काय सारा तीन तासाचा त्यांत वैशिष्ट्य तें काय असावयाचें ? फार तर हवाई सुदरीच्या अस्तित्वाचाच कोठें कोठें विरगुळा मिळावयाचा. पण येथें विमानाचा डौल उतरविणारें सौंदर्य साक्षात् आणि समीप उभें आहे आणि त्याच्याभोवती जणु वलय निर्माण करावें त्याप्रमाणें सगीताची धुंद मैफिल चालली आहे.

बस्स. साऱ्या उतारूंच्या मुद्रेवरील भाव मी पाहतों. ते जणु म्हणत आहेत, हा प्रवास असाच अखंड, अनत काळपर्यंत, अतरिक्षांतून चालला तर ?

हो चालला तर ! पण समोर पाहा काय दिसत आहे.

"नो स्मोकिंग । फासन् युवर बेल्ट." चला आकाशातून भूवर !



... १०

## १९५४.

# पहिला वाढदिवस

पहिलाच हा वाढदिवस. खरें म्हटलें तर सहा महिन्यापूर्वीच तो यावयाचा. पण ' महाराष्ट्र टाइम्स 'नें जन्मापूर्वीपासूनच एका अपूर्वाईचा पायंडा घातला. त्यानें नांव घेतलें, आपली निशाणी जागजागीं कोरली. पण तो स्वतः मात्र अनपेक्षितपणें अंतर्धान पावला.

पण पुनरागमन करण्यासाठीं. एका वर्षापूर्वी या दिवशीं तो प्रगट झाला. पण त्याच्या पहिल्या अंकाची शाई वाळते न वाळते तोंच कागदाच्या टंचाईमुळें त्याला आपल्या प्रिय वाचकाचा निरोप घ्यावयाची वेळ आली. मला आठवतें, सिमल्याच्या थंड हवेंत कागदासाठीं मंत्र्याची आराधना करता करता अखेरच्या अग्रलेखाची पूर्वतयारी सुद्धां करण्यात आली होती. ती वेळ आली नाहीं म्हणून, नाहींतर ' टाइम्स ऑफ इंडियाच्या ' या पहिल्यावहिल्या मराठी पत्रात फक्त आठव्या दिवशीं " आम्ही जातों आपुल्या गावा ! आमुचा रामराम घ्यावा " या मथळ्याखालील एक अग्रलेख मराठी वाचकांना वाचावा लागला असता.

आता आमचें म्हणजे संपादकवर्गाचें नशीब–मराठी वाचकाचें आहे किंवा नाहीं हें मी काय सांगू ?–कीं तो अग्रलेख हस्तलिखितांतच राहिला. पण त्याची काळी छाया निदान कित्येक वाचकापुरती तरी अधूनमधून ' क्षमस्व ' या मथळ्याखालीं प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या निवेदनांत दाटून आलेली आढळते. दुसरें काहीं नसलें तरी ' हें ' निवेदन हें महाराष्ट्र टाइम्सचें वैशिष्ट्य झालें आहे. इतकें कीं वृत्तपत्रीय कागदाच्या बाबतींत आपण कोणता हुकूम केव्हा काढला आणि आज आपलें धोरण कोणतें आहे हें जसें सरकारला सांगतां येत नाहीं त्याचप्रमाणें आपलें कोणतें निवेदन चढाईचें आणि कोणतें पीछेहाटीचें आहे आणि आज आपण कोठें आहों, हें संपादकवर्गाला सांगतां येत नाही. ' आजचा दिवस आपला ' हें आमचें सूत्रवाक्य झालें आहे खरें. आणि वाचकांचें ? मला वाटतें ' आजचा अंक आपला ' हें.

जीवन हें त्यामुळेंच जगण्यासारखें वाटतें नाहीं का ? आशा, निराशा, अपेक्षा, साफल्य, चढ, उतार, सप, टाळेबंदी आणि कायमची अनिश्चितता या आमच्या एका वर्षाच्या जीवनातील अनेकविध अवस्था. पण कोण जाणे. या चढउतारामुळेंच कदाचित् आहे तोंवर जीवन जगण्याचें चैतन्य निर्माण झालें असेल आणि त्यामुळेंच कदाचित् आमच्यामधील टवटवीतपणा कायम राहिला असेल.

तुम्ही म्हणाल बाल्यावस्थेंत आहात तोंवर उड्या माराल, बाळलीलांनीं मन मोहरून टाकाल. पुढें दिवस जसे जातील तसा आपोआप शिळेपणा येतो किंवा नाहीं पाहा. खरें आहे तुमचें म्हणणें.

पण पुढच्या दिवसांची आज चिंता कशाला ? आजच्या पहिल्या वाढदिवसाचें अंगाई गीत गातांना आम्ही एवढेंच म्हणू––

" के सेरा, सेरा व्हाटेव्हर विल बी विल बी द फ्यूचर्स नॉट अवर्स टू सी के सेरा, सेरा "

जें व्हावयाचें असेल तें होईल. भवितव्याची आज चिंता कशाला ? आज नव्या उमेदीच्या आशेनें जीवनाला सामोरें जाऊं या. जीवन–संग्रामांतूनच स्फूर्ति घेऊं या.

वाचकहो, तुमच्या सदिच्छा आणि तुमचे आशीर्वाद मात्र आमच्या पाठीशीं हवेत. तीच आज आम्ही प्रार्थना करीत आहों.

१४५.

## कोण तो ? आणि कोण ती ?

कचेरीच्या वेळांत आता म्हणे कॅंटीनमध्यें जाऊन गप्पा मारीत बसतात. मग काय त्यांनीं कचेरींत गप्पा मारावयाच्या ?

खरें सांगू का, कचेरीची शिस्त राहिली आहे ती कॅंटीनमुळें. त्याचें असें आहे, ज्याना काम करावयाचें असतें ते काम करतात. त्यांची संख्या लहान असेल, पण त्याच्या कामामुळेंच सचिवालयांतील फायली खालून वर जातात. वर गेल्यावर: अर्थात् थडगार वाऱ्यामुळें मऱ्याप्रमाणें त्या झोपी जातात ही गोष्ट निराळी.

पण त्यांच्यावर संस्कार सुरू होतात. तातडीचें, अतितातडीचें, तात्काळ निकालात काढण्याचें वगैरे वगैरे लेबलें त्यांच्यावर डकवून लाल फितींत त्या गुंडाळल्या जातात. ही लाल फीत लागली कीं समजावें " प्रश्नाचा विचार चालू आहे. " तो विचार कृतींत उतरला नाहीं तर त्याचा दोष फितीकडे जात नाहीं किंवा ती फीत बांधणाऱ्या कार्यक्षम कर्मचाऱ्याकडेहि जात नाहीं. आतां ती कार्यक्षमताहि तुम्हांला नाहींशी करावयाची आहे काय ?

मग कचेरीच्या वेळांत कॅंटीन बंद करण्याचा निर्णय खुशाल घ्या. त्याचा परिणाम एवढाच होईल कीं, कॅंटीनमधील गलबला कचेऱ्यात सुरू होईल आणि जे काम करतात, करूं पाहतात त्याच्याहि लेखण्या कानांवर जातील.

कॅंटीन म्हणजे तुम्ही काय समजता ! अहो, त्यांतील चहा आणि चिवडा हें नुसतें बाह्यरूप आहे. त्याचें अंतरंग, फायलींतील गुप्त मजकुराप्रमाणें उद्बोधक, तसेंच स्फोटक असतें. तेथें तुम्हांला वर शिजत असलेल्या राजकारणाची सारी चुरचुरीत फोडणी चाखावयाला मिळेल आणि कितीक खऱ्याखोट्या प्रोफ्यूमो प्रकरणाचीं गुप्त दालनें तेथें तुमच्यासमोर खुलीं होतील.

प्रोफ्यूमो आणि खिस्लाइन कीलर. कोण तो ? आणि कोण ती ? आणि कोण चढणारा व पडणारा मंत्री ? कोण खात्याचा नवा नियता आणि कोण कोणाचा भाग्यविधाता ?

तें सारें तुम्ही बंद करणार ? आणि कचेरीच्या वेळांत ? अहो, मग कचेरी तरी कशाला पाहिजे ? सचिवालयच बंद करून टाकाना एकदा !

## १४६.

# " आला खुषिंत समिंदर "

तीस वर्षांनंतर आज त्यानीं काळा कोट चढविला आणि ते कोर्टांत आले. काळा कोट. बहुधा अल्पाकचाच असावा. तुम्हाला नाही ना माहीत? कसें असणार? आता पॉपलीनसुद्धा मागें पडू लागले आहे. आतां टेरेलीनचे दिवस आले आहेत. पण अल्पाकचा कोट कांहीं वेगळाच. अहो, बोहोऱ्यालासुद्धा द्यावयाची वेळ येत नसे. कारण पिढ्यान् पिढ्या चालायचा तो.

हेंच पाहा ना! तीस वर्षांनतर त्यानीं कोट चढविला. पण जसाच्या तसा. खिशातून म्हणे एक झुरळ निघालें आणि त्यानें फस्त केलेलें ' चांदरात. ' पण कापडाला धक्का नाहीं. ' चांदराती ' मुळें जुन्या आठवणी उजाळून न येतील तर काय! तिच्यामुळेंच काळा कोट फेकून देण्याची वेळ आली न्यायालयांत काय चंद्र, सूर्य, तारे चालतात होय? मिलॉर्डना काय सांगावयाचें?

किति गोड गोड बदला हृदयीं गुलाब फुलला!

मला वाटतें, एखादें कोठें ' ब्रीफ ' मिळालें असेल त्यांना. त्या दिवशीं ' चांदरात ' खिशांत घालून ते गेले असावे. येतांना बहुधा ते एवढेंच गुणगुणत आले असतील.

काटा हळूच हाले कळ येई जीव विव्हळे.

आज त्याचा जीव पुन्हां विव्हळला असेल तो ' चांदरात 'ची ती दशा पाहून. म्हणजे व्यवसायापरी वकिलीचा व्यवसाय गेला आणि आज ' चांदरात ' झुरळाच्या भक्ष्यस्थानीं पडलेली पाहावयाची वेळ आली.

पण? पण काय? महाराज, द्या टाळी. टॅक्टिक, धोरण, म्हणतात तें हें. ते पाहिलेत ना? ते सारे वार्ताहर, वृत्तपत्राचे वार्ताहर. त्यांचें लक्ष कोठें केंद्रित झालें आहे? त्या त्या अल्पाकच्या कोटावर.

बस्स वकिली गेली. जाऊ द्या. चांदरात वितळली. वितळू द्या. प्रसिद्धि तर निश्चित झाली ना! लक्षात ठेवा. अखेरचा अंकच नाटकाचे भवितव्य ठरवीत असतो. या अखेरच्या अंकात काय घडलें आहे?

इतिहास—जो पंडितजींनीं काळा झगा अंगावर चढवून लाल किल्ल्यांत घडविला आणि जो अनंत काणेकर यांनीं काळा कोट अंगावर चढवून दादरच्या कोर्टांत घडविला.

तुमच्या, आमच्या, सर्वांच्या या आवडत्या साहित्यिकाबरोबर आपणहि आनंदानें आतां म्हणूं या :

" आला खुषींत समिंदर त्याला नाहीं धीर,
होडिला देई ना ठरूं ग सजणे, होडीला बघतो धरू. "

# १९४७.

## जूते पैजार

पार्लमेंटरी पद्धतींत एक सरकारी पक्ष आणि दुसरा विरोधी पक्ष असे दोन प्रमुख पक्ष असतात. त्यांच्यामधून विस्तवसुद्धा जाऊ शकत नाहीं असें म्हणण्यापेक्षा त्यांच्यामध्यें तलवारीचें अंतर ठेवलें जातें, असें म्हणणें अधिक वास्तववादी होईल. म्हणजे समोरासमोर बसलेल्या सभासदांनीं तलवार परजली तरी त्यांतून कोणाला इजा होऊं नये इतकें अंतर. तशी वेळ पूर्वी येत असे. आतां आपण अधिक सुसंस्कृत झालेले आहों. त्यामुळें मुद्यावरून तलवारीवर येण्याची वेळ येत नाहीं.

पण ब्रिटिश कॉमन्स सभा इतकी परंपरेची भोक्ती आहे कीं तिनें सरकारी व विरोधी पक्षात तलवारीचें अंतर ठेवण्याचा उपचार कायम ठेवला आहे. आपल्याकडेहि सरकारी व विरोधी पक्षांचे सभासद तसेच आमने सामने बसतात.

आतां मात्र या दोघांतील अंतर तोडणारा एक नवीन घटक निर्माण झाला आहे. तो घटक म्हणजे जोडा. पंजाबच्या विधानसभेत एका विरोधी पक्षीयानें एका मंत्र्यावर जोडा भिरकावला हें तुम्ही वाचलेंच असेल.

त्या प्रसंगानें एक नवीन पेंचप्रसंगच निर्माण केला आहे. कारण एकदा जोडा भिरकावण्याची प्रथा पडली तर सभासदांच्या दोन घटकांत राखून ठेवलेलें अंतरच नाहीसे होतें. शिवाय भिरकावलेल्या जोड्याची स्थिति सुटलेल्या बाणासारखीच असते. तो कांहीं आक्षेपार्ह शब्दांप्रमाणें मागे घेता येत नाहीं. त्यामुळें निषेधाची ही प्रथा पार्लमेंटरी आहे किंवा नाहीं ही चर्चा करणेंहि अप्रस्तुत ठरतें. ही प्रथा निखालस पार्लमेंटरी पद्धतीशीं प्रतारणा करणारी आहे.

पण त्या गुन्ह्याचें प्रायश्चित्त काय ? तो विरोधी पक्षाच्या दिशेनें परत भिरकावून देणें ? म्हणजे मग संसदेंत किंवा विधानसभेंत परस्परांवर पादत्राणें भिरकावण्याखेरीज दुसरें कामच राहणार नाहीं.

एका जोड्यानें कसा पेंच निर्माण केला पाहा. तसाच एक जोडा संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अधिवेशनांतहि चमकला होता. पण क्रुश्चेव्ह यांनीं तो भिरकावला नाहीं. तो पायांतून काढून त्यांनीं फक्त आपल्या समोरचें बाक तेवढें त्याच्या साहाय्यानें वाजविलें.

रशियन नेत्याचें अनुकरण करून आपल्या सभासदांनीं जोड्याचा एवढाच उपयोग केला तर ? बघा बुवा, पार्लमेंटरी पद्धतींत तें बसतें किंवा नाहीं ?

पण जोडे भिरकावण्याचीच प्रथा पाडावयाची असली तर मात्र संपाच्या वेळीं मुंबईच्या बसेसवर बसवितात तशा जाळ्या निदान ट्रेझरी बेंचीसभोंवती तरी बसवून टाकाव्या.

मंत्र्यांचा मुखभंग अशा पद्धतीनें तरी होऊं नये.

## १९४८.

# बेटा कॉन्डुइट

हॅम्लेट, मॅकबेथ, ऑथेल्लो,

ज्युलियस सीझर.

आणि कॉन्डुइट.

चार धीरोदात्त नायक, स्ट्रॅटफर्ड ऑन एव्हनमधील शब्दसृष्टीच्या ईश्वरानें आपल्या प्रतिभाशाली लेखणींतून निर्माण केले.

पांचवा तितकाच धीरोदात्त नायक माउंट प्लेझंट रोडवरील न्यायसृष्टीच्या नियत्यानें आपल्या चिकित्सक प्रज्ञेच्या साहाय्यानें पृथ्वीच्या गाभ्यांतून हुडकून काढला.

सारीच शोकांतिका मानवी जीवनाची. तशीच अचेतन सृष्टीची. हाडामांसाचे, उसळत्या रक्ताचे आणि त्याहिपेक्षां उसळणाऱ्या भावभावनांचे मानवी आदर्श अखेरीस एकाच दोषामुळें अधःपतित झाले हा दोष कोठें अतःकरणाचा, तर कोठें अनिश्चित मनोवृत्तीचा. कोठें परिस्थितीनें या धीरोदात्त जीवांना कुंठित केलें तर कोठें महत्त्वाकांक्षेच्या वा सशयाच्या वारूवर आरूढ झाल्यामुळें आपल्या प्रियजनांसहित त्यांना दुर्दैवाच्या खोल गर्तेत पडावें लागलें.

मानवी जीवनाची ही शोकांतिका. शेक्सपियरच्या लेखणीनें तिला साहित्यात अमरपद प्राप्त करून दिलें. आज चारशें वर्षांनंतर त्याच प्रकारचा एक धीरोदात्त नायक एका प्रज्ञावताच्या चिकित्सक दृष्टीनें हुडकून काढला आहे. फरक एवढाच कीं तो नायक अचेतन सृष्टीचा एक घटक आहे. तो रक्तामांसाचा नाहीं. तो मातीचा आणि रेतीचा, दगडाचा आणि सिमेंटचा आहे. त्याचें नाव कॉन्डुइट.

पण केवढा धीरोदात्त! त्याचें साहस तरी केवढें—पृथ्वीच्या गाभ्यांत शिरून त्यानें वरुणराजाच्या अजस्र सेनेला एका अरुंद प्रवाहांत नियंत्रित केलें. त्याचें सामर्थ्य तरी केवढें अचाट. एकेक वीट, विटेवर वीट, दगडावर दगड, आणि गरगरा गरगरा फिरून घट्ट, मजबूत बनलेल्या सीमेंटचे थरावर थर त्यानें आपल्या पाठीवर धारण केले. ते कशासाठीं? तर वरुणराजाच्या सेनेचें तांडवनृत्य नियंत्रित रंगभूमीच्या आवाक्याबाहेर जाऊ नये म्हणून.

पण!——निसर्गाच्या मुशींतून आणि मानवी प्रज्ञेच्या कल्पकतेंतून निर्माण झालेला हा धीरोदात्त नायक शेक्सपियरच्या नायकासारखाच एका, फक्त एकाच अगभूत दोषामुळे म्हणा किंवा परिस्थितीच्या दडपणामुळें म्हणा, खचला. तो खचला आणि पुढें काय घडून आल?

एक दारुण शोकांतिका. शेक्सपियरच्या शोकांतिकेची आठवण करून देणारी शोकांतिका! नुसती साहित्यांतील नव्हे, रंगभूमीवर प्रगट केली जाणारी नव्हे, प्रत्यक्ष जीवनात भासणारी.

बेटा कॉन्डुइट, त्या शोकांतिकेचा तू नायक आहेस. तुला कोणी खलनायक मानतील. पण बाळा, हॅम्लेट, मॅकबेथ, ऑथेल्लो आणि ज्युलियस सीझर यांच्या परपरेंत बसण्याचा, त्यांचा वारसदार होण्याचा सन्मान तुला लाभला आहे हें लक्षांत ठेव आणि आपल्या डोळ्यात तरारलेले अश्रु आवर.

अरे, आणखी तुला हें माहीत आहे का? शेक्सपियरच्या शोकातिकेंतून जें भावनिक शुद्धीकरण (कॅथार्सिस) प्रत्ययाला येतें, आत्म्याचं जें उदात्तीकरण होत ते तुझ्याहि शोकातिकेंतून आज प्रत्यक्षपणे वहून येऊ लागलें आहे.

बाळा, हा बघ तुझ्या अचेतन देहाचा, तुझ्या अणुरेणूंचा जतन करून ठेवलेला अवशेष, ज्याच्या नुसत्या दर्शनानें आपल्या भावनांचं शुद्धीकरण होतें.

हाच तो कॅथार्सिस–पानशेतच्या जलप्रलयाची जिवंत साक्ष देणारा महान् चिखल!

# १४९.

## एकच प्याला

एकच प्याला !—दुसऱ्या कशाचा नाहीं फक्त चहाचा. पण पत्रकाराना आमच्या विरोधी पक्षांतील नेते तेवढाहि म्हणे देत नाहींत आणि म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळत नाहीं.

त्याच्या उलट सरकार जाहिरातींचा मलिदा चारतें आणि मग काय, वृत्तपत्रांतून ' ही ' प्रसिद्धी मिळते असेहि एका थोर विरोधी पक्षाच्या नेत्यानें उद्‌गार काढल्याचें कळतें.

पत्रकार बंधूनो, तुम्ही अगदीं गंभीर झाली आहांत हे मला स्पष्ट दिसत आहे. पण बाबांनो, अशा कपाळाला आठ्या घालून भागणार नाहीं. थोर पुढाऱ्यांनीं जे जें काहीं म्हटलें असेल तें वेदवाक्य मानणें हाच आपण धर्म मानला पाहिजे. त्यानीं तें म्हणणें फिरविलें तरी तें आपण पुन्हा दुसरें वेदवाक्य मानलें पाहिजे.

पहिल्या उद्‌गारांत आणि दुसऱ्या उद्‌गारांत तफावत दिसत असली तर त्याचा अर्थ असा समजावयाचा कीं आपले नेते विचारांच्या दृष्टीनें स्थितिशील नाहींत तर गतिशील आहेत. ही तरी गतिशीलता पाहा. केवळ्या दूरदृष्टीनें, नव्हे प्रज्ञावताच्या दृष्टीनें या विरोधी पक्षांतील नेत्यानें आपल्या अप्रसिद्धीची चिकित्सा केली आहे.

ही अप्रसिद्धी का ? केवळ एकच प्याल्यासाठीं ! पण न मिळालेल्या एकच प्याल्यासाठीं. अरे, तो एकच प्याला तुम्हाला मिळाला नाहीं म्हणून ज्ञानाचीं कवाडें का तुम्ही बंद करणार ? उदात्त विचाराचा प्रवाह का तुम्ही अडवून धरणार ?

अरे बाबांनो ! ही प्रज्ञा बोलते आहे, कल्याणमय प्रज्ञा-जी शेतकऱ्यांना आणि कामगारांना कल्याणकारी ठरणार आहे. त्या प्रज्ञेचें मूल्यमापन काय चहाच्या एकच प्याल्यावरून तुम्ही करणार ?

नाहीं. नाहीं. चहाच्या एकच प्याल्यापेक्षांच काय पण सरकारी जाहिरातींतून मिळणाऱ्या मलिद्यापेक्षांहि ती अधिक किंमती आहे.

पत्रकार बंधूनो, चला आजपासून आपण एक नियम करू या. ' ती ' प्रज्ञा उत्तेजित करण्यासाठीं या विरोधी पक्षाच्या थोर नेत्याला आपणच एकच प्याला देऊ या. नुसता चहाचा बरें का; नाहीं तर कोणाचा गैरसमज होईल,

" कांठोकांठ भरू द्या प्याला फेंस भराभर उसळू द्या "

यापैकीं एकच प्याला.

## १५०.

# सहजीवनाचा आदर्श

देवघरातील निरांजन तेवत असताना जो मधुर भक्तिभाव उचंबळून येतो तसाच निरागस भाव सुचेता कृपलानी यांच्या व्यक्तिजीवनाचा विचार करताना मनात दाटून येतो. शांत, निर्वैर, कनवाळू असा त्यांचा स्वभावधर्म आहे. पण वृत्ति मात्र लढाऊ—विशेषत: अन्यायाविरुद्ध झगडतांना. त्या वृत्तीमुळेंच काँग्रेसच्या परंपरेत मुरलेल्या सुचेताजी आपल्या धुरंधर पतीच्या प्रेरणेमुळे कांहीं काळ काँग्रेसचा त्याग करून प्रजासमाजवादी पक्षात सामील झाल्या.

पण त्यांचा विरोध काँग्रेसला फारसा बोचला नाहीं. कारण आचार्य कृपलानी यांच्या उपरोधाची हृदयभेदक धार त्याला नसे. सुचेताजी यांनीं दिल्लींतील निर्वासितांबद्दलची कणव येऊन त्यांच्यासाठीं आपल्या जिवाचें जें रान केलें त्यामागील सात्त्विक संतापच निधडेपणानें या विरोधात प्रगट होत असे. कॉंग्रेसच्या नेत्यांनाहि हें ठाऊक असे कीं, हा विरोधासाठीं विरोध नव्हे; यामागें सेवेची तळमळ आहे, त्यागाच्या बलयानें तो उजळून निघाला आहे. सुचेताजी यांना जनहृदयांत जें स्थान असे तें विरोधक असतांनाहि आणि पुढें काँग्रेसजन बनल्यानंतरहि पार्लमेंटच्या निवडणुकींत त्यांनीं वेगवेगळ्या वेळीं जें घवघवीत यश संपादन केलें त्यावरून सिद्ध होत आलें आहे.

आपल्या पतीच्या वादळी जीवनामुळें आणि वादग्रस्त व्यक्तित्वामुळेंसुद्धा सुचेता कृपलानी यांच्या शांत, निरामय जीवनात फरक पडला नाही किंवा त्यांच्या लोकप्रियतेला कधीं ओहोटी लागली नाहीं. दादा आणि सुचेतादिदी यांचें वैवाहिक जीवन हा सहजीवनाचा एक मनोरम आदर्श आहे. कृपलानी आपल्या भाषणात कधीकधी मिस्किलपणें त्याचा उल्लेखहि करीत असत. अशा वेळीं सारें सभागृह खळखळून हसावयाचें आणि एकमेकाच्या समोर विरोधी पक्षांत उभ्या ठाकलेल्या या पति-पत्नींच्या मुद्रेवरहि त्या प्रसन्न हास्याची छटा उमटावयाची.

पुढें सुचेताजी लोकसभा सोडून उत्तर प्रदेश राज्यातील एक मंत्री बनल्या. अनेक वर्षांच्या त्यांच्या कॉंग्रेस—सेवेचें हें पारितोषिकच होतें. सुचेता कृपलानी यांची ही सेवा—तसेंच पाहिलें तर आचार्य कृपलानी यांचीहि खऱ्या उमेदीच्या काळांतील कॉंग्रेससेवा—आज जाणूनबुजून कोणी विस्मृतीच्या आड दडवून ठेवू पाहत असेल. पण इतिहास पुसून टाकणें इतकें का सोपें आहे ? स्टालिनसारख्या सत्ताधीशाची शक्तीसुद्धा ज्या बाबतींत तोकडी पडली तेथें पुरोगामित्वाची सिह-कातडी पांघरून क्रांतीचे ठेकेदार बनू पाहणाऱ्या मतलबी लोकांच्या द्वेषभावनेतून निर्माण होणारा, सुचेता कृपलानी यांच्या जीवन व कर्तृत्वाबद्दलचा विपर्यास कसा मूळ धरू शकेल ?

सुचेता कृपलानी यांनीं या विपर्यासाकडे कधीं लक्ष दिले नाहीं. कारण त्यांचें निर्मळ मन त्यांना सदैव ग्वाही देत होतें कीं, आपल्या पत्नीधर्माचें पालन करताना आपल्या हातून कदापिहि पक्षद्रोह झाला नाहीं.

मुख्यमंत्रिपदावर एकमतानें निवड करून उत्तर प्रदेशांतील कॉंग्रेस विधानसभापक्षानें त्या सत्यावर शिक्कामोर्तब केलें आहे.

## १५१.

# परमेश्वराची करणी !

विसाव्या शतकाच्या अखेरीला जगाची लोकसंख्या म्हणे ६०० कोटि होईल फार काळ उरलेला नाहीं बरें ! फक्त ३७ वर्षे. चुटकीसरशीं तीं निघून जातील आणि मग आपण वाट पाहावयाची ती त्या काळाची, जेव्हा या पृथ्वीतलावर मानवसमाजाला फक्त उभे राहण्यासाठीं तेवढी जागा मिळेल.

किती भयानक कल्पना आहे, नाहीं का ? भयानक तशीच हृदयद्रावक. अमर्याद, अनंत असा एक मानवी ' क्यू ' लागलेला पाहावयाची वेळ येणें यासारखें दुसरें दुर्दैव आणि दुश्चिन्ह कोठलें असणार ?

पण ईश्वराची म्हणे ही निर्मिती. या बाबतींत ईश्वर आणि अल्ला, येशू आणि झरतुष्ट्र, बुद्ध आणि महावीर आणि नानक या सर्वांचें नाव एकच. आधार घ्यावयाचा तो श्रीसच्चिदानंद-स्वरूपी भगवान् परमेशाच्या चिरमंगलमय आणि सदाशुभंकर कृपेचा–ज्या कृपाशीर्वादानें वर्षा दीड वर्षाकाठीं पाळणा हलत राहतो आणि प्रजोत्पादनाचें धर्मकार्य आपल्या हातून अव्याहतपणें चालू राहतें.

प्रजोत्पादन हें धर्मकार्य. इतर उत्पादन नाहीं का होईना ! शेतजमीन नांगरली गेली नाहीं, कारखान्यातील चक्रें हललीं नाहींत, हातोडा आणि विळा कोयता गंजून जाऊ लागला तरी काय हरकत आहे ! देवाब्राह्मणांसमोर, अग्निनारायणासमोर आपण शपथ घेतली आहे ना, " धर्मे च, अर्थे च, कामे च नातिचरामि ! " यांतील " कामे च " हाच अधिक महत्त्वाचा घटक. कारण अखेरीस मोक्षप्राप्ति व्हावयाची ती तर्पणासाठीं कोणी वारसदार असेल तरच ना ! म्हणून " कामे च नातिचरामि " हेंच आपल्या जीवनाचें उद्दिष्ट आणि आपल्या कार्यसिद्धीचें घोषवाक्य मानलें पाहिजे.

या वारसदाराना स्वतःला खायला अन्न नाहीं मिळालें तरी चालेल. पण त्यानीं पितराना पाणी मात्र पाजलेंच पाहिजे. तेवढ्यासाठीं " कामे च नातिचरामि " हा महामंत्र जपावयाचा, आचरणांत आणावयाचा. तो स्वत:च्या सुखाचा मूलमंत्र झाला नाहीं म्हणून काय झालें. आपण जगतों तें कुटुंबासाठीं, कुटुंबाचें अक्षयत्व राखण्यासाठीं.

म्हणून ईश्वरनिर्मित प्रजेला बंध घालण्याचा प्रयत्न कोणी करण्याचें कारण नाहीं. ६०० कोटींची प्रजा आणि फक्त उभे राहण्यासाठीं जागा. ही कल्पना भयानक असेल, हृदयद्रावकहि असेल.

पण परमेश्वराच्या करणीला बोल लावून कसें चालेल !

## १५२.

## हांक मनाची, कीं हृदयाची ?

अशोक मेहता हे गेलीं कांहीं वर्षें खरोखरच एखाद्या वाट चुकलेल्या व्यक्तीप्रमाणें अक्षरशः अंधारांत चांचपडत होते. मन आणि हृदय यांच्यामध्यें शरीरशास्त्राच्या दृष्टीनें कोणता फरक केला जातो कोण जाणे ? पण मनानें ते कॉंग्रेसपाशीं होते आणि हृदयानें आपल्या स्वत:च्या पक्षाभोंवतीं घोटाळत होते.

कॉंग्रेसकडे त्यांचा कल झुकत होता तो अर्थलाभासाठीं किंवा सत्ता-संपादनासाठीं मात्र नव्हे. या दोन्ही गोष्टींचा कधींहि मोह न पडण्याइतका अशोक मेहता यांचा ध्येयवाद जाज्वल्य आहे. सत्ता-संपादन आपल्या मताप्रमाणें लोकसेवा करण्यासाठीं किंवा राज्यकर्त्यांना आपल्या परीनें मार्गदर्शन करण्यासाठीं करावें असें मात्र त्यांना मनापासून वाटत होतें.

पण तीन दशकापेक्षा अधिक काळ प्रजासमाजवादी पक्षामध्यें निष्ठेनें व पोटतिडिकेनें काढल्या-नंतर उच्च हेतूनें का होईना पण त्या पक्षाशीं असलेले जिव्हाळ्याचे बंध तोडावयाला त्यांचें मन तयार होईना. पण मागासलेल्या देशामध्यें राजकारणाचीं दडपणें कांहीं वेगळींच पडतात आणि त्यामुळें त्या त्या देशांतील पुरोगामी व समाजवादी विचारसरणींच्या गटांना परस्परविरोधा-पेक्षा जाणीवपूर्वक होणाऱ्या परस्पर सहकार्याचाच मार्ग चोखाळणें आवश्यक आहे या त्यांच्या सिद्धांतानुसार त्यांना प्रत्यक्ष कार्य करणें मात्र शक्य झालें नाहीं.

त्याचा परिणाम असा झाला कीं, पक्षामध्यें एकाकी, कॉंग्रेस जनापासून पक्षनिष्ठेमुळें अलिप्त आणि जनसमुदायाच्या भावभावनाशीं बहुशः समरस होण्यास असमर्थ अशा प्रकारच्या अवस्थेंत त्यांना जीवन कंठण्याची वेळ आली. मग त्यांचें कार्य उरलें तें सटीसहामासीं पक्ष-नेतृत्वापुढें विचारमंथन करणें, लोकसभेमध्यें निवडक वेळीं मूलभूत दृष्टिकोणातून आर्थिक व राजकीय प्रश्नाचा ऊहापोह करणें आणि परदेशातील व्याख्यानातून भारताच्या भूमिकेची चिकित्सा करणें एवढेंच.

अशोक मेहता यांच्यासारख्या व्यासंगी, कार्यनिपुण आणि ध्येयवादी व्यक्तीच्या कर्तृत्वाला यापेक्षां अधिक विस्तृत कार्यक्षेत्र मिळणें देशहिताच्या दृष्टीनें आवश्यक होतें. सुदैवानें पंडितजींनी त्यांना यूनोच्या प्रतिनिधित्वातच नुसतें स्थान दिलें नाहीं तर नियोजन मंडळाचें उपाध्यक्षपदहि बहाल केलें आहे. अशोक मेहता यानीं तें अधिकारपद स्वीकारलें आहे तें पक्षहितापेक्षां देशहित अधिक महत्वाचें मानून. पक्षानेहि आपल्या या नेत्याचा सन्मान हें आपलें भूषण कां बरें मानू नये ?

# १५३.

## तीं संथ, कोमल पावलें

परदेशातील आपले वकील कोण आहेत हें विचारताना आतां आपण वकिलीण बाईची सुद्धा तितक्याच आस्थेनें चौकशी केली पाहिजे. आजवर अर्धांगीच्या नात्यानें त्या घरसंसार चालवीत असत, समाजांतहि मानानें वावरत असत. पण आतां पण्डितजी म्हणतात कीं, देशाचें प्रतिनिधित्व करण्यात आणि दरबारांतील हालचालींचें मार्गदर्शन करण्यांतहि त्यांना जबाबदारीचा वाटा उचलावा लागतो.

उगाच नाहीं वकिलाची निवड करताना त्याच्या पत्नीचें रूप, समाजात रुबाबानें वावरण्याचें तिचें कौशल्य, तिचें संभाषणचातुर्य आणि तिचें बुद्धितेज विचारात घेतलें जातें या सर्व गोष्टी दैनंदिन व्यवहारातहि आवश्यक असतात, कारण तुम्ही लक्षात ठेवा, वकिलाचें कामकाज नुसतें वकिलातींत चालत नाहीं. तें दुपारच्या कॉफी ब्रेकच्या वेळीं, सध्याकाळच्या बगीच्यातील समारंभाच्या वेळीं आणि रात्रींच्या खान्याच्या वेळी होणाऱ्या भेटीगाठींतून आणि तेथें होणाऱ्या "गुफ्तगू" तून खरें आकारास येत असतें. त्या प्रसन्न आणि जिव्हाळ्याच्या वार्तालापाला चालना देण्याच्या कामी वकिलीणबाईंचें मनोहर, रूपसुंदर व्यक्तित्व फार फार उपयोगी पडतें

त्या वार्तालापाची पार्श्वभूमि तुम्ही विचारात घ्या. ती अशी कीं बगीचा नसला, फक्त चार दोन खुरटलेलीं रोपें व्हराड्यात ठेवलेलीं असली तरी वकिलीणबाई नुसता प्रवेश करताच म्हणतात, "हाउ व्हेरी नाईस. हाउ लव्हली." अहो पण काय ? काहीं नाहीं. बगीचा हो बगीचा. लगेच त्या देशाचे परराष्ट्रमंत्री त्यांना प्रतिसाद देतांना म्हणतात, "ओ, व्हॉट ए ब्यूटिफुल सारी, इट लुक्स गॉर्जस ऑन यू." गॉर्जस ! साडी आणि ती परिधान करणारें व्यक्तित्व ! वकीलसाहेबांनीं यावेळीं नुसतें हसावयाचें आणि आपल्या पत्नीनें "पवनासवें हळूच नाचणारी कुरळी बट स्वकरांगुलीनें बाजूला सारलेली" पाहताना आजूबाजूच्या समिश्र समूहांत जो आविर्भाव प्रगट होतो त्याकडे नुसती कौतुकानें तेवढी दृष्टि टाकावयाची म्हणजे . . बस्स. राजनैतिक हालचालींना आणखी योग्य तें वातावरण कोणतें असणार ?

हें सारें वकिलीणबाईंच्या शिवाय होईल काय ? वकिलातींचें वातावरण कसें स्निग्ध, मधुर हवें. मऊमऊ कोचें ! पडदे कसे कलात्मक रीतीनें सोडलेले आहेत. एकच आकर्षक कॅलेंडर, मोनालिसाचें स्मित प्रगट करणारें एखादेंच तैलचित्र. तीं दिवाणखान्यांत पडणारीं संथ, कोमल पावलें, तो लव्हेंडरचा दरवळणारा सुगंध. वेणींत खोवलेलें एकच गुलाबाचें सपर्ण फूल आणि नाचणारी एकच एक बट ..

याला म्हणतात वकिलात. एखाद्या ब्रह्मचाऱ्यानें आणि एखाद्या विधुरानें का तिला विशोभित करावें ?

## १५४.

# श्री. बळवंतराय मेहता

बळवतराय मेहता हे गुजरातचे मुख्यमत्री होणार हें स्पष्ट दिसत आहे. गेल्या निवडणुकी-नतरच ते मुख्यमत्री व्हावयाचे. निवडणुकीपूर्वींच तसा घाटहि घालण्यांत आला होता. दहा वर्षें अधिकारपदावर राहिलेल्या लोकानी निवृत्त व्हावें असा जो बूट मध्यतरीं निघाला होता त्याचा आधार घेऊन जीवराज मेहता याना तिकिटच मिळू नये असेंहि कारस्थान शिजवियात आलें होतें.

हें कारस्थान शिजविण्यांत अग्रभागीं होते ढेबरभाई. पण पडिजींच्या कानीं हें प्रकरण जातांच त्यानीं नेहमींप्रमाणें आपल्या कानावर हात ठेवले. वाईटपणा पदरीं आला तो मोरारजींच्या. त्याचें दुर्दैव असें कीं पडितजींच्या प्रेरणेनें जीवराज भाईना तर तिकिट मिळालेंच. पण निवडणुकींत बळवतराय मेहता अनपेक्षितपणें पराभूत झाले.

ते पडले याच्यामागेंहि कांहीं कारस्थान असावें का ? गुजरात हा साधनशुचितेचा पुरस्कार करणारा प्रदेश. साहजिकच त्या पडद्याआड कारस्थानें अधिक सफाईनें करता येतात. माझ्या माहिती-प्रमाणें याहि निवडणुकींत सौराष्ट्रातील कांहीं मातबर मडळींनीं बळवतराय मेहता याच्या विरोधकाना नुसतीच फूस दिली नाहीं तर प्रत्यक्ष आर्थिक साहाय्यहि दिलें. कां ? तर ते पुन्हां एकदा पडावे आणि आपला मार्ग निष्कटक व्हावा.

पण आजच्या कोणत्याहि सौराष्ट्री नेत्यापेक्षा बळवतराय मेहता यांची देशसेवा आणि सार्व-जनिक सेवा अधिक डोळ्यांत भरण्यासारखी आहे. राजेशाहीच्या अंमलात प्रजावाद्यांची तरफदारी हिरीरीनें केली ती बळवतराय मेहता यानींच. म्हणून ढेबरयुग उदयाला येण्यापूर्वी गाधीजींच्या शिष्यगणांत बळवतराय यांनाच मानाचें स्थान असे.

बळवतराय हे विधायक दृष्टीचे, एक अबोल पण खबीर कार्यकर्ते आहेत. लोकसभेमध्यें ते बरींच वर्षें होते. पण ते उठून दिसत ते सभागृहामध्यें नव्हे; कमिट्याच्या बैठकींत. येथें मात्र त्याच्या शांत, अविचल स्वभावाची खूणगांठ सर्वांना पटे आणि पद्धतशीर, मूलग्राही असा त्यांचा कामाचा उरकहि डोळ्यात भरत असे. काळीसावळी त्यांची मूर्ति, साध्या खडबडीत खादीच्या पोशाखांत अंगावर लहानशी शालीची घडी घेऊन बसलेली मी अनेकवेळा सेंट्रल हॉलमध्यें पाहिली आहे त्यावेळीं कोणाला कल्पना नसेल कीं ही मूर्ति कालांतरानें गुजरात सारख्या एका मातबर प्रांताचें मुख्य मत्रिपद भूषवील. पण तें पद भूषविण्याइतकी बळवतराय मेहता यांची जशी तपश्चर्या आहे तसेंच त्यांचें कर्तृत्वहि आहे.

# १५५.

## डॉ. श्रीमाळी

कल्लू लाल या त्याच्या पाळण्यांतील नांवावरून डॉ. श्रीमाळी यांच्याबद्दल तुम्ही कल्पना करू नका. नांवाइतका उपहास करण्यासारखें त्यांचें व्यक्तित्व खास नव्हे, आणि त्याचें कर्तृत्वहि दुसऱ्या प्रतीच्या कोणत्याहि मन्त्र्यापेक्षा अधिक नांवाजण्यासारखें ठरलेलें आहे.

भारत सरकारच्या शिक्षणमंत्रालयाशीं गेलीं दहा वर्षें तरी त्याचा संबंध आहे. मौलाना आझाद यांच्या हयातींत उपमंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण शिक्षणमंत्रालयातील तसाच पार्लमेंटमधील सारा कामाचा उरक त्यानाच करावा लागत असे. शिक्षण खातें आधीच वादग्रस्त. त्यांतच मौलाना आझाद याच्यावर हिंदुत्वनिष्ठ स्वकीय परकीयाचा कडाडून हल्ला व्हावयाचा. त्यात भर पडे ती हिंदीवाद्यांच्या कडव्या उर्दू-द्वेषाची. त्यामुळें मौलानांच्या हयातींत शिक्षण खात्याच्या धोरणाची व कार्यपद्धतीची प्रश्नोत्तरांच्या वेळी किंवा अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळीं जी हजेरी घेतली जात असे ती नुसतीच गरम नव्हे तर मर्मभेद करणारी असे.

बहुश: अशा चर्चेच्या वेळीं मौलाना हजर नसत किंवा असले तरी बोलत नसत. मग साऱ्या टीकेचा प्रहार डॉ. श्रीमाळी यांनाच सहन करावा लागत असे. अशा वेळीं डॉ. श्रीमाळी हे कधी कमी पडले नाहींत, किंवा टीका सफाईदार रीतीनें परतविण्यांतहि त्यांनीं कधी कसूर केली नाहीं. तसे स्वभावानें ते मोठे धीमे आहेत. त्यांचा तोल असा कधीं जातच नाहीं आणि त्याच्या भाषेंत धारदारपणा आला नाहीं तरी आपला मुद्दा टिकवून धरण्याचा त्याचा निर्धार मोठा खंबीर असतो.

हा निर्धार पूर्वी हिंदुत्वनिष्ठाच्या आरोप-प्रत्यारोपांना उत्तर देण्यात ते दाखवीत असत. बनारस विश्वविद्यालयाच्या अनागोंदी आणि भ्रष्ट कारभाराविरुद्ध केंद्रीय सरकारनें जेव्हां खंबीर उपाययोजना केली तेव्हा श्रीमाळी यांना हिंदुत्वनिष्ठांप्रमाणेंच उत्तर प्रदेशातील पूर्वभागाच्या राजकारणी पुरुषाच्या कारवायांना तोंड द्यावें लागलें. पुढें अशाच प्रकारची उपाययोजना अलीगड विश्वविद्यालयाविरुद्ध करण्यात आली तेव्हा मुसलमानी जातीयवादाच्या शक्ति त्यांच्याविरुद्ध खवळून उठल्या.

पण डॉ. श्रीमाळी यांनीं याहि वेळीं आपली मूलभूत भूमिका सोडली नाहीं. कदाचित् अलीगडच्या संदर्भांत "जातीयवादा"चा जो आरोप त्यांच्यावर करण्यात येत असे त्याचेंहि प्रायश्चित्त त्याना या निवृत्तींतून भोगावें लागत आहे कीं काय कोण जाणे !

कसेंहि असलें तरी या शिडशिडीत अंगयष्टीच्या, धिम्या स्वभावाच्या आणि मंदभाषी व्यक्तीनें शिक्षण खात्यावर छाप टाकली यांत तिळमात्रहि संशय नाहीं.

# १५६.

## श्री. जगजीवनराम

श्री. जगजीवनराम हे नेहरूंच्या नंतरचे ज्येष्ठ केन्द्रीय मंत्री आहेत. म्हणजे वयानें नव्हे प्रतिष्ठेनेंहि नव्हे. केन्द्रीय मंत्रिमंडळातील अखंड अस्तित्वानें. त्यांना केन्द्रीय मंत्रिमंडळांत प्रवेश मिळाला तो अनपेक्षितपणें. गांधीजींची कृपा तशीच कल्पना त्यांना उपयोगी पडली. कल्पना ही कीं भारताच्या मंत्रिमंडळांत अस्पृश्याच्या प्रतिनिधीला स्थान हें मिळालेंच पाहिजे.

दैव हें कसें आकस्मिकपणें एखाद्याला हात देतें त्याचें हें उत्कृष्ट प्रत्यंतर आहे. जगजीवनराम बाबू हे त्यावेळीं जवळजवळ अज्ञात होते. कॉंग्रेसशींहि ते संलग्न झालेले नव्हते. असें म्हणतात कीं, १९४२ सालीं ब्रिटिश सरकारच्या मजूर खात्यांतील एका सल्लागाराच्या जागेसाठीं त्यांनीं अर्ज केला होता. पण सुदैवानें त्यांना ती नोकरी मिळाली नाहीं.

त्यांना त्यावेळीं जे दुर्दैव वाटलें असेल तें अतीं फार मोठें भाग्य ठरलें. कारण त्यांच्या दैवांत साधासुधा नव्हे, भारताच्या पहिल्या केन्द्रीय मंत्रिमंडळात समाविष्ट होण्याचा सन्मान लिहिलेला होता. अस्पृश्य आणि कॉंग्रेसजन हे गुणविशेष त्यांच्या बाबतींत इतके मोलाचे ठरले कीं केन्द्रीय मंत्रिपद शोध काढीत त्यांच्या पायाशीं गेलें.

गांधीजींचा आशीर्वाद आणि सरदारांची कृपा यांचें पाठबळ घेऊन जगजीवनराम बाबू जे एकदां केन्द्रीय मंत्रिमंडळात शिरले ते अनेक पुनर्घटना होऊनहि कधीं पदच्युत झाले नाहींत. सरदारांच्या मृत्यूनंतर इतर कांहीं त्यांच्या अनुयायांप्रमाणें जगजीवनराम यांच्यावर मंत्रिपदांतून निवृत्त होण्याची वेळ आली असती. पण त्या वेळीं राजेंद्रप्रसादांचें कृपाछत्र त्यांना लाभल्यामुळें तीहि त्यांच्यावरील आपत्ति टळली.

आता मात्र मंत्रिमंडळातील परस्परविरोधी गटांचे एक मानलेले म्होरके म्हणून त्यांना कॉंग्रेस सेवेसाठीं बाहेर पडण्याचा आदेश मिळाला आहे. मोरारजी यांचे प्रतिस्पर्धी म्हणून ते कां पुढें यावेत आणि मेननवादी डाव्या गटाशीं त्यांनीं कां हातमिळवणी करावी हें एक कोडें आहे. कदाचित् पुढील परिणामाची जाणीव न झाल्यामुळेंच या सत्तास्पर्धेतील एक उमेदवार म्हणून त्यांनीं आपलें नांव पुढें आणावयाला संमति दिली असणें शक्य आहे.

पण त्यामुळें आज त्यांच्यावर इच्छेविरुद्ध निवृत्त होण्याची पाळी आली आहे. त्यांची निवृत्ति कदाचित् लोकांच्या डोळ्यांत भरणार नाहीं. पण त्यांनीं ज्या ज्या मंत्रालयाचा कारभार हाताळला आहे, त्यांतील अधिकारीवर्ग मात्र आज हळहळून म्हणेल कीं, जगजीवनराम बाबूंच्या निवृत्तीमुळें, नेमून दिलेल्या क्षेत्रांत आपलें काम समजून उमजून, पद्धतशीरपणें आणि हाताखालील अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन करून करणारा, एक कुशल कारभारी केन्द्रस्थानावरून निघून जात आहे.

जगजीवनराम यांनीं खरोखरच आपला कारभार निरनिराळ्या मंत्रालयांत चांगला केला. त्यांना झेपलें नाहीं तें सत्तास्पर्धेचें राजकारण. त्यांत कांहीं मतलबी व्यक्तींनीं त्यांना ओढलें आणि अक्षरशः त्यांचा बळी दिला.

## १५७

# खुबसुरत

अरे, रसिकतेचें इतकें वावडें का तुम्हांला ! लोहिया इतर वेळीं कांहीं बोलोत, पण इंदिरा गांधींच्या बद्दल ते जें बोलल्याचें अर्थमंत्र्यांनीं अगदीं शहारे आणून सांगितलें त्यात मला तर कांहींच वावगें वाटत नाहीं. मी सांगतो तुम्हांला, स्वतः इंदिरा गांधींना त्या उद्‌गाराबद्दल मनांतल्या मनांत आनंद–नव्हे अभिमानहि वाटला असेल.

लोहियानीं म्हणे केव्हा तरी म्हटलें होतें, "काँग्रेसमधील इतर कोणी प्रधानमंत्री होण्या-पेक्षा इंदिरा गांधी झाल्या तर मला तें अधिक आवडेल; कारण सकाळच्या वृत्तपत्रात त्यामुळें एक गोडसा चेहरा तरी आपल्याला पाहावयाला मिळेल."

यात शहारे आणण्यासारखें काय वरें आहे ? म्हणजे गोड चेहरा असणें हा एक लोकोत्तर गुण नाहीं वाटतें. अहो, प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनीं सुभेदारांच्या सुनेला काय म्हटलें होतें माहित आहे ना ! ते म्हणाले होते, "आमच्या मासाहेब अशा खुबसुरत असत्या तर आमचेंहि रूप असेंच झालें असतें." क्षत्रियकुलावतंस, गोब्राह्मण–प्रतिपालक श्री छत्रपति शिवाजी महाराजाना काय कमी होतें ! पण त्यांच्यासुद्धा मनांत साहजिक विचार आला कीं आपलें रूप अधिक सुंदर असतें तर किती चांगलें झालें असतें !

मानवी मनाची ही नैसर्गिक ओढ आहे. तें भाग्य सर्वांना थोडेंच मिळणार आहे ! अहो, मी मी म्हणणारे मोठे लोक म्हणतील, हें वैभव नको, ही कीर्ति नको· पाहतांक्षणीं लोकावर छाप पाडणारें गोजिरवाणें रूप मिळालें तर आम्ही सर्वस्वावर लाथ मारू. हें गोजिरवाणें रूप पाहावयाला मिळणें हेंसुद्धां एकप्रकारें भाग्यच नाहीं का ?

पण तिथें रसिकता पाहिजे. मी म्हणतो, भारतानें हा सुद्धां पायंडा कां पाडू नये ? आपले राज्यकर्ते, आपले परदेशांतील वकील, आपल्या सार्वजनिक जीवनांतील नेते निवडतांना स्त्रियांना–आणि स्वरूप-सुंदर स्त्रियांना भारतानें प्राधान्य कां देऊं नये ? बुद्धि आणि प्रज्ञा आणि व्यासंग, आणि विद्वत्ता हें सर्व ठीक आहे. पण सौंदर्य, मोहक व्यक्तित्व यानासुद्धां आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत कांहीं महत्त्व आहेच कीं नाहीं. तें जाणून तर एकदां आपण संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अधिवेशना-साठीं एका स्वरूपसुंदर बेगमेला भारताचे प्रतिनिधि म्हणून पाठविलें.

परवां ठाऊक आहे ना, एका आंतरराष्ट्रीय बैठकींत इंडोनेशियाचे अध्यक्ष डॉ. सुकार्नो हे एका मलायी सुंदरीकडे नुसते टकमक टकमक पाहत राहिले. सौंदर्याचा हा प्रभाव असतो.

पण त्यासाठीं रसिकता हवी. अर्थमंत्र्यांप्रमाणें तिचें वावडें तरी नको.

१५८.

३८८८५ निबंध
९५९८ १५-८-६४

# अजुनि चालतोचि वाट

“ अजुनि चालतोचि वाट माळ हा सरेना. ” हीच ओळ आज आठवली ना तुम्हांला ! होय. विश्रांतिस्थळ-नव्हे नव्हे कार्यस्थळ-अद्याप दूर आहे. खूप माळ अद्याप तुडवावयाचा आहे आपल्याला. पण महाराज, असें चिडून, वैतागून जाऊ नका. या वैतागानें रस्ता थोडाच कापला जाणार आहे आणि श्रम थोडेच कमी होणार आहेत !

त्यापेक्षां मी म्हणतों, वाहनाच्या अभावीं आपल्याला चालवें लागत आहे तर प्रसन्न हृदयानेंच आपण पावलें कां उचलू नयेत ? हें भाग्य तरी पाहा आपलें कीं, आज पावसाच्या सरी कोसळत नाहींत, सूर्य प्रसन्नपणें उगवला आहे आणि मंद वारा सुटला आहे.

हा रस्ता तरी पाहा. नेहमीं गजबजलेला असतो. आज बसची वर्दळ नाहीं. टॅक्सीची भरधांव नाहीं. जाऊ द्या हो, हे मोटारवाले मोठ्या दिमाखानें निघून जात आहेत. पण आज ते आणि आपण दोघेच रस्त्याचे मालक आहोंत-अगदीं बरोबरीच्या दर्जानें हें का विसरता ?

काय थकलांत थोडेसे ? मग जरा उभे राहा. हें समोंवारचें सृष्टिसौंदर्य पाहा. हा पाहा अथांग सागर पसरला आहे. या सागराच्या लाटा अशा निवांतपणें पाहण्याचें सुख तुम्हांला कधीं मिळालें नें ? चौपाटीवरून त्या लाटा पाहण्यापूर्वीं दहा लक्ष लोकांचे धक्के खावे लागतात नाहीं का ? आणि बसमधून कसलें दर्शन होणार कपाळाचें !

त्या शांत, निवांत दर्शनाची तुम्हाला संधि मिळावी, सृष्टिमातेशीं समरस होण्याचा योग यावा, नेहमीं बंदिस्त वाहनात अडकून पडणारे तुमचे पाय मोकळे व्हावे म्हणून तर सरकारनें आणि संपवाल्यानीं एकजुटीनें हा वाहनबंदीचा कार्यक्रम तुमच्यासाठीं सुरू केला. या सुयोगाबद्दल त्याना धन्यवाद देतच, चला आपण मार्गक्रमण करू या.

चला, चला, आता जरा झपझप पावलें टाकू या निम्में अंतर तर काटलें. आतां फक्त अकरा बस स्टॉप्स ओलांडावयाचे आहेत सध्या आपण पहिल्याच टप्प्याचा विचार करू या. तेंच जणु आपलें इच्छित स्थळ आहे अशी कल्पना केली ना, म्हणजे अंतर भासत नाहीं. माझा आपला अनुभवसिद्ध सल्ला घ्या. दिल्ली दूर असेल. पण डहाणू रोड तर जवळ आहे ना !

चला, फक्त हजार पावलें टाका. अशी दहा वेळां हजार पावलें टाकलींत कीं, तुमचें कार्य-स्थळ आलें.

आणि मग कचेरींत शिरताना, तुम्ही आणि मोटारवाले एकाच फरशीवरून चालणार आहात. म्हणजे काय, तुम्ही आणि ते सारखेच.

तुमचे पाय दमलेले असतील. पण केवढा मोकळा वारा तुमच्या कानांत शिरलेला असेल आणि केवढ्या सृष्टिसौंदर्याचा आविष्कार तुमच्या मनाला झालेला असेल. म्हणून म्हणतों, नुसतेच प्रसन्नपणें नव्हे, पण अभिमानानें पावलें टाका.

# १५१.

## महाराष्ट्राची सून

आज रणजित पंडित हयात असते तर आपल्या पत्नीचें मराठींतील पहिलें भाषण ऐकताना यांचा ऊर अभिमानानें भरून आला असता आणि त्यांच्या वडिलांनीं तें ऐकलें असतें तर नितांत कौतुकानें ते म्हणाले असते, " आमची सूनबाई आहेच तशी गुणांची ". एवढें गजान्तलक्ष्मीचें माहेरचें वैभव. पण—

" पडवीला कणगी पोतीं
मोतीं त्यामधि बिनमोल "

असणाऱ्या कोंकणच्या सासरची तिनें ओढ घेतली. आणि आज बघा, साऱ्या दुनियेंत नांव मिळवून ती आपली सासरच्या विसाव्याला परत आली.

पंडिताच्या घरची ही सून. एका दृष्टीनें महाराष्ट्राचीहि सून आहे. त्या घराला जसा तिचा अभिमान वाटतो तसाच महाराष्ट्राला वाटला तर काय नवल ! विजयालक्ष्मी हें तिचें नाव. अनेक क्षेत्रात तिनें विजय संपादन केला आणि लक्ष्मीचा वरदहस्त जन्मतःच तिला जो लाभला तोहि तिला कधीं पारखा झाला नाही. राजकन्येचें ऐश्वर्य तिच्या वांट्याला आलें तसेंच तिचें रूप. दैवानें दोन्ही हातानीं तिला अगदीं भरभरून दिलें हेंच खरें.

पण विजयालक्ष्मींनीं आपल्या कर्तृत्वानें आपल्या माहेरचा आणि सासरचा अशा दोन्ही कुळाचा लौकिक शतगुणित केला ही तर त्याची सुदैवावरीलहि मात म्हणता येईल. भारतांतच काय जगांतहि कोणत्याहि स्त्रीला किंवा पुरुषालाहि क्वचितच मिळाला असेल असा सन्मान त्यांनीं मिळविला. क्षणभर त्या सन्मानाचा विचार केला तरी मन दिपून जातें, पुलकित होतें. मग क्षणभर वाटूं लागतें कीं आता विजयालक्ष्मींच्या मनाला एकच खत राहील आणि ती म्हणजे मिळविण्यासारखें कांहीं राहिलेंच नाहीं ही !

कोण जाणे पण ! महाराष्ट्राची ही सून जशी गुणी आणि भाग्यवान् तशीच विलक्षण महत्त्वाकांक्षी. तिच्या महत्त्वाकांक्षेला कोणतें न्यून राहील हें कोणीं सांगावें !

गरीब भाबडा महाराष्ट्र आपल्या सुनेचे मराठींतील पहिले बोल ऐकून अगदीं मनांतल्या मनात हरखून जाईल आणि एवढेंच कौतुकानें म्हणेल, " सूनबाई, थोड्याच दिवसाचा तुझा सहवास लाभला पण मराठीचे पांग फेडलेस तू , आता कोठेहि जा. महाराष्ट्राच्या सदिच्छा सदैव तुझ्या पाठीशीं राहतील. "

## १६०.

# भव्य आणि दिव्य

सत्तावीस लक्ष रुपये खर्चून मुंबईसमोरच्या महासागरात गांधीजींचा पुतळा उभारण्यांत येणार आहे. हा सागर किती महत्त्वाचा आहे हें तुम्ही लक्षात घ्या. यालाच आपण आरबी सागर म्हणतों. त्या सागरात गांधीजींचा पुतळा उभारण्यात येणार आहे. सागराच्या प्रलयकारी लाटांप्रमाणेंच हृदय उचंबळून आणणारी ही घटना नव्हे काय ?

दुसरी गोष्ट लक्षात घ्या. गांधीजींचें उभें जीवन संघर्ष आणि संग्राम यांनीं भरलेलें होतें. त्या संघर्षांत ते धीरोदात्त, अविचल राहिले. अजस्र लाटा-विरोधाच्या, विटंबनेच्या, उपेक्षेच्या त्यांच्या अंगावर येऊन आदळल्या. पण तरी ते अविचल राहिले. त्यांच्या या धीरोदात्ततेचें प्रतीक म्हणून त्यांचा हा पुतळा समुद्राच्या लाटांशीं अखंड झगडत राहिला तर तें त्यांचें एकमेव उचित स्मारक होणार नाही काय ?

आणखी एक गोष्ट सांगतों. तुम्हीं कधीं न्यूयॉर्कचा विचार केला आहे काय ? तेथील वैशिष्ट्यपूर्ण अशी गोष्ट कोणती ? स्वतंत्रता देवीचा भव्य पुतळा. हा पुतळा भूमीवर उभारण्यात आलेला नाहीं. अमेरिकेची ही स्वातंत्र्यदेवता उचंबळून येणाऱ्या लाटा परतवीत सागराच्या पोटांत उभी आहे. भव्यतेचें हें खरें अधिष्ठान स्फूर्तीचा साक्षात्कार अशा रोमांचकारी पार्श्वभूमीवरच होत असतो. ती पार्श्वभूमि आणि तें अधिष्ठान आपण राष्ट्रपित्याच्या पुतळ्याला दिलें तर ! तर काय ! या पृथ्वीतलावर दोनच शहरें आपल्या वैशिष्ट्यानें चमकतील-न्यूयॉर्क आणि मुंबई. आणि या पृथ्वीतलावर दोनच पुतळे अविस्मरणीय होतील. एक स्वतंत्रता देवीचा आणि दुसरा भारताच्या राष्ट्रपित्याचा. हा संयोग-ऐतिहासिक आणि भौगोलिक— तुम्ही लक्षांत घ्या.

म्हणजे मग सत्तावीस लक्षांची तुम्हाला मातब्बरी वाटणार नाहीं. अहो, सत्तावीस लक्ष म्हणजे काय ! शेअर बाजारांतील एका व्यक्तीचा एक सौदा. लीधो आणि बेचो यामधील किरकोळ नफातोटा ! असे अनेक सत्तावीस लक्ष या नुसत्या कल्पनेवरूनच आपण ओवाळून टाकले पाहिजेत.

भव्य, दिव्य असें कल्पनाचित्र रंगविण्याची संवय लावून घ्या, महाराज; असे रुपये आणे पैचे किरकोळ हिशेब काय करीत बसता आहां. सागराच्या लाटांचें तांडव सहन करणारा, गगनचुंबी पुतळा उभारून आपण अमेरिकेशीं टक्कर देणार आहोंत हें ध्यानीं धरा.

## १६१.

# मॉस्कोंत पगडी

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे मॉस्कोला पगडी घालून जाणार आहेत हें वाचून मला किती आनंद झाला म्हणून सागू. आनंद अशासाठीं कीं आपलें वैशिष्ट्य सोडायला ते तयार नाहींत. महाराष्ट्राच्या अस्मितेची साक्ष पटते ती अशा बाणेदारपणामुळें. खरोखर पोतदार म्हणतात त्याप्रमाणें चांगल्या गोष्टी टाकून का द्यावयाच्या ?

आता ही पगडीच पाहा. तिला इतिहास आहे. मग ती पगडी पेशव्यांची असो कीं शिंद्यांची असो. त्या पगडींतील एकेक झिरमिळी ही आपल्या वैभवाची निदर्शक असते बरें. ती नुसती डोक्यावर ठेवली कीं गतेतिहासाचा सारा चित्रपट डोळ्यांसमोर उभा राहतो आणि आपलें तें शौर्य, ती मुत्सद्देगिरी, तो कारकपणा तसाच तो विलास, तीं भोजनें आणि ती पलायनें, सारें सारें कांहीं आपल्या मनश्चक्षूसमोरून सरकू लागतें आणि क्षणार्धात आपण त्या इतिहासांतच जणु वावरू लागतों.

महामहोपाध्याय हे तर काय चालता बोलता इतिहासच. तो इतिहास पगडींतून बोलू लागला तर मॉस्कोवासीयांना त्याचें अधिक कौतुक नाहीं का वाटणार ? आधींच तिचा रंग लाल. म्हणजे पाहा, सोव्हियट क्रांतीच्या-इतकेंच कशाला, प्रत्यक्ष मार्क्सच्याहि आधीं महाराष्ट्रानें लाल रंगाचा स्वीकार केला आहे हें आपल्याला सिद्ध करून देतां येईल. एकदां डोकें लाल झालें कीं लाल तत्त्वज्ञानाचा मनावर पगडा बसायला कितीसा वेळ लागणार आहे. उगाच नाहीं समाजवादी भारतांत, समाजवादी महाराष्ट्र स्थापन करण्याचा निर्धार फक्त महाराष्ट्रांतच व्यक्त होऊ शकला.

महामहोपाध्यायाच्या पगडीपासून मॉस्कोवासीयाना आणखीहि एक चांगली स्फूर्ति घेतां येईल. ती म्हणजे पगडी फिरविण्याबद्दलची. सोव्हियट प्रधानमन्त्र्याना आज त्याची फार फार गरज आहे. रशिया-चीन वादात जी तेढ आलेली आहे ती नाहींशी करण्याचा एकच परिणामकारक मार्ग म्हणजे पगडी फिरविण्याचा. तशीच पगडी फिरविण्याची करामत रशियन पुढाऱ्यांना भारत-चीन सीमावादांतहि करावी लागणार आहे. माझी तर अशी सूचना आहे कीं पोतदारानीं आपल्या-बरोबर पगडीचा एक जोड न्यावा आणि त्यातील एक त्यानीं क्रुश्चेव यांना बहाल करावी.

महाराष्ट्राची स्मृति जागृत ठेवण्याच्या दृष्टीनें तिचा जसा उपयोग होईल त्याचप्रमाणें पगडी फिरविण्याच्या राजकारणाचा साक्षात्कार होण्यासाठींहि ती उपयोगी पडेल. अडचणींत सांपडलेल्या रशियाला त्यातून केवढा दिलासा मिळेल म्हणून सांगू !

## १६३.

## उद्घाटन !!

चला, तुमची काळजी मिटली. आता मंत्री निवृत्त होणार, मग उद्घाटनाचें काय होणार हीच ना तुमची चिंता. तुम्ही अगदीं निर्धास्त असा. आपली सरक्षणाची आघाडी कोसळली, आपल्या नेतृत्वाची दुसरी फळी तयार झाली नाहीं तरी उद्घाटकाची दुसरी फळी मात्र या क्षणीं तयार झालेली आहे.

हे उद्घाटक तसे नवशिके आहेत. म्हणून त्यांच्याकडे छोटींछोटीं उद्घाटनाचीं कार्ये सोपविण्यात येत आहेत. हेंच पाहा ना बोरीबंदरचें स्लॉट मशीन लहानसेंच आहे. फक्त दहा नये पैसे गिळतें तें. म्हणजे दहा नया पैशाचें एक नाणें. नाहींतर तुम्ही आपले नया पैशांची दहा नाणीं टाकाल. हा तुमचा गैरसमज होऊ नये म्हणून तर मध्य रेल्वेच्या धोरणी अधिकाऱ्यानी प्रत्यक्ष रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षाना त्या यंत्राच्या उद्घाटनासाठी बोलाविलें. बापडे लोककल्याणासाठीं दिल्लीहून आले आणि स्वतःच्या खिशातील दहा नया पैशाचें नाणें टाकून त्यानीं एक प्लॅटफॉर्मचें तिकिट बाहेर काढलें. कर्तव्यतत्परता म्हणतात ती ही बरें. रेल्वे बोर्डाचा सारा कारभार त्यांना संभाळावा लागतो. पण कर्तव्याची हाक येताच एका लहानशा उद्घाटनासाठींसुद्धां त्यानीं दोन हजार मैलांच्या प्रवासाचे परिश्रम घेतले.

खरोखर बैजल साहेबांनीं कार्यैकनिष्ठेचा आदर्श घातला आणि मंत्र्यांवर पडणारा ताणहि आपल्या कष्टानें दूर केला. तुम्ही आपलें लक्षांत ठेवा, उद्घाटनासाटीं माननीय पाहुणा म्हणून कोणाला आणावें याबद्दल फार काळजी करण्याचें आता तुम्हाला कारण नाहीं. या देशात कार्यतत्पर, कष्टाळू अशा अधिकाऱ्याचें जणु मोहोळ तयार झालें आहे बरें.

आपले पोलीस कमिशनरसाहेबसुद्धा पाहा ना. साऱ्या मुंबईच्या रक्षणाची त्यांच्यावर जबाबदारी. संप काय, मोर्चे काय, चोऱ्या काय, दरोडे काय, खून काय, नुसती आग भडकलेली असते त्यांच्या भोंवतीं पण या आगींत जळत असतांनाहि विधायक कार्याकडे ते कधींहि दुर्लक्ष करीत नाहींत. त्यांच्या मनाचा पिंडच असा सेवाभावी आहे.

त्या सेवाभावाच्या वृत्तीनेंच ते काल परवां ऑपेरा हाऊसपाशीं आले. कशाकरितां ? साध्या दिवाबत्तीच्या उद्घाटनाकरितां. शाबास ! मी जास्त बोलू शकत नाहीं. कारण माझें हृदय भरून आलें आहे, शब्द तोंडांतून फुटू शकत नाहींत.

मी एवढेंच म्हणतों, हा सेवाभाव लोकोत्तर आहे. ऑपेरा हाउसवरील ट्रॅफिक सिग्नलच्या लाल, पिवळ्या, हिरव्या दिव्यांनो, तुम्हाला जर कर्तव्यदृष्टिहि असेल तर या सेवाभावाकडे लक्ष देऊन तरी आपलें मार्गदर्शनाचें कार्य अविरतपणें करीत राहा. पोलीस कमिशनर साहेबानीं तुमच्या-सारख्या लुकलुकणाऱ्या दिव्याच्या उद्घाटनासाटीं एवढा अमूल्य वेळ खर्च केला आहे हें ध्यानीं घेऊन तरी आपलें कार्य सचोटीनें आणि इमानानें करा.



...१२

## १६३.

# अश्लीलतेचें मोजमाप

कै. कृष्णराव मराठे यांचा आत्मा देवलोकात, स्वर्गलोकात जेथें कोठें असेल तेथें नितांत समाधानानें तो आज उद्‌गार काढीत असेल "माझ्या उभ्या जन्माच्या तपश्चर्येचें सार्थक झालें. आज साहित्य समेलनाचे अध्यक्ष वाङ्मय फौजदार होऊन अश्लील साहित्यिकांना धारेवर धरू लागले आहेत. त्यांचा निःपात करण्यासाठीं कायद्याचा बडगा उचलण्याची मागणी करू लागले आहेत. माझें तरी मागणें दुसरें कोणतें होतें? प्रभो, आता माझ्या आत्म्याचें समाधान झालें. आता उर्वरित कार्य पुरें करण्यासाठीं माझ्या आत्म्याला दुसऱ्या कुडींत घातलें नाहींस तरी चालेल."

कृष्णराव मराठे यांच्या आत्म्याचें समाधान का बरें होऊ नये! अहो, अश्लीलता विरोधाची आघाडी त्यांनीं उघडल्यानतर एक साहित्यसमेलन-मोठें आणि छोटें, बृहन्महाराष्ट्रांतील, महाराष्ट्रातील आणि गावोगावींचें–असें गेलें नसेल कीं ज्यात कृष्णरावानीं अश्लीलता विरोधासाठीं आपला बडगा उचलला नसेल. त्यावेळीं त्याची उपेक्षा झाली, हेटाळणी झाली आणि त्याचा ठरावसुद्धा कधीं संमत झाला नाहीं. नुसता कागदी ठराव सुद्धा.

पण आता ठरावच नुसता नाहीं तर त्याची अमलबजावणीहि होऊ लागली आहे, प्रत्यक्ष सरकारचे दरवाजे त्यासाठीं खडखडवले जाऊ लागले आहेत. आपल्या काकाची तरी कार्यनिष्ठा पाहा, महात्मा गांधींच्याप्रमाणें

"आज कराची, उद्याच राची परवां तजावर। जागवी केव्हा पेशावर" या पद्धतीनें आज बेळगांवचा सीमाप्रश्न मिटव, उद्या कृष्णा-गोदावरीचें पाणी-वांटप कर आणि परवा साहित्य संमेलनाच्या आदेशानुसार अश्लील साहित्यिकाच्या मुसक्या बांध असें अनेकविध कार्य ते तत्परतेनें पार पाडीत आहेत.

खरोखर कृष्णरावानीं नुसती ज्योत पेटविली. आज काकानीं चूड हातीं घेतली आहे. त्यांत सारी अश्लीलता जळून खाक झाल्याशिवाय कशी राहील!

अश्लीलता! लेखनांतील, चित्रांतील, व्यग्यचित्रातील. साहित्यिकानो, कलाकारानो आणि त्यांच्या आश्रयदात्या प्रकाशकानो, आतां जें काहीं तुम्ही लिहाल, रगवाल, प्रकाशित कराल, त्याच्या मर्यादा नीट हेरून नव्हे मोजून मापून ठरवा कारण ज्या मानवी शरीराच्या अंगोपांगाचें तुम्ही वर्णन कराल त्याचा कोणता उच्च सखल भाग अश्लीलतेच्या टप्प्यात येईल तें सांगता येणार नाहीं.

तसें पाहिलें तर या मर्यादा, मोजमापासहित साहित्य समेलनानेंच जाहीर केल्या तर अधिक इष्ट होणार नाहीं काय?

## १६४.

# कोरडा उन्माद

परदेशी प्रवाशाची संख्या घटत चालली आहे. ती कां ? तर दारूबंदीमुळें, असें एका केंद्रीय मन्त्यानेंच जाहीर केलें आहे. त्यामुळें भारताचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान होतें, आणि म्हणून या प्रवाशांकरितां तरी दारूबंदी शिथिल करावी अशी त्यांनीं शिफारस केली आहे.

मी म्हणतो मुळींच करू नये कां करावी ? आपली नीति सुधारावी, आपल्या लोकांचें जीवनमान सुधारावें म्हणून तर दारूबंदी हें आपण आपलें श्रद्धास्थान केलें ना ? मग हीच आस्था आपण परदेशीय लोकासाठींहि का दाखवू नये ? त्याची सुद्धा नीति ढासळली जाऊ नये म्हणून आपण खटपट करायला नको काय ?

भले त्यासाठीं आपला आर्थिक तोटा होऊ द्या ! अरे बाबांनो, असे कमकुवत होण्यापूर्वी आपल्या केंद्रीय अर्थमन्त्र्याची मूर्ति तरी डोळ्यासमोर आणा. त्यांना तुम्ही म्हटलेत, प्रवाशाची घट होत आहे, तर ते तात्काळ उत्तर देतील, "आम्हाला असे मद्यपी, अनाचारी परदेशी प्रवासी नकोतच मुळी !"

त्यांच्या व्यसनांतून मिळणारें द्रव्य ! त्याची भारतानें अभिलाषा करावी ! अरे, असे कोट्यवधि रुपये आपण समुद्रांत फेकू. पण आपलें चारित्र्य नाहीं गमविणार, नीतिमूल्यांशीं प्रतारणा नाहीं करणार.

राजबहादुरजी, तुम्ही असे कच्च्या दिलाचे कसे निघालांत ! उगाच इतकीं वर्षें केंद्रीय मन्त्रिमंडळात राहिलांत तुम्ही. प्रत्यक्ष अर्थमन्त्र्याच्या सहवासांत राहूनहि तुम्ही त्यांचा आग्रहीपणा, त्यांचा उन्मादच म्हणाना, आत्मसात् करू शकलां नाहींत ना !

खरें सांगू का, राजबहादुरजी, ओल्या उन्मादापेक्षां हा कोरडा उन्माद प्रत्यक्षपणें वरचढ ठरतो. कारण ओल्या विभागांत मला लोकांचे डोळे लाल झालेले आढळले, कधी अर्धोन्मीलित झालेलेहि दिसले. पण कोरड्या ठणठणीत विभागात मात्र नशेनें बेहोष झालेले, डोळे मिटून निपचित पडलेले लोकच मला अधिक आढळले.

ही गत नशाबाजांची. पण प्रत्यक्ष कोरडे लोक तर त्याहिपेक्षां बेधुद असतात. आग्रहीपणाचा कैफ त्यांच्या डोळ्यावर इतका येतो कीं त्यांची सारासार विचारशक्तीहि नष्ट होते. नव्या भारताला अशा आग्रही लोकांची खरी गरज आहे हें राजबहादुरजी, तुम्ही कसे बरें विसरतां !

म्हणून म्हणतों, आपण देशांतील आणि परदेशातील लोकांना एकच संदेश दिला पाहिजे "दारू पीना हराम है"

## १९६५.

# अंधाऱ्या जगाचा सूत्रधार

डॉ. वॉर्ड यांचें निधन झालें. साऱ्या जगानें त्यांच्या निधनाची नोंद घेतली. त्यांच्याबद्दल आता सहानुभूतीची एक बारीकशी लाटहि उसळलेली दिसत आहे, आणि कांहीं हृदयांत पश्चात्तापाची.

ब्रिटनमधील अंधाऱ्या जगात जे वावरत होते त्यांचे डॉ. वॉर्ड हे अग्रणी होते. ते खुल्या जगाच्या प्रकाशांत आलेहि नसते. पण ब्रिटिश युद्धमंत्र्यानें त्या अंधाऱ्या जगात प्रवेश केला आणि तोहि एका रशियन अधिकाऱ्याच्या संगतीनें ! म्हणून ब्रिटनच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आणि एके दिवशी आयव्हेनॉव्ह, प्रोफ्यूमो, ख्रिस्तीन कीलर यांच्याबरोबर डॉ. वॉर्ड हे झगझगीत प्रकाशांत आले, सरकारच्या आणि चारित्र्यवान् लोकांच्या रोषाला तोंड द्यावयाची त्यांच्यावर पाळी आली.

त्यानंतर ब्रिटनमधील अंधाऱ्या जगाचें आणि डॉ. वॉर्ड यांच्या निवासस्थानातील कामक्रीडेचें जगाला दर्शन झालें. तें कोणाला कामुक वाटलें असेल, कोणाला किळसवाणें आणि कोणाला केविलवाणें. मानवी प्रकृतिनुसार प्रत्येकाच्या प्रतिक्रिया भिन्न झाल्या असणें साहजिकच आहे. डॉ. वॉर्ड हे त्या लैंगिक विकृतीच्या खेळांतील सूत्रधार आणि प्रेक्षकसुद्धा. तेवढ्यासाठींच तर त्यांनीं प्रेक्षकाला अदृश्य ठेवून अंतर्गृहातील कामक्रीडांचें दर्शन घडवून आणणारा चमत्कृतिपूर्ण आरसा आपल्या महालात बसविण्याची कल्पना काढली.

या कामक्रीडेंत रममाण होणाऱ्या एका सुंदरीनेच संतापाच्या भरात तो आरसा फोडला आणि वॉर्ड यांच्यावर कोसळणाऱ्या संकटाची जणू प्रतीकात्मक पूर्वसूचना दिली. कारण थोड्याच दिवसांत डॉ. वॉर्ड यांच्या जीवनाचा आरसाहि असाच छिन्नभिन्न झाला. आणि आतां त्यांचें प्रत्यक्ष जीवनसुद्धां.

त्या जीवनावर संकट कोसळलें तेव्हा त्यांच्या मित्रांनीं, आणि प्रियकरणींनींसुद्धां त्यांना साथ दिली नाहीं ही त्यांची खरी शोकांतिका. अनीतीच्या जीवनाबद्दलच्या आरोपांनीं ते खचले नाहींत. पण या कृतघ्नपणामुळें मात्र त्यांचा जीवनाबद्दलचा धीर सुटला आणि आत्मघाताला ते प्रवृत्त झाले.

डॉ. वॉर्ड यांच्या निधनामुळें आतां ब्रिटनच्या या अंधाऱ्या जगातील कृष्णकारस्थानें न्यायालयाच्या दरबारात प्रगट होणार नाहींत पण त्यांच्या कांहीं प्रियकरणींच्या पश्चात्तापाचे उमाळे, कांहीं लब्धप्रतिष्ठिताचे चाळे आणि सूडबुद्धीनें उकरून काढण्यांत येणारे खरे खोटे साक्षीपुरावे यांनीं ब्रिटनमधील खळबळ उडविणाऱ्या वृत्तपत्रांचे रकाने मात्र बराच काळ भरभरून बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहींत.

ब्रिटिश जीवनाचें वैशिष्ट्य आहे तें हेंच कीं तेथे उच्च आणि नीच, सुंदर आणि असुंदर सारख्याच खुलेपणानें वावरत असतें.

## १६६.

## स्वप्न कीं सत्य?

विश्वास ठेवा अगर ठेवू नका. पण काल रात्रीं पुन्हा एकदां फ्लोरा माझ्या स्वप्नांत आली. वर्षापूर्वी ती अशीच माझ्या स्वप्नात आली होती आणि त्यावेळीं तिनें खिन्नपणें मला म्हटलें होतें 'सारे जण मला विसरले. इतकीं वर्षें मी उन्हातान्हांत, पावसापाण्यात या चौकात उभी राहिले आहे. मुंबईकराच्या सुखदुःखात समभागी होत. पण आता माझ्या भावनाचा विचार न करता एखादी सवत आणावी तसा माझ्यासमोर एक पुतळा उभा करण्यांत येत आहे.'

फ्लोरा फाउंटनची ही स्फूर्तिदाती देवता आज पुन्हां मला भेटली. पण तिचा नूर किती बदलला होता आज. तिच्या चर्येवर आज हसू होतें आणि आनंदानें नाचतबागडतच ती माझ्या-पाशीं आली होती. मी आश्चर्यानें म्हटलें "फ्लोरा, तूच का ती?"

"होय मीच" फ्लोरा एक गिरकी घेत म्हणाली. तिच्या पांढऱ्या शुभ्र हातांत कोंवळीं फुलें होतीं. तीं इतस्ततः उधळीत ती मला म्हणाली, "आज कीं नाहीं, माझ्यावर सुद्धा पुष्पवृष्टि झाली. सारा गुलाल उधळला गेला माझ्यावर. आणि त्या सुवासिनींच्या हातांतील तीं तबकें, त्यांतील तीं निरांजनें किती मनोहर दिसत होतीं म्हणून सांगू? बस्स. असा देखावा उभ्या आयुष्यात मला पाहावयाला मिळाला नव्हता. आज माझें नारीहृदय संतुष्ट झालें आहे. आमच्या स्वर्गलोकांत जशी आरती होते ना, तशीच आज मला पाहावयाला मिळाली आणि माझ्या डोळ्याचें पारणें फिटलें."

फ्लोरा बोलत होती. तिचे डोळे चमकत होते. आणि नाचऱ्या पावलांनीं ती खोलीभर फिरत होती मोठ्या प्रयासानें तिला थांबवीत मीं म्हटलें, "पण फ्लोरा, त्या पुतळ्याचें काय? तो तुला सवतीसारखा भासत होता ना."

"नाहीं नाही." फ्लोरानें आवेशानें म्हटलें, "ते माझे सवंगडी होणार आहेत आता आणि रक्षणकर्ते सुद्धां आता मला कुणाचें भय नाहीं. अहो, त्याची ती मूठ पाहिलीत का तुम्हीं? अशी आवळली आहे त्यानें जोरानें. कोणाचा हात अडकला तर चकाचूर होईल त्याचा, उभ्या चौकाला त्याची दहशत बसेल आतां."

"आणि तो दुसरा त्याचा सोबती." मीं कुतूहलानें विचारलें.

"बिचारा!" फ्लोरानें खिन्नपणें म्हटलें, "त्याच्या चर्येवर चिंतेचें कसें जाळें पसरलें आहे. मला कळत नाहीं, दुःख आणि चिंता या पृथ्वीतलावर कायम घर करून कां राहिली आहे आणि भांडखोरपणा! अहो, तो पुतळा उभारला ना आणि लगेच तिथें जमलेले लोक आपापसांत भांडू लागले. मला बाई, त्याची मात्र भीति वाटते . .

फ्लोरा बोलता बोलतां निघूनहि गेली. मी स्वतःला विचारू लागलों हें स्वप्न कीं सत्य?

## १९६७.

## बाळा, जो जो रे

जीवनातील कोणतीहि ताटातूट ही मन खिन्न करणारी असते. मृत्यूमुळें होणारी ताटातूट ही तर हृदय पिळवटून टाकणारी असते. त्यांतच तरुण जीवाचा मृत्यु झाला तर दुःखाला सीमा राहत नाहीं. आणि नुकत्याच उमलणाऱ्या फुलाप्रमाणें कोवळ्या असणाऱ्या बालकाचा मृत्यु ?

कोणीहि सहृदय माणूस त्यावेळीं एवढेंच म्हणतो, " देवा, वैऱ्यावर सुद्धां असा प्रसंग येऊ देऊ नको. "

तो प्रसंग आज फिलिपाईन्समधील मातापित्यावर आकस्मिकपणें ओढवला आहे. अरेरे ! कांहीं तासापूर्वींच मॅनिलामधील विमानतळावर त्या एकवीस बालवीराना निरोप देण्यासाठीं या माता आल्या असतील तेव्हां त्या चिमण्या बालवीरांचा आनंद आणि उत्साह पाहून त्याना केवढें कौतुक वाटलें असेल. त्या कौतुकाच्या भरांत विरहाच्या भावनेनें जमा होणारे अश्रूहि त्यानीं मागे सारले असतील.

पण काय त्याचें दुर्दैव ! ते दाटून येणारे अश्रु त्यांनी त्या क्षणीं आवरून धरले. पण आतां कायमच्या विरहामुळें अश्रूंची अखंड धार त्याच्या डोळ्याना लागावी अशी नियतीनें त्याच्यावर वेळ आणली आहे.

कोवळे बालवीर ! बालवीराच्या मेळाव्यात भाग घेण्यासाठी ते आनंदाने घराबाहेर पडले. जगाचें दर्शन घेण्याची त्यांना उत्सुकता होती. उंच आकाशांत घिरट्या घालणाऱ्या पक्षाची झेपच यावेळीं त्यांच्या मनश्चक्षूसमोर होती. ती झेप कॉमेटच्या वेगानें ते प्रत्यक्ष घेऊहि लागले. आणि आता आकाशातून पृथ्वीवर क्षणकाल विसावा घेण्यासाठींच ते उतरत असतांना त्यांच्या आशा-आकांक्षा आणि मातापित्याच्या त्यांच्याबद्दलच्या आशा धुळीस मिळवणारा एक भयानक अपघात घडला.

पुन्हा एकदा सांताक्रूझच्या विमानतळानेंच आपल्या कुशींत शिरू पाहणाऱ्या एका हवाई पक्षाला निष्ठुरपणें दूर लोटलें. इजा, बिजा आणि तिजा अशी ही तिसरी वेळ. दोन वेळा डोंगर-माथ्यानें त्या पक्षाच्या ठिकऱ्या उडविल्या; आज खवळलेल्या सागरानें त्याला पोटांत घेतलें.

नुसत्या हवाई पक्षालाच नव्हे. त्याच्या अंतरिक्षांत २१ चिमणीं पाखरें होतीं. क्षणापूर्वी त्यांची केवढी किलबिल चालली असेल. क्षणार्धात एकाच एका कर्णकटु किंकाळीनें सारें आसमंत भरून गेलें असेल.

आणि त्यानंतर सारें शांत. चिमणीं पांखरें कायमचीं निद्रावश झाली राहिला तो अंतःकरण चिरकाल जाळणारा दाह—मातापित्याच्या अंतःकरणातील. त्यांचे सांत्वन कोण करू शकेल ?—फक्त काळ.

# १६८.

## मग उरलें काय ?

बहिणीच्या जिव्हाळयानें विजयालक्ष्मी पंडित यानीं पंडितजींच्या उदासीनतेबद्दल खेदाचे उद्गार काढले. त्या म्हणाल्या, " सहजसुलभ रागाची आणि हास्याची त्यांच्या मुद्रेवर होणारी प्रतिक्रिया आज लुप्त झाली आहे. आतां ते फक्त उदासीन, विषण्ण होतात. "

पंडितजींच्या जीवनाची ही दारुण शोकांतिकाच नव्हे तर काय ? त्यांच्या रागाचा पारा चढलेला पाहण्याचा ज्यांना प्रसंग येत असे त्यांनाच क्षणार्धाच्या अवसरानंतर त्यांच्या मुद्रेवर उमटणारें प्रसन्न स्मित किंवा त्यानंतर थोड्या वेळानें खळखळून बाहेर पडणारें मुक्तहास्य अनुभवायला मिळत असे. त्या मुक्तहास्यात केवढा खेळकरपणा आणि मिस्किलपणाहि प्रगट होत असे ! पंडितजींचा तिटकारा करण्यासाठीं पुढें सरसावलेले लोक प्रत्यक्ष त्यांच्या सहवासात गेल्यानंतर जे त्यांचे अनन्यभक्त बनत ते या सहजसुलभ संतापीपणामुळें आणि त्याहीपेक्षां अधिक सुलभ अशा त्यांच्यामधील खेळकरपणामुळें.

संतापून लाल लाल होणें हा त्यांचा मूळस्वभाव. त्या प्रक्षुब्ध भावनावेगात ते केव्हां कोणावर फायली फेकतील, केव्हा कोणावर धावून जातील याचा नियम नसे. पण तो एकच क्षण आणि दुसऱ्या क्षणीं काळेकुट्ट ढग दूर होऊन सूर्यकिरणें चमकावीं तसें त्यांच्या मुखावर प्रसन्न स्मित विलसू लागे.

तें आता लुप्त झालें ही कल्पनाच केवढी हृदयद्रावक आहे. जीवनाचें वैशिष्ट्य गेलें, व्यक्तीचें स्वत्व हरपलें तर मग राहिलें काय ! पंडितजी हे जनतेचे लाडके जवाहरलाल झाले ते त्यांच्या तेजस्वी वृत्तीमुळें, प्रसन्न व्यक्तिमत्वामुळें. त्या तेजाचा आविष्कार त्यांच्या संतापांत होत असे. त्या प्रसन्नतेची खूण त्यांच्या स्मितहास्यात मिळत असे

तो संताप गेला आणि उरली फक्त उदासीनता, विषण्णता. काळानें हें परिवर्तन केलें कीं परिस्थितीनें ? व्यक्तिगत जीवनात हें परिवर्तन होतच असतें. पण पंडितजींचें जे व्यक्तित्व थोडथोडकीं नाहीं, गेलीं पन्नास वर्षें जो भारतखंड पाहत आहे त्या भारताला एका चिरतरुण, तेजस्वी आणि सस्मित अशा व्यक्तित्वातच पंडितजी दिसत आले आहेत.

दुसऱ्या कोणत्याहि रूपांत पंडितजींना पाहणें हें म्हणूनच भारताला पटणार नाहीं. विषण्ण, उदासीन असे पंडितजी ही स्वतः पंडितजींनाच नव्हे तर भारतालाहि आपली शोकांतिका वाटेल.

## १९६१.

# स्वतःस ओळखणारा पुढारी

दादासाहेब पाटसकर हे आतां पद्मविभूषण झाले आहेत. दुसऱ्या क्रमाकाचा हा सन्मान आहे. स्वतः पाटसकरांना विचारलें तर ते प्रामाणिकपणें म्हणतील : "मला साजेसाच हा सन्मान आहे." आपल्या मर्यादा ओळखणारा त्याच्यासारखा कार्यकर्ता क्वचितच आढळून येईल, दादासाहेबांचे वैशिष्ट्य आहे तें तेंच आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न चिघळला होता त्याच वेळीं ते अचानक केंद्रीय कायदेमंत्री झाले. साहजिकच त्यांच्या बंगल्याकडे शिष्टमंडळांची वर्दळ सुरू झाली, वाटाघाटींचे व पर्यायाचे पवित्रे त्यांच्या दिवाणखान्यांतील रात्रींबेरात्रीं होणाऱ्या बैठकींतून निघू लागले दादासाहेब पाटसकर हे नाहीं म्हटलें तरी केंद्रस्थानीं आले. पण त्यांचा स्वतःचा दृष्टिकोण असा कीं "माझें जें कांहीं थोडेंसें वजन केंद्रस्थानीं आहे त्याचा तुम्हांला उपयोग करून घेतां आला तर पाहा; माझ्याकडून फारशी अपेक्षा मात्र करू नका."

आपल्याला मोठें महत्त्व द्यावें, आपल्याभोंवतीं एखादें तेजोवलय निर्माण केलें जावें अशी दादासाहेब पाटसकर यांचीहि अपेक्षा नसे. 'आपलें व्यक्तित्व साधें, आपल्या गुणांतहि असामान्य असें कांहीं नाहीं आणि वक्तृत्व म्हणा किंवा व्यासंग म्हणा यांतहि मनावर मोहिनी टाकणारी कांहीं किमया आपल्यापाशीं आहे असेंहि नाहीं.' हें दादासाहेबांचें स्वतःबद्दलचे मूल्यमापन आहे. पण असामान्य असणाऱ्या किंवा म्हटल्या जाणाऱ्या नेत्यांमध्यें सहसा दिसून न येणारी सत्प्रवृत्ति मात्र पाटसकरांच्यामध्यें अपरंपार आहे. त्यामुळेंच उन्मत्तपणानें वा निदान अहंकारानें तरी अनेकांनीं जें घालविलें तें पाटसकरांनीं केवळ आपल्या सौजन्यानें व विनयशीलपणानें उदंडपणें मिळविलें.

उदंडपणेंच नाहीं तर काय ! मी म्हणतों तें यशाबद्दलच नव्हे. सदिच्छेचें जें धन त्यांनीं गाठीं बांधलें तें त्याहिपेक्षां मोठें आहे. ही सदिच्छा महाराष्ट्राच्या प्रश्नाचा उलगडा होताना अनेक वेळां उपयोगी पडली, हें मला माहीत आहे. पाटसकरांनीं त्याचा गाजावाजा केला नाहीं. महाराष्ट्राचे नेते व बुद्धिदाते सहसा आपल्याखेरीज दुसऱ्याला श्रेय द्यावयाला तयार नसल्यामुळें त्यांनींहि कधीं पाटसकरांचें ऋण मान्य केलें नाहीं. पण राजधानीच्या राजकीय जीवनाचा जे त्यावेळीं कानोसा घेत होते त्यांना मात्र पुरेपूर पटलें होतें कीं अशोक रोडवरील पाटसकरांच्या निवासस्थानातून सद्भावनेचे व सदिच्छेचे जे सूर छेडले जात होते त्यानीं दिल्लीश्वराच्या अंतःकरणांत थोडा अधिक दिलासा खास निर्माण केला.

त्याची जाणीव ठेवणाऱ्या लोकांना, पाटसकराना मिळालेला हा नवा सन्मान निश्चितपणें योग्य वाटल्यावाचून राहणार नाहीं.

# १९७०.

## केल्यानें देशाटन

लहानपणीं एक कविता शिकविलेली मला आठवते. त्यातील एक ओळ अशी होती : " केल्यानें देशाटन पंडित-मैत्री, सभेत संचार ". पुढची ओळ आठवत नाहीं. बहुधा त्यांत म्हटलेलें असेल कीं देशाटन केल्यामुळें अनेक नव्या गोष्टी पाहावयाला मिळतात, अनेक अनुभव पदरीं बांधले जातात. जगाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोण मिळतो.

पण त्यासाठीं दृष्टि कशी विशाल ठेवली पाहिजे मन कसें उदार ठेवलें पाहिजे. मग सभोवार प्रगट होणाऱ्या नव्या विश्वापासून आपल्याला अनेक गोष्टी शिकतां येतील, आपल्या ज्ञानाचीं तशीच सहानुभूतीचीं क्षितिजें अधिक व्यापक करता येतील. आपल्याला आज त्याचीच अधिक गरज नाहीं का ?

आताच पाहा, फक्त पधरा दिवस उलटून गेले आणि मी इतकें पाहिलें, इतकें ऐकलें, इतकें अनुभवलें कीं तें सांगावयाची सुरुवात कोठून करावी याचाच मला सभ्रम पडला आहे. तो का पडावा हें मात्र मला समजत नाहीं. कारण जें कांहीं सागावयाचें आहे तें सुरुवातीचें असो कीं पुढचें असो, त्याच्या मनोरजकतेवरच त्याचें मूल्य ठरावयाचें आहे ना ! मग जी काही अनुभवांची मोतीं आणि माणकें गोळा केली आहेत तीं खुशाल इतस्ततः उधळलीं तरी काय झालें ?

होय मोतीं आणि माणके. मी कांहीं शख आणि शिंपले गोळा करण्यासाठी येथें आलेला नाहीं. तें ज्याना करावयाचें आहे ते ख्रिस्ताईन आणि प्रोफ्युमो आणि त्या प्रकरणाचीं चवदार वर्णनें करणारीं वृत्तपत्रे यांच्या पोतेऱ्यातच लोळत राहतील. राहू द्या त्यांना तेथें. गाधीजींनीं मिस् मेयोच्या पुस्तकावर अभिप्राय देताना म्हटलें होतें कीं, 'वाहत्या गटारांची ज्याना पाहणी करावयाची आहे त्यानीं ती खुशाल करावी. त्यांना त्यात आनंद वाटत असेल तर तो का हिरावून घेतला जावा?' तसेंच येथें आहे. ब्रिटनच्या सामाजिक जीवनात उच्च आणि नीच असें दोन्हीहि आहे. ज्यांना खालच्या पातळीवरील ब्रिटनच पाहावयाचें असेल त्यानीं निशाचराचें जेथें थैमान चालतें तेथेंच घिरट्या घालाव्या.

तुम्ही आणि आम्ही मात्र जरा सभ्य, सुसस्कृत, अशा समाजांत हिंडू या, राजमार्गानेंच नव्हे तर सन्मार्गानें जाऊ पाहणाऱ्या ब्रिटिश जीवनाच्या एकेका पैलूचें दर्शन घेऊ या. तो एकेक पैलू पाहून माझा आशावाद खरोखरच बळावला आहे. असें निश्चित वाटू लागलें आहे कीं, ब्रिटन हें राजकीय, आर्थिक दृष्टीनें दुय्यम प्रकारचे राष्ट्र झाले असेल. पण जगाच्या राजकारणाला कलाटणी देण्याचें, लोकशाहीवादी स्वतत्र जगाचें नैतिक नेतृत्व घेण्याचे सामर्थ्य अद्यापहि ब्रिटिश राष्ट्रात आणि विशेषतः ब्रिटिश लोकांत आहे.

त्यासाठींच त्या राष्ट्राचें आणि तेथील लोकाचें विहगावलोकन आपण करू या. चला महाराज, चला आमच्याबरोबर. बघू या तर खरें कसें आपल्याला हें जमणार आहे तें !

## १९७१.

## ज्ञानपीठ

मला आश्चर्य वाटलें. दहा अकरा वर्षांचीं मुलें. राष्ट्रकुलसंघातील राष्ट्रांच्या जीवनाबद्दलचें एक कायमचें भव्य प्रदर्शन लंडनमधील एका नव्यानें उभारण्यात आलेल्या भव्य इमारतींत उघडण्यात आलें आहे तें प्रदर्शन ही लंडनमधील मुलांची एक पाठशाळाच झाली आहे. कारण इतिहास आणि भूगोल याचें प्रत्यक्ष शिक्षण घेण्यासाठीं या प्रदर्शनाचा उपयोग करून घेण्यात येऊं लागला आहे

त्या दिवशीं अशींच काहीं मुलें हे प्रदर्शन पाहण्यासाठीं आलीं होतीं. दहा अकरा वर्षांचीं मुलें असतील तीं. छापील प्रश्नपत्रिका घेऊन त्या प्रश्नांचीं उत्तरें तेथील माहितीवरून तीं काढीत होतीं. मी त्यांना प्रश्न केला, "बाळांनो, राष्ट्रकुलसंघाच्या या इमारतींत तुम्ही आलां आहांत. पण राष्ट्रकुलसंघ म्हणजे काय हें तुम्हांला माहीत आहे का?" क्षणभर तीं मुलें चाचरलीं. पण नंतर त्यांच्यापैकीं एका मुलानें धीटपणें उत्तर दिलें, "पूर्वीं जे ब्रिटिश साम्राज्यात देश होते ते आता राणीच्या नेतृत्वाखालीं एका संघटनेंत आले आहेत, त्याला राष्ट्रकुलसंघ म्हणतात."

आश्चर्य वाटावें असेंच हें उत्तर होतें. पण ब्रिटनमधील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या ज्या सवलती उपलब्ध आहेत त्यांतूनच हें काटेकोर ज्ञान प्राप्त झालेलें आहे. कॉमनवेल्थ इन्स्टिटयूट हें राष्ट्रकुलसंघाच्या बाबतींतील एक ज्ञानपीठच झालेलें आहे. आधुनिक स्वरूपाचा तो एक म्युझियम आहे. एकच भव्य इमारत. त्याच्या तीन मजल्यात ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा यांच्यासारखे स्वतंत्र देश, भारत, पाकिस्तान, सिलोन यांच्यासारखे नव्यानें स्वतंत्र झालेले देश, आणि केनिया व इतर स्वातंत्र्याच्या मार्गावरील वसाहती यांच्याबद्दलची सर्व माहिती पद्धतशीरपणें व ठळकपणें नजरेंत भरेल अशा रीतीनें देण्यांत आलेली आहे. ब्रिटनमधील विद्यार्थ्यांना आतां भारताबद्दलचें नुसतें पुस्तकी ज्ञान मिळणार नाहीं. त्याना भारतीय जीवनाचें, त्याच्या इतिहासाचें, भूगोलाचें, कलेचें, शिल्पकलेचें, घटनेचें आणि रीतिरिवाजाचें प्रत्यक्ष दर्शन तेथें घ्यावयाला मिळेल.

ती माहिती जी मुलांच्या अंत:करणावर ठसेल ती भाराभर पुस्तकांचीं पारायणें करून मिळणार नाहीं साहजिकच मुलांचे जणु शैक्षणिक वर्ग या इन्स्टिटयूटमध्यें भरू लागले आहेत. त्या इन्स्टिटयूटचें वैशिष्ट्य असे आहे कीं, तिची इमारत नवी कोरी आहे, तिची बांधणी आकर्षक आहे. आणि तेथील वातावरण ताजें, टवटवीत आणि चमकदार आहे. तो म्युझियम आहे खरा. पण म्युझियममधील कोंदट, विद्याभ्यासजड वातावरण तेथें नाहीं. खुली हवा, मुबलक उजेड, आणि मन उचावणारी उंची यांतून निर्माण होणाऱ्या प्रसन्न वातावरणांत तेथें ज्ञानाचीं कवाडें खोलण्यात आलीं आहेत.

## १९३.

### चमत्कार

हा चमत्कारच नव्हे तर काय ! नॉटिंगहॅमच्या परिसरात कोळशाच्या खाणी अनेक आहेत. या खाणींमुळें जमीन हादरते, कधी कधी दहा दहा फुटांपर्यंत खालीं असते. इमारतींच्या स्थैर्याच्या दृष्टीनें हा धोकाच नाही का ?

तो धोका ध्यानीं घेऊन येथील आर्किटेक्टांनी एक नवीन प्रयोग सुरू केला आहे. त्यानीं "क्लास्प" पद्धतीनें इमारती बांधावयास सुरुवात केली आहे क्लास्प ही तसें म्हटलें तर एक संघटना आहे. तिचें नाव "कॅन्सॉर्टियम ऑफ लोकल अथॉरिटी सोशल प्रोग्राम" त्यांतून 'क्लास्प' हें संक्षिप्त नांव तयार झालें. नॉटिंगहॅम काउंटींतील अधिकारी आणि तज्ज्ञ यांच्या सहकार्यातून ही योजना नावारूपाला येत आहे.

कल्पना आर्किटेक्टांची. ती कल्पना अशी की भुसभुशीत जमिनीवर इमारत उभी करावयाची तर पाया मजबूत ठेवण्यासाठीं सिमेंट खोलपर्यंत ओतलें पाहिजे. तरी सुद्धां स्थैर्याची ग्वाही देणें कठीण आहे. मग साठ वर्षांच्या काळापुरता विचार करून त्या काळात जमिनीची किती हालचाल होईल याचा अंदाज बांधून इमारतीच्या पायात आणि भिंतींत मजबूत स्प्रिंग घालून त्या इमारतींना आधार कां देण्यांत येऊं नये ? तसें झालें तर साठ वर्षेपर्यंत, जमिनीचा नुसता कलच नव्हे तर प्रत्यक्ष धरणीकंप यापासूनसुद्धा इमारती सुरक्षित ठेवतां येतील.

नॉटिंगहॅमच्या परिसरांतील रशक्लिफ बॉईज ग्रामर स्कूलच्या इमारतींत अशा रीतीनें बसविण्यात आलेल्या स्प्रिंगजहि मीं पाहिल्या. हा एक नवीन प्रयोग आहे. चमत्कारहि आहे. मानवी बुद्धीची सारी कुशाग्रता आणि कल्पकता अशा तऱ्हेच्या चमत्कारांतून प्रतीत होते.

ही झाली कल्पकता. तिला जोड मिळाली आहे व्यवहाराची. यापुढील काळात शाळा, स्टेशन्स, क्लिनिक्स, अनाथाश्रम, वृद्धालयें आणि अशाच तऱ्हेच्या सार्वजनिक संस्थांची उभारणी या सहकार्यातूनच व्हावयाची आहे. म्हणजे डिझाइन्स, इमारतीसाठीं लागणारा सारा कच्चा आणि पक्का माल, त्यांची उभारणी, त्यावरील देखरेख हीं सर्व कामे 'क्लास्प'कडेच सोपविण्यांत येतील. इमारतीसाठीं साधारणपणें सत्तावीस प्रकारचा माल लागतो तो 'क्लास्प' एकाच वेळीं घाऊक भावानें खरेदी करीत असते. त्यामुळें आठ टक्केपर्यंत खर्चाची बचत होऊं शकते असा अंदाज आहे.

आपण सहकार्याच्या घोषणा करतों, सहकारी संघटनाच्या उभारणीसाठी आवाहन करतों. पण सहकार्याचा आपला मुख्य आधार म्हणजे सरकारी सहकार्य. त्यातून जो परावलंबीपणा निर्माण होतो तो लाल फितीच्या प्रभावामुळें वाढीस लागतो आणि अखेरीस उरतो तो सहकारी संघटनेचा अस्थिपंजर.

सार्वजनिक संस्था आणि खाजगी व्यक्ति यांच्या सहकार्यातून निर्माण झालेला सहकारी संघटनेचा हा प्रयोग आपल्याला मार्गदर्शक होणार नाहीं काय ?

# १७३.

## ' पंडित हाऊस '

नॉटिंगहॅमच्या परिसरातील एक शाळा. अर्नोल्ड काउटी हायस्कूल. पण तेथें एक ' पंडित हाऊस ' आढळून आलें. विजयालक्ष्मी पंडित यांच्या सन्मानार्थ तें स्थापन करण्यांत आलें आहे. म्हणजे त्या शाळेंतील एका खोलीला तें नांव देण्यात आलेलें आहे. नुसतें नाव नाहीं. त्यामागील भूमिका अशी कीं ' पंडित हाऊस ' मध्यें समाविष्ट झालेल्या मुलांमुलींनीं भारताबद्दलची माहिती मिळवावी, तेथील जीवनाबद्दल चर्चा करावी, त्याविषयीं लिहावें, आणि एकंदरीनें भारताबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

आपल्याकडील शाळातहि अशा ' हाऊसेस ' असतात. पण या शाळेनें एक नवीन पायंडा पाडला आहे. निरनिराळ्या खंडांतील व देशांतील प्रसिद्ध पुरुषांच्या नावानें विद्यार्थ्यांचे संघ तेथें निर्माण करण्यात आले आहेत. ' पंडित हाऊस ' भारताचें प्रतीक. ' आल्बर्ट श्वायत्झर ' याच्या नांवानें आफ्रिकेची आठवण जागृत करण्यांत आली आहे. त्या बाबतींत भेदभाव नाही, राजकीय पूर्वग्रह नाहीं. रशियाला वाहिलेल्या एका हाऊसला ' माकारेंको ' असें नाव देण्यात आलेलें आहे. क्रांतीनंतरच्या काळात शिक्षणाची पुनर्घटना करण्याचं महान् कार्य माकारेंको यांनीं केलें होतें.

तसेंच ' चेशायर हाऊस.' युद्धात जायबंदी झालेल्या या वीरानें दुर्बलांना आधार देण्यासाठीं जगातील निरनिराळ्या भागांत अनाथाश्रम काढले. त्याच्या या थोर कामगिरीची जाणीव म्हणून त्यांना ' चेशायर होम्स ' असेंच नाव देण्यात आलें आहे. नॉटिंगहॅममधील एका लहानशा शाळेनें चेशायर याच्याबद्दलची गुणग्राहकता व्यक्त करावी हें त्या शाळेला केवढें भूषणावह आहे !

त्यात दिसून येते ती विश्वप्रेमी वृत्ति. कारण त्याशिवाय जगांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या कार्याबद्दल आस्थेनें विचार करण्याइतकें मन विशाल होणार नाहीं. अर्नोल्ड काउटी हायस्कूलनें त्या विशाल मनाचा प्रत्यय आणून दिला. त्याचं श्रेय अर्थातच शाळेचे हेडमास्तर मि. हिगिन्स यानाच प्रामुख्यानें दिलें पाहिजे. पण एक ज्योत उजळली कीं त्यांतून अनेक ज्योति प्रज्वलित केल्या जातात तसे हिगिन्स याच्या विशाल दृष्टिकोणाचें लोण शाळेंतील अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोचलें आहे. पंडित हाऊस'च्या घटकाशीं बोलतांना मला आढळून आलें कीं यांपैकीं अनेक विद्यार्थ्यांना भारताबद्दल नुसतें ज्ञानच झालेलें नाहीं तर त्यांना आपल्या देशाबद्दल आस्था आणि जिव्हाळाहि वाटू लागला आहे.

देशादेशातील गर्व, पूर्वग्रहाचे आडपडदे दूर करण्यासाठीं बाल्यावस्थेंतील विद्यार्थ्यांनीं बद्धपरिकर व्हावें यासारखी आशादायक घटना दुसरी कोणती असू शकेल ?

# १८९४.

## लेडी गोडायव्हा

एका स्त्रीनें भारून टाकलेलें शहर असें मी कॉव्हेन्ट्रीचें वर्णन करीन. ही स्त्री लोकोत्तर होती आणि लोकविलक्षण अशा दिव्यांतून तिला जावें लागलें. लेडी गोडायव्हा तिचें नाव. सुमारें नऊशें वर्षांपूर्वी ती होऊन गेली पण कॉव्हेन्ट्री कॅथेड्रलच्या परिसरात ती एका पुतळ्याच्या रूपानें तर अस्तित्वात आहेच, पण दर अर्ध्या तासानें तिची प्रतिकृति मिरवणुकीनें एका घराच्या गच्चीवर आणण्यात येते व तेथें जमणाऱ्या जनसमुदायाला तिचें दर्शन होतें.

लेडी गोडायव्हा हिनें कॉव्हेन्ट्रीला असें भारून का टाकलें आहे? ती एक कहाणी आहे, जिच्यांतून या लोकोत्तर स्त्रीच्या लोकप्रेमाची साक्ष पटते. होय. लोकांवरील प्रेमाची. त्या प्रेमासाठीं तिला कॉव्हेन्ट्रीच्या भर रस्त्यांतून नग्नावस्थेंत घोड्यावरून रपेट मारावी लागली.

लेडी गोडायव्हा एका सरदाराची पत्नी. नऊशें वर्षांपूर्वी त्या सरदाराच्या हातीं किती अनियंत्रित सत्ता असेल त्याची कल्पनाच करावी. त्या सत्तेंतून जुलूम जबरदस्ती येई, असह्य कर-भाराचें ओझें लोकांवर लादलें जाई. लेडी गोडायव्हा कनवाळू अंतःकरणानें लोकांच्या दुःखाकडे पाही आणि आपल्या पतीची मिनतवारी करून तें दुःख कमी करण्याचा प्रयत्न करी.

हा प्रयत्न करीत असतानाच एके दिवशीं आपल्या स्वामीला तिनें करभार हलका करण्याची विनति केली. त्या दिवशीं तिच्या स्वामीला आकस्मिकपणें एक अनपेक्षित लहर आली. तो तिला म्हणाला, "लोकांवरील प्रेमासाठीं तू वाटेल तो त्याग करावयाला तयार होशील? मी सांगेन तें ऐकशील?" लेडी गोडायव्हा निर्मळ मनानें म्हणाली, "होय महाराज, करभार हलका करा; मी वाटेल तें दिव्य करीन."

आणि त्यानंतर त्यानें काय सांगितलें? तो म्हणाला, "लेडी गोडायव्हा, मी करभार हलका करतों. पण त्यापूर्वी कॉव्हेन्ट्रीच्या भर रस्त्यानें तुम्ही नग्नावस्थेंत घोड्यावरून रपेट केली पाहिजे."

वज्राघात आणखी दुसरा कोणता असू शकेल काय? लेडी गोडायव्हा दिङ्मूढ झाली. तिनें प्राणार्पण करण्याचीहि तयारी दाखविली. पण तिच्या स्वामीनें आपली अट सोडण्याचें मान्य केलें नाहीं.

लेडी गोडायव्हानें लोकांवरील प्रेमासाठीं तें दिव्य केलें. नऊशें वर्षांपूर्वी ही लोकोत्तर स्त्री कॉव्हेन्ट्रीच्या रस्त्यानें आपल्या पतीच्या लहरीनुसार अनावृत अवस्थेंत घोड्यावरून रपेट मारीत गेली. साऱ्या कॉव्हेन्ट्रींतील एकहि दरवाजा वा खिडकी त्या दिवशीं उघडी राहिली नाहीं. एकाच कर्मनष्ट इसमाला एका छिद्रांतून पाहण्याचा मोह आवरला नाहीं. असें म्हणतात कीं त्याच क्षणीं त्याचे डोळे कायमचे गेले. लेडी गोडायव्हा मात्र त्या दिवशीं अमर झाली.

कॉव्हेन्ट्रीला गेलीं नऊशें वर्षें तिनें भारून टाकलें आहे. ब्रिटनच्या समाज–जीवनात तिला अढळ स्थान प्राप्त झालें आहे.

# १७५.

## राजा राममोहन रॉय

ब्रिस्टलमधील एक दफनभूमि. तिला भेट देण्याचें तसें कारण पडलें नसतें. पण भारतातील एका श्रेष्ठ पुत्राच्या पार्थिव देहाची रक्षा या ठिकाणीं मातीला मिळाली आहे त्या पावन भूमीवर आज एक समाधि उभी आहे.

लहानशीच, पण उठून दिसणारी. तिचा आकार भिन्न आहे. तिची घडण वेगळी आहे. हिंदु मंदिराची ही घडण आहे. तेच चौरंगाचे खूर, तीच महिरपी, तोच कळस. समाधि लगेच डोळ्यात भरते आणि पाय तिकडे ओढले जातात.

राजा राममोहन रॉय यांच्या नावाची मोहिनीहि तशीच आहे. आधुनिक काळातील तो एक पुराणपुरुष होता—भव्य, धीरोदात्त, स्फूर्तिप्रद. बंगालने त्या काळीं अनेक सुपुत्रांना जन्म दिला. पण या पुत्राची उंची फारच मोठी. त्याच्या विचारांची झेंप जणू आकाशाला गवसणी घालणारी आणि त्याच्या कर्तृत्वाचें तर मोजमाप करणेंहि कठीण.

ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळांत ब्रिटिश संस्कृतीचें मूल्य अजमावणारा हा पहिला भारतीय पुरुष. त्यानें ही राजवट हें वरदान मानलें नाहीं. पण भारताचा सुसंस्कृत जगाशीं संपर्क घडवून आणणारा दुवा म्हणून या राजपुत्रानें इंग्लंडच्या आचारविचारांचें स्वागत केलें, त्याचा स्वीकार करण्याचें भारतीयांना आवाहन केलें. त्यातूनच सतीपद्धतीला विरोध निर्माण झाला, ब्राम्हो समाजाची स्थापना करण्याला चालना मिळाली.

राजा राममोहन रॉय यांनीं पुराणप्रियतेला जो धक्का दिला, रूढी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनिष्ट चालीरीति यांच्याविरुद्ध जे रणशिंग फुंकलें आणि कर्मकांडाचा बडिवार माजविणाऱ्या धर्माला आधुनिकतेचें, वैचारिकतेचें वळण लावण्यासाठीं जे परिश्रम घेतले ती त्याची अविस्मरणीय अशी कामगिरी आहे एका व्यक्तीनें, इतक्या प्रतिकूल परिस्थितींत, इतक्या दूरदृष्टीनें आणि विशाल दृष्टिकोणातून कार्याची उभारणी करावी हें खरोखरच अपूर्व आहे. पण त्यामुळेंच आधुनिक भारताच्या पुनरुज्जीवनाचा प्रवर्तक म्हणून राजा राममोहन रॉय यांचें नाव चिरस्मरणीय राहिलेले आहे.

ब्रिस्टलमधील त्याच्या समाधीवर फुलें वाहतांना म्हणूनच मला वाटलें कीं या भारतीय सुपुत्राचा देह या ठिकाणीं पडावा हेंसुद्धां प्रतीकात्मकच मानावें लागेल. एका प्राचीन संस्कृतीचा, आधुनिक सुसंस्कृततेशीं जो दुवा जोडला गेला त्याचेंच हे प्रतीक का मानलें जाऊ नये ?

## १७६.

# नवा पुरुषावतार

" हा कोण सप्रति नवा पुरुषावतार " असेच उद्गार आज केनेडी यांच्या विजययात्रेची चित्रें टेलेव्हिजनवर पाहताना मनातून उत्स्फूर्तपणें बाहेर पडतात.

टेलेव्हिजननें सारें अंतर तोडून टाकलें आहे खरें. प्रत्यक्ष दर्शन, नव्हे प्रत्यक्ष सहवास घडवून आणणारें हें चमत्कृतिपूर्ण साधन आहे. नभोवाणीवरून नुसता आवाज ऐकू येत असे. आतां बर्लिनच्या परिसरात, लक्षावधि लोकांसमोर केनेडी भाषण करीत आहेत, तें आटोपून डब्लिनला जाण्यासाठीं ते विमानतळावर आले आहेत, डब्लिनमध्यें त्यांची मिरवणूक चालली आहे, हें सर्व क्षणोक्षणीं अगदीं उत्कटपणें आपल्या डोळ्यांसमोर येतें.

तें नुसतें दृश्य नव्हे. प्रत्यक्ष जीवनाची वास्तवता, त्यांतील चैतन्य, जिवंतपणा त्यात प्रगट होतो मग वाटतें अमेरिकेचे लाडके अध्यक्ष आपल्यापासून दूर नाहींत, त्यांचें तें मन जिंकणारें मुक्तहास्य प्रत्यक्षपणें आपल्या वाट्याला आलेलें आहे.

केनेडी यांनी या मुक्तहास्यानें जर्मनीचें आणि आयर्लंडचें मन जिंकलें. आयर्लंड ही तर त्यांच्या पूर्वजांची मातृभूमि. साहजिकच आपला एक सुपुत्र जगांतील सर्वश्रेष्ठ देशाचा पहिला नागरिक बनला याबद्दल आयरिश लोकांना आनंदाचें भरतें येऊन त्यांनीं डोळ्यातील आनंदाश्रूंनीं त्यांचें स्वागत करावें यात काय नवल ! जर्मनी हा सुद्धा भावनाप्रधान देश. जीव ओंवाळून टाकण्याचीच तेथील लोकांची वृत्ति. आज त्यांना वाटलें कीं बर्लिनमध्यें आणि दोन जर्मनींच्या अंतःकरणांत उभारलेली दुराव्याची भिंत फोडून टाकण्याचें सामर्थ्य या तरण्याबाड, निधड्या छातीच्या पण विचारपूर्वक पाऊल टाकणाऱ्या अमेरिकन अध्यक्षात आहे. म्हणून फ्रँकफूर्ट, कोलोन आणि बर्लिन या तिन्ही शहरांत साऱ्या जर्मन लोकांनीं भावनेचे सारे बंध तोडून केनेडी यांचें स्वागत केलें.

केनेडी यांना भावविवश लोकांची नाडी किती ओळखता येते हें त्यांनीं बर्लिनमधील भाषणांत " इख बिन बेर्लिनेर " ( मी बर्लिनर आहें ) अशी जर्मन भाषेंत घोषणा करून व्यक्त केलें. त्या क्षणीं त्यांनीं बर्लिनच्याच नव्हे तर जर्मनीच्या अंतःकरणाला हेलकावा दिला; तें अंतःकरण कायमचें जिंकलें.

भावनेचा हा प्रभाव ब्रिटिश राष्ट्राला आणि ब्रिटिश लोकांना कधीं कळेल काय ? बिचारे थंड प्रकृतीचे, विचारी, उपचारातच मग्न असणारे हे लोक आहेत. त्यांना भावनेचा उन्माद काय असतो आणि त्या उन्मादातूनच आत्म्याची शुद्धि कशी होते व तो कसा उन्नावतो हें कसें कळणार ?

केनेडी आणि त्यांचें जर्मनी-आयर्लंडमधील उत्स्फूर्त, भावनोत्कट स्वागत तरी त्यांना कसें कळणार ?

१९१७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## देवा, क्षमा कर

" फादर फरगिव्ह " ( देवा, क्षमा कर ) एवढे दोनच शब्द कॉव्हेन्ट्रींतील उध्वस्त कथेड्रलमधील जळून कोळसा झालेल्या क्रूसामागें कोरलेले आहेत.

क्षमा ! कोणाला ? तें धर्ममंदिर उध्वस्त करणाऱ्या जर्मन राष्ट्राला ? नाहीं. क्षमा सर्वांना, जर्मनांना, तुम्हां आम्हां सर्व लोकांना. कॉव्हेन्ट्रीनें संदेश दिला आहे तो हा कीं जें कांहीं घडलें त्याला दुनियेंतील प्रत्येक व्यक्ति जबाबदार आहे; एकाच राष्ट्राला, एकाच जनतेला त्याबद्दल दोषी धरणें हें हितावह नाहीं. त्यातून द्वेषभावना फैलावेल, हृदयाचें मीलन दुरावेल.

म्हणून कॉव्हेन्ट्रीच्या कॅथेड्रलनें कळवळून म्हटलें आहे, " हे प्रभो, आम्हांला क्षमा कर. "

हा संदेश जसा उदात्त आहे तशीच नव्यानें उभारलेली कॅथेड्रलची इमारतहि अंतःकरण पावन करणारी आहे. उध्वस्त झालेल्या वास्तूच्या शेजारींच हें नवें धर्ममंदिर उभारण्यांत आलेलें आहे.

ते आधुनिक आहे, नव विचारांना चालना देणारें तें आहे. भव्यता ही दोन्हीकडे सारखीच. प्रभूच्या दर्शनासाठींच जणु हे मनोरे आकाशाच्या पोकळींत प्रवेश करू पाहतात. मनाची उंची वाढावी, मानवतेच्या सेवेचें क्षितिज विस्तार पावावें म्हणून का हीं धर्ममंदिरें भव्यतेकडे झेप घेत असतात ?

कॉव्हेन्ट्रीच्या नव्या कॅथेड्रलनें तर भव्यतेलाच जणु आव्हान दिलें आहे. तसेंच कल्पकतेला, कलात्मकतेला. येथें नुसतीच बांधणी नवी नाहीं, येथें रंगाची खुलावट आहे, प्रतीकांची उधळण आहे, बायबलच्या शिकवणुकींतून व्यवहारी जगाला मार्गदर्शन करू पाहणाऱ्या आणि त्याच वेळीं सत् विरुद्ध असत्च्या लढ्यांत सत्याच्या विजयाची ग्वाही देणाऱ्या शिल्पाकृति आहेत.

कॉव्हेन्ट्रीच्या नव्या कॅथेड्रलनें शिल्पकलेचा जसा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्याचप्रमाणें धर्मशिक्षणाचा, नीतिशिक्षणाचा एक नवा पायडाहि पाडण्याचा प्रयत्न केला आहे. उध्वस्तातून विधायकाची कशी नवी उभारणी करतां येते याचेंहि तें एक भव्य प्रतीक आहे.

म्हणूनच कॉव्हेन्ट्रीच्या पुनरुज्जीवनाचें तें केंद्र आणि स्फूर्तिस्थान झालें असलें तर त्यांत काय आश्चर्य ?

RFFBK-0013736